# श्रीमद्भागवतकथा



## सुबोध मराठी कथारूप

## अविनाश नगरकर

# श्रीमद्भागवत

## संक्षिप्त गोष्टीरूप कथामृत

## खंड १

अविनाश महादेव नगरकर

ई साहित्य प्रतिष्ठान

श्रीमद्भागवत (Shreemadbhagavat)
खंड पहिला


अनुवादक : अविनाश महादेव नगरकर
nagarkaram@yahoo.com
12 kilbaaha Close,
Dannimora
Auckland 2013, Australia
फोन नंबर. 00649 2715555



प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com
esahity@gmail.com

प्रकाशन : १ जुलै २०१४ (आषाढ शुद्ध चतुर्थी)



©esahity Pratishthan® 2014



निर्मिती सहाय्य : अलका पाटिल



- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.
- या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण किंवा रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

## ||श्रीगुरु:शरणं||

संपूर्ण जगदेव नंदनवनं सर्वेऽपि कल्पद्रुमा: गाङ्गंवारि

समस्तवारिनिवहा: पुण्या समस्ता:क्रिया: |

वाच: संस्कृतप्राकृत: श्रुतिशिरो वाराणसी मेदिनी

सर्वावास्थितिरस्य वस्तूविषया दृष्टे परब्रह्मणि ||



हे परब्रह्मरुपी सद्गुरो, आपल्यासाठी संपूर्ण विश्व म्हणजे एक नंदनवनच आहे. सर्व वृक्ष आपणास कल्पवृक्षच आहेत. सर्व जलाशय गंगा आहेत व आपल्या सर्व क्रिया अत्यंत पवित्र आहेत. आपली वाणी संस्कृत असो कीं प्राकृत ती मला वेदासम शिरोधार्य आहे. सर्व भूमी आपल्यासाठी वाराणसीच आहे. कारण आपण सदैव ब्रह्मभावात असता.

**अनंत कोटी ब्रह्मांडनायक भगवान योगीराज सद्गुरू वामनरावजी गुळवणी महाराजांचे वर्णन श्रीमत्‌ आद्य शंकराचार्यांच्या या सुयोग्य शब्दांखेरीज करताच येत नाही. त्यांनी घडवलेली हि कलाकृती त्यांच्याच चरणी सादर समर्पण .**

# विषयानुक्रम


पुष्प १ ले मनोगत

पुष्प २ रे श्रीमद्भागवताचा प्रस्ताव व दिव्यत्व

स्कंध पहिला

पुष्प ३ रे व्यास नारद संवाद

पुष्प ४ थे नारदांचे पूर्वचरित्र

पुष्प ५ वे अश्वत्थाम्याचे ब्रह्मास्त्र

पुष्प ६ वे उत्तरेच्या गर्भाचे रक्षण व कुंतीची कृष्णस्तुति

पुष्प ७ वे भीष्मांचा युधिष्ठिरास उपदेश व भीष्मांचे निर्वाण

पुष्प ८ वे परीक्षित जन्म व श्रीकृष्णांचे द्वारका गमन

पुष्प ९ वे विदुरांचे हस्तिनापुरी परत येणे

पुष्प १० वे पांडवांचे महाप्रस्थान

पुष्प ११ वे राजा परीक्षित कृत कली निग्रह व तडजोड

पुष्प १२ वे राजा परीक्षितला ऋषीपुत्राचा शाप

पुष्प १३ वे शुक मुनींचे आगमन

स्कंध २

पुष्प १४ वे मोक्ष साधन व विराट स्वरूप

पुष्प १५ वे कर्म फळाची निंदा व भक्तीयोग

पुष्प १६ वे सृष्टी विषयी प्रश्न व कथारंभ

पुष्प १७ वे विराट स्वरूपाचे वर्णन

पुष्प १८ वे भगवंताचे लीलावतार

पुष्प १९ वे भगवद्धाम दर्शन व चतु:श्लोकीं भागवत

पुष्प २० वे श्रीमद्भागवताची दहा लक्षणे अध्याय १०

स्कंध ३

पुष्प २१ वे उद्धव विदुर भेट

पुष्प २२ वे विदुरांचे मैत्रेय ऋषींच्याकडे प्रयाण

पुष्प २३ वे विराट पुरुषाची उत्पत्ती

पुष्प २४ वे ब्रह्मदेवांची उत्पत्ती

पुष्प २५ वे दहा प्रकारच्या सृष्टीचे वर्णन
पुष्प २६ वे काल गणना
पुष्प २७ वे स्वायंभूव मनू व शतरूपा यांचा जन्म
पुष्प २८ वे यज्ञवराह अवतार
पुष्प २९ वे हिरण्याक्षाचा वध
पुष्प ३० वे ब्रह्म देवांची सृष्टी व कर्दमऋषींचे तप
पुष्प ३१ वे कर्दम-देवहुति विवाह
पुष्प ३२ वे कर्दम-देवहुति विहार
पुष्प ३३ वे कपिलमुनींचा अवतार
पुष्प ३४ वे देवहुतिचे प्रश्न व भक्ती
पुष्प ३५ वे प्रकृति-पुरुष विवेक
पुष्प ३६ वे प्रकृति-पुरुष विवेक व मोक्ष
पुष्प ३७ वे भक्तीचे मर्म
पुष्प ३८ वे मनुष्य जन्म-त्याची गती
पुष्प ३९ वे देवहुतिला मोक्षपदाची प्राप्ती
पुष्प ४० वे मनूच्या कन्यांचा वंश
स्कंध ४
पुष्प ४१ वे प्रजापती दक्षाचा शिवद्वेष
पुष्प ४२ वे सतीचा देहोत्सर्ग
पुष्प ४३ वे दक्ष यज्ञाचा विध्वंस
पुष्प ४४ वे सर्वांचे कैलास गमन
पुष्प ४५ वे दक्षयज्ञाची पूर्तता
पुष्प ४६ वे ध्रुवाचे वन गमन
पुष्प ४७ वे ध्रुवाचे पुनरागमन
पुष्प ४८ वे ध्रुवाचा राज्याभिषेक
पुष्प ४९ वे ध्रुवाला कुबेराचे वरदान
पुष्प ५0 वे ध्रुववंश व अंगराज
पुष्प ५१ वे महाराज पृथूंचा अविर्भाव
पुष्प ५२ वे पृथु व पृथ्वी यांचा संवाद
पुष्प ५३ वे पृथुंचे अश्वमेध यज्ञ
पुष्प ५४ वे विष्णूंचे पृथूला वरदान

पुष्प ५५ वे पृथुना सनकादिकांचा उपदेश
पुष्प ५६ वे पृथुचरित्राचे महात्म्य
पुष्प ५७ वे प्रचेत्यांना योगादेश स्तोत्र
पुष्प ५८ वे पुरांजनाख्यान
पुष्प ५९ वे पुरंजनावर राणीचा राग
पुष्प ६० वे पुरंजनपुरीचा नाश
पुष्प ६१ वे पुरंजनाख्यानाचे तात्पर्य
पुष्प ६२ वे रूपक कथा
पुष्प ६३ वे प्रचेत्यांना वरदान व प्राचेतस दक्ष
पुष्प ६४ वे प्रचेत्यांना परमपदाचा लाभ
स्कंध ५
पुष्प ६५ वे प्रियव्रत चरित्र
पुष्प ६६ वे आग्नीध्र चरित्र व नाभिराजाचे चरित्र
पुष्प ६७ वे भगवान ऋषभदेव
पुष्प ६८ वे ऋषभदेवांचा देहत्याग
पुष्प ६९ वे भरताचे चरित्र
पुष्प ७० वे भरताचा जडभरत म्हणून जन्म
पुष्प ७१ वे जडभरत व राजा रहूगण यांची भेट
पुष्प ७२ वे राजा रहूगणास जडभरताचा उपदेश
पुष्प ७३ वे राजा रहूगणाचे समाधान
पुष्प ७४ वे रूपकात्मक संसारचक्राचे स्पष्टीकरण
पुष्प ७५ वे भुवनकोश वर्णन
पुष्प ७६ वे विविध खंडांचे व द्वीपांचे वर्णन
पुष्प ७७ वे सूर्य रथ व त्याची गती
पुष्प ७८ वे कालचक्र व शिशुमारचक्र
पुष्प ७९ वे अंतरिक्षातील इतर स्थाने

स्कंध सहापासून पुढील खंडांसाठी

लिहा : esahity@gmail.com

किंवा भेट द्या : www.esahity.com

# लेखकाचा अल्पपरिचय



श्री अविनाश नगरकर हे बहुआयामी व्यक्तिमत्व आहे. सद्‌गुरूवरच्या निष्ठेनी सर्व काही साध्य होते अशी त्यांची श्रद्धा आहे. भारतीय परंपरेतील सद्‌गुरूंचे स्थान त्यांनी जाणले आहे. अध्यात्मिक विचारांचा वारसा हा या कुटुंबाचा विशेष आहे. वडील व आजोबांकडूनच तो मिळाला असल्याचे ते मानतात. सर्वात महत्वाचे म्हणजे सन १९६७ मध्ये त्याना प्राप्त झालेला योगिराज प.पू. वामनरावजी गुळवणी महाराज, पुणे यांचा अनुग्रह. त्यांच्या मार्गदर्शनानुसार केलेल्या साधनेचे व अध्ययनाचे फळ म्हणजे त्यांचे आजचे यश असे ते ठामपणे सांगतात.

श्री अविनाश नगरकर हे ठाणे येथे मायर्स ऍंड वास्प या पंप बनवणाऱ्या कंपनीतून प्रोजेक्ट मॅनेजर म्हणून निवृत्त झाले. नोकरीवर असतानाच त्यांनी सामाजिक कार्य आणि लिखाण सुरू केले. अनेक संस्थांचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले. यात ग्राहक पंचायत, विविध आध्यात्मिक आणि सांस्कृतिक संस्था आहेत. वयाच्या ५६व्या वर्षी कॉंप्युटर शिकून त्यांनी त्यावर लिखाण सुरू केले. आजवर त्यांची श्री आद्य शंकराचार्य, समर्थ रामदास स्वामी यांच्याबद्दलची पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्याशिवाय त्यांची ज्ञानेश्वरी, नवनाथ भक्तीरसामृत, एकनाथी भागवत, आणि श्रीमद्भागवत यांविषयावरची चातुर्मास प्रवचनेही खूप गाजली.

सन १९८४ नंतर त्यांच्या सामाजिक कार्याचे धुमारे फुटू लागले. अनेक सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक संस्थांचे ते अध्यक्ष म्हणून जबाबदारी पार पाडतात. ज्ञानेश्वरीवर अधिकारवाणीने प्रवचन करणे हा त्यांचा हातखंडा आहे. श्रीमत् आद्य शंकराचार्य ह्या पुस्तकातील भाषासौष्ठव व कथाभागाची अलगदपणे उलगडणारी घडी वाचकांचे मन भारून टाकते.

अध्यात्म आणि इंजिनियरिंग व्यतिरिक्त अनेक कलांमध्येही श्री अविनाश नगरकर पारंगत असून चित्रकला व शिल्पकलेतील त्यांचे काम वाखाणले जाते.


श्रीमद्भागवत
संक्षिप्त गोष्टीरूप कथामृत
अनुवादक
अविनाश महादेव नगरकर

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत

## पुष्प १ ले

## मनोगत

श्रीमद्भागवत म्हणजेच भगवद्गीता असा अनेक जणांचा समज असल्याचे लोकांच्या विचारण्यावरून, बोलण्यावरून लक्षात आले. म्हणून आपल्या या अलौकिक ग्रंथाची थोड्या प्रमाणात का होईना ओळख व्हावी म्हणून हा लेखन प्रपंच करण्याचे ठरवले आहे. कुतूहल म्हणून अनेकजण मराठी अनुवाद असलेले भागवत वाचायला घेतात पण नंतर कंटाळून ठेवून देतात. भागवताशी मैत्री जोडल्या खेरीज त्यातील अवीट गोडी चाखता येत नाही हेच खरे. भागवतात भगवद्भक्ती व अध्यात्म यांची गोष्टी रूपाने कशी सांगड घातली आहे  हे खरोखरच वाचण्यासारखे आहे. त्याची थोडी ओळख व्हावी असे वाटले म्हणून ही पुष्पे सदर करीत आहे. त्यासाठी मूळ भागवत संहिता अभ्यासून मग त्यातल्या निवडक श्लोकांचा उपयोग केलेला आहे. ऐकींव अथवा काल्पनिक गोष्टी यात नाहीत. गर्भित अर्थाच्या अनुषंगाने केलेला अनुवाद आहे.  भागवत ग्रंथ म्हणजे भगवद्भक्तीतला एक महान चमत्कार आहे. श्रीमद्भागवतातल्या बाराव्या स्कंधातल्या तेराव्या अध्यायात सूतमुनी म्हणतात

श्रीमद्भागवतं पुराणममलं यद्वैष्णवानां प्रियं यस्मिन् पारमहंस्यमेकममलं ज्ञानं परं गीयते ।
तत्र ज्ञानविराग भक्तिसहितं नैष्कर्म्यमाविष्कृतं तत् शृण्वन् प्रपठन् विचारणपरो भक्त्या विमुच्येन्नरः।।१८।।

अर्थात "श्रीमद्भागवत पुराण हे अत्यंत निर्दोष आहे. ते वैष्णवांना फार प्रिय आहे. ह्या पुराणात मायेपासून अलिप्त असलेल्या परमहंसांच्या अद्वितीय ज्ञानाचे वर्णन केले आहे. या ग्रंथात ज्ञान,वैराग्य व भक्ती यांच्यासह नैष्कर्म्य होण्याचा मार्ग दाखवला आहे. अशा या भागवत ग्रंथाचे भक्तीने श्रवण, मनन व चिंतन करणारा मनुष्य खात्रीने मुक्त होतो."  ह्या वरून भागवताचे महत्व किती आहे हे लक्षात येईल. पण संस्कृत न समजण्यामुळे अनेक जण भागवत वाचण्याचा कंटाळा करतात. भागवतातल्या ज्ञानाची ओळख व्हावी हा हेतू या लिखाणा मागे आहे. सद्गुरुकृपेनेच हे होईल अशी अशा आहे. त्यामुळे सद्गुरु चरणी तशी प्रार्थना आहे.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

अविनाश महादेव नगरकर.,  ३/२३ थोमस स्ट्रीट, क्लेफिल्ड, ब्रिस्बेन

## ।।श्रीगुरु:शरणं।।

## श्रीमद्भागवत-स्कंध पहिला

## पुष्प २ रे. (अध्याय १ व २)

## श्रीमद्भागवताचा प्रस्ताव व दिव्यत्व

भागवत नक्की कुणी सांगितले आहे असा प्रश्न अनेक जणांना पडतो. कारण भागवताच्या पहिल्या स्कंधात, पहिल्या पाच श्लोकांनंतर आहे, ऋषय उचु: (म्हणजे ऋषी म्हणाले). मग दुसऱ्या अध्यायाची सुरुवात होते "व्यास उवाच" ने आणि एक श्लोक ते म्हणतात व सूतउवाच (म्हणजे सूतमुनि म्हणाले) होऊन अध्याय संपे पर्यंत सूतमुनीच बोलत राहतात. असो. थोडक्यात काय कीं भागवत कुणी सांगितले? त्याचे थोडक्यात विवरण असे आहे कीं भागवत व्यासांनी आपला पुत्र शुक याला प्रथम सांगितले. शुकमुनींनी परीक्षित राजा प्रायोपवेशनास बसला असता त्याला सांगितले. त्यावेळी सूतमुनी तिथे गेलेले होते. त्यांनी ते ऐकून आत्मसात केले. पुढे नैमिषारण्यात शौनकमुनी करीत असलेल्या दीर्घ काळ चालणाऱ्या यज्ञ स्थानी जेव्हा सूतमुनी आले तेंव्हा सगळ्या ऋषींच्या विनंती वरून सूतमुनींनी ते सांगितले. आणि तेच आजही प्रचलित आहे. त्याच भागवताचे बारा स्कंध आहेत. बारा स्कंध मिळून एकूण १८००० श्लोक आहेत. भगवंताच्या विविध अवतारांसह भौतिक व अध्यात्मिक असे दोन्हीचे प्रचंड ज्ञान त्यात दिले आहे. पहिल्या स्कंधात पहिल्या अध्यायात शौनकादि मुनींनी सूतांना उच्चासनावर बसवून आदर सत्कार केला. व मग प्रार्थना केली. हे व्यासशिष्य सूतमुने आपण निष्पाप असून अनुभूतीसह सर्व शास्त्रात व पुराणातही प्रवीण आहात. सगुण व निर्गुण यांचे यथार्थ ज्ञान आपणास आहे. शास्त्रभेदामुळे आमची बुद्धी संशयग्रस्त झाली आहे. त्यामुळे शास्त्राच्या मथितार्थासह आम्हाला आत्मोन्नतीचा मार्ग सांगावा. जीवाला अजाणता जरी श्रीकृष्णाचे स्मरण झाले तरी तो मुक्त होतो. कारण साक्षात् भयालाच श्रीकृष्णाचे नामस्मरण करणाऱ्याचे भय वाटते. म्हणून हे सूतमुने, आपण आपल्या पर-तत्त्वस्पर्शी अमृतमय रसाळवाणीने आम्हाला हे सांगा कीं भगवान श्रीकृष्णांनी वसुदेव-देवकी यांच्या पोटी जन्म कां घेतला? त्यांनी बलरामासह कोणती गूढ कृत्ये केली? भगवंताचे इतर अवतार कोणते आहेत? भगवान श्रीकृष्णांच्या निर्याणानंतर धर्म कोणाच्या आश्रया खाली आहे?

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-स्कंध पहिला

## पुष्प ३ रे. (अध्याय ५)

## व्यास नारद संवाद

जन्मत:च विरक्त असलेल्या आपल्या पुत्राचा 'ब्रह्मभाव व विरक्ती' ज्ञानासह दृढ व्हावी म्हणून व्यासांनी सर्व प्रथम आपल्या पुत्राला म्हणजेच शुकमुनिंना श्रीमद्भागवत संहिता सांगितली. त्यामुळे श्रीमद्भागवत सांगणाऱ्या श्रीव्यासांना श्री सूतमुनी पहिले वंदन करतात. आपणही करुया!

१७पुराणे, वेदांच्या चार शाखा, एक लाख २५ हजार श्लोक असलेला महाभारतासारखा इतिहास, असे अप्रतीम वाङ्मय निर्माण करूनही व्यासमुनींना स्वस्थता आलेली नव्हती.

त्यावेळी श्री नारदमुनींचे तिथे आगमन झाले. नारदमुनींनी व्यासांना त्यांच्या अस्वस्थतेचे कारण विचारले. तेंव्हा व्यासांनी प्रामाणिकपणाने सांगितले कीं इतके सगळे वाङ्मय निर्माण करूनही मला स्वस्थ कां वाटत नाही. हे मलाच समजत नाही. कृपया तुम्हीच ते मला सांगा. कारण दुसऱ्याचे अंत:करण जाणण्याचे योगसामर्थ्य आपल्याकडे आहे. तेंव्हा आपणच माझ्यावर कृपा करा!

तेंव्हां व्यासांची मन:स्थिती लक्षात घेऊन नारद म्हणाले. ज्ञानमार्गासाठी आपण अपूर्व कष्ट करून भरपूर वाङ्मय निर्माण केलेत हे कौतुकास्पद आहे. पण ज्ञानप्राप्ती फक्त भगवंताच्या निर्मल याशोगानामुळे होते. आणि तसे यशोगान आपल्या आजवरच्या कोणत्याच ग्रंथात नाही. मोक्षप्राप्तीज्ञान जर भगवद्भक्ती रहित असेल तर ते सुध्दा असफल होते. दुसरे महत्वाचे असे कीं संसारी मनुष्या कडून निष्काम कर्म घडणे अतीव कठीण आहे. पण संसारी मनुष्य जर भगवंताला शरण जाऊन ईश्वर भक्तीत तल्लीन झाला तर त्याचे इह-पर कल्याण होते. मग त्याला ज्ञान प्राप्ती न होता जरी मृत्यू आला तरी त्याचे अकल्याण होत नाही. अनन्य भावाने केलेल्या भगवंताच्या नामस्मरणाने अंत:करण शुध्द होत जाते. त्या योगे अहंकाराच्या ग्रंथी आपोआप सुटून जातात. निरंतर हरी नाम घेण्याने त्याच्या सूक्ष्मरुपाचा सहवास घडतो. सहवासाने भगवंता विषयी प्रेम व भक्ती उत्पन्न होते. भक्तीमुळे श्रीहरीची कृपा संपादन होते. मग त्याच्या कृपेमुळेच अहंकार विरहीत नामस्मरण सुरु होते. त्यावेळी निर्गुण, निराकार, सर्वव्यापी, सर्वगामी, सर्वसाक्षी अशा भगवंताची अंत:करणात जाणीव उत्पन्न होते. मगच मन व बुद्धी यांच्या अतीत असलेल्या भगवंताच्या सामर्थ्याची अनुभूती येऊ लागते. भौतिक सुखदु:खाच्या जाणीव दूर होतात. म्हणून हे व्यासमुने आपण त्या षड्गुणैश्वर्य श्रीहरीचे विविध अवतारातील यश, कीर्ती, प्रताप व सामर्थ्य भक्तिरसात वर्णन करावे म्हणजे त्या योगे सर्वसामान्य मनुष्याचे जीवन सुखी होईल.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-स्कंध पहिला

## पुष्प ४ थे (अध्याय ६ वा)

## नारदांचे पूर्वचरित्र

श्रीमद् भागवताच्या पहिल्या स्कंधाच्या दुसऱ्या अध्यायात 'भगवान' कुणाला म्हणतात ते सांगितले आहे. कारण भगवंत म्हणजे आपण कोणत्या ना कोणत्या स्वरूपात म्हणजे विष्णू, कृष्ण, राम अथवा इतर स्वरूपे असतील अशा स्वरूपात पाहण्याचा विचार मनात आणतो. पण भागवतात स्पष्ट केले आहे ते असे कीं आत्मज्ञानी अथवा तत्वज्ञानी अथवा अभेदाने पहाणारे असतात ते "सर्वव्यापी" जे आहे त्याला तत् किंवा ब्रह्म किंवा परमात्मा  किंवा भगवान असे संबोधतात. (निर्गुण निराकार पण सर्वव्यापी अशी जी एक विश्व संचालन करणारी अद्‌भुतशक्ती संपूर्ण विश्व व्यापून उरली आहे तिला भगवान असे संबोधले जाते.) श्लोक असा

"वदन्ति तत्तत्त्वविदस्तत्वं यज्ज्ञानमद्वयम् ।

ब्रह्मेति परमात्मेति भगवानिति शब्द्यते ।।स्कं.१. अ.२. श्लो.११।।"

आणि मग सूतमुनी  म्हणाले, धर्माचा हेतू जरी अर्थ, काम व मोक्ष हा असला तरी मनुष्य अर्थ व काम यात अहंकाराने मग्न होऊन वर्णाश्रम धर्माचे मुख्य फळ ईश्वराचा संतोष व त्यामुळे मिळणारी मुक्ती म्हणजेच मोक्ष यांना मुकतो. (इथे वर्णाश्रमधर्म स्वत:ला श्रेष्ठ व दुसऱ्याला कनिष्ठ समजण्यासाठी नसल्याची जाणीव दिली आहे). अर्थात् मनुष्य मोक्ष मिळण्यासाठी असलेली निष्काम भक्ती विसरतो." असे सांगितले. व त्यावर उपाय हाच कीं भगवान् श्रीकृष्णांच्या ध्यानरुपी खड्‌गाने कर्मरूप अहंकाराची गाठ छेदून टाकावी. आणि भगवंताचे ध्यानरूप अधिष्ठान आपल्या अंत:करणात निर्माण होण्यासाठी भगवंताचे गुणानुवाद श्रवण करावे, त्याचे वर्णन करावे, त्याचे लीला चरित्र श्रवण करावे. हे अत्यंत सोपे साधन आचरणात आणावे. आणि सत्संगात राहावे.  सत्संगाची महती सांगताना सूतमुनींनी  नारदांचा अनुभव सांगितला. नारदांना लहानपणातच सत्संगाचा लाभ झाला होता. त्या सत्संगात त्याना खूपच भगवत्कथा श्रवण करण्यास मिळाल्या. त्यामुळे त्यांची भगवंतावर दृढ श्रद्धा निर्माण झाली. त्या श्रद्धेचे भागवतधर्मात रुपांतर झाले.

भागवतधर्म म्हणजे निष्काम भक्ती. ज्या योगेश्वरांचा नारदांना सत्संग लाभला त्यांच्या मार्गदर्शना प्रमाणे नारद बाल वयात ध्यान धारणा करू लागले. त्यामुळे त्यांना भगवंताच्या सहवासाची तीव्र ओढ लागली. भगवंताच्या विरहामुळे नारद व्याकूळ झाले. नारद देहभान हरपून भगवंताला विनवू लागले, "हे भगवंता! मला तुझ्या शिवाय काहीही नको!" आणि त्यांचा जीव कासावीस होऊ लागला. कारण त्यांचा तो भाव अगदी प्रामाणिक होता. त्यामुळे भगवंत एका क्षणात नारदांच्या हृदयात प्रकट झाला! नारद त्याच्याशी एकरूप होण्याचा प्रयत्न करू लागले!

पण भगवंत लगेच अदृश्य झाले. आणि नारद देहभानावर आले. नारद कासावीस होऊन पुन्हा ध्यान धरू लागले. पण उपयोग होईना. त्यामुळे ते फार व्याकुळ झाले. त्याना प्राण नकोसा झाला. तेंव्हा परावाणीने भगवंताने त्यांना सांगितले "हे निष्पाप नारदा! तुझी निष्ठा दृढ व्हावी म्हणून योग्यांनाही दुर्लभ असे दर्शन मी तुला दिले आहे. तुझ्या प्रामाणिक भाव-भक्तीमुळे हे घडले आहे. आता तुझी निष्ठा माझ्या ठिकाणी स्थिर झालेली आहे. आता हळूहळू सर्वसंग परित्याग करून तूं माझ्या परम-पदाला पावशील. तुझी स्मृती कधीच नष्ट होणार नाही व या नश्वर देहपातानंतर तूं मलाच येऊन मिळशील." इतके सांगून ती वाणी बंद झाली. नारद निरिच्छ व निर्मत्सर होऊन देहपाताची वाट पहात हरिस्मरण करीत राहिले. आणि एक दिवस नारद हरिस्मरणात असताना मेघातून वीज बाहेर पडावी तसे देहातून बाहेर पडले व विष्णुदूत त्याना भगवंताकडे नेऊ लागले. त्यावेळी नारदांना प्रारब्धकर्माचा क्षय होत असल्याचा अनुभव आला. आणि प्रारब्धक्षय होताच त्यांना भगवंताने आपल्या उदरात स्थान दिले. पुढे प्रलयानंतर जेंव्हा पुन्हा सृष्टीची उत्पत्ती झाली तेंव्हा मरिचादि ऋषींसह नारदांची उत्पत्ती झाली. म्हणून भगवंताचे यशोगान व सत्संग ही एक भवसागर तरून जाण्याची नौकाच आहे.

हरये नमः। हरये नमः। हरये नमः।

श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-स्कंध पहिला

## पुष्प ५ वे (अध्याय ७ वा)

## अश्वत्थाम्याचे ब्रह्मास्त्र

कौरव-पांडव यांच्या युद्धाची समाप्ती भीमाने दुर्योधनाची मांडी फोडून केली. पण त्याच रात्री अश्वत्थाम्याने पांडवांचा निर्वंश करण्याच्या उद्देशाने त्यांच्या पांचही पुत्रांची ते रात्री झोपलेले असताना नृशंसपणे हत्या केली. द्रौपदी आपल्या पुत्रांच्या या वधामुळे शोकसंतप्त झाली. तिला सांत्वना देण्यासाठी अर्जुनाने लगेच अश्वत्थाम्याचा वध करण्याची प्रतिज्ञा केली. आणि द्रौपदीस म्हणाला "त्याच्या शिरावर बसून तूं पुत्र वियोगाचे स्नान करशील तेंव्हा तुझे दु:ख हलके होईल." अर्जुन भगवान् श्रीकृष्णांसह अश्वत्थाम्याचा पाठलाग करू लागला. ते पाहून अश्वत्थाम्याने स्वसंरक्षणासाठी ब्रह्मास्त्र सोडले. तत्क्षणी भगवान् श्रीकृष्ण म्हणाले, “अर्जुना या मूर्खाने ब्रह्मास्त्र सोडले आहे. याला उपसंहार माहीत नाही. तूं तुझे ब्रह्मास्त्र सोडून दोन्हीचा उपसंहार कर.” त्याप्रमाणे अर्जुनाने लगेच उपसंहार करून अश्वत्थाम्याला पकडले. व दोराने बांधून त्याला घेऊन निघाला. ते पाहून भगवान् श्रीकृष्ण म्हणाले, "अर्जुना! अरे या नराधामाची गय करू नकोस! याने निद्रिस्त बालकांचा वध केलेला आहे. त्यामुळे हा नराधम वध्य ठरलेला आहे. शिवाय तूं तशी प्रतिज्ञा करून द्रौपदीस वचन दिले आहेस. तेंव्हा याचा वध करून वचन पूर्ती कर!" भगवान् श्रीकृष्णांनी अर्जुनाची परीक्षा घेण्या करिताच असे म्हटले! पण धर्मनिष्ठ अर्जुनाने अश्वत्थाम्याला तसेच द्रौपदी समोर आणले. त्यावेळी कोमल मनाची द्रौपदी म्हणाली, “मला जसे पुत्र वियोगाचे दु:ख झाले आहे तसे गुरुपत्नी कृपीला होऊ नये म्हणून व आपण याच्या पित्या कडून सर्व धनुर्विद्या संपादन केलेली असल्यामुळे गुरुपुत्र म्हणून याला सोडून द्या.” द्रौपदीच्या या धर्मयुक्त वचनाला भीमा खेरीज युधिष्ठिरासह इतर सर्वांनी मान्यता दिली. पण भीमाने स्पष्ट सांगितले कीं याच्या वधा खेरीज मला काहीच मान्य नाही. तेंव्हा भगवान् श्रीकृष्ण अर्जुनास म्हणाले “आता आमच्या सर्वांचेच समाधान कर!” धर्मवेत्या अर्जुनाने भगवान् श्रीकृष्णांचे गर्भित अर्थाचे बोलणे समजून लगेच अश्वत्थाम्याचा मस्तकमणि त्याच्या केसासह वेगळा केला. त्याला दोरखंडातून मुक्त केला आणि हाकलून दिला. अशा प्रकारे अर्जुनाने सर्वांचे समाधान केले.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

## ।।श्रीगुरु:शरणं।।
## श्रीमद्भागवत-स्कंध पहिला
## पुष्प ६ वे (अध्याय ८ वा)

## उत्तरेच्या गर्भाचे रक्षण व कुंतीची कृष्णस्तुति

अश्वत्थाम्याला शिबिरांतून हाकलून दिल्यावर अश्वत्थामा काही स्वस्थ बसला नाही. त्याने पांडवांचा निर्वंश करण्याच्या सूडबुद्धीने पुन्हा एक ब्रह्मास्त्र उत्तरेच्या गर्भावर सोडले. त्यावेळी उत्तरा भयभीत होऊन द्वारकेस निघालेल्या भगवान् श्रीकृष्णांना शरण गेली. व प्रार्थना करू लागली कीं पांडवांचा वंश माझ्या पोटात वाढत आहे त्याचे रक्षण करा. मी मेले तरी चालेल. भगवान् श्रीकृष्णांनी अंतर्ज्ञानाने अश्वत्थाम्याचे दुष्कृत्य जाणले. व उत्तरे भोवती अभेद्य कवच निर्माण करून योगमार्गाने उत्तरेच्या गर्भात प्रवेश केला. ब्रह्मास्त्राचा उपशम दुसऱ्या कशानेच होत नसल्यामुळे ते स्वत:तच विलीन करून घेतले व उत्तरेच्या गर्भाचे रक्षण केले. उत्तरा शांत झालेली पाहून कुंतीला फार समाधान झाले. व तिने भगवान् श्रीकृष्णांची भावपूर्ण स्तुती व प्रार्थना केली. ती म्हणू लागली, "हे जगन्नायका, आदिपुरुषा, सर्वव्यापका माझे तुला शतश: प्रणाम असोत. परमहंसांनाही अनाकलनीय असणारे तुझे स्वरूप आम्हा सामान्य स्त्रियांना कसे बरे समजावे? हे जितेन्द्रिया, तूंच आमचा रक्षण करता आहेस. भीमाला बालपणी विषप्रयोगातून वाचवणारा तूंच होतास. लाक्षागृहातून, बक, हिडींब इत्यादी राक्षसांपासून वाचवणारा तूंच होतास. दुर्वासांच्या कोपापासून वाचवणारा ही तूंच होतास. महायुद्धातल्या अतिरथी, महारथी यांच्या भयानक अस्त्रांपासून वाचवणारा ही तूंच आणि आज उत्तरेला ब्रह्मास्त्रापासून वाचवले आहेस. हे देवाधिदेवा! श्रीमंती, सुख, ज्ञान इत्यादी मध्ये तुझे स्मरण राहत नाही पण संकटात मात्र तुझे स्मरण होत राहते. पण हे सच्चिदानंदा मी तुझ्याकडे एकच मागणे मागते, कीं मला माझे पुत्र पांडव व इतर आप्त स्वकींय यांच्यातल्या दृढ स्नेहपाशातून मुक्त कर. मला तुझ्या चरणी आसरा दे! तुझे नामस्मरण दे! तुझी भक्ती दे! बाकी तुझ्या ह्या कुंतीला काही देऊ नकोस. हे मुकुंदा! माझी एवढी कळकळीची विनंती ऐक! हे दयाघना, माझ्या बुद्धीत साठलेल्या विकारांचा नाश कर. आणि तुझ्या भजनाची आवड वृद्धींगत कर. एवढे दान या हीन दीन कुंतीच्या ओटीत घाल!" भगवान् श्रीकृष्णानी कुंतीला तसा वर दिला. नंतर सगळ्यांच्या आग्रहामुळे श्रीकृष्णांनी द्वारकेस जाण्याचे पुढे ढकलले. ते एका अर्थी बरेच झाले. कारण युधिष्ठिर आप्त स्वकींयांच्या वधामुळे आपण प्रजाद्रोह केला असे मानून राज्य ग्रहणास तयार होत नव्हता. त्याला धर्माचे रहस्य समजावे म्हणून श्रीकृष्णांनी युक्ती केली. भीष्म शरपंजरी पडून उत्तरायणाची वाट पहात होते. ते ज्ञानी व कुरुकुलातील सर्वात श्रेष्ठ असल्यामुळे श्रीकृष्णांनी धर्मराजाला त्यांना भेटावयास नेण्याचे ठरवले!

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-स्कंध पहिला

## पुष्प ७ वे (अध्याय ९ वा)

## भीष्मांचा युधिष्ठिरास उपदेश व भीष्मांचे निर्वाण

धर्मराज (युधिष्ठिर) आपण प्रजाद्रोह केल्याच्या भावनेने शोकमग्न झालेला होता. त्याला धर्मोपदेशाची गरज होती. म्हणून भगवान् श्रीकृष्णांनी पांडवांना शरपंजरी पडलेल्या भीष्मांकडे जाऊन उपदेश घेण्याची प्रेरणा दिली! त्यामुळे धर्मराजासह सगळे पांडव भगवान् श्रीकृष्णांसह कुरुक्षेत्री जाण्यास निघाले. त्यांच्या बरोबर व्यास, वशिष्ठ, नारद, बृहद्श्रवा इत्यादी इतर ऋषीही निघाले.

शरपंजरी पडलेले भीष्म तशा स्थितीतही अत्यंत तेजस्वी व टवटवीत दिसत होते. भगवान् श्रीकृष्णांसह आलेल्या पांडवाना पाहून भीष्मांचा चेहरा उजळला ! धर्मराजासह सर्व पांडवांनी त्यांना भावपूर्ण वंदन करताच भीष्मांचे नेत्र पाणावले. भगवान् श्रीकृष्णांचे मनोगत जाणून व भगवान् श्रीकृष्णांवर आपली नजर स्थिर करून भीष्म धर्मराजाशी बोलू लागले. हे राजन् ! श्रीकृष्णाच्या मनात काय आहे हे कोणीच जाणू शकणार नाही. पण तूं निश्चिंतपणे श्रीकृष्णांच्या आज्ञेचे पालन कर. अरे! हा साक्षात् परमात्मा आहे. तुम्ही जरी त्याला आपला मामेभाऊ समजत असलात तरी ते साक्षात् परब्रह्म आहे. उत्पत्ती, स्थिती व लय हा याच्याच मायेचा प्रभाव आहे. स्वत:च्या मायेने सर्व विश्वाला हा मोहित करतो. वसुदेवाच्या पोटी हा जन्माला आला म्हणून तुम्ही याला आपला मामेभाऊ समजून प्रधानाचे व दूताचे काम सांगितलेत. त्याच्याकडून सारथ्याचेही काम करून घेतलेत. ह्यावरून धर्मराजा तूं हे समजून घे कीं आपल्या भक्तांवर हा किती प्रेम करतो. आणि याची दुसरी साक्ष म्हणजे आजचा हा प्रसंग! केवळ मला दर्शन देण्यासाठीच हा परमात्मा इथे आला आहे. आणखी एक रहस्य मी तुला आज सांगतो. याने जेंव्हा 'मी शस्त्र हाती धरणार नाही' अशी प्रतिज्ञा केली तेंव्हा मी सुद्धा मनातल्या मनात अशी प्रतिज्ञा केली होती कीं मी याला शस्त्र हाती धरण्यास लावीन तरच नावाचा भीष्म! आणि केवळ माझी प्रतिज्ञा खरी करण्यासाठी याने आपली प्रतिज्ञा मोडली व युद्धात स्वत: शस्त्र हाती घेतले. आतां मी हे शरीर सोडून जाई पर्यंत हा असाच माझ्याकडे पाहत राहो.

इतके बोलून मग भीष्मांनी धर्मराजाचे सुयोग्य शब्दात सांत्वन करून धर्मोपदेश करण्यास सुरुवात केली. त्या उपदेशात त्यांनी राजधर्म, मानवधर्म, निवृत्तीधर्म, प्रवृत्तीधर्म, वर्णाश्रमधर्म , मोक्षधर्म, भागवतधर्म, स्त्रीधर्म, इत्यादी सर्व धर्मांचे सविस्तर विवरण करून राज्यग्रहण करण्याची आज्ञा दिली. इतके सगळे सांगून होई पर्यंत उत्तरायणाचा काळ जवळ आलेला पाहून भीष्मांनी आपले बोलणे थांबवले. देहत्यागासाठी इष्ट वेळ आलेली पाहून इच्छामरणी भीष्मांनी आपली दृष्टी जगताचे स्वामी असलेल्या श्रीकृष्णांवर स्थिर केली. आणि त्यांनी भगवान् श्रीकृष्णांची स्तुति करण्यास आरंभ केला. "हे भगवंता, हे नारायणा, हे वासुदेवा, मी माझी निष्काम व सात्विक बुद्धी तुझ्या ठिकाणी स्थिर करीत आहे. हे त्रैलोक्य सुन्दरा! तुझी अंगकांती सूर्यासारखी तेजस्वी आहे. पण त्यात चंद्रासारखी शीतलता आहे. तुझी अनेक रूपे मी माझ्या ध्यानात कायमचीच साठवली आहेत. आणि तुझे चतुर्भुज स्वरूप तर मी माझ्या हृत्पटलावरच कोरले आहे. पण हे अद्भुत परब्रह्मा , हे अच्युता, हे माधवा, हे केशवा धर्मयुद्धाच्या प्रसंगी अर्जुनावरील प्रेमामुळे तूं त्याच्या रथाचे सारथ्य करीत असतानाचे तुझे रूप तर मी कधीच विसरू शकत नाही. आणि हे भगवंता, तुझ्या मनाचा ईश्वरीय मोठेपणा तूं युद्धाच्या प्रसंगी प्रकट केलास. मी अत्यंत आततायीपणाने बाण सोडून अर्जुनाला व तुला विद्ध करीत होतो. तुझे कवच फुटून तूं रक्तबंबाळ झाला होतास! तेंव्हा वीरश्रीने बेभान झाल्यासारखे भासवून आपले उत्तरीयही न सावरता तूं रथातून आवेशाने उडी घेतलीस. त्यावेळी हवेत उडालेला तुझा केश कलाप आणि मुखावरचे हवेत उडालेले मोत्यासारखे तेजस्वी घर्मबिंदू असे तुझे मोहक रूप मी आजही विसरू शकत नाही. त्यावेळी तूं आपण बेभान झाल्याचे भासवून एका क्षणात रथचक्र हाती धरून माझ्यावर वीरश्रीने धावून आलास. ते केवळ स्वत:ची प्रतिज्ञा मोडून माझी प्रतिज्ञा खरी करण्यासाठीच नां? त्याच वेळी मी माझी दृष्टी तुझ्या चरणकमलांवर स्थिर केली होती. ते तुझे तेज:पुंज चरणकमल आजही जसेच्या तसेच माझ्या स्मरणात आहेत व तेच चरण मला आता शांत रूपाने तुझ्यात विलीन करून घेवोत. आज या क्षणी मला दर्शन देऊन माझी भेदबुद्धी नष्ट करणाऱ्या भगवान् श्रीकृष्णात माझे आत्मार्पण होवो!" असा संकल्प करून इच्छामरणी भीष्मांनी भगवान् श्रीकृष्णांच्या ठिकाणी मन, बुद्धी व सर्व इंद्रिये स्थिर करून शेवटचा श्वास घेऊन देहत्याग केला.

त्याक्षणी कुरुक्षेत्रावर नीरव शांतता पसरली.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-स्कंध पहिला

## पुष्प ८ वे (अध्याय १०,११,१२ )

## परीक्षित जन्म व श्रीकृष्णांचे द्वारका गमन.

उत्तरेच्या गर्भाचे अश्वत्थाम्याच्या ब्रम्हास्त्रापासून भगवान् श्रीकृष्णांनी संरक्षण केले. त्यामुळे कुरुकुळ अंकुरले. राजा युधिष्ठिर राज्यावर आरूढ झाला. भगवान श्रीकृष्णांच्या कृपेमुळे धर्माधिष्ठित राज्य निर्माण झाले. सुभद्रा, द्रौपदी, कुंती, उत्तरा यांच्या आग्रहामुळे श्रीकृष्ण काही काळ हस्तिनापुरात राहिले. विराटकन्या उत्तरेच्या गर्भातल्या जीवाने अश्वत्थाम्याच्या ब्रम्हास्त्रापासून रक्षण करणाऱ्या सूक्ष्म देहधारी तेजस्वी पुरुषाला पहिले. सूक्ष्मरूप धारण केलेला तो पुरुष अत्यंत तेजस्वी, नीलवर्ण,आजानुबाहू व अत्यंत डौलदार दिसत होता. त्याने सोन्यासारखा चमकणारा पितांबर धारण केलेला होता. आपली लखलखती गदा गर्भाच्या संरक्षणासाठी सतत गरगर फिरवीत होता. अश्वत्थाम्याने सोडलेल्या ब्रह्मास्त्राचा उपशाम केल्यावर तो परम पुरुष गुप्त झाला. गर्भस्थ बालक त्या परम पुरुषाच्या चिंतनात, तो कोण असावा या विचारात गर्क झाला. सर्व ग्रहांची अनुकूलता होताच पांडूकुलाच्या वंशाचा अंकुर जन्मास आला. ब्रम्हास्त्राच्या प्रभावामुळे तो जरी मृतावस्थेत जन्माला आला तरी भगवान श्रीकृष्णांनी आपल्या सामर्थ्याने त्याला पुन्हा सजीव केले. त्यामुळे हस्तिनापूर अत्यंत आनंदात पांडूकुलाच्या या वंशाच्या स्वागतास सिद्ध झाले. युधिष्ठिरांनी भरपूर दान धर्म करून आपला आनंद व्यक्त केला. साक्षात् भगवान् श्रीकृष्णांनी म्हणजेच भगवान् श्रीविष्णूंनी रक्षण केले म्हणून त्याचे नाव विष्णुरात व परीक्षित असे ठेवण्यात आले. जन्मोत्सवी आलेल्या ज्योतिषांनी विष्णुराताचे भविष्य वर्तवले कीं हा प्रभू रामचन्द्रांसारखा सत्यवचनी व प्रजापालन दक्ष, राजा शिबी प्रमाणे दानी, धनुर्धरामध्ये सहस्त्रार्जुन व कुंतीपुत्र अर्जुन यांच्यासारखा श्रेष्ठ धनुर्धर, हिमालयासारखा साधूपुरुषांना आश्रय देणारा, आणि ब्रह्मदेवा प्रमाणे समबुद्धीने वागणारा होईल. हा श्रीकृष्णाचा दृढ भक्त होईल. याचा वंश विस्तार भरपूर होईल. याच्या वंशात उत्पन्न झालेले पुरुष राजर्षि पदाला प्राप्त होतील. हा कलीच्या निग्रहाचा प्रयत्न करील. पण शेवटी ऋषिपुत्राच्या शापामुळे आपल्याला तक्षकापासून मृत्यू असल्याचे समजल्यावर हा सर्वसंग परित्याग करून गंगा तटाकी प्रायोपवेशनास बसेल. त्यावेळी शुकमुनींच्या श्रीमद्भागवताच्या उपदेशाने देह गंगार्पण करून विष्णुपदाला जाईल. हे श्रवण करून युधिष्ठिर सुखावला. त्यानंतर ज्ञातीवधाच्या पाप क्षलानार्थ धर्मराजाने भगवान श्रीकृष्णांच्या

मार्गदर्शनाखाली तीन अश्वमेध यज्ञ केले. त्यासाठी आवश्यक असलेल्या धनाची व्यवस्था भगवान श्रीकृष्णांच्या मार्गदर्शनाने उत्तरेकडील राजा वृषपर्व्याच्या प्रदेशातील भूमिगत धनाने करण्यात आली. त्यामुळे प्रजेवर जादा कराचा बोजा न पडता तीनही अश्वमेध यज्ञ पार पडले. प्रजा सुखावली. यज्ञाच्या पवित्र कार्यामुळे पांडवांची कीर्ती सर्वत्र पसरली. त्यानंतर युधिष्ठिराची अनुज्ञा घेऊन भगवान श्रीकृष्ण द्वारकेस निघाले.

भगवान श्रीकृष्णांच्या बद्दलचा आपला आदर व प्रेम व्यक्त करण्यासाठी युधिष्ठिराने अर्जुनास त्यांच्याबरोबर चतुरंग सैन्यासह पाठवले. भगवान श्रीकृष्ण अर्जुनासह कुरुजाङ्गल, पांचाल, शूरसेन इत्यादी पार करून सौभीर व आभीर यांच्या पलीकडे असलेल्या द्वारके जवळ आले, त्यावेळी सूर्य उदकात प्रवेश करण्याच्या तयारीत होता. त्यामुळे सुवर्णाच्या द्वारकेचे फारच विलोभनीय दर्शन घडत होते. द्वारकेच्या जवळ आल्याचे द्वारकावासियांना सुचवण्यासाठी भगवान श्रीकृष्णांनी आपला राजहंसासारखा गुबगुबीत पांचजन्य शंख फुंकला. तो निनाद ऐकताच द्वारकावासी आबालवृद्ध समुद्राला उधाण यावे तसे प्रफुल्लीत झाले. भगवान श्रीकृष्ण द्वारकेच्या प्रवेश द्वाराजवळ येण्याच्या आत नागरिकांनी भराभर आपापल्या घरासमोर सडे शिंपून व दरवाजांवर तोरणे वगैरे लावून सगळे वातावरण बदलून टाकले. घराघरातून धूप लावण्यात आले. आणि दारा समोर फुलांनी रांगोळया काढण्यात आल्या. भगवान श्रीकृष्णांच्या स्वागताची जोरदार तयारी थोड्याच अवधीत पूर्ण झाली. वसुदेव-देवकी वेद घोषात रथातून श्रीकृष्णांना सामोरे जाण्यास निघाले.

तो अपूर्व सोहळा पाहण्यास आकाशात देवांचीही दाटी झाली. द्वारकेच्या प्रवेशद्वारावर संरक्षणासाठी सदैव सिद्ध असलेल्या दाशार्ह, मधु, भोज, कुकर इत्यादी कुळातल्या प्रमुखांनी प्रथम श्रीकृष्णांचे स्वागत केले. पूजन झाले, मानाप्रमाणे आलिंगनादि झाले. भगवान श्रीकृष्ण प्रथम पितृगृही आले. वसुदेव-देवकी यांना वंदन केले. इतर सापत्न मांतानाही वंदन केले. श्रीकृष्णांवरील आत्यंतिक प्रेमामुळे देवकीला पान्हा फुटला! फुटलेल्या पान्ह्याने व नेत्रातल्या अश्रूंनी तिने भगवंताला आपला पुत्र समजून न्हाऊ घातले. आपल्या माता व पिता यांच्या भेटीचा सगळा अपूर्व सोहळा पार पडल्यावर भगवान श्रीकृष्ण अंतर्गृहाकडे वळले. भगवंतांनी अंतर्गृहात प्रवेश केला. त्यांच्या सर्व भार्या हातात पंचारत्या घेऊन आतुरतेने वाट पहात उभ्या होत्या. नेत्रात आनंदाश्रू, मुखावर सलज्ज स्मित, गालावर फुटलेली पहाट असे संमिश्र भाव त्यांच्या मुखावर उमटले होते. श्रीकृष्णांच्या चरणकमलांच्या दर्शनाने त्या धन्य झाल्या होत्या. अज्ञानामुळे त्या भगवंताला आपला पती समजत होत्या व तसेच वागत होत्या.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-स्कंध पहिला

## पुष्प ९ वे (अध्याय १३)

## विदुरांचे हस्तिनापुरी परत येणे.

कौरव-पांडव युद्धापूर्वीच विदुर तीर्थयात्रेस गेले होते. यात्रेत त्यांची व उध्दवाची भेट झाली. तेंव्हा उध्दवानी विदुराना मैत्रेय मुनींचा अनुग्रह घेण्यास सांगितले. त्याप्रमाणे विदुरांनी मैत्रेयमुनींची कृपा संपादन केली. त्यांच्या अनुग्रहामुळे विदुरांना भगवान श्रीकृष्ण आपल्या जीवनाची परमोच्च गती असल्याची अनुभूती आली. तेथील ज्ञानसाधना पूर्ण करून विदुर हस्तिनापूर येथे परत आले. त्यावेळी युधिष्ठिर राज्य करीत होता. युधिष्ठिराने विदुरांचे अत्यंत भावपूर्ण स्वागत केले. धृतराष्ट्र, गांधारी, कुंती इत्यादी सर्वांनाच मोठा आनंद झाला.

विदुरांचे वास्तव्य जरी राजवाड्यात होते तरी ते सर्व भोग अलिप्त पणाने भोगत होते. थोड्याच काळात विदुरांच्या लक्षात आले कीं धृतराष्ट्र व गांधारी त्या राजवैभवात संसार सुख भोगण्यात आसक्त झाले आहेत. विदुरांना त्याचे फार वाईट वाटले. एकांत पाहून ते धृतराष्ट्राला म्हणाले. " राजन्! सर्व प्राणीमात्रांना भयंकर वाटणारा काळ तुझ्या समीप येत चाललेला आहे. तूं या मायामोहाचा त्याग करून परमात्मसाधन करण्यासाठी लवकर राजवाड्यातून बाहेर पड. नुसता संसारच नव्हे तर शरीर सुद्धा नाशवंत आहे. तुझे आता इथे काय राहिले आहे? भीष्म गेले. दुर्योधनादि तुझे सर्व पुत्रही गेले! आप्त-मित्रही मारले गेले आहेत. तूं स्वत: वार्धक्याने जर्जर झाला आहेस. भीम तुझा पावलो पावली पाणउतारा करून कुत्र्यासारखे वागवतो आहे. एवढे असूनही तूं इथे अन्नाच्या गोळयाचा स्वीकार कां करतोस? धृतराष्ट्रा! या वरून हेच सिद्ध होते कीं प्राणिमात्रांची जगण्याची इच्छा किती प्रबळ असते. अरे! भीमाच्या लहानपणी ज्या भीमावर तूं विषप्रयोग केलास, ज्या पांडवाना तूं लाक्षागृहात जाळण्याचा प्रयत्न केलास, ज्यांच्या पत्नीचा तूं भर दरबारात अपमान केलास, ज्यांचे राज्य व धन तूं कपटाने हरण केलेस, त्यांनी तुझ्यापुढे टाकलेल्या अन्नावर जगण्याचा तुला

काय अधिकार आहे? तुला त्याचा उबग कसा येत नाही? अरे स्वबुद्धीने किंवा दुसऱ्याच्या उपदेशामुळे जो वैराग्य स्वीकारून आत्मज्ञानाचा मार्ग धरतो तो उत्तम पुरुष असे शास्त्र वचन आहे. म्हणून हे राजन्! चल, कोणालाही कळू न देता माझ्या बरोबर उत्तरेकडे चल." अशा प्रकारे विदुरांनी धृतराष्ट्राची चांगलीच कान उघडणी केली. त्याचा सुपरिणाम होऊन धृतराष्ट्र विदुरांबरोबर तत्काळ राजवाडा सोडून निघाला. पाठोपाठ महासती गांधारीही निघाली. तिघेही जण गुपचूप उत्तरेकडे निघून गेले.

दुसरे दिवशी प्रात:काळी पूजा व दान धर्म आटोपून धर्मराज, विदुर व धृतराष्ट्र यांच्या दर्शनास आला. पण संजया खेरीज तेथे कोणीच नव्हते. त्यामुळे धर्मराजाने संजयाकडे विदुर, धृतराष्ट्र व गांधारी यांची चौकशी केली. तेंव्हा संजयाने आपणास काहीच माहिती नसल्याचे सांगितले. धर्मराजास हा आघात सहन झाला नाही. तो शोकमग्न झाला. इतक्यात देवर्षि नारदांचे तिथे आगमन झाले. धर्मराजाला शोक मग्न पाहून त्यांनी धर्मराजास शोकाचे कारण विचारले. तेंव्हा चिंता व्यक्त करीत धर्मराजाने आपल्या शोकाचे कारण सांगितले. व आपल्या कडून असा कोणता अपराध घडला कीं तात धृतराष्ट्र, विदुर व आई गांधारी यांनी माझा त्याग करून निघून जावे? त्यांच्या उदर निर्वाहाच्या काळजीने मी व्यथित झालो आहे. असे जेंव्हा धर्मराज म्हणाला तेंव्हा नारद म्हणाले, "धर्मराजा! प्रथम हा शोक थांबव. कारण हे विश्व ईश्वराच्या आधीन आहे. हे लक्षात घे. इथे संयोग व वियोग हे त्याच्या इच्छेने घडतात. उदर निर्वाहा बाबत म्हणशील तर ते सुद्धा भगवंताच्याच इच्छेने होत असते. हात पाय नसलेल्यांचे सुद्धा भरण पोषण तोच करीत असतो ना? त्यामुळे त्यांची काळजी तूं सोड. ते आता सप्तस्रोत तीर्थावर आत्मकल्याण करून देह त्याग करतील. तूं सुद्धा भगवान श्रीकृष्ण जोवर भूतलावर आहेत, तो वरच राज्य कर. त्यांनी भूलोकाचा त्याग केल्यावर तूं सुद्धा राज्य त्याग करून आत्मकल्याणाचा मार्ग धर. इतके सांगून देवर्षि नारद निघून गेले. धर्मराज शोक आवरून आपल्या उद्योगास प्रवृत्त झाला.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-स्कंध पहिला

## पुष्प १० वे (अध्याय१४,१५)

## पांडवांचे महाप्रस्थान

आपल्या सुहृदांची विचारपूस करण्यास व श्रीकृष्णाचा पुढचा विचार काय आहे हे जाणून घेण्यास द्वारकेस गेलेला अर्जुन सात महिने होत आले तरी परत आलेला नव्हता. व काही अपशकून दिसू लागल्यामुळे धर्मराजाला काळजी वाटू लागली. जवळच असलेल्या वृकोदराकडे आपली काळजी धर्मराजाने व्यक्त केली. धर्मराज म्हणाला, " वृकोदरा! दिशा बघ कशा धूसर दिसू लागल्या आहेत. सूर्याला खळे पडले आहे, ढग अकारणच गर्जना करीत आहेत. घुबडांचे शब्द उमटू लागले आहेत. भीमा! भगवान श्रीकृष्णांची चरण कमले या भूमी वरून नाहीशी तर झाली नसतील ना? " धर्मराज इतके बोलत बोलत आपल्या महालाकडे जात असतानाच अर्जुन आल्याची बातमी कळल्यामुळे ते तातडीने अर्जुनाला भेटण्यास निघाले. द्वारकेहून परतलेला अर्जुन, राजा युधिष्ठिराना पाहताच भावावेगाने त्यांच्या चरणावर कोसळला! अनावर अश्रूंनी धर्मराजांच्या चरणाचे क्षालन केले. नंतर अश्रू ढाळीत मूकपणे उभा राहिला. अर्जुनाचे निस्तेज व म्लान मुख पाहून धर्मराज चरकला! धर्मराजाला तत्क्षणी नारदांची आठवण झाली. अधीरतेने धर्मराजाने विचारले, "अर्जुना! द्वारकेतील आपली आप्त मंडळी श्रीकृष्णासह आनंदात आहेत ना? तुझी प्रकृती ठीक आहे नां? तुझा कुणी अपमान तर केला नाही नां? तूं बोलत का नाहीस? धर्मराजाने एका मागोमाग एक प्रश्न विचारले. पण अर्जुन उत्तर देण्याच्या मन:स्थितीत नव्हताच. शेवटी आपल्या मनाला आवर घालून अर्जुन अतिशय विषण्णतेने बोलू लागला, “ हे धर्मराजा! देवांनाही थक्क करणारे माझे सामर्थ्य हिरावून भगवान श्रीकृष्ण या जगाचा त्याग करून निघून गेले आहेत. माझे हे शरीर म्हणजे एक जिवंत प्रेत उरले आहे. तूं ज्या द्वारकेचे व आप्त स्वकीयांचे क्षेम विचारलेस ती द्वारका व ते आप्त यापैकी आता काही शिल्लक उरले नाही. द्वारकेच्या यादवांना ऋषींच्या शापाची बाधा झाली. वारुणी नावाच्या मद्य प्राशनाने उन्मत्त होऊन ते एकमेकांना ओळखेनासे झाले. मग थट्टा मस्करीत एकमेकांचे जीव घेऊ लागले. परस्परांचा वध करून अवघे चारपाच यादव काय ते शिल्लक उरलेत. मी अत्यंत विकल झालो. तेंव्हा भगवान श्रीकृष्णांनी मला जो आत्मज्ञानाचा उपदेश केला होता त्याचे स्मरण करून मी माझ्या मनाचे सांत्वन करून घेतले आहे. अर्जुनाने

कथन केलेले वृत्त ऐकून महासती कुंतीने भगवान श्रीकृष्णाचे स्मरण केले. पंचप्राण एकवटून तिने श्रीकृष्णाची प्रार्थना केली व क्षणातच अनंतात विलीन झाली. अर्जुनाने कथन केलेले वृत्त ऐकून धर्मराजाने मनातून सर्वसंग परित्याग केला. स्वर्गारोहणाचा निश्चय करून परीक्षिताला राज्याभिषेक करविला. अर्जुना बरोबर आलेल्या व्रज नामक अनिरुद्धाच्या पुत्राला मथुरेच्या राज्यावर बसविले. नंतर प्राजापत्य नामक इष्टी करून अग्नीची आत्म्यात स्थापना केली. सर्वसंग परित्याग केला. वाणी बंद करून मनात, मन प्राणात, प्राण अपानात व अपानाला मृत्यूत लीन केले. वस्त्र त्याग केला. अन्न त्याग केला. केस मोकळे सोडले व एखाद्या मूक बधीर असल्यासारखा शून्यात दृष्टी स्थिर करून अजातशत्रू धर्मराजा भगवान श्रीकृष्णांच्या स्मरणात उत्तरेकडे निघाला. त्याच्या पाठोपाठ त्याचे चारही भाऊ निघाले. त्यांच्या पाठोपाठ द्रौपदीही गेली. सर्वांनीच भगवान श्रीकृष्णांचे ध्यान धरले व स्वत:ला निष्कलंक मनाने श्रीकृष्ण चरणी लीन करून घेतले. भगवान श्रीकृष्णभक्त पांडवांचे हे महाप्रस्थान अत्यंत पवित्र व मंगल कारक आहे. ते श्रद्धेने व भक्तीने श्रवण करणारा श्रीकृष्णभक्तीने सद्गतीला जातो.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

## श्रीमद्भागवत-स्कंध पहिला

## पुष्प ११ वे (अध्याय १६,१७)

# राजा परीक्षित कृत कली निग्रह व तडजोड

सूतमुनी पुढे सांगू लागले, पांडवांच्या महाप्रस्थानानंतर सर्वगुणसंपन्न व भगवद्भक्त राजा परीक्षित राज्यावर आला. उत्तर राजाची कन्या इरावतीशी त्याचा विवाह झाला. इरावतीपासून त्याला जनमेजयादि चार पुत्र झाले. परीक्षित राजाने कृपाचार्यांच्या मार्गदर्शनाने प्रजेच्या कल्याणासाठी तीन अश्वमेध यज्ञ केले.

पुढे आपल्या राज्यात कलीचा प्रवेश झाल्याचे कळल्यावर राजा परीक्षित आपले धनुष्य सिद्ध करून व चतुरंग सैन्य बरोबर घेऊन दिग्विजयाला निघाला. अनेक प्रदेश पादाक्रांत करताना त्याला ब्रम्हास्त्रापासून भगवान श्रीकृष्णांनी केलेल्या रक्षणासह पांडवांच्या सख्यभक्तीच्या अनेक गोष्टी ऐकावयास मिळाल्या. प्रसंगी दूताचे काम करण्यापासून ते अर्जुन आजोबांच्या रथाचे सारथ्य करण्या पर्यंतच्या अनेक विस्मय कारक गोष्टी ऐकून राजा परीक्षित खूपच भारावला गेला. भगवान श्रीकृष्णांवर असलेली त्याची भक्ती अधिकच दृढ झाली.

अशा प्रकारे राजा परीक्षित विजय संपादन करीत चालला होता. त्यावेळी सरस्वती नदीच्या तीरावर राजा येण्यापूर्वी वृषभरूप धर्म व गोरूप पृथ्वी यांचा संवाद चालला होता. कांती व मुख अत्यंत निस्तेज झालेला व एकच पाय शिल्लक असलेला वृषभरूप धर्म, नेत्रातून अश्रू ओघळत असलेल्या गोरूप पृथ्वीला विचारीत होता, "तूं कशामुळे दु:खी झालेली आहेस? माझे तीन पाय नष्ट झाल्याचे दु:ख आहे कीं कलीयुगात लोक खाणे, पिणे, मैथुन करणे आणि झोपा काढणे या व्यतिरिक्त काही करणार नाहीत याचे दु:ख होत आहे?"

तेंव्हा गोरूप पृथ्वी म्हणाली, " हे सर्वगुण संपन्न धर्मा! भगवान श्रीकृष्ण असताना तूं 'सत्य, तप, दया व पावित्र्य' अशा चार पायांवर डौलात व आनंदात उभा होतास. पण आज तुझी अवस्था किती

केविलवाणी झालेली आहे? माझीही तशीच स्थिती आहे. भगवान श्रीकृष्ण माझ्या अंगावर विहार करीत असताना मी अत्यंत सुखावत होते. आता त्यांच्या विरहामुळे मी अतीव दु:खी आहे."

अशा प्रकारे त्यांचा संवाद चालला असताना राजवस्त्रे धारण केलेला एक ओंगळ मनुष्य तिथे आला व वृषभरूप धर्माच्या उरलेल्या पायावर प्रहार करून तो मोडण्याचा उद्योग करू लागला. त्या वृषभरूप धर्माच्या पायावर प्रहार करीत असतानाच कर्म-धर्म संयोगाने राजा परीक्षित तिथे आला. राजाने ते दृश्य पहिले आणि त्याच्या तळपायाची आग मस्तकात गेली. राजा परीक्षितीने आपले धनुष्य  सज्ज करून मेघ गंभीर आवाजात त्या दुष्टाला जाब विचारला, " राजवेषधारी अधमा थांब! राजवेष जरी धारण केलेला असलास तरी शरीर लक्षणावरून व कृती वरून तूं अत्यंत अधम असला पाहिजेस! निरपराध दुर्बलांचा छळ करण्याच्या अपराधामुळे तूं वध्य ठरला आहेस.”

या प्रमाणे त्या दुष्टाचा प्रतिकार करून राजाने वृषभाला तीन पाय कोणी तोडले असे विचारले. धर्मरूप वृषभ म्हणाला, "हे पांडवकुल भूषणा, वेद-वाद करून नाना प्रकारचा बुद्धीभेद केला गेल्यामुळे लोक संभ्रमात पडले आहेत. तर्कांने जाणता येणार नाही व निश्चयाने सांगताही येणार नाही अशा अनेक कारणामुळे माझे तीनही पाय गेले आहेत. त्यामुळे स्वमनाशी उचित विचार करून तूंच निर्णय घे! आहे हा पाय तोडू पाहणारा हा साक्षात कली आहे हे ध्यानात घे!" ह्या अर्थगर्भ बोलण्यावरून हा साक्षात धर्मच असला पाहिजे हे विचारवंत व तत्त्वनिष्ठ राजा परीक्षितीच्या लक्षात आले.

राजा वृषभाला म्हणाला, "सूक्ष्म अशा आंतरिक कुहेतुने केलेल्या अधर्माचे नाव सांगता येणार नाही हे खरे. तथापि विस्मयाने तप, कुसंगतीने पावित्र्य व उन्मत्तपणामुळे दया हे तुझे ३ पाय नष्ट झाले आहेत. आणि सत्य नामक उरलेला पाय कली नष्ट करू पाहत आहे. पण थांब आता मी त्याचा बंदोबस्त केल्या शिवाय राहात नाही.” असे म्हणून राजा कलीवर धावून गेला.

परीक्षिताचा पराक्रम ज्ञात असलेला कली लगेच राजाला शरण गेला व अभय मागितले. राजवस्त्रांचा त्याग करून कलीने राजाला दंडवत घातले व त्याच्याच राज्यात निर्भयपणे राहण्यास स्थाने मागितली. राजाने कलीचा प्रभाव जाणून कलीला राहण्यासाठी जुगार, मद्यपान, व्यभिचार व  हिंसा, काम, क्रोध, मद, भेद व असत्य अशी नऊ स्थाने दिली. यातील  पाच स्थानाचे अधिष्ठान सोन्यात असल्यामुळे कली खुश झाला व राजाला नमस्कार करून निघून गेला. धर्माला पुनश्च चार पायावर उभा करण्याचा निश्चय करून राजा हस्तिनापूरला परत आला.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

श्रीमद्भागवत-स्कंधपहिला

पुष्प १२ वे (अध्याय१८)

## राजा परीक्षिताला ऋषीपुत्राचा शाप

राजा परीक्षित अत्यंत धर्मनिष्ठ व सदाचारी असल्यामुळे कलीला राजावर आपला प्रभाव चालवता येत नव्हता. राजा परीक्षिताला कलीचा एक गुण माहित होता कीं कलीयुगात संकल्पाने पुण्य प्राप्त होते पण पाप घडण्यासाठी प्रत्यक्ष कृती व्हावी लागते. त्यामुळे राजाने त्याच्याशी तडजोड केली व त्याला आपल्या राज्यात पांच स्थाने दिली. तथापि कलीची वृत्ती लांडग्यासारखी आहे. तो बेसावध असणाऱ्यांवर झडप घालतो. राजा परीक्षिताच्या बाबतीतही तेच घडले. परीक्षित शिकारीला गेला असताना एका मृगाचा पाठलाग करताना खूप दमला. तो क्षुधेने व तृषेने आर्त झाला. त्याला जवळपास कुठे जलाशयही दिसेना. त्यामुळे त्याची व्याकुळता वाढतच चालली.

इतक्यात त्याला शमिक मुनींचा आश्रम दिसला. आता आपल्याला तृषा शमवण्यास मिळेल या आशेने राजा त्या आश्रमात आला. क्षुधा व तृषा यांनी राजा अगदी कासावीस झाला होता. आश्रमात प्रवेश करून त्याने बऱ्याच हाका मारल्या परंतु त्याला कोणीच प्रतिसाद दिला नाही. शिवाय पाण्याचे रांजण अथवा तत्सम व्यवस्थाही कोठे दिसेना. त्यामुळे राजा अधिकच अस्वस्थ झाला. त्याच्या मनात थोडा राग उत्पन्न झालाच . इतक्यात त्याला एका पर्णशाळेत केस विस्कळीत झालेले पण ध्यानस्थ बसलेले शमिक ऋषी दिसले. त्यांना पाहून राजाने उच्चरवात त्याना पाणी मागितले. पण शमिक ऋषी जागृती, स्वप्न व सुषुप्ती यांच्या पलीकडे गेलेले असल्यामुळे त्या समाधी अवस्थेत त्यांच्याकडून राजाला काहीच प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे क्षुधा व तृषा यांनी व्याकूळ झालेला राजा अधिकच क्षुब्ध झाला. त्या ऋषींची समाधी म्हणजे राजाला एक ढोंग वाटले. त्यामुळे त्याचा विवेक सुटला आणि कलीरूप लांडग्याने त्याच्यावर झडप घातली.

राजा संतप्त होऊन पर्णशाळेच्या बाहेर येऊ लागला. त्यावेळी पर्णशाळेच्या बाहेर त्याला एक मृत सर्प दिसला तो राजाने आपल्या हातात असलेल्या बाणाच्या टोकाने उचलून शमिक ऋषींच्या गळयात घातला. व आपल्या नगराकडे निघून गेला. कलीचे काम झाले. थोड्याच वेळात शमिक मुनींचा बाहेर गेलेला तेजस्वी पुत्र आश्रमात परतला. त्याला आपल्या पित्याची अवहेलना झालेली दिसली. त्याचा संताप

अनावर झाला. त्याने लगेच आचमन करून हातात उदक घेतले व " ज्याकोणी हे कृत्य करून स्वत:च्या कुळाला बट्टा लावला आहे, व माझ्या पित्याचा अपमान केला आहे त्याला आजपासून सातव्या दिवशी मी प्रेरणा केलेला तक्षक नाग दंश करील." अशी शाप वाणी उच्चारून तो आपल्या पित्या जवळ आला.

पित्याच्या खांद्यावर असलेला सर्प पाहून त्याला अनावर रडू आले. त्याच्या त्या रडण्यामुळे शामिक मुनी ध्यानातून बाहेर आले. त्यांनी आपल्या खांद्यावरचा मृतसर्प निर्विकारपणे काढून टाकला. व पुत्राला रडण्याचे कारण विचारले. पुत्राने राजाचे कृत्य आपण दिलेल्या शापासह निवेदन केले. तेंव्हा शमिक मुनींनी तीव्र शब्दात आपली नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले “एका क्षुल्लक अपराधासाठी तूं एका महान व धर्मनिष्ठ राजाला फार मोठी शिक्षा दिली आहेस.

आपल्या पुत्राच्या कृत्याचा त्याना तीव्र पश्चात्ताप झाला पण राजाचा अपराध त्यांच्या मनातही आला नाही. इकडे राजा परीक्षित राजप्रासादाकडे जात असतानाच स्वत:च्या दुष्कृत्याचा पश्चात्ताप होऊन आपण आता राजा म्हणून राहण्याच्या योग्यतेचे राहिलो नाही अशा निर्णयाप्रत आला. त्याने राजप्रसादात जाण्या पूर्वीच राज्यत्याग करून प्रायोपवेशन करून प्रायश्चित्त घ्यावयाचे ठरवले.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-स्कंध पहिला

## पुष्प १३ वे (अध्याय १९)

## राजा परीक्षितचे प्रायोपवेशन व शुक मुनींचे आगमन

राजा परीक्षित हस्तिनापूर येथे आपल्या राजप्रासादात पोहोचतो न पोहोचतो तेवढयात ऋषी पुत्राने दिलेल्या शापाचे वृत्त त्याच्या हेरांकडून कळले. आजपासून ७ व्या दिवशी तक्षक दंशाने आपणास मृत्यू येणार हे समजताच राजाला आनंद झाला. क्षणाचाही विलंब न लावता राजाने आपला पुत्र जनमेजय यास राज्यावर बसवण्याची व्यवस्था केली व सर्वसंग परित्याग करून राजा परीक्षित गंगा किनारी जाऊन बसला.

राजा प्रायोपवेशनास गंगा किनारी जाऊन बसला हे वृत्त वायूवेगाने सर्वत्र पसरले. त्यामुळे त्रिभुवनाला पावन करणारे प्रभावशाली ऋषी आपल्या शिष्यगणासह राजा जवळ गंगा तटाकी आले. अत्रि, वसिष्ठ, च्यवन, शरद्वान, अरीष्ट्नेमी, भृगु, अंगिरा, व्यास, नारद, पराशर, विश्वामित्र, परशुराम इत्यादी ज्येष्ठ व श्रेष्ठ ऋषींचे तेथे आगमन झाले. तेंव्हा वैराग्यामुळे शांत व शुद्ध मन झालेल्या राजाने त्यांना हात जोडून प्रार्थना केली कीं ब्रम्हशापामुळे मला प्राप्त झालेली विरक्ती हा त्या शापाचा माझ्यावर उपकारच आहे. मी माझे चित्त भगवान श्रीकृष्णांच्या ठिकाणी स्थिर केले आहे. हे जाणून आपण माझ्यावर अनुग्रह करावा. तक्षक कोणत्याही स्वरूपात येऊन दंश करो. आपण त्यास प्रतिबंध करू नये ही माझी आपणास प्रार्थना आहे. ईश्वराच्या ठिकाणी माझी बुद्धी स्थिर राहील असा उपदेश आपण मला करावा. अशी मी आपणास नम्र प्रार्थना करतो. आपण सर्वजण माझ्यावर अनुग्रह करण्यासाठीच आला आहात हे माझ्यावर अनंत उपकारच आहेत. मी आपणास अशी प्रार्थना करतो कीं मृत्यू समीप आलेला असताना मनुष्याने आपले कर्तव्य शुद्धरीतीने कसे आचरावे हे आपण मला सांगावे. मला स्वत:ला भगवान श्रीकृष्णांचे चरित्र श्रवण करण्याची इच्छा आहे. आपल्या अनुग्रहाने ती इच्छा पुरी होईल!"

राजा परीक्षित हे बोलत असतानाच त्या ठिकाणी भगवान श्रीशुक मुनींचे आगमन झाले. सर्वसंग परित्याग केलेल्या शुकमुनिंचा चेहरा अत्यंत तेजस्वी दिसत होता. त्यांची अंगकांती जरी धुलीकणांनी माखलेली होती तरीही कांतीचे तेज लपून रहात नव्हते. शरीर सौष्ठवाची तुलना भगवान श्रीविष्णूंच्या शरीराशीच होऊ शकली असती. चेहऱ्यावर ब्रम्हानंद उजळलेला. शरीरावर एकही वस्त्र नाही. वय फक्त १६

वर्षाचे. पण त्यांना पहाता क्षणीच सर्व ऋषी व मुनी पटकन उठून उभे राहिले व त्यांना अभिवादन करण्यासाठी सामोरे गेले.

राजा परीक्षितही भारावल्यासारखा पुढे आला. शुकमुनींच्या पायावर त्याने साष्टांग नमस्कार केला. त्यांना अत्यादराने उच्चासनावर बसवले. राजाने मनोभावे त्यांची पाद्य पूजा केली. मग अत्यंत विनयाने त्यांच्या चरणाशी बसला. दोन्ही हात जोडून त्याना म्हणाला, "हे ब्रम्हन्! आपण आमच्यावर कृपा करण्यासाठीच आला आहात हे नक्कीच. त्यामुळे माझ्यासारखा अधम क्षत्रिय सुद्धा साधुसेवेस पात्र झाला आहे. भगवान श्रीकृष्णांच्या कृपेनेच आपले इथे आगमन झाले आहे असेच मी मानतो. यास्तव माझी आपणास नम्र प्रार्थना आहे कीं मरणोन्मुख मनुष्याचे मोक्ष प्राप्तीचे साधन आपण मला सांगावे. आपण कोणत्याच ठिकाणी गो दोहनास लागेल इतका वेळही थांबत नाही हे मला ज्ञात आहे. म्हणून माझी आपणास अशी विनंती आहे कीं मला मार्गदर्शन केल्याखेरीज जाऊ नये. हे ऐकून शुक मुनींनी प्रसन्नतेने बोलावयास सुरुवात केली.

इथे श्रीमद्भागवतातला पहिला स्कंध पूर्ण झाला. यात एकूण १९ अध्याय व ८०३ श्लोक आहेत. त्या सर्वांचा पुष्प १ ते पुष्प १३ हा साररूप अनुवाद आहे.

हरये नमः। हरये नमः। हरये नमः।

# स्कंध २

।।श्रीगुरु:शरणं।।

श्रीमद्भागवत-स्कंध दुसरा

पुष्प १४ वे (अध्याय १)

## मोक्ष साधन विचार व विराट स्वरूप

शुकमुनी म्हणाले, "राजन्! तुझे विचार अत्यंत उत्तम आहेत. प्रपंचासक्त मनुष्या कडून नकळत अनेक दोष घडतच असतात. त्या दोषातून मुक्त होण्यास अनेक साधने आहेत. पण दिवस द्रव्यार्जनाच्या कष्टात जातो व रात्र विषय सेवन व निद्रा  यात संपून जाते. त्यामुळे प्रापंचीकांना त्या साधनाचा उपयोग करण्यास वेळ मिळत नाही. संसार मिथ्या आहे हे समजत असूनही संसारासक्ती काही सुटत नाही.

संसारासक्ती सुटण्यासाठी व ब्रम्हज्ञान प्राप्तीसाठी श्रीमद्भागवत पुराण वेदतुल्य असून मी ते द्वापार युगाच्या शेवटी माझा पिता भगवान व्यास यांच्या कडून शिकलो. सदैव परब्रह्माच्या ध्यानात निमग्न असतानाही भगवंताच्या मधुर लीलांनी मी आकर्षित झालो. व भागवताचे अध्ययन केले. तेच मी आता तुला सांगणार आहे. कारण श्रीमद्भागवताच्या श्रवणाने निष्काम भक्ती उत्पन्न होते. निष्काम भक्तीने केलेले नामसंकीर्तन मोक्ष प्राप्ती करून देणारे तर आहेच पण संसारातल्या अडचणी नष्ट करणारे आहे. पूर्वी खट्वांग नावाच्या राजाने निष्काम भक्तीने केवळ दोन घटकातच श्रीहरीपदाची प्राप्ती करून घेतली. तुला तर सात दिवसांचा अवधी मिळाला आहे. म्हणून तूं श्रीमद्भागवताच्या श्रवणाने श्रीहरीपद प्राप्त करून घे.

राजन्! आपला मरण काल जवळ आलेला कळताच मनुष्याने मरणाचे भय त्यागावे व सर्वसंग परित्याग करावा. सर्वसंग परित्याग तूं  केलाच आहेस पण आपण अनेक अक्षौहिणी सैन्य, राजवाडा, पुत्र, कलत्र इत्यादिकांचा त्याग केल्याच्या भावनेच्या संगाचाही त्याग कर. आणि मग तूं भगवान श्रीहरीचे ध्यान धर. साधकाने प्रथम इंद्रिय प्रवृत्ती स्थिर करून मग प्राणायामाचा सराव करावा. मग भगवंताच्या सगुण स्वरूपावर बुद्धी स्थिर करावी. भगवंताला भूत, भविष्य व प्रत्यक्ष घडत असलेल्या कार्यरूप जगताचे स्वरूप कल्पावे. तोच भगवंताचा विराट देह यच्चयावत् विश्वा पेक्षा मोठा असल्याची कल्पना करावी. तोच विराट देह पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश, अहंकार व महतत्त्व या सात आवरणांनी युक्त आहे.

अशा ब्रह्मांडरुपी स्वरूपात विराजमान असणाऱ्या अधिष्ठात्री देवतेला विराट पुरुष असे म्हणतात. ती अधिष्ठात्री देवता धारणायोगाचे शास्त्रशुद्ध अधिष्ठान आहे. त्याचे ध्यान कसे करावे ते ऐक.  या विराट

पुरुषाचे तळवे म्हणजे पाताळ आहे. चवडे व टाचा म्हणजे रसातळ, घोटे महातळ, पोटऱ्या रसातळ, गुडघे सुतल, दोन्ही मांड्या अतल व वितल, बेंबी व कंबर यांच्या मध्ये महीतल, नाभी म्हणजे आकाश, वक्षस्थळ म्हणजे स्वर्लोक, कण्ठ महर्लोक, मुख जनलोक, ललाट तपोलोक, सहस्त्रमस्तके सत्यलोक. इंद्रादि तेजोरूप देव बाहू, दिशा कान, शब्द श्रोत्रेन्द्रीय, नाकपुड्या अश्विनीकुमार, गंध घ्राणेन्द्रीय, अग्नी मुख, अंतरिक्ष नेत्रगोलाक, सूर्य चक्षुरीन्द्रीय, रात्र व दिवस पापण्या, ब्रह्मलोक भृकुटी, पाणी टाळू, सर्वप्रकारचे रस जिव्हा, वेद मस्तक, यम दाढा, दात कलत्र व पुत्र यांच्यावरचे प्रेम, हास्य म्हणजे मोह उत्पन्न करणारी माया आणि अपरंपार सृष्टी म्हणजे नेत्रकटाक्ष. वरचा ओठ लज्जा तर खालचा ओठ लोभ, धर्म स्तन तर पाठ अधर्म, दक्षप्रजापती जननेन्द्रीय, मित्र व वरुण वृषण, समुद्र म्हणजे दोन्ही कुशी, अस्थि म्हणजे पर्वत, नद्या म्हणजे नाड्या, शरीरावरचे रोम म्हणजे वनस्पती, वायू म्हणजे श्वासोच्छवास. काल ही विराट पुरुषाची गती आहे. सत्व, रज,तम (म्हणजे महत्तत्व) या गुणांपासून होणारी कार्ये त्याची क्रीडा आहे. मेघ हे केस, सायंकाळ त्याचे वस्त्र, प्रकृती त्याचे हृदय आहे, रुद्र अंत:करण, सर्व विकारांचे भांडार असलेले मन म्हणजे चंद्र, महत्तत्व म्हणजे त्याचे चित आहे.पशु त्याची कंबर आहे, पक्षी त्याचे शिल्प आहे, मनु बुद्धी आहे, मानव हे निवासस्थान आहे. गंधर्व, विद्याधर, इत्यादी त्याचे मधुर स्वर आहेत. प्रल्हाद त्या विराट पुरुषाची स्मृती आहे. मुख ब्राम्हण, भुजा क्षत्रिय, मांड्या वैश्य, चरण शूद्र. व यज्ञ हे त्या विराट पुरुषाचे कर्म आहे.

राजन्! दृढ निश्चयाने तूं आपली बुद्धी या रूपावर स्थिर कर. कारण या रूपा शिवाय कोणत्याच वस्तूला अस्तित्व नाही. सर्वांच्या अंतर्यामी रहाणारा हाच परमात्मा साक्षित्वाने सर्व जीवांमध्ये बुद्धी व वृत्तीच्या रूपाने सर्व विषयांचा अनुभव घेतो. पण तो स्वत: मात्र ज्ञानबलाने त्यात बध्द होत नाही. म्हणून त्याचे ध्यान केल्यास मोहामुळे होणारा अध:पात टाळता येतो.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-स्कंध दुसरा

## पुष्प १५ वे (अध्याय २ रा व ३ रा )

## कर्म फळाची निंदा व भक्तीयोग

शुक मुनी पुढे सांगू लागले, राजन्! शास्त्राने कर्म प्रवृत्ती निर्माण व्हावी म्हणून स्वर्गलोकादिची अभिलाषा उत्पन्न होईल अशी युक्ती केली आहे. त्यामुळे आपण प्रथम जरी त्या अभिलाषेने कर्म आरंभले तरी नंतर ती अभिलाषा त्यागावी. कारण बाह्य उपभोग्य वस्तूपासून शाश्वत सुख प्राप्त होत नाही. त्यामुळे भोग्य वस्तूंसाठी लाचार न होता स्वहृदयात विराजमान असलेल्या स्वयंसिद्ध, सत्यस्वरुप, अविनाशी व सर्वव्यापी भगवान श्रीकृष्णांना शरण जावे. त्यांचे निश्चयात्मक व नि:संशय बुद्धीने स्मरण करावे. त्यामुळेच संकल्पाला कारण असलेले अज्ञान नाहीसे होते. त्यासाठी प्रथम सगुण ध्यानाची संवय लावून घ्यावी. त्यासाठी शंख, चक्र, गदा व पद्म धारण केलेल्या आजानुबाहू असलेल्या चतुर्भुज स्वरूपाचे ध्यान हृदयाकाशात धरावे. सम चरण, कौस्तुभमणि, वैजयंती माला, वनमाला, मस्तकी मुकुट, कानात मकर कुंडले, चेहऱ्यावर मधुर हास्य अशा स्वरूपात भगवान श्रीकृष्णांना पाहण्याची संवय लावून घ्यावी. त्यांच्या ठिकाणी प्रेमभक्ती उत्पन्न होई पर्यंत असे ध्यान करीत जावे व प्रेमभक्ती उत्पन्न झाल्यावर त्यांच्या हास्यावर लक्ष केंद्रित करून मग त्या हास्यातल्या आनंदावर ध्यान धरावे. म्हणजे निर्गुण ध्यानाची संवय जडते. अशी संवय जडल्यानंतर अहंकाराने ज्याला आपण मी असे म्हणतो त्या "मी" ला त्या परमात्म्यात लीन करावा म्हणजे शांती प्राप्ती होते.

मग प्राणायामाच्या सरावाने प्राणवायू स्वाधीन करून घ्यावा. त्यानंतर मूळबंध नामक आसनाच्या सरावाने अपानवायू उलटा फिरवावा. त्यामुळे कुंडलिनी नामक शक्ती जागी होऊन षट्चक्रांचा भेद होतो. व त्याला मोक्ष प्राप्त होतो. राजन्! तूं मोक्षमार्ग विचारलास त्याचे हे थोडक्यात उत्तर दिले. पण संसारीकाला हे जमत नाही. म्हणून त्याने भक्तिमार्ग अवलंबावा. त्यामुळे श्रीहरी जरी दिसत नसला तरी तो सर्वांच्या अंतर्यामी आहेच. म्हणून अस्तिक्य बुद्धीने मन:पूर्वक भक्ती करावी.

मन व बुद्धी ही प्रत्येक प्राण्याला असतेच. व माझ्या मनाला असे वाटले, किंवा माझ्या बुद्धीला हे पटत नाही, माझ्या जीवाला बरे नाही, असे आपण म्हणतो तेंव्हा आपण स्वत:ला मन, बुद्धी, अंत:करण, जीव  इत्यादी पेक्षा वेगळे समजतो. याचाच अर्थ हा कीं जीवा पेक्षा वेगळा चालक अंतर्यामी असल्याचे ज्ञान आपल्याला असतच असते. ह्याचा अर्थ असा कीं ज्ञानरूप ईश्वर सर्वांच्या अंतर्यामी असतच असतो. तो दिसत नसला तरी अनुभवता येतो. म्हणून नामस्मरण व मनन करावे. तसेच भगवत्कथा श्रवण करण्याने कलुषित झालेला जीव पवित्र होतो.

राजन्! भगवंताची निष्काम भक्ती शाश्वत सौख्य मिळवून देणारी आहे. अनेक प्रकारची काम्यव्रते शास्त्रात दिलेली आहेत. अज्ञानामुळे लोक काम्यव्रते करतात.  तथापि निष्काम भक्ती उत्पन्न होण्यासाठी ही काम्यव्रते अनन्यभावाने करीत राहाणे हा अत्यंत कल्याणप्रद मार्ग आहे. त्यासाठी हरिकथा श्रवण करून ज्ञानप्राप्ती करून घ्यावी. त्यासाठीच नामस्मरण व हरिकथा श्रवण करीत राहावे म्हणजे कुतर्क दूर होऊन अंत:करण शुद्ध होत जाते. व आहे त्या स्थितीत समाधानाचा अनुभव येऊन मोक्ष प्राप्ती करून देणारा भक्तियोग साधला जातो.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-स्कंध दुसरा

## पुष्प १६ वे (अध्याय ४, ५)

## सृष्टी विषयी प्रश्न व कथारंभ

राजा परीक्षित शुक मुनींना म्हणाला, हे प्रभो! अनंतशक्ती परमात्मा स्वत:च सर्व बनतो व स्वत:च स्वत:शी खेळतो. मग त्यासाठी परमात्मा कोणत्या शक्तीचा वापर करतो? शुक मुनी म्हणाले, राजन्! असेच प्रश्न पूर्वी नारदांनी ब्रह्मदेवांना विचारले होते. पूर्वी नारद ब्रह्मदेवांना म्हणाले, हे प्रभो! आपणास माझा नमस्कार असो. प्रभो आपण मला आत्मज्ञानाचा बोध करावा अशी माझी आपणास प्रार्थना आहे. मला असे प्रश्न पडलेत कीं या सृष्टीचा निर्माता कोण? या सृष्टीचा आधार काय? या संसाराचे लक्षण काय? ही सृष्टी कोणाच्या आधीन आहे? हिचे सत्यस्वरूप काय? हे प्रभो जे काही झाले आहे, होत आहे व होणार आहे त्याचे स्वामी आपणच आहात. संपूर्ण सृष्टीचे ज्ञान आपणास तळहातावर ठेवलेल्या आवळयासारखे होत असते. पण आपण एकटेच आहात कीं आपलाही कोणी स्वामी आहे? आपणास हे ज्ञान कोठून झाले? आपण कोणाच्या आधारावर स्थिर आहात? प्रभो ! कृपया मला समजेल अशा पद्धतीने हे सर्व सांगावे.

हे ऐकून ब्रह्मदेव म्हणाले, पुत्रा नारदा! तुझ्या या उत्कृष्ट प्रश्नामुळे मला भगवंताचे गुण वर्णन करण्याची प्रेरणा झाली आहे. माझ्या पलीकडे असलेले भगवत्तत्त्व जो पर्यंत जाणले जात नाही तो पर्यंत हा माझाच प्रभाव वाटत राहील. त्यामुळे ज्यांच्या अगम्य मायेमुळे मोहित होऊन लोक मलाच भगवंत मानतात त्या परमात्म स्वरूपी वासुदेवास नमस्कार करून मी तुझ्या प्रश्नांची उत्तरे देतो. नारदा! स्वत: निर्गुण, निराकार असूनही सर्वांचे स्वरूप असणाऱ्या भगवान वासुदेवाने मला प्रकाशित केले आहे. त्याच्याच चिन्मय प्रकाशाने प्रकाशित झालेल्या विश्वाला मी प्रकाशित करीत असतो. द्रव्य, काल, कर्म, स्वभाव, जीव इत्यादी सर्व वासुदेवाचेच स्वरूप आहे. त्यांनाच नारायण म्हणतात. त्यामुळे वेद त्याच नारायणाचे वर्णन करतात. देवदेवता त्याच नारायणाची रूपे आहेत. योगसाधना, यज्ञ, याग, इत्यादी सर्व नारायणाचे स्वरूप असून नारायणाच्या प्राप्तीसाठीच केले जातात.

रहस्यमय भगवंताला एकटेपणाचा कंटाळा आला व अनेक व्हावेसे वाटले तेंव्हा निर्गुण भगवंताने सत्व, रज, तम हे तीन गुण निर्माण केले. त्या द्वारे भगवंत उत्पत्ती, स्थिती व प्रलय करीत असतो. सत्व, रज व तम हे तीन गुण भगवंताच्या मायेच्या प्रभावाने भगवंतानेच निर्माण केलेल्या द्रव्य, ज्ञान व क्रिया या शक्तींचा आश्रय घेतात. मग कार्य, कारण व कर्तृत्व यांच्या अभिमानाने नित्यमुक्त पुरुषाला बध्द करतात. मग काल, कर्म व स्वभाव या चिद्रूप शक्तींच्या माध्यमातून त्यांनी या गुणांना क्षोभवले. कालाने क्षोभ निर्माण केला. स्वभावाने त्याना रुपांतरीत केले. व कर्माने महत्तत्त्वाची उत्पत्ती केली.

महत्तत्त्व म्हणजेच अहंकार. हा अहंकार तीन प्रकारचा झाला. वैकारिक, तैजस व तामस. हे क्रमश: ज्ञानशक्ती, क्रियाशक्ती व द्रव्याशक्ती प्रधान आहेत.

तामस अहंकारापासून म्हणजेच द्रव्याशक्ती प्रधान अहंकारापासून पंचमहाभूते निर्माण झाली. प्रथम शब्द गुणासह आकाश निर्माण झाले. आकाशापासून शब्द व स्पर्श या गुणांसह वायू , वायूपासून शब्द, स्पर्श व रूप या गुणांसह तेज , तेजापासून शब्द, स्पर्श, रूप व रस या गुणांसह आप, आपापासून शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध या गुणांसह पृथ्वी निर्माण झाली. नंतर वैकारिक अहंकारापासून इंद्रियांच्या अधिष्ठात्री देवता उत्पन्न झाल्या. नंतर तैजस अहंकारापासून कर्मेंद्रिये, कर्मेंद्रियांची कार्ये समजण्यासाठी ज्ञानशक्ती म्हणजे बुद्धी, व क्रियाशीलतेसाठी प्राण नामक क्रियाशक्ती उत्पन्न झाली. इतके सगळे उत्पन्न करून भगवान श्रीहरी स्वस्थ राहिले.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-स्कंध दुसरा

## पुष्प १७ वे (अध्याय ६) –

## विराट स्वरूपाचे वर्णन

भगवंताने निर्माण केलेले सगळे गुण, शक्ती, देवता वगैरे सर्व स्वतंत्रपणे विहार करीत होते. बराच काल त्यांचा विहार झाल्यावर भगवंतांनी त्याना संघटीत होण्याची प्रेरणा दिली. आणि व्यष्टीरूप जीव व समष्टीरूप ब्रह्मांड संगठीत करून ठेवले. हजारो वर्षे त्यांना परस्परांचा सहवास घडू दिला. मग त्या ब्रह्मांडातल्या विराट पुरुषाला म्हणजेच जीवाला काल, कर्म, स्वभाव यांच्या सहाय्याने जागृत केले.

त्यावेळी तो विराट पुरुष ब्रह्मांड फोडून बाहेर आला. त्या विराट पुरुषाच्या पायापासून कमरे पर्यंत सप्त पाताळे आहेत व कमरेच्या वर मस्तका पर्यंत सप्त भुवने आहेत. विराट पुरुषाच्या मुखातून वाणी व वाणीची अधिष्ठात्री देवता अग्नी उत्पन्न झाले. सप्त धातूंपासून सात छंद निर्माण झाले. जिभेपासून रसनेन्द्रिय व रसनेन्द्रियाची अधिष्ठात्री देवता वरूण, मनुष्य, पितर, इतर देवता व अमृत रसमय अन्न उत्पन्न झाले. नाकाच्या छिद्रापासून पांच प्राणवायू निर्माण झाले. घ्राणेन्द्रीयापासून सर्व प्रकारचे गंध व अश्विनीकुमार निर्माण झाले. नेत्रगोलकांच्या रूपाने सूर्याचे क्रीडास्थान अंतरिक्ष निर्माण झाले. चक्षुरीन्द्रीयाच्या रूपाने सूर्याची क्रीडा निर्माण झाली. श्रोत्रापासून दिशा व श्रोत्रेन्द्रियापासून शब्द व आकाश निर्माण झाले. विराट पुरुषाचे शरीर म्हणजे सर्व वस्तूंचे सार व सौंदर्याचा खजिना आहे. त्याच्या त्वचेपासून यज्ञ, स्पर्श व वायू निर्माण झाले. रोमापासून उद्भिज पदार्थ उत्पन्न झाले. वृषणापासून जल, वीर्य, सृष्टी, मेघ, प्रजापती इत्यादींचा आधार उत्पन्न झाला. जननेन्द्रियापासून प्रजनन व आनंद निर्माण झाला. गुदेन्द्रीय यम, मित्र व मलत्याग यांचे उत्पत्ती स्थान आहे. तर गुदद्वार हे हिंसा, निर्ऋती, मृत्यू व नरक यांचे उत्पत्ती स्थान आहे. स्तनापासून धर्म, पाठीपासून अधर्म व अज्ञान, हाडे म्हणजे पर्वत, नाड्यांपासून नद्या, त्याच्या पोटात सगळ्या प्राण्यांचा, त्यांच्या मृत्यूचा, रस, समुद्र, प्रकृती इत्यादींचा समावेश आहे. त्याचे हृदय हे मनाची जन्म भूमी आहे. नारदा! मी, तूं , भगवान शंकर, सनक ऋषी, विज्ञान, अंत:करण हे सर्व त्याचे क्रीडन आहे. थोडक्यात म्हणजे सगळे विश्व या विराट पुरुषाच्या रूपाने भगवंतानेच व्यापले आहे. आणि हे सर्व व्यापून भगवंत साक्षी रूपाने उरलेला आहे. सर्व सत्ता त्याचीच आहे. त्याला काल नाही, कर्म नाही, स्वभाव नाही, पण सत्ता मात्र या सर्वांवर त्याची आहे. संपूर्ण विश्व त्याच्यासाठी कणभरही नाही. तोच माझ्या माध्यमातून

रजोगुणाच्या अविष्काराने सृष्टी रचना करतो. विष्णूंच्या रूपाने सत्वगुणाच्या माध्यमातून पालन करतो व रुद्राच्या रूपाने तमो गुणातून संहार करतो.

नारदा! या विश्वातली प्रत्येक शक्ती, दृश्य वा अदृश्य पदार्थ, चल अथवा अचल पदार्थ, चेतन - अचेतन, भाव, भावना, वैराग्य, यश, कीर्ती, अपकीर्ती, मान, अपमान, असे जे जे म्हणून अनुभवास येते ते सर्व भग्वद्स्वरुपच आहे. अविद्येने ते झाकले गेल्यामुळे भगवंताच्या स्वरूपा विषयी मन साशंक होते. पण अंत:करण एकवटून भगवंताला शरण जाण्याने थोडे तरी त्याचे गूढ स्वरूप अनुभवास येते. त्यासाठीच तर श्रीव्यासानी श्रीमद्भागवत सांगितले आहे.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-स्कंध दुसरा

## पुष्प १८ वे (अध्याय ७,८)

## भगवंताचे लीलावतार

ब्रह्मदेव नारदांना भगवंताचे मुख्य मुख्य अवतार सांगू लागले, नारदा! रसातळाला गेलेली पृथ्वी वर आणण्यासाठी यज्ञ वराह. तिन्ही लोकांची व्यवस्था लावण्यासाठी श्रीहरी, सांख्य शास्त्र समजावून सांगण्यासाठी कपिल, मोक्षमार्ग दाखवण्यासाठी श्रीदत्तात्रेय, आत्मज्ञानाच्या बोधासाठी सनकादीमुनींचा, तपाचरणाचा मार्ग दाखवण्यासाठी नर-नारायणांचा, भक्ती समजण्यासाठी ध्रुवाचा, पृथ्वीच्या गोरूप दोहनासाठी राजा पृथुचा, परमहंसपद प्राप्तीच्या मार्गदर्शनासाठी ऋषभांचा, वेदवाणी प्रगट करण्यासाठी हयग्रीवाचा, चाक्षुष मन्वंतराच्या शेवटी प्रलय काळी सत्यव्रतासाठी मत्स्यावतार, क्षीरसागर मन्थनाच्या वेळी मंदराचलाला आधार देण्यासाठी कूर्मावतार, भक्त रक्षणासाठी व हिरण्यकशिपुचा वध करण्यासाठी नरसिंहाचा, गजेंद्रमोक्षासाठी घेतलेला श्रीहरीचा अवतार, अदितीच्या प्रार्थनेवरून वामनावतार, तुझ्या भक्तीवर प्रसन्न होऊन तुला योग, आत्मज्ञान व श्रीमद्भागवताचा उपदेश करण्यासाठी घेतलेला हंसावतार, मन्वंतर व्यवस्थेसाठी मनूचा अवतार, आयुर्वेद प्रगट करण्यासाठी धन्वंतरीचा अवतार, देवाना अमृत पाजण्यासाठी मोहिनीचा अवतार, धर्ममर्यादांचे उल्लंघन करणाऱ्या क्षत्रिय राजांना शासन करण्यासाठी परशुरामांचा अवतार, रावण वधासाठी श्रीरामांचा अवतार, दैत्यांचा नाश करून भूमी भार हलका करण्यासाठी कृष्ण-बलराम अवतार, वेदाचे चार भाग करण्यासाठी व्यासांचा अवतार, लोकांना वेदमार्गाने पीडा करणाऱ्या दैत्यांना मोह उत्पन्न करण्यासाठी बौद्धावतार, कलियुगाच्या शेवटी अनाचाराचा कळस झाल्यावर भगवान कल्कीचा अवतार धारण करतील.

समस्त सृष्टी रचना ही त्यांची माया आहे. अशा अनंत शक्तींचा आश्रयस्थान असलेल्या भगवंताला मीच काय पण कोणीच जाणू शकत नाही. नारदा, संकल्पाने विश्व रचना करणाऱ्या भगवंताचे मी हे

संक्षेपाने केलेले वर्णन लोकांच्या मनात श्रीहरीची भक्ती निर्माण होण्यासाठी तूं विस्ताराने कर! हे सर्व श्रवण करून राजा परीक्षितीच्या मनात अनेक प्रश्न उपस्थित झाले.

त्याने शुक मुनींना विचारले, प्रभो! भगवंतापासून माया झाली. पण भगवंताचा मायेशी संबंध नसतो म्हणजे नक्की काय? काळाची सूक्ष्म व स्थूल गतीची परिमाणे काय आहेत? पृथ्वी, पाताळ, आकाश, पर्वत इत्यादी कसे उत्पन्न होतात? युगभेद व त्याची परिमाणे, बंध व मोक्ष यांचे स्वरूप, पाखंड कसे निर्माण होते? या सगळ्या गोष्टींचा उलगडा होईल असे सांगा. तेंव्हा शुक मुनी म्हणाले, राजन्! श्रीमद्भागवत पुराणाच्या आधारेच सर्व समजावून सांगणार आहे.

हरये नमः। हरये नमः। हरये नमः।

।।श्रीगुरु:शरणं।।

## श्रीमद्भागवत-स्कंध दुसरा

## पुष्प १९ वे (अध्याय ९)

# भगवद्धाम दर्शन व चतु:श्लोकी भागवत

शुकमुनी सांगू लागले, राजन्! स्वप्न पाहाणाऱ्याचा जसा स्वप्नातल्या पदार्थांशी संबंध नसतो. तद्वतच मायेमुळे उत्पन्न होणाऱ्या पदार्थांशी, घडणाऱ्या घटनांशी, काळाशी, भविष्याशी, असा कोणत्याच गोष्टींशी भगवंताचा संबंध नसतो. म्हणून तो माये वेगळा असतो. घडणाऱ्या यच्चयावत् गोष्टींचा तो साक्षी असतो. प्रकृतीच्या कार्यात तो आपण होऊन काहीच ढवळा-ढवळ करीत नाही.

ब्रह्मदेव जेंव्हा विराट पुरुषाच्या नाभी कमळातून उत्पन्न झाले तेंव्हा त्यांना कमळा शिवाय काहीच दिसत नव्हते. शिवाय आपण कोण, कोठून उत्पन्न झालो, काय करावयाचे इत्यादी त्यांना काहीच समजेना. त्यांनी खूप विचार केला पण त्यांना काहीच सुचेना. ते फार अगतिक झाले. तेंव्हा त्यांना अज्ञातातून " तप " शब्द ऐकू आला. त्याचा त्यांना अर्थबोध झाला. व त्यांनी चित्त एकाग्र करून तपाला आरंभ केला. हजारो वर्षे तप केल्यावर त्यांना भगवान श्रीविष्णूंनी सगुणस्वरूपात दर्शन दिले व ब्रह्मदेवांना आपल्या वैकुंठ लोकी घेऊन गेले.

वैकुंठ लोकी गेल्यावर ब्रह्मदेवांचे अष्टसात्विक भाव जागे झाले. त्यांनी भगवंताला साष्टांग नमस्कार केला. हात जोडून उभे राहिले. तेंव्हा ब्रह्मदेवांचा हात आपल्या हातात घेऊन भगवंत म्हणाले, ब्रह्मदेवा! माझी वाणी ऐकूनच तूं तपाला आरंभ केलास. तुझ्या निष्काम भक्तियुक्त तपामुळे मी तुझ्यावर प्रसन्न झालो आहे. काम्य भक्तीने मी प्रसन्न होत नाही. सृष्टी रचने बाबत तूं किंकर्तव्यमूढ झाल्यामुळे मीच तुला तपाची प्रेरणा दिली. तप हे माझे हृदय आहे. मी स्वत: तपाचा आत्मा आहे. मी स्वत:सुद्धा तपानेच सृष्टी रचना करतो. उत्पत्ती, स्थिती व लय हे माझ्या तपाने होते. तप हि माझी अत्यंत पवित्र व श्रेष्ठ शक्ती आहे. मी तुझ्यावर प्रसन्न आहे. तुला जे हवे असेल ते तूं मागून घे व सृष्टी रचनेच्या कार्यास प्रवृत्त हो.

हे ऐकून ब्रह्मदेव म्हणाले, भगवंता, आपण सर्वांतर्यामी साक्षी रूपाने आहात ह्याचे जसे ज्ञान मला झाले तसेंच आपण आपल्या अप्रतिहत ज्ञानाने विश्वातल्या सर्वांचे मनोगतही जाणता. याचेही ज्ञान मला

झाले आहे. पण आपण मला वर माग म्हणालात म्हणून वाणीने अशी प्रार्थना करतो कीं मला आपल्या सगुण व निर्गुण अशा दोन्ही स्वरूपाचे यथार्थ ज्ञान व्हावे. दुसरे असे कीं सृष्टीची रचना करताना मला कर्तेपणाच्या अभिमानाने ग्रासू नये व मी कर्ता नसून आपण कर्ते असल्याची जाणीव मला राहावी व कर्तेपणाच्या अभिमानाने माझे अध:पतन होऊ नये असा वर आपण मला द्या. पण मी जेंव्हा सृष्टी रचना करू लागेन त्यावेळी "मी जन्म-कर्मा"पासून मुक्त असल्याचाही अभिमान होणार नाही असा वर द्या. तेंव्हा भगवंत म्हणाले ब्रह्मदेवा, त्यासाठी मी तुला माझे अत्यंत गोपनीय हृद्गत सांगणार आहे. ते तूं सदैव अंत:करणात ठेव म्हणजे तुला हे सर्व प्राप्त होईल. (हेच चतु:श्लोकीं भागवत आहे.) ते असे:-

“अहमेवा समेवाग्रे नान्यद्यत् सद् सत् परम् । पश्चादहं यदेतच्च योऽवशिष्येत सोऽस्म्यहम् ।।२.९.३२।।

ऋतेऽर्थं यत् प्रतीयेत न प्रतीयेत च आत्मनि | तद्विद्यादात्मनो मायां यथाऽऽभासो यथा तम: ||३३||

यथा महान्तिभूतानि भूतेषूच्यावचेष्वनु | प्रविष्टान्यप्रविष्टानि तथा तेषु न तेष्वहम् ||३४||

एतावदेव जिज्ञास्यं तत्त्वजिज्ञासुनाSSत्मन: । अन्वयव्यतिरेकाभ्यां यत् स्यात् सर्वत्र सर्वदा ।।३५।।”

अर्थ:- ब्रह्मदेवा तूं हे लक्षात ठेव कीं, सृष्टी उत्पन्न करण्या पूर्वी मी एकटाच होतो. माझ्या व्यतिरिक्त सूक्ष्म-स्थूल, ज्ञान-अज्ञान, असे काहीही नव्हते. उत्पत्तीनंतर प्रतीत होणारी सृष्टी म्हणजे मीच आहे. प्रलयानंतरही मीच असेन.।।३२।। परमात्म्याच्या ठिकाणीच सर्व वस्तूंचा भास निर्माण होत असल्यामुळे ग्रहांमध्ये जसा राहू असूनही दिसत नाही तद्वत् परमात्मा असूनही दिसत नाही. ही माझी माया आहे. ।।३३।। सर्व व्यापी पंचमहाभूते कार्य रूपाने शरीरात प्रवेशलेली असतात पण कारण रूपाने बाहेरही असतातच त्यामुळे प्रवेशली किंवा न प्रवेशली असे काहीच म्हणता येत नाही तसाच आत्मरूपाने मी सर्वत्र असल्याने असणे नसणे असे काहीच म्हणता येत नाही. ।।३४।। म्हणून तत्त्वजिज्ञासूंनी अन्वय व व्यतिरेकानेच आत्मतत्त्व जाणून घ्यावे. ।।३५।।

जसे घडा मातीचा असला तरी त्याला माती न म्हणता घडा म्हणतात! तसे सर्वत्र असणारे आत्मतत्त्व आत्मसात केले कीं कर्तेपणाचा अभिमान राहणार नाही. इतके सांगून भगवान अदृश्य झाले.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

## श्रीमद्भागवत-स्कंध दुसरा

## पुष्प २० वे (अध्याय १०)

## श्रीमद्भागवताची दहा लक्षणे

शुकमुनी राजा परिक्षितीला पुढे सांगू लागले.

भगवंत अदृष्य होत असतानाच ब्रह्मदेवांनी त्यांना वंदन केले. ब्रह्मदेव परत आपल्या स्थानावर येउन बसले. सृष्टी रचनेच्या कार्यात मग्न झाले.

सृष्टी निर्माण होऊ लागली. आणि नारदांचा जन्म झाला. नारदांनी आपला पिता ब्रह्मदेवांची भरपूर व निरपेक्ष सेवा केली. आपल्या सेवेमुळे प्रसन्न चित्त झालेल्या ब्रह्मदेवांना एक दिवस नारदांनी तूं विचारलेले प्रश्न विचारले. तेंव्हा ब्रह्मदेवांनी नारदांना आत्मज्ञान होण्यासाठी दशलक्षणी श्रीमद्भागवत सांगितले. भागवत पुराणात 'सर्ग', 'विसर्ग', 'स्थान', 'पोषण', 'ऊती', 'मन्वंतर', 'ईश्वरकथा', 'निरोध', 'मुक्ती' व 'आश्रय' ह्या दहा विषयांचे वर्णन आहे म्हणून त्याला दशलक्षणी भागवत असे म्हणतात.

यातल्या 'आश्रय' या लक्षणाचा अर्थ आत्मज्ञान. ते होण्यासाठीच आधीच्या नऊ लक्षणांचे प्रत्यक्षानुभवाने तर कधी तात्पर्याने केलेले वर्णन म्हणजेच भागवत. परब्रह्माने सत्व, रज, तम गुणांसह उत्पन्न केलेले विराट स्वरुप (सृष्टी) म्हणजे "सर्ग". ब्रह्मदेवांनी उत्पन्न केलेल्या चराचर सृष्टीला "विसर्ग" म्हणतात. क्षणा क्षणाला विनाशाकडे जाणाऱ्या सृष्टीला मर्यादित कलापर्यंत स्थिर राखण्यात भगवान श्रीविष्णुंची श्रेष्ठता तिला "स्थान" म्हणतात. सर्वांचे भरण व पोषण करणाऱ्या श्रीविष्णुंच्या कृपेला "पोषण" म्हणतात. जीवांना कर्मबंधन निर्माण करणाऱ्या वासनांना "ऊती" असे म्हणतात. मनूच्या कालावधीला "मन्वंतर" असे म्हणतात. भक्तिमार्ग दर्शवणाऱ्या भगवंताच्या अवतार कथा व भक्तांची आख्याने म्हणजे "ईश्वरकथा". आणि योगनिद्रेचा स्वीकार करून शयन केल्यावर

भगवंत चराचर-विश्व आपल्या उदरात धारण करतात याला "निरोध" असे म्हणतात. कर्तृत्व व भोक्तृत्व इत्यादींचा अनाक्रोश त्याग म्हणजे "मुक्ती". आणि उत्पत्ती, स्थिती व लय हे ज्या तत्त्वाने प्रकाशित होते त्याला शास्त्रात "परब्रह्म" अशी संज्ञा आहे, व ते परब्रह्म म्हणजेच "आश्रय" आहे. राजन् ! जीव हा

इंद्रियांचा अभिमानी द्रष्टा आहे. त्यालाच अध्यात्मिक म्हणतात. इंद्रीयामध्ये हाच जीव देवता रूपाने प्रगट होतो तेंव्हा त्याला आधिदैविक असे म्हणतात. ह्या अध्यात्मिक व आधिदैविक यांच्या वियोगस्थानी जे जडस्वरूप निर्माण होते त्याला आधिभौतिक असे म्हणतात. अध्यात्मिक, आधिदैविक व आधिभौतिक या तिन्हींचे "आश्रय " स्थान परमात्मा असून तोच या तिघांनाही जाणतो. परमात्मा हा स्वत:च स्वत:चा आश्रय असल्यामुळे त्याला दुसऱ्याच्या आश्रयाची गरज नसते. सर्व चराचराचे आश्रय स्थान असलेला विराटपुरुष ब्रह्मांड फोडून बाहेर आला. मग स्वत:साठी शुध्द जल निर्माण केले व त्यावर स्वस्थ पडून राहिला. काल गणनाच नसल्यामुळे सहस्र वर्षे पडून राहिला असे म्हटले तरी वावगे होणार नाही.विराट पुरुष म्हणजेच 'नर' त्याने जल निर्माण केले म्हणून पाण्याला 'नार' असे नाव पडले. ते नार विराट पुरुषाने आपले 'अयन' म्हणजे वसतीस्थान केले म्हणून तो 'नारायण'! ह्या नारायणाची कृपा असे पर्यंतच काल, कर्म, स्वभाव, ज्ञान, द्रव्य, क्रिया, महत्तत्व इत्यादी कार्यान्वित असते. विराट पुरुष प्रथम एकटाच असतो. त्याला अनेक होण्याची इच्छा होते. मग तो आपल्या तेजोरूप वीर्याचे अध्यात्मिक, आधिदैविक व अधिभूतिक असे तीन भाग करतो. मग आकाशापासून मनोबल, इन्द्रियबल व शरीरबल उत्पन्न केले. मग या सर्वांपासून प्राण उत्पन्न केला. तोच प्राण प्रथम पाच भागात व नंतर अनेक भागात विभागला. या प्राणामुळेच विराट पुरुषाला तहान व भूक यांचा अनुभव आला. व खाण्याची इच्छा झाली म्हणून त्याला मुख निर्माण झाले. मग प्रत्येक इच्छे बरोबर एक एक इंद्रिय त्या त्या इंद्रियाच्या अधिष्ठात्री देवतेसह निर्माण झाले. अहंकारापासून विषय निर्माण केले. विषय समजण्यासाठी तेजोमय बुद्धी निर्माण केली. वायुरूप मन निर्माण केले. त्यातच सगळे विकार उत्पन्न होतात. विविध विषय भोगण्यासाठी विविध शरीरे निर्माण केली. मायेचा विचार करण्यासाठी हृदय निर्माण झाले. असे हे सगळे पृथ्वी, पाणी, अग्नी, वायू, आकाश, मन, बुद्धी व अहंकार अशा आठ गोष्टीनी निर्माण झालेल्या प्रकृतीपासून हे स्थूलरूप निर्माण झाले. राजन्! हे सर्व वर्णन परमात्म्याशी कर्तृत्वाचा संबंध जोडण्यासाठी नसून परमात्मा सर्वव्यापी कसा आहे हे समजण्यासाठी केले आहे.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

इथे श्रीमद्भागवतातला दुसरा स्कंध पूर्ण झाला. यात एकूण १० अध्याय व ४९१ श्लोक आहेत. त्या सर्वांचा पुष्प १४ ते पुष्प २० हा साररूप अनुवाद आहे.

# स्कंध तिसरा

।।श्रीगुरु:शरणं।

# श्रीमद्भागवत-स्कंध तिसरा

## पुष्प २१ वे (अध्याय १)

## उद्धव विदुर भेट

शुकमुनी पुढे म्हणाले राजन्! तूं जसे प्रश्न विचारलेस तसेच प्रश्न विदुरांनी मैत्रेय मुनींना विचारले होते.

राजा परीक्षिताने कुतूहलाने उद्धव व विदुर भेटीचा वृत्तांत विचारला.

शुकमुनी सांगू लागले, राजन्! पूर्वी धृतराष्ट्राने राज्य लोभाने भीमावर विषप्रयोग, पांडवांना लाक्षागृहात जाळणे, द्रौपदीची विटंबना इत्यादी अनेक दोष केले. व पांडव जेंव्हा अज्ञातवासातून परत येऊन आपला राज्यभाग मागू लागले तेंव्हा धृतराष्ट्राने तो दिला नाही. म्हणून युधिष्ठिराने भगवान् श्रीकृष्णांना शिष्टाई करण्यास पाठवले. धृतराष्ट्राने श्रीकृष्णांचा सल्लाही मानला नाही. पण त्याने विदुरांना सल्ला विचारला. विदुरांनी जो सल्ला दिला त्याला विदुर नीती असे मान्यवर लोक म्हणू लागले. विदुर म्हणाले, धृतराष्ट्रा! स्वत:चा सर्वनाश टाळण्यासाठी भगवान् श्रीकृष्णांचा सल्ला ऐकणे तुझ्या हिताचे आहे. श्रीकृष्ण म्हणजे साक्षात् परब्रह्म असून पांडवांचे पाठीराखे आहेत. खल निर्दालानासाठी त्यांनी हा अवतार धारण केला आहे. त्यामुळे तूं दुर्योधनाचा त्याग कर व पांडवाना त्यांचा न्याय्य राज्यभाग देऊन कुळाचे कल्याण करून घे.

सत्वशील विदुरांचा हा सल्ला ऐकून दुर्योधन संतापला. त्यावेळी "आमचेच अन्न खाऊन आमच्यावरच उलटणाऱ्या या दासीपुत्राला ताबडतोब आमच्या राज्यातून हद्दपार करा!" असे बोलून दुर्योधनाने महात्म्या विदुरांचा घोर अपमान केला. त्यामुळे हस्तिनापूरचा त्याग करून विदुर तीर्थयात्रेला गेले.

त्यानंतर महायुध्द संपून युधिष्ठीर राज्यावर आल्यानंतर विदुर व उद्धव भेट झाली. त्या भेटीत दोघेही श्रीकृष्णांच्या आठवणीने गहिवरले. विदुर भावविवशतेने म्हणाले, अजन्मा असूनही श्रीकृष्णांनी

यदुकुलात जन्म घेतला. अशा पवित्रकीर्ती श्रीहरीच्या सहवासात तूं बराच कालावधी होतास तेंव्हा मला त्यांच्या विशेष कथा ऐकव.

उद्धव सांगू लागला, विदुरा, अरे! हे यादव खरेच भाग्यहीन म्हणावे लागतील.! कारण सर्वांतर्यामी श्रीकृष्णांना ते एक यादवच समजत होते. अजन्मा असूनही देवकीच्या उदरी जन्म घेणे, कंस भयाने गोकुळात लपून राहणे, जरासंधाच्या भयाने मथुरा सोडून द्वारकेस जाणे, इत्यादी लीला आठवल्या कीं काही सुचेनासे होते. कारण स्वत:सिद्ध व पूर्णकाम असलेल्या श्रीकृष्णांपेक्षा कोणी मोठा असूच शकत नाही.

त्यांच्या पाय ठेवण्याच्या चौपाईला इंद्रादी लोकपाल मुकुटाचे टोक टेकून नमस्कार करीत असत. पण .. पण विदुरा! तेच भगवान् श्रीकृष्ण उग्रसेन महाराजांच्या सिंहासना समोर नम्रपणे उभे राहून 'महाराज आमची प्रार्थना ऐका!' असे म्हणत त्यावेळी माझ्या सारख्या सेवकाचे चित्त किती व्यथित होत असेल याची कुणाला कल्पनाही करता येणार नाही. कारण त्याच वेळी माझ्या नजरे समोर पुतना राक्षसीचे स्तनपान करणारे तान्हुले उभे राहते. आणि केवळ स्तनपान दिले म्हणून त्या राक्षसीला उत्तम गती देणारे भगवान् श्रीकृष्णही उभे राहातात. किती दयाळू!

उद्धव आपला भावावेग आवरू शकला नाही. त्याच्या नजरे समोर कंस वधापासून ते भौमासुरच्या वधासह एकाच वेळी सोळा हजार राजकन्यांशी केलेल्या विवाहपर्यंतच्या सगळया गोष्टी उभ्या राहिल्या व त्या त्याने विदुराना सांगितल्या. भगवंताचे निर्याण ऐकून विदुर फारच खिन्न झाले. ते पाहून उद्धवानी त्यांना सांगितले, विदुरा! खिन्न होऊ नका. आपण फार भाग्यवान आहात. कारण भगवान् श्रीकृष्णांनी निर्याणा पूर्वी मला सांगितले आहे ' उद्धवा तुझी आणि विदुरांची भेट होईल, तेंव्हा त्यांना मैत्रेयमुनींच्याकडे जाऊन उपदेश घेण्यास मी सांगितले आहे असे सांग.' आणि विदुरा मगच मला उत्तरेकडे जा अशी प्रभूंची आज्ञा आहे.

हे ऐकून विदुर गहिवरले. उद्धवाचा निरोप घेऊन मैत्रेय मुनींकडे निघाले. उद्धव उत्तरेकडे 'नर-नारायणांच्या' भेटीस निघाला.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-स्कंध तिसरा

## पुष्प २२ वे (अध्याय ४,५)

## विदुरांचे मैत्रेय ऋषींच्याकडे प्रयाण

शुकमुनी पुढे सांगू लागले, राजन्! मैत्रेयमुनिंनी विदुरांचे स्वागतच केले. आश्रमात काही दिवस मैत्रेय मुनींची सेवा केल्यावर एक दिवस मैत्रेयमुनींची प्रसन्नता पाहून विदुर मैत्रेय मुनिना म्हणाले, “प्रभो! संसारात सर्वच जण सुखप्राप्तीसाठी कर्मे करीत असतात. पण प्रत्यक्षात त्यांना अपेक्षेप्रमाणे सुखप्राप्ती न झाल्यामुळे ते दु:खीच होतात. त्यामुळे मला शाश्वत शांती व समाधानाचा मार्ग जाणून घेण्याची इच्छा आहे. ब्रह्मज्ञानाच्या बऱ्याच गोष्टी मी ऐकलेल्या आहेत त्यामुळे मला अनेक प्रश्न पडले आहेत. त्रैलोक्य निर्माते भगवान्! श्रीकृष्ण अकर्ते असूनही सर्व कसे करतात? उत्पत्ती, स्थिती व लय करून योग निद्रेत कसे जातात? तसेच त्यांच्या विश्वकल्याणासाठी घेतलेल्या अवतार कथा त्यातल्या रहस्यासह श्रवण करण्याची माझी इच्छा आहे!”

हे ऐकून मैत्रेय मुनी मोठ्या प्रसन्नतेने म्हणाले, “विदुरा, निजधमाला जाताना भागवान् श्रीकृष्णांनी तुला ब्रह्मज्ञानाचा उपदेश करण्याची मला आज्ञा केलेली आहे. म्हणून मी तुला उत्पत्ती, स्थिती व लय यासाठी योगमायेच्या सहाय्याने भगवंताने केलेल्या विविध लीला सांगतो. त्यातूनच तुला तुझ्या सर्व प्रश्नांची उत्तरे मिळतील.

विदुरा! सृष्टीरचने पूर्वी फक्त निर्गुण परमात्माच असतो. हा परमात्माच दृश्य व द्रष्टा यांना एकत्र आणण्याची शक्ती निर्माण करतो. त्या शक्तीलाच माया असे संबोधले जाते. त्या कार्यकारणरूप मायेनेच हे सर्व विश्व भगवंताने निर्माण केले आहे. आपल्या काल नामक शक्तीने गुणक्षोभ घडवून चिदाभासवीर्याने अव्यक्त मायेतून महत्तत्त्व निर्माण केले. ह्या महत्तत्त्व निर्मितीसाठी काल ही शक्ती वापरल्यामुळे ते काळाच्या आधीन झाले. नंतर चिदाभास, गुण व महत्तत्त्व यांच्याकडे उत्पत्ती करण्याच्या दृष्टीने परमात्म्याने दृष्टी टाकली व परिणामी महत्तत्त्व विकारले गेले. आणि कार्य, कारण व कर्ता या तिन्हीचे रूप असलेला अहंकार

निर्माण झाला. हाच अहंकार त्रिविध झाला. वैकारिक, तैजस व तामस. मग वैकारिक अहंकारापासून मन व इंद्रियांच्या अधिष्ठात्री देवता निर्माण झाल्या. तैजस अहंकारापासून ज्ञानेंद्रिये व कर्मेंद्रिये उत्पन्न झाली. तामस अहंकारापासून शब्द व शब्दाचे कारण आणि आत्मबोधाचा दृष्टांत असलेले आकाश निर्माण झाले. मग शब्द गुणातून आकाश विकारले व शब्द व स्पर्श हे गुण असलेला वायू झाला, वायूपासून शब्द, स्पर्श व रूप हे गुण असलेले तेज झाले, तेजापासून शब्द, स्पर्श, रूप व रस हे गुण असलेले जल झाले व जलापासून शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध हे गुण असलेली पृथ्वी झाली. अशी पंचमहाभूते निर्माण झाली. ह्या देवता, हे गुण इत्यादी जे काही निर्माण झाले होते ते सर्व कार्य प्रेरणा न मिळाल्यामुळे स्वतंत्ररित्या विहरत होते. काल नामक शक्तीने त्या कंटाळल्या व भगवंताला शरण जाऊन म्हणाल्या, हे परमात्म्या, अहंकार व ममता यामुळे सर्वान्तर्यामी असणाऱ्या आपणास कोणीच जाणू शकत नाही. आम्ही सर्वजण त्रिगुणात्मक व भिन्न भिन्न स्वभावाचे असल्यामुळे गुण्यागोविंदाने एकत्र नांदू शकत नाही. त्यामुळे हे परमात्मन् ! ज्या कारणासाठी आपण आम्हास जन्माला घातले आहे त्या ब्रम्हांड रचनेच्या कार्यासाठी आमच्यावर अनुग्रह करावा! आम्हाला ज्ञानशक्ती व क्रियाशक्ती प्रदान करावी.

त्यांची ही विनंती ऐकून परमात्म्याने कालशक्तीचा स्वीकार करून महत्तत्त्वादी तेवीस तत्त्व समुदायात प्रवेश केला. आणि तत्त्व समुदायाला क्रियाशक्तीद्वारे एकमेकात मिसळून टाकले. तत्क्षणी तेवीस तत्त्व समुहापासून एक विराट पुरुष निर्माण झाला. त्या विराट पुरुषाला परमात्म्याने ब्रम्हांडातल्या जळात बंदिस्त केले.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-स्कंध तिसरा

## पुष्प २३ वे (अध्याय ६, ७)

## विराट पुरुषाची उत्पत्ती

विदुरा! परमात्म्याने त्या तत्त्व समुदायाला क्रियाशक्तीने एकमेकात मिसळून टाकाल्यामुळे निर्माण झालेला विराट पुरुष अनेक दिव्य वर्षे त्या बंदिस्त ब्रम्हांडातल्या जलावर शांत पडून होता. हाच विराट पुरुष चराचराचे आश्रयस्थान बनला. ज्ञानशक्ती, क्रियाशक्ती व आत्मशक्ती यांनी संपन्न असलेल्या या विराट पुरुषाने ज्ञानशक्तीने एक हृदय, क्रियाशक्तीने दहा प्राण व आत्मशक्तीने तीन ताप निर्माण केले. ते पाहून परमात्म्याने आपल्या चैतन्यतेजाने विराट पुरुषाच्या वृत्ती जाग्या केल्या.

वृत्ती जाग्या होताच विराट पुरुषाने निरनिराळ्या देवतांची स्थाने निर्माण केली. प्रथम अग्निदेवतेचे स्थान मुख वागेन्द्रीयासह उत्पन्न केले. मग वरुण देवतेचे स्थान रसनेंद्रियासह टाळू, अश्विनी कुमारांचे स्थान घ्राणेन्द्रियासह नाक, सूर्यदेवतेचे स्थान चक्षुरिन्द्रियासह डोळे, वायुदेवतेचे स्थान त्वगेन्द्रियासह त्वचा, दिग्देवतेचे स्थान श्रवणेन्द्रियासह कान, निरनिराळ्या औषधींसह त्वचेवर रोमांची योजना केली, मग लिंग उत्पन्न केले त्यात वीर्यासह प्रजापती प्रवेशाला, मग पायुरिन्द्रियासह गुदद्वार उत्पन्न झाले. त्यात लोकपाल मित्राने प्रवेश केला. मग देण्या-घेण्याच्या शक्तीसह इंद्राने हातात प्रवेश केला. पाय उत्पन्न होताच त्यात गतीरूप शक्तीसह लोकपाल विष्णूनी प्रवेश केला. बुद्धी उत्पन्न होताच त्यात ज्ञानरूपाने बृहस्पती प्रवेशले. हृदय उत्पन्न होताच त्यात मनोरुपशक्तीसह चंद्राने प्रवेश केला. मग अहंकार उत्पन्न होताच त्यात क्रियाशक्तीसह रुद्र प्रवेशाला. मग चित्त उत्पन्न झाले. अशा प्रकारे संपूर्ण विराट पुरुष उत्पन्न झाला.

या विराट पुरुषाच्या मस्तकापासून नाभी पर्यंत सत्यलोकादि सप्तभुवने, नाभीस्थानी अंतरीक्ष, जघनापासून(म्हणजे बेंबी व कंबर यांच्या मधला भाग) पृथ्वी, पायांपासून कमरे पर्यंत सप्त पाताळे निर्माण झाली. विदुरा, हा विराटपुरुष काल, कर्म व स्वभाव या शक्तींनी युक्त असून परमात्म्याच्या योगमायेला प्रगट करणारा आहे. याचे संपूर्ण वर्णन हे वाणीच्या आवाक्यातले नाही. आदिकवी ब्रह्मदेवसुद्धा अनेक

काळाच्या तपानंतर परिपक्व होऊनही त्याचे पूर्ण वर्णन करू शकले नाहीत. मग इतरांना ते कसे जमणार? त्यामुळे मन, वाणी, बुद्धी व सर्व देव देवताही ज्याची प्राप्ती न होता परत फिरतात त्या षड्गुणैश्वर्यसंपन्न भगवंताला माझा नमस्कार असो.”

मैत्रेयमुनी असे म्हणून क्षणकाल थांबले. तेंव्हा विदुर म्हणाले, “प्रभो, परमात्मा निर्गुण, निराकार, स्वसंतुष्ट इत्यादी असताना त्याचा गुण व क्रिया यांच्याशी संबंध येतोच कसा? शिवाय रहून राहून मला असाही एक गहन प्रश्न पडला कीं, नित्यतृप्त परमात्मा एकटा असताना नाक कान डोळे इत्यादी असलेला विराट पुरुष करण्याचे त्याला सुचलेच कसे? कारण कुणाचे तरी पाहून आपण तुलनात्मक चांगले वाईट ठरवतो. इथे तर तसे काहीच नाही. त्या शिवाय आणखी एक प्रश्न म्हणजे ज्यांच्या ज्ञानाचा काल वा अवस्था इत्यादी कशानेच लोप होत नाही असा परमात्माच जर अंतर्बाह्य भरलेला आहे तर मग जीवाला सुख-दु:खादी भोग कसे उद्भवतात?”

मैत्रेय म्हणाले “विदुरा, नित्यशुद्ध व मुक्तस्वरूप परब्रह्माला गुण व क्रिया यांच्याशी जोडणे हीच तर आपल्या अज्ञानामुळे उत्पन्न झालेली माया आहे. जसे स्वप्नांत पाहिलेला आपला अपघात जसा स्वप्नातच खरा वाटतो व जागे झाल्यावर तो एक भास असल्याचे ज्ञान होते. तद्वत अज्ञान नामक निद्रेत देहाभिमानी जीवाला सुख-दु:खादी भोग खरे वाटतात. त्याच्याच अंतर्यामी असलेल्या साक्षीरुप परब्रह्माला नाही. निष्काम भक्तियोगाने ‘अहंकार, बल, दर्प, काम, क्रोध व हाव’ यांच्यापासून निवृत्ती साधून मनुष्य जेंव्हा श्रीहरीच्या चरणी निश्चल प्रेमभावाने स्थिर होतो तेंव्हा आत्मज्ञानाच्या जागृतीमुळे त्याची सुख-दु:खादीची भावना नष्ट होते.”

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-स्कंध तिसरा

## पुष्प २४ वे (अध्याय ८ व ९)

## ब्रह्मदेवांची उत्पत्ती

मैत्रेय मुनींनी केलेला खुलासा ऐकून विदुर म्हणाले, प्रभो! आपल्या परतत्त्वस्पर्शी वाणीमुळे मला परब्रह्माचे स्वातंत्र्य व जीवाचे पारतंत्र्य या दोन गोष्टींचा नि:संदेह असा बोध झाला आहे कीं, आत्मज्ञानाने परिपूर्ण झालेला जीव परब्रह्माशी एकरूपत्व साधून मनामुळे उत्पन्न होणाऱ्या संकल्प-विकल्प, सुख-दु:ख इत्यादी द्वंद्वांचा साक्षित्वाने स्वीकार करू लागतो. व आहे त्या स्थितीत समाधानी राहतो. प्रभो ! विराट पुरुषाच्या उत्पत्तीनंतर विराट पुरुषाने कोणत्या प्रजा, विभूती वगैरे केले? ब्रह्मदेवांनी प्रथम कोणती सृष्टी उत्पन्न केली? त्या सृष्टीचे भेद किती? सर्ग, उपसर्ग, मनू, मन्वंतरे, कालगणना, इत्यादी सर्व मला समजावून सांगा. तसेच ब्रह्मा, विष्णू, महेश यांच्या स्वरूपातली परब्रह्माची लीला. हे सर्व सांगावे अशी माझी आपणास प्रार्थना आहे.

विदुरा! तुझ्या सर्व प्रश्नांची उकल होण्यासाठी मी तुला श्रीमद्भागवत सांगतो. पूर्वी भगवान् संकर्षणांनी हेच भागवत सनकादी मुनींना सांगितले होते, सनकादी मुनींनी सांख्यायन मुनींना, सांख्यायन मुनींनी आमचे गुरु पराशर याना व पराशर मुनींनी मला सांगितले आहे. तेच तूं लक्ष पूर्वक श्रवण कर.

सृष्टीच्या उत्पत्ती पूर्वी संपूर्ण जलमय होते व त्यावर विराटपुरुष श्रीमन्नारायण शांत पडून होते. दिवस नव्हता कीं रात्र नव्हती. भगवान् नारायण एकटेच होते. त्यांना परमात्म्याच्या प्रेरणेने सृष्टी उत्पन्न करण्याची इच्छा झाली. तेंव्हा त्यांनी आपल्यातच असलेल्या सूक्ष्मभूतांवर दृष्टीक्षेपाने काल व रजोगुण यांना प्रेरणा देऊन अनावर चलन उत्पन्न केले. त्यावेळी ती सूक्ष्मभूते श्रीनारायणांच्या नाभिसरोवरातून सरसरत जलाच्या पृष्ठ भागावर आली व त्यांचे एका कमळकोषात रुपांतर झाले. त्या कमळकोषाच्या प्रकाशाने सर्व परिसर प्रकाशमय झाला. मग भगवान् नारायणांनी अंतर्याम रूपाने त्यात प्रवेश केला. भगवान् नारायणांचा प्रवेश होताच तो कमळकोष विकसित झाला. व अंतर्याम रूपाने प्रवेशलेले भगवान् नारायणच ब्रह्मदेवाच्या रुपात प्रगट झाले. साक्षात् नारायण जरी त्या रुपात प्रगट झालेले असले तरी ते वेगळेपणाने देहधारण करून

प्रगट झाल्यामुळे ब्रह्मदेव " मी कोण?" ह्या विचारात गर्क झाले. त्या विचाराने ते इतके घेरले कीं त्यांना आपल्या मूळस्वरूपाचा विसर पडला. स्वत: वेदगर्भ असूनही आपण कुणापासून उत्पन्न झालो या विचारात त्यांनी कमळाच्या उगमस्थानी जाण्याचा प्रयत्न केला. पण कमळनाळ संपेना व काळभयाने ग्रस्त होऊन ते परत आपल्या स्थानी येउन बसले. मग अंतर्मुख झाले. त्यांची निर्विकल्प समाधी लागली. प्राणवायूवर विजय मिळवून ते योगाभ्यासी झाले.

शतवर्षे त्या अवस्थेत गेली. आणि बाहेर शोधूनही जे सांपडले नव्हते ते त्यांना त्यांच्याच अंतरात प्रगट झालेले दिसले. साक्षात् भगवान् नारायण त्यांच्या सामोर प्रगट झाले. त्यांचे ते दिव्य व तेजस्वी दर्शन अति मोहक होते. भगवान् नारायणांच्या नाभीतून प्रगट झालेले कमळ व त्या कमळात आपण स्वत: बसलो असून आपल्या सेवेस पंचमहाभूते तयार असल्याचे त्यांना दिसले. ते आश्चर्यचकित झाले.

ब्रह्मदेवांचे आत्मज्ञान जागृत झाले व ते भगवंताची स्तुती करू लागले. “हे प्रभो! चराचरात आपल्या शिवाय काहीच नाही तथापि देहधारी जीव आपल्याच मायेमुळे ते जाणू शकत नाही. आपले हे रूप मला शेकडो अवतारांचे कारण असल्याचे जाणवत आहे. त्यातलाच एक भाग म्हणून मी आपल्या नाभी कमळातून अवतरीत झालो आहे. भगवंता तुझ्या अद्वितीय रूपाचे वर्णन शब्दांच्या पलिकडले आहे. तथापि शब्दात सांगायचे तर ते भेदरहित, स्पष्ट, निर्विकार, व दृश्य असूनही निर्गुण, निराकार व आनंदमय आहे. मी तुला पूर्ण शरण आहे. आपल्या शुध्द व चैतन्यमय ज्ञानप्रकाशाने तूं शरणागताचे अज्ञान व मनातील द्वैत नाहीसे करतोस. व त्याला स्व-रूपाचे ज्ञान देतोस. तूं निर्माण केलेली सृष्टीच मी फक्त स्पष्ट करणार असल्यामुळे मला कर्तृत्वाचा अभिमान होणार नाही असा आशिर्वाद दे. "

अशाप्रकारे स्तुती केल्यावर भगवान् श्रीहरी म्हणाले, " ब्रह्मदेवा! तूं निर्भय होऊन सृष्टी रचना कर. मी तुझ्या सर्व इच्छा पूर्ण करीन. तूं केलेल्या स्तुतीने जो कोणी प्रार्थना करील त्यावरही मी कृपा करीन. तूं नित्य श्रीमद्भागवताच्या स्मरणात राहून पूर्वकल्पा प्रमाणे स्वत:च्या वेदमयस्वरूपापासून सृष्टी रचना कर." असे सांगून भगवान अदृश्य झाले.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-स्कंध तिसरा

## पुष्प २५ वे (अध्याय १० वा)

## दहा प्रकारच्या सृष्टीचे वर्णन

राजा परीक्षिताला शुकमुनी पुढे सांगू लागले, राजन्! मैत्रेय विदुरांना म्हणाले, विदुरा! भगवान् श्रीहरी अंतर्धान पावल्यावर ब्रह्मदेवांनी पुनश्च तपाला आरंभ केला. शतवर्षे तप केल्यावर ब्रह्मदेवांना आत्मज्ञान व विज्ञानबल स्थिर होऊन स्वत:सह सर्व विश्व नारायणमय असल्याची अनुभूती आली. तेंव्हा ते समाधीतून बाहेर आले. समाधीतून बाहेर येताच त्यांना जाणवले कीं प्रलयजल वेगवान वायुमुळे खवळलेले आहे. तेंव्हा त्यांनी आपल्या योगबलाने प्रथम त्या पंचमहाभूताना शांत केले. कमळ म्हणजेच विश्वाचे रचना घर स्थिर झाल्यावर ब्रम्हदेवांनी प्रथम सप्तलोक निर्माण केले. इथे विदुरांनी मैत्रेय मुनींना थांबवून कालशक्ती विषयी प्रथम माहिती सांगा. असे विनवल्यामुळे मैत्रेय सांगू लागले, विदुरा! स्थित्यंतर करणे हा कालाचा गुणधर्म आहे. काल स्वत: अनादि व निर्विशेष आहे. त्याला निमित्त करूनच भगवंत नऊ प्रकारची सृष्टी उत्पन्न करतात. दहावी सृष्टी प्राकृत व वैकृत भेदाची असते. त्यात फक्त सनकादी कुमार गणले जातात. कालाच्याच प्रभावाने त्रिगुणांना क्षोभवून ब्रह्मदेव स्वत:च्या सृष्टीसाठी पहिला महत्तत्त्वाचा सर्ग उत्पन्न करतात. दुसरा सर्ग "अहंकाराचा" त्यात सूक्ष्म रूपाने पंचमहाभूते, ज्ञानेन्द्रिये व कर्मेंद्रिये याची उत्पत्ती होते. तिसरा सर्ग "तन्मात्रांचा" ह्या सर्गात पंचमहाभूते प्रगट करण्याची शक्ती असते. चवथ्या सर्गात ज्ञानेंद्रिये व कर्मेंद्रिये अवक्रांत होतात. पाचव्या सर्गात इंद्रियाभिमानी देवता असून यातच संकल्प-विकल्पात्मक मनाचाही समावेश होतो. सहावा सर्ग तामिस्र, अंधतामिस्र, तम, मोह, महामोह या पाच प्रकारच्या अविद्येचा. अविद्येच्या सृष्टीत आवरण व विक्षेप दोन शक्ती कार्यान्वित असतात. आवरण शक्तीने मोह निर्माण होतो. व विक्षेप शक्तीने मूळस्वरूपाचा विसर पडून भेदबुद्धीने प्रपंच निर्माण होतो. विदुरा! हे सहा सर्ग म्हणजेच सहा सृष्टी ह्या प्राकृतिक सर्गातल्या मानल्या जातात. सातवा सर्ग सहा प्रकारच्या वृक्षांचा. पहिला वनस्पती (म्हणजे फूल न येता फळ देणारे वृक्ष), दुसरा प्रकार औषधी (म्हणजे एकदा फळ देऊन नष्ट होणारे झाड), तिसरा प्रकार वेली (आधाराने वाढणारे झाड), चवथा प्रकार त्वक्सार (म्हणजे बांबू वगैरे), पाचवा प्रकार वीरुध (म्हणजे आधारा शिवाय वाढणारी वेल) व सहावा प्रकार द्रुम (म्हणजे ठराविक ऋतूंत

फळ देणारे, अंबा, मोसंबी, बोरे, इत्यादी).ह्या सर्गाचे वैशिष्ट्य असे कीं हा ऊर्ध्व स्रोत आहे. म्हणजे यांचा आहार खालून वर असतो. यांना अंतर्यामी स्पर्श समजतो पण सुख-दु:खाची जाणीव असत नाही. सातवा सर्ग हा पशू व पक्षी यांचा आहे. यांचा आहार पुढून मागे असा असतो म्हणून यांना तिर्यकस्रोतस म्हणतात. यांना आहार, विश्रांती, मैथुन, भय अशा काही नियमित गोष्टींचेच ज्ञान असते. सुख-दु:खादीचे परिणाम त्यांच्यावर फार काळ टिकत नाहीत. घ्राणेंद्रियाच्या सहाय्याने यांना वस्तू ज्ञान होते. या सर्गात अठ्ठावीस प्रकार आहेत. सत्तावीस प्रकारचे पशू आहेत व अठ्ठाविसाव्या प्रकारात जलचर, कीटक व पक्षी येतात. पशूंची विभागणी अशी, एक खुराचे सहा पशू (घोडा, गाढव, खेचर, गौर, शरभ व चमरी), दोन खुरांचे नऊ पशू (बैल, रेडा, बकरा, हरीण, डुक्कर, मेंढा, गवा, काळवीट व उंट) व पाच नखांचे बारा पशू (कुत्रा, कोल्हा, लांडगा, वाघ, सिंह, हत्ती, वानर,ससा, मांजर, साळ, कासव व घोरपड). नववा सर्ग मनुष्यांचा! यांचा आहार वरून खाली असतो. हे कर्मनिष्ठ असतात. ते दु:ख रुपी संसारातच सुख मानून राहातात. हे तीन वैकृतिक सर्ग किंवा सृष्टी मानल्या जातात.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-स्कंध तिसरा

## पुष्प २६ वे (अध्याय ११ वा)

## काल गणना

मैत्रेयमुनी पुढे सांगू लागले. विदुरा! आता मी तुला कालगणनेचे रहस्य सांगतो. विश्वातल्या कोणत्याही व्यक्त पदार्थाचे विभाजन करीत गेल्यास अति सूक्ष्म असा विभाजन न करता येणारा जो भाग उरतो त्याला परमाणू अशी संज्ञा दिली आहे. हा परमाणू कार्यरत नसतो. व त्याला स्वत:चे कोणतेही गुणधर्म नसतात. ह्या परमाणूला स्वत:ला व्यापण्यास जेवढा कालावधी लागतो तो सूक्ष्मातिसूक्ष्म कालावधी आहे. व ती परमात्म्याची महान् शक्ती आहे. हाच काल सृष्टीतल्या यच्चयावत् पदार्थांना व्यापून राहातो. सृष्टीच्या उत्पत्तीपासून ते अंता पर्यंत परमाणूची सर्व कार्ये व्यापण्यास परमाणूला जो कालावधी लागतो त्याला काळाचे परममहान स्थूल स्वरूप म्हणतात. काल गणनेसाठी त्याचे प्रमाण असे आहे. दोन परमाणू मिळून एक अणु होतो. तीन अणूंचा एक त्रसरेणु होतो. आकाशात एकटक नजर लावल्यास असंख्य प्रकाशगोलक एकमेकाभोवती एका विशिष्ट गतिने फिरताना दिसतात. त्यातला एक प्रकाशगोलक म्हणजे एक त्रसरेणू होय. तीन त्रसरेणूंची एक त्रुटी होते. तीन त्रसरेणू ओलांडून जाण्यास सूर्याला जो कालावधी लागतो त्याला त्रुटी अशी संज्ञा दिली आहे. अशा शंभर त्रुटींना 'वेध' अशी संज्ञा दिली आहे. पुढची काल गणना अशी, तीन वेध एक लव. तीन लव एक निमिष, तीन निमिष एक क्षण, पांच क्षण एक काष्ठा, पंधरा काष्ठा एक लघु, पंधरा लघु एक घटिका. दोन घटीकांचा एक मुहूर्त, तीन मुहूर्तांचा एक प्रहर व आठ प्रहरांची एक अहोरात्र. (म्हणजे एक दिवस व एक रात्र). पंधरा अहोरात्रींचा एक पक्ष. दोन पक्षांचा (शुक्ल पक्ष व कृष्ण पक्ष) एक मास. एक मास म्हणजे पितरांची एक अहोरात्र. दोन मासांचा एक ऋतू. तीन ऋतूंचे एक अयन. दोन अयने (दक्षिणायन व उत्तरायण) एक संवत्सर (वर्ष). आपले एक संवत्सर म्हणजे देवांची एक अहोरात्र.

मनुष्याचे आयुष्य सर्वसाधारण १०० वर्षे सांगितले आहे. सूर्य, बृहस्पती, सावन, चंद्र व नक्षत्रे बारा राशिरूप विश्वाला वेगवेगळया गतिने प्रदक्षणा करीत असतात. त्या सर्वांचा मेळ साधण्यासाठी वेगवेगळी वर्षे वेगवेगळया वेळी संपतात. सर्व तारामंडलाचा अधिष्ठाता कालस्वरूप श्रीसूर्यनारायण परमाणूपासून बारा राशिरूप विश्वाला प्रदक्षिणा पूर्ण करण्यास जो कालावधी घेतो त्याला संवत्सर म्हणतात. बृहस्पतीच्या

प्रदक्षिणेला लागणाऱ्या कालावधीला परिवत्सर, सावनला इडावत्सर, चंद्राच्या प्रदक्षिणा काळास अनुवत्सर व नक्षत्र वर्षास वत्सर म्हणतात. मानवाच्या काल गणने नुसार सत्ययुग (१७२८०००वर्षे ), त्रेतायुग (१२९६०००वर्षे ), द्वापारयुग (८६४०००वर्षे ) व कलीयुग (४३२०००वर्षे ) अशी ही चार युगे म्हणजे एक महायुग पूर्ण होण्यास त्रेचाळीसलक्ष वीस हजार (४३२००००) वर्षे लागतात. प्रत्येक युगाचा विशेष धर्म आहे. सत्य युगात धर्म सत्य, दया, पावित्र्य व तप या चार पायांवर उभा असतो. पुढे अधर्म वाढत जातो व प्रत्येक युगात एक एक पाय कमी कमी होत जातो. कली युगात फक्त सत्य हा एकच पाय शिल्लक राहतो. विदुरा! ब्रह्मदेवांचे आयुष्यही शंभर वर्षाचे असते पण त्यांचा एक दिवस म्हणजे एक सहस्त्र महायुगे असतो. तेवढीच त्यांची रात्र असते. ब्रह्मदेवांच्या एका दिवसाला कल्प असे म्हणतात व एका कल्पात १४ मन्वंतरे व १४ इंद्र होऊन जातात. ब्रह्मदेवांच्या आयुष्यातली ५० वर्षे सांप्रत उलटून गेली आहेत व आता दुसऱ्या परार्धाला सुरुवात झाली आहे. ब्रह्मदेवांचे दोन परार्ध म्हणजे विराट पुरुषाचे म्हणजेच श्रीहरीचे एक निमिष होते.

हरये नमः। हरये नमः। हरये नमः।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-स्कंध तिसरा

## पुष्प २७ वे (अध्याय १२ वा)

## स्वायंभूव मनू व शतरूपा यांचा जन्म

विदुरा! आता सृष्टीचा विस्तार ऐक! पाच अविद्या निर्माण करून ब्रह्मदेवाला स्वस्थता वाटेना. म्हणून त्यांनी मन पवित्र करून पुन्हा भगवंताचे ध्यान धरले व सत्वगुणी सृष्टीसाठी सनकादिकुमारांची निर्मिती केली. व त्यांना प्रजा उत्पन्न करण्याची आज्ञा दिली. पण ते सत्वगुणातून उत्पन्न झालेले असल्यामुळे तपाचरणाला उद्युक्त झाले होते. त्यांनी नकार दिल्यामुळे ब्रह्मदेवांना राग आला. त्यांनी राग आवरण्याचा प्रयत्न केला. पण तो त्यांना आवरता न आल्यामुळे तो त्यांच्या भ्रूमध्यातून नीललोहित वर्ण असलेल्या बालकाच्या रूपाने बाहेर पडला. ते बालक जन्माला आल्या आल्याच रडत रडत ब्रह्मदेवांना म्हणाले, "मी काय करू? माझे नाव काय? माझे राहाण्याचे स्थान कोणते?" ब्रह्मदेवांना किंचित् हसू आले. ते बालक रडत होते म्हणून त्यांनी त्याचे नाव रुद्र असे ठेवले. पण तेवढ्याने त्याचे समाधान होईना म्हणून मन्यू, मन, महिनस, महान, शिव, ऋतध्वज, उग्ररेता, भव, काल, वामदेव व धृतव्रत अशी आणखी अकरा नावे दिली. रहाण्यासाठी हृदय, इंद्रिये, प्राण, आकाश, वायू, अग्नी, जल, पृथ्वी, सूर्य, चंद्र व तप ही अकरा स्थाने दिली. मग अकरा रुद्राणी देऊन प्रजा उत्पन्न करण्यास सांगितली. रुद्राने आज्ञा शिरसावंद्य मानली व प्रजोत्पादन सुरु केले. थोड्याच काळात त्यांनी असे काही रुद्रगण निर्माण केले कीं ते पाहून ब्रह्मदेव अस्वस्थ झाले व असली विचित्र प्रजा आपल्या सृष्टीत नको म्हणून त्यांनी रुद्राला प्रजोत्पादन थांबवायला सांगितले. व ते रुद्रगण स्वत:साठी ठेऊन रुद्राला तप करण्याची आज्ञा दिली. रुद्राने लगेच आपल्या गणासह ब्रह्मदेवांना प्रदक्षणा करून तपाचरणासाठी वनात गमन केले. त्यानंतर ब्रह्मदेवांनी पुन्हा भगवत्शक्तीच्या आश्रयाने संकल्प करून मरिची, अत्री, अंगिरा, पुलस्त्य, क्रतु, भृगु, वसिष्ठ, दक्ष आणि नारद असे दहा दिव्य पुत्र उत्पन्न केले. तेंव्हा ब्रह्मदेवांना बरे वाटले. मग त्यांनी इतरही बरीच प्रजा उत्पन्न केली. स्तनापासून धर्म, पाठीपासून अधर्म, हृदयापासून काम, भुवयांपासून क्रोध, खालच्या ओठांपासून लोभ इत्यादी उत्पन्न केले. त्यांच्या सावलीपासून कर्दमऋषी उत्पन्न झाले.

मुखापासून सरस्वती उत्पन्न झाली. त्यावेळी सरस्वतीला पाहून ब्रह्मदेवांचा काम जागा झाला. व काही अघटीत घडण्यापूर्वीच मरिच्यादि ऋषींनी त्याना त्या विचारापासून परावृत्त केले. तेंव्हा ब्रह्मदेवांनी त्या शरीराचा त्याग करून नूतन देह धारण केला. मग पुनश्च सृष्टी मार्गी लावण्यासाठी आपल्या पूर्व, दक्षिण, पश्चिम व उत्तर मुखांपासून अनुक्रमे ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद असे चार वेद उत्पन्न केले. मग त्याच क्रमाने 'शस्त्र', 'इज्या', 'स्तुतिस्तोम' व 'प्रायश्चित्त' ही कर्मे उत्पन्न केली व त्याच क्रमाने 'होता', 'अध्वर्यु ', 'उद्गाता' व 'ब्रह्मा' हे त्या कर्मांचे अधिकारी उत्पन्न केले. मग आयुर्वेद, धनुर्वेद इत्यादी उपवेद, पुरणरूपी इतिहास नामक पाचवा वेद, विविध यज्ञ, चार आश्रम, चार विद्या, चार व्याहृती, ओंकार , सप्त छंद, स्वर वर्ण, स्पर्शवर्ण, ऊष्म वर्ण, अंतस्थ वर्ण, सप्तस्वर, इतके सर्व करून त्यांनी आपल्या सृष्टीकडे नजर टाकली. तेंव्हा त्यांना सृष्टी फारशी वाढलेली दिसेना. काही तरी दैवी सदोषतेमुळे हे घडत असावे असे त्यांच्या मनात येताच त्यांच्या शरीरात एक अनामिक पण सुखद संवेदना निर्माण झाली व ब्रह्मदेवांच्या शरीराचे दोन भाग झाले. त्यातूनच पुरुष आणि स्त्री जन्माला आली. पुरुष म्हणजे स्वायंभूव मनू व स्त्री म्हणजे शतरूपा. दोघेही ब्रह्मदेवापुढे हात जोडून उभे राहिले. ब्रह्मदेवांनी त्याना प्रजोत्पादनाची आज्ञा दिली व इथूनच मैथुनी सृष्टीला सुरुवात झाली.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-स्कंध तिसरा

# पुष्प २८ वे (अध्याय १३, १४ व १५)

## यज्ञवराह अवतार

ब्रह्मदेवांची आज्ञा त्या दोघांनी शिरसावंद्य मानली. तथापि स्वायंभुव मनूने रहाण्यासाठी जागा मागितली. तेंव्हा ब्रह्मदेवांच्या लक्षात आले कीं सृष्टी रचनेच्या कार्यात मग्न असतांना जलप्रलयात बुडालेली पृथ्वी आपण वर काढायची विसरलो. व आता रसातळाला गेलेली पृथ्वी वर कशी काढायची? ते श्रीहरीची प्रार्थना करू लागले. इतक्यात त्यांच्या नाकातून उच्छवासावाटे एक अंगुष्ठ मात्र वराह शिशु बाहेर पडला.

मरीची, अत्री आदी ऋषी हा अघटीत प्रकार पाहून आश्चर्य करीत असतानाच तो वराह शिशू मोठा होऊ लागला. काही क्षणातच त्याचा विस्तार कल्पनेत न बसण्या इतका मोठा झाला. शरीर अत्यंत तेजस्वी होते. गर्जना प्रचंड मोठी पण खेद नाहीशी करणारी होती. त्याने आपली कृपामय दृष्टी ब्रह्मदेवांसह सर्व ऋषींवर टाकली. तेंव्हा त्यांच्या अंत:करणात हा श्रीहरीचा अवतार असल्याची जाणीव झाली. त्यांनी वेदमंत्रांनी त्या वराहाची प्रार्थना केली. अंतरिक्षात क्रीडा करणाऱ्या त्या वराहाने पुन्हा एकदा आश्वासक गर्जना करून प्रलय जळात उडी घेतली व रसातळाला जाऊन पृथ्वी वर आणू लागला. तेंव्हा हिरण्याक्ष नामक दैत्य त्यास आडवण्यास आला असता वराहाने आपल्या सामर्थ्याने त्याला ठार केले व पृथ्वीची योग्य जागी स्थापना केली. इथे विदुरांनी 'हिरण्याक्ष कोण?' असे विचारले म्हणून मैत्रेय मुनी त्याचा इतिहास सांगू लागले. मरिची पुत्र कश्यप सूर्यास्त समयी अग्निशाळेत अग्निला आहुती देऊन ध्यानस्थ बसले असताना त्यांची पत्नी दिति हिने त्यांच्याकडे कामातुर होऊन भोग मागितला. तेंव्हा कश्यपांनी तिला रात्री पर्यंत थांबण्यास सांगितले. कारण संध्याकाळी भूतनाथ शिवाचे गण सर्वत्र संचार करीत असतात. अशावेळी जर तुला भोग दिला तर सगळ्या विश्वाला ताप देणारी संतती होईल. पण दितिने हट्ट केल्यामुळे कश्यपांचा नाईलाज झाला. दितिला भोग दिल्यानंतर स्नानादी करून त्यांनी प्रायश्चित्त घेतले. व स्वस्थ बसले. तेंव्हा आपल्या निंद्य कर्माची लज्जा उत्पन्न झालेली दिति कश्यपांची क्षमा याचना करू लागली व होणाऱ्या संतानाची काळजी वाटून लौकिक व पारलौकिक कल्याणाची प्रार्थना करू लागली. तेंव्हा कश्यप म्हणाले, तूं अशुभ वेळी अयोग्य कृत्य केल्याने देवतांची अवहेलना झालेली आहे. त्यामुळे तुला दोन अधम व जगाला

ताप देणारे पुत्र होतील. पण पश्चात्ताप झाल्यामुळे त्यांना साक्षात् भगवंत अवतार घेऊन ठार करतील. त्यामुळे ते पाप योनीत खितपत पडणार नाहीत. तूं भगवान विष्णू, शिव व ब्रह्मदेव यांच्या बद्दल आदर व्यक्त केल्यामुळे व खऱ्या पश्चात्तापाने क्षमा याचना केल्यामुळे तुझा एक नातू भगवद्भक्त होईल. त्याला भगवंत स्वत: प्रगट होऊन दर्शन देतील. नातू भगवद्भक्त होईल हे ऐकून दिति सुखावली. पण तिला जेंव्हा गर्भधारणा झाली तेंव्हा लोकपालांचे तेज फिके पडले. त्यांना अनामिक भयाने ग्रासले. म्हणून ते ब्रह्मदेवांकडे तसे होण्याचे कारण विचारण्यास आले. ब्रह्मदेव म्हणाले, लोकपाल हो! दितिच्या गर्भधारणेचा हा प्रभाव आहे. तुमचे पूर्वज व माझे मानसपुत्र सनकादि ऋषी (पांच वर्षाचेच दिसत असत व तसेच नग्न फिरत असत.) हे वैकुंठलोकी जात असताना त्याना विवस्त्र असल्याने जय विजयांनी त्यांची योग्यता न जाणता व परिस्थितीचे भान न ठेवता त्यांना आडवले. तेंव्हा सनकादि ऋषींनी त्याना शाप दिला कीं "अरे जय-विजयानो इथे वैकुंठलोकीही तुम्ही भेदबुद्धि न सोडता वावरता आहात त्यामुळे तुम्ही शिक्षेस योग्य आहात. म्हणून तुमच्या कल्याणासाठी तुम्ही आता पापयोनीत जन्म घ्या. जय-विजयांनी लगेच सनकादी कुमारांची क्षमा याचना केली. व आपल्याला त्याही जन्मात भगवान् श्रीहरीचे स्मरण असावे असा आशीर्वाद मागितला. सनकादि ऋषींचा अपमान होऊन जय-विजयाना शाप मिळता क्षणीच भगवान् श्रीहरी तिथे प्रगट झाले.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-स्कंध तिसरा

## पुष्प २९ वे (अध्याय १६, १७, १८, १९)

## हिरण्याक्षाचा वध

इतके सांगून ब्रह्मदेव देवांना म्हणाले, भगवान् श्रीहरी प्रगट होताच सनकादि ऋषींनी सुयोग्य शब्दात श्रीहरीची स्तुति केली. त्यावेळी भगवान् श्रीहरी म्हणाले, "विबुध हो! जय-विजय हे माझे पार्षद आहेत. पण त्यांनी आपला मोठाच अपराध केला आहे. ब्राम्हण हे माझे परम आराध्य दैवत आहेत. माझ्या पार्षदांकडून आपला जो अपमान झाला तो मी माझ्याकडून झाला असेच मानतो. त्या बद्दल मी आपली क्षमा मागतो. माझ्या निर्मलकीर्ति चरित्र श्रवणाने सर्व जग पवित्र होते खरे पण ही पवित्र कीर्ती मला आपल्यामुळेच प्राप्त झाली आहे. त्यामुळे जय-विजयांना दिलेली शिक्षा योग्यच आहे. व हा आपण माझ्यावर मोठाच अनुग्रह केला आहे असे मी मानतो. माझी फक्त इतकीच विनंती आहे कीं त्यांचा अधोगतीचा भोग संपवून ते लवकर माझ्याकडे परत येतील असे करा." ब्रह्मदेव म्हणाले, " देवहो! भगवंताचे हे बोलणे इतके रहस्यमय होते कीं विचार करूनही सनकादि ऋषी ते समजू शकले नाहीत. म्हणून ते भगवंताला म्हणू लागले, " प्रभो! आपल्या ह्या बोलण्याचा नेमका हेतू आम्ही समजू शकलो नाही! ब्राम्हण माझे आराध्य दैवत आहेत असे आपण म्हणता ते केवळ लोक शिक्षणासाठीच असावे असे आम्ही मानतो. कारण सर्व विश्वाचे आराध्य दैवत आपण स्वत:च आहात. आपण सर्वेसर्वा असल्यामुळे जर आमची काही चूक झाली असेल तर आपण हवी ती शिक्षा आम्हास द्या. आम्ही ती भोगण्यास तयार आहोत." हे ऐकून भगवान म्हणाले "ऋषीहो! तुम्ही दिलेला शाप माझ्याच प्रेरणेने दिला आहे असे समजा. आपले कल्याण असो." भगवंताच्या या बोलण्याने समाधान होऊन सनकादि ऋषी भगवंताला प्रदक्षणा करून आपल्या स्थानी गेले. सनकादि ऋषी निघून गेल्यावर श्रीहरी जय-विजयांना म्हणाले, " जा! तुमचे कल्याणच होईल. ब्रम्हतेजाचे सामर्थ्य माझेच आहे. ते मी अबाधित ठेऊ इच्छित आहे. मागे मी योगनिद्रेत असताना असाच अपराध तुम्ही लक्ष्मीच्या बाबतीतही केला होता. त्यावेळेस तिनेही तुम्हाला हाच शाप दिला होता. तेंव्हा मी तुमची गय केली पण आता नाही. जा! शाप भोगून परत या!" ब्रह्मदेव पुढे म्हणाले, “त्या जय-विजयांच्या तेजामुळे तुमचे तेज फिके पडले आहे. श्रीहरी हे उत्पत्ती स्थिती व लय यांचे स्वामी आहेत ते सर्वांचे कल्याणच

करतील. तेंव्हा त्यांच्या स्मरणात राहावे हे उत्तम. आपले तेज कमी होण्याचे कारण समजल्यावर लोकपाल आपल्या स्थानी परत आले. दितिने जेंव्हा पुत्रांना जन्म दिला तेंव्हा पृथ्वीवर धडाधड भूकंप होऊ लागले. आकाशात ढग नसताना विजा चमकू लागल्या. समुद्र खवळून मोठ मोठ्या लाटा आदळू लागल्या. वादळी वारे थैमान घालू लागले. पुत्र झालेत म्हटल्यावर कश्यपांनी जातकर्म केले. पुत्रांची नावे हिरण्यकशीपू व हिरण्याक्ष अशी ठेवली. ते आदीदैत्य जन्मानंतर लगेच प्रचंड प्रमाणात वाढू लागले. व थोड्याच वेळात ते पर्वतप्राय दिसू लागले. शरीरे पोलादासारखी टणक व कणखर झाली. ते उभे राहिले कीं कटीप्रदेशाने सूर्य झाकला जाऊ लागला. बराच कालावधी गेल्यावर हिरण्याक्षाला युद्धाची खुमखुमी आली. म्हणून आपली प्रचंड मोठी गदा घेऊन तो स्वर्गात इंद्राशी युद्ध करण्यास गेला. पण इंद्र लपून बसल्यामुळे त्याला सापडू शकला नाही. म्हणून तो समुद्रातल्या वरुणाच्या नगरीत गेला. वरुणाकडे त्याने छद्मीपणाने युद्धाची भिक्षा मागितली. तेंव्हा वरुणाने त्याला भगवान विष्णूंच्याकडे जाण्यास सांगितले. म्हणून हिरण्याक्ष त्यांच्या शोधात निघाला. व कर्मधर्म संयोगाने भेटलेल्या नारदांना त्याने विष्णूंचा ठावठिकाणा विचारला. नारदांकडून ते रसातळात असल्याचे समजल्यावरून हिरण्याक्ष रसातळात आला. तिथे त्याला यज्ञवराह पृथ्वी घेऊन जाताना दिसला. हिरण्याक्षाने यज्ञवराहाला प्रतिकार करताच यज्ञवराहाने सहजतेने त्याला दूर केला. त्या सहजतेने हिरण्याक्ष डिवचला गेला. दांत ओठ खात आपली गदा परजून तो यज्ञवराहावर धावला. तेंव्हा मात्र यज्ञवराहाने आपल्या खुराने हिरण्याक्षाच्या कानफटीत अगदी सहजतेने एक ठोसा मारला. भगवतांनी सहज मारलेल्या ठोशाने हिरण्याक्ष भेलाकांडला, त्याचे डोळे बाहेर आले, जबडा जागेवरून निसटला. आचके देत तो खाली पडला आणि गतप्राण झाला. त्याला बिचाऱ्याला हे ज्ञात नव्हते कीं विश्वातल्या यच्चयावत् शक्ती भगवंताच्या असतात. महापराक्रमी हिरण्याक्षाचा वध केल्यावर ब्रह्मदेव यज्ञवराहाची वेद मंत्रांनी स्तुती करीत असतानाच भगवान् यज्ञवराह आपल्या स्थानाकडे निघून गेले.

हरये नमः। हरये नमः। हरये नमः।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-स्कंध तिसरा

## पुष्प ३० वे (अध्याय २०, २१)

## ब्रह्मदेवांची सृष्टी व कर्दमऋषींचे तप

मैत्रेय मुनींनी सांगितलेले आख्यान ऐकून विदुरांनी कुतुहलाने विचारले, "प्रभो! ब्रह्मदेवांनी सगळी सृष्टी संकल्पाने निर्माण केली कीं सप्तऋषी व मनु यांच्या सहाय्याने केली? कारण मैथुनी सृष्टी तर मनु-शतरुपा यांच्यापासून झाल्याचे आपण सांगितले म्हणून हा प्रश्न विचारला आहे." तेंव्हा मैत्रेय मुनी म्हणाले, " विदुरा! खरे तर हे सगळे तर्काच्या पलीकडले आहे. जीवाचे प्रारब्ध, प्रकृतीचा नियंता, पुरुष आणि काल या त्रिगुणात्मक प्रकृतीत क्षोभ निर्माण करून भगवंतांनी स्वत:च महत्तत्त्व, अहंकार, त्रिगुण, पंचमहाभूते इत्यादी उत्पन्न केले. त्यांना सुवर्णाच्या अंड्यात बंदिस्त करून स्वत:च त्यात प्रवेश केला. स्वत:च विराट पुरुषाचे रूप धारण केले. मग स्वत:च्या नाभीतून कोटी सूर्याचे तेज असलेले कमळ उत्पन्न केले. तेच सर्व सृष्टीचे रचनाघर आहे. त्यात परब्रह्माने स्वत:च ब्रह्मदेवाच्या रूपाने प्रवेश केला. मग ब्रह्मदेवांच्या कडून पंच-अविद्या निर्माण करवून घेतल्या. त्या ब्रह्मदेवांना आवडल्या नाहीत. म्हणून त्यांना त्या शरीराचा त्याग करायला लावला. त्या तमोगुणी शरीरापासून अनेक जीव तयार झाले. त्यांना भूक लागली म्हणून ते ब्रह्मदेवालाच खायला निघाले. तेंव्हा ब्रह्मदेव म्हणाले 'अरे, तुम्ही माझे संतान आहात. माझे भक्षण नव्हे रक्षण करा. तेंव्हा रक्षण करा, असे म्हणणारे यक्ष झाले व भक्षण करा म्हणणारे राक्षस झाले. नंतर ब्रह्मदेवांनी सत्वगुणातून सुरांची म्हणजे देवांची निर्मिती केली. मग आपल्या नव्या कांतीपासून ब्रह्मदेवांनी अप्सरा व गंधर्व निर्माण केले. ब्रह्मदेवाच्या क्रोधापासून अहि नामक नाग, आळसापासून भूत, पिशाच्च योनी, अदृश्य बालरूपापासून साध्यगण व पितृगण, तीरोधान शक्तीपासून सिद्ध व विद्याधर, अशी अनेक प्रकारची प्रजा काही संकल्पाने काही अनवधानाने निर्माण झाली. त्यामुळे विदुरा हे सगळेच तर्काच्या पलीकडले असले तरी घडलेले तर आपण अनुभवत असतोच नां? मग त्यांनी आपल्या सृष्टीकडे नजर टाकली. तेंव्हा त्यांच्या असे लक्षात आले कीं आपण जेवढी केली तेवढीच सृष्टी आहे. ती सृष्टी वाढवण्याच्या विचाराने ते जेंव्हा स्वस्थ बसले तेंव्हा स्वायम्भूव मनू व शतरूपा या मैथुनाची निर्मिती झाली. मग स्वायंभूव मनूपासून

मैथुनी सृष्टी होऊ लागली. ब्रह्मदेवाच्या सावलीपासून कर्दम मुनी उत्पन्न झाल्याचे पूर्वी सांगितले आहे. त्या कार्दमांना ब्रह्मदेवांनी प्रजोत्पादन करण्याची आज्ञा दिली. तेंव्हा कर्दमऋषींनी उत्कृष्ट संततीसाठी कायिक, वाचिक, मानसिक वैराग्य धारण करून निष्काम भक्तीने अनेक वर्षे भगवंताचे तप केले. त्यांच्या निष्काम तपावर प्रसन्न होऊन भगवान् श्रीहरी म्हाणाले, 'कर्दमा, तुझ्या निष्काम भक्तीवर मी प्रसन्न आहे. सध्या ब्रम्हावर्तात सदाचार संपन्न स्वायंभुवमनू सर्व पृथ्वीचे राज्य करीत आहे. तो तुला भेटण्यास चार दिवसात इथे येईल. त्यावेळी देवहुति नावाची त्याची कन्या तुला अर्पण करण्याचा मनोदय तो व्यक्त करील. त्याला तूं संमती दे. देवहुति तुझी सेवा करील. तिच्यापासून तुला नऊ कन्या व माझाच अंश असलेला एक पुत्र होईल. मग तूं परत तप करून मला येऊन मिळशील.' इतके सांगून श्रीहरी अंतर्धान पावले. त्याठिकाणी श्रीहरी जेंव्हा प्रगट झाले तेंव्हा कर्दमांची भावावस्था पाहून श्रीहरींच्या नेत्रातून अश्रू ठिबकले होते. श्रीहरी अंतर्धान पावल्यावर त्या अश्रुंचे एका सुंदर सरोवरात रुपांतर झाले. तेच बिन्दुसरोवर! त्यात स्नान करून पवित्र होऊन कर्दम 'हरी नामस्मरण' करीत शांत बसले.

हरये नमः। हरये नमः। हरये नमः।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-स्कंध तिसरा

## पुष्प ३१ वे (अध्याय २२)

## कर्दम-देवहुति विवाह

मैत्रेय मुनी पुढे सांगू लागले, "विदुरा! निर्विकल्प कर्दम मुनी नित्याप्रमाणे आपल्या तपात मग्न झाले. चार दिवस चुटकी सरशी निघून गेले. आणि श्रीहारींनी सांगितल्या प्रमाणे स्वायंभुव मनु आपली पत्नी शतरूपा व कन्या देवहुति यांच्यासह कार्दमांच्या आश्रमात आला. आश्रमाचा परिसर अत्यंत पवित्र व रम्य वाटत होता. मनूसह शतरूपा व देवहुति भारावल्यासारखे त्या आश्रमात प्रवेशले. कर्दमांनी स्वागत करून सम्राट मनूची अतिथी म्हणून पूजा केली. सर्वांचा यथोचित आदर सत्कार झाल्यावर मनू आसनस्थ झाल्यावर कर्दम मुनी म्हणाले, " हे राजा, स्वत:ची सेना घेऊन तूं विजयरथावर आरूढ होऊन खल निर्दालनासाठी पृथ्वी भ्रमण करतोस तेंव्हा तुझ्या धनुष्याच्या नुसत्या टणत्काराने व रथाच्या खडखडाटाने पापी लोकांच्या मनात भय उत्पन्न होऊन ते आपल्या पाप वृत्तींचा त्याग करतात. अधर्माचा नाश व सद्धर्माची स्थापना करीत जाणारे तुझे हे सृष्टी भ्रमण अतुलनीय आहे. त्यामुळे आपले मन:पूर्वक स्वागत आहे. हे वीरवर! हे जरी खरे असले तरी सुद्धा मी आपणास विचारतो कीं आपले यावेळी इथे कोणत्या कारणासतव आगमन झाले आहे? मनू विनयाने म्हणाला, " माझे भाग्य मोठे! म्हणून आपल्या सारख्या श्रेष्ठ मुनींचे दर्शन झाले. हे मुने, कन्यास्नेहाने माझे चित्त चिंताग्रस्त आहे. तिला अनुरूप वर मिळावा या इच्छेने मी इथे आलो आहे. पूर्वी तिने नारदांच्या मुखातून आपल्या तेजाचे, तपाचे व वैराग्याचे वर्णन श्रवण केल्यापासून आपल्यालाच पती म्हणून वरण्याचा निश्चय मज जवळ व्यक्त केला आहे. गृहस्थाश्रमातील सर्व कर्मे करण्यात माझी कन्या देवहुति निष्णात आहे. हे विद्वन्, मला असे ज्ञात झाले आहे कीं आपण विवाहोत्सुक आहात. त्यामुळे स्वत: होऊन प्राप्त होणाऱ्या भोगाची अवहेलना आपण करणार नाही अशी मला खात्री आहे. म्हणून आपण माझ्या कन्येचा स्वीकार करावा!" हे ऐकून कर्दममुनी म्हणाले, "राजन्! विवाह करण्याची माझी इच्छा आहे. जिच्या अंगकांतीने अलंकारानाही शोभा येत आहे अशा तुझ्या ह्या कन्येचा कोण आदर करणार नाही? शिवाय ती स्वत:च इथे येऊन विनंती करीत असताना कोणता सूज्ञ तिला नाकारणार आहे? तथापि माझी एक अट आहे. मी हिच्या समवेत संतान होई पर्यंतच गृहस्थाश्रमात राहीन.

संतान झाल्यावर संन्यासाश्रम स्वीकारीन." कर्दममुनींचे हे बोलणे ऐकून देवहुतिने स्वत:च ती अट मान्य केल्यामुळे राजा व शतरूपा यांना बोलण्यासारखे काहीच उरले नाही. त्यामुळे कर्दम-देवहुति विवाह मोठ्या थाटात पार पडला. राज वैभवात वाढलेल्या आपल्या कन्येचा निरोप घेताना तिच्या तपस्वी जीवनाची सुरुवात होणार या कल्पनेने राजा मनू व शतरूपा यांना भडभडून येणे स्वाभाविकच होते. जड अंत:कारणाने दोघांनी कर्दम व देवहुति यांचा निरोप घेतला. माता पिता निघून गेल्यावर देवहुति आपल्या पतीचे मनोगत ओळखून त्याप्रमाणे संसार करू लागली. कर्दम मुनींची ती ज्या प्रकारे सेवा करीत होती त्या सेवेला योग्य उपमा म्हणजे भगवान् शिवांची सती पार्वतीने केलेली सेवा असेच म्हणावे लागेल. काम, क्रोध, लोभ, मद, मत्सर देवहुतिच्या आसपासही फिरकू शकत नव्हते. तिच्या तपस्वी जीवनास सुरुवात झाली. तिने आपल्या केसांच्या जटा वळल्या. निरंतर पतिसेवेत तत्पर राहून विश्वास, पवित्रता, गौरव, संयम, निरपेक्ष प्रेम, सदैव प्रसन्नता, मधुर व उचित भाषण, इत्यादी सद्‌गुणांनी देवहुतिने आपल्या पतिला संतुष्ट केले. पण त्यांत ती तिचे मुसमुसते तारुण्य हरवून बसली. गालफडे बसली. सर्व शरीर म्हणजे निव्वळ हाडांचा सापळा उरल्यासारखे झाले. पण तिच्या मनाची प्रसन्नता मात्र वाढत होती.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

## ।।श्रीगुरु:शरणं।।

## श्रीमद्भागवत-स्कंध तिसरा

## पुष्प ३२ वे (अध्याय२३)

# कर्दम-देवहुति विहार

पुष्कळ काळ व्रतस्थ राहून दुर्बल झालेल्या देवहुतिला पाहून, कळवळा येऊन कर्दममुनी एक दिवस तिला म्हणाले, " देवहुति देहधारकाला आपला देह अत्यंत प्रिय असतो. तथापि तूं स्वत:च्या देहाची पर्वा न करता निरपेक्ष व निष्कपट भावाने तन मन अर्पून माझी सेवा केली आहेस. त्यामुळे मला भगवंताच्या कृपेने जे काही सामर्थ्य प्राप्त झाले आहे त्यावर तुझाही अधिकार निर्माण झाला आहे. तेंव्हा तुझे मनोगत तूं मला नि:संकोच सांग!" आपल्या पतीचे हे प्रेममय भाषण ऐकून देवहुति आनंदली. ती विनयाने म्हणाली, " स्वामी! त्रिगुणात्मक मायेवर आपला निरंकुश अधिकार आहे! हे मला ज्ञात आहे. तथापि माझ्या बरोबर गृहस्थसुखाचा उपभोग घेईन असे माझ्या पित्याला आपण वचन दिले आहे. त्याची पूर्तता करावी! आपल्या तपाचरणात व्यत्यय येऊ नये म्हणून मी स्वत:च काम भावनेचा त्याग केला होता. त्यामुळे माझे माझ्या शरीराकडे लक्षच नव्हते. मी माझे तारुण्य व सौंदर्य हरवून बसले आहे. आज आपल्या भाषणामुळे मी आपल्या समागमास उत्सुक झाले आहे. त्यासाठी स्वामींनी अनुकूल परिस्थिती निर्माण करावी! " देवहुतिचे हे विनयशील मनोगत ऐकून कर्दममुनी प्रसन्न झाले. देवहुतिच्या अंतरंगातला भाव जाणून कर्दममुनी तिला म्हणाले, " देवहुति! जा! समोरच्या बिंदू सरोवरात बुडी मारून ये! म्हणजे सारे काही तुझ्या मनासारखे होईल!" देवहुतिने मोठ्या उत्साहाने बिंदू सरोवरात प्रवेश केला. सरोवरात बुडी मारता क्षणीच ती एका प्रशस्त व सुंदर महालात प्रवेशली. तिच्या स्वागतास असंख्य दासी उभ्या असलेल्या तिला दिसल्या. त्यांनी देवहुतिला एका सुंदर मंचकावर बसवले हळुवारपणे तिच्या जटा सोडवल्या. अप्रतीम सुगंधी उटणे लावून तिला न्हाऊ घातले. मग तिला अमृतासमान पेय पिण्यास दिले. तिला उत्तमोत्तम वस्त्रालंकारांनी नटवून आरशा समोर आणले. विवाहाच्या दिवसापेक्षाही अधिक सौंदर्य प्राप्त झालेले पाहून देवहुती चकित झाली. ती तारुण्याने मुसमुसली होती. आपला सर्व शृंगार पूर्ण झालेला दिसताच देवहुतिला ऋषिश्रेष्ठ कर्दामांची आठवण झाली. आणि तत्क्षणी ते तिच्या बाजूला प्रगट झाले. हजारो अप्सरा सेवा करीत असलेल्या आपल्या प्रियतमेला घेऊन कर्दम सरोवराबाहेर आले. तो काय? संपूर्ण आश्रमाचाही काया पालट झालेला होता. वैभवशाली राजवाडाच समोर होता. त्याच्या समोर तेवढेच भव्य व सर्व सुख-सोयींनी

युक्त असे एक विमान तयार होते. कर्दमांनी तिला त्या विमानात आणले. अफाट व अद्भुतवैभवाने नटलेल्या व असंख्य दासी सेवेत असलेल्या त्या विमानातून त्यांनी मेरुपर्वताच्या रम्य परिसरातून मनसोक्त विहार केला. खास लोकपालांना विहार करण्यासाठी तयार केलेली ती विहार स्थाने म्हणजे कामाग्नी प्रदीप्त करणाऱ्या जागाच होत्या. त्या स्थानात विहार करून तृप्त झाल्यानंतर देवहुतिसह कर्दमांनी वैश्रम्भक, सूरसन, नंदन, चित्ररथ व पुष्पभद्र अशा अनेक दिव्य उद्यानातून विहार केला. देवहुतिला रतिसुखाने तृप्त करीत कर्दममुनी अनेक वर्षे विहार करीत होते. देवहुतिची तृप्तता झाल्यावर ते परत आपल्या बिंदू सरोवरा जवळच्या राजवाड्यात आले. प्रदीर्घ स्वप्नातून जागे व्हावे तसेच देवहुतिला झाले. परत आल्यानंतर कर्दमांनी स्वसंकल्पाने नऊ कन्यांच्या उत्पत्तीसाठी देवहुतिच्या गर्भात आपले वीर्य स्थापन केले. त्यामुळे यथाकाल व योग्य समयी देवहुतिला नऊ कन्या झाल्या. त्या नऊही कन्या अतिशय तेजस्वी व सुंदर होत्या. त्यांच्या शरीरास कमळाचा सुगंध येत असे. देवहुति सुखावली खरी पण तिला लगेच कर्दमांनी घातलेल्या अटीचे स्मरण झाले. आपला पती आता त्या प्रतिज्ञे प्रमाणे संन्यास घेणार या कल्पनेने ती अस्वस्थ झाली.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

श्रीमद्भागवत-स्कंध तिसरा

पुष्प ३३ वे (अध्याय २४)

## कपिलमुनींचा अवतार

आपल्याला नऊ कन्या झाल्या आहेत व आता कर्दममुनी प्रतिज्ञे प्रमाणे निश्चित संन्यास घेतील हे देवहुति जाणून होती. तरी तिच्या मनाची काही तयारी होत नव्हती. एक दिवस उचित समय पाहून ती कर्दमांना म्हणाली, " भगवन्! मी आपली शरणागत आहे. म्हणून मला अभय द्या. आपण आपल्या प्रतिज्ञे प्रमाणे संन्यास घ्याल. पण त्या पूर्वी आपल्या नऊ कन्यांना सुयोग्य वर शोधून त्यांचे कन्यादान करावे ही एक प्रार्थना आहे. व दुसरी प्रार्थना अशी कीं माझा जन्म-मृत्यूरूप शोक नाहीसा करून मगच आपण संन्यास घ्यावा. देवहुतिचे हे समयोचित व योग्य बोलणे ऐकून कर्दमांना भगवान् श्रीहरीने सांगितलेल्या गोष्टीचे स्मरण झाले. ते देवहुतिला म्हणाले, " हे प्रियतमे! तूं ह्या गोष्टींविषयी निश्चिंत राहा. तूं केलेल्या तपोबलाने साक्षात् भगवान् श्रीहरीच तुझ्या उदरी जन्म घेतील. व तेच तुला उपदेश करतील. त्यांच्या जन्मानंतर त्यांच्याच अनुमतीने मी संन्यास घेईन. त्यामुळे तूं आता पुनश्च नामस्मरण करीत तपाचरण कर." आपल्या प्रिय पतीचे हे आश्वासन श्रावण करून देवहुति अत्यंत श्रद्धेने तपाचरण करू लागली. पुढे यथा योग्य समयी देवहुतिने एका दिव्य पुत्राला जन्म दिला. त्यावेळी मेघ मंडळात मंजुळ व मंगल वाद्यांचा गजर होऊ लागला. गंधर्व स्तुतिसुमने गाऊ लागले. दशदिशा आनंदाने फुलून गेल्या. मरीची, अत्री, अंगिरा, भृगु, वसिष्ठ, पुलह, क्रतु, पुलस्त्य, अथर्व, नारद व सनत्कुमार यांच्या सह ब्रह्मदेव कर्दमांच्या आश्रमात प्रवेशले. कर्दमांनी पित्याच्या आज्ञेचे योग्य प्रकारे पालन केले असल्यामुळे कार्दमांचा पिता ब्रह्मदेव प्रसन्नतेने म्हणाले, " कार्दमा! तुझ्या या नऊ सुंदर व सुलक्षणी कन्या तूं इथे आलेल्या नऊ ऋषींना अर्पण कर. त्यामुळे जगात तुझी कीर्ती वाढेल. हे कर्दम मुने! देवहुतिच्या पोटी साक्षात् नारायण अवतीर्ण झालेले आहेत. ते कपिल या नावाने प्रसिद्ध होतील. ते विश्वाला सांख्यमार्ग दाखवण्यासाठीच अवतीर्ण झाले आहेत!" कर्दम मुनींनी आपल्या पित्याच्या आज्ञेप्रमाणे, मरिची-कला, अत्री-अनसूया, अंगिरा-श्रद्धा, भृगु-ख्याती, वसिष्ठ-अरुंधती, पुलह-गती, क्रतु-क्रिया, पुलस्त्य-हविर्भू, अथर्व-शांती, अशा प्रकारे नऊही कन्यांचा विधी पूर्वक विवाह आलेल्या नऊ ऋषींशी मोठ्या थाटात लावून दिला. मग कर्दमांनी केलेला आदर सत्कार स्वीकारून

सर्व जण खुशीत आपआपल्या स्थानी निघून गेले. योग्य समयी एकांत पाहून कर्दम मुनी आपल्या पोटी जन्मास आलेल्या भगवान कापिलांना म्हणाले, " हे त्रिकालातीत असलेल्या परब्रह्मा माझा आपणास शतश: प्रणाम आहे. माझ्या सारख्या भक्ताला दिलेले वचन पूर्ण करण्यासाठी आपण अवतरला आहात. हे माझे परम भाग्यच आहे. तथापि पुत्ररूपाने आपण माझ्या पोटी जन्म घेतला असल्यामुळे मी तिन्ही ऋणातून मुक्त झालो आहे. आता मला संन्यासाश्रमाची परवानगी द्यावी ही माझी नम्र प्रार्थना आहे." कर्दममुनींचे हे बोलणे ऐकून भगवान कपिल म्हणाले, "कर्दमा! आत्मज्ञानाचा मार्ग दाखवण्यासाठीच मी हा जन्म घेऊन तुला दिलेले वचन पूर्ण केले आहे. आतां मला विचारलेच आहेस तर आवश्य जा! देवहुतिची काळजी करू नकोस. मी यथावकाश कर्मापासून मुक्त होण्याचा मार्ग असलेले आत्मज्ञान तिला देईन." भगवान कापिलांनी असे सांगितल्यावर प्रजापती कर्दमांनी कपिल मुनींना प्रदक्षिणा घातली व नि:संग भावाने गृहस्थाश्रमाचा त्याग करून वनात निघून गेले.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

श्रीमद्भागवत-स्कंध तिसरा

पुष्प ३४ वे (अध्याय २५, २६चालू)

## देवहुतिचे प्रश्न व भक्ती योग

पिता वनात निघून गेल्यावर आपल्या मातेला आनंद देत भगवान कपिल बिंदूसरोवराकाठी राहू लागले. पती वनात निघून गेल्यावर देवहुति अंतर्मुख झाली. तिला ब्रह्मदेवांचे शब्द आठवले. त्याच बरोबर आपल्या पतीचेही शब्द आठवले. साक्षात श्रीहरीच तुला उपदेश करील. आपला पुत्र साक्षात परब्रह्म आहे या जाणीवेतून ती भगवान कापिलांना म्हणाली, " हे प्रभो! ह्या इंद्रियांच्या कधीही तृप्त न होणाऱ्या विषयलालसेने मी अति उद्विग्न झाले आहे. आपणच या देहा विषयी ममता उत्पन्न करून 'हा मी! हे माझे' असे अज्ञान निर्माण केले आहे. तरी आता हा माझा महामोह आपणच नाहीसा करा. प्रकृती व पुरुष यांच्या ज्ञानप्राप्तीच्या तळमळीने मी आपणास शरण आले आहे. आपणास माझा प्रणाम आहे." आपल्या मातेने स्वत: होऊन हा प्रश्न विचारल्यामुळे कापिलांना मोठाच आनंद झाला. ते म्हणाले, "माते! अध्यात्मयोग हा सुख-दु:खाची निवृत्ती करणारा कल्याणमार्ग आहे. जीवाला बद्धावस्था वा मुक्तावस्था मनामुळेच प्राप्त होते. मन विषयासक्त झाल्यास बद्धावस्था येते व मन परमात्म्यात लीन झाल्यास मुक्तावस्था येते. हे ज्याचे त्याने भक्तियोगाच्या माध्यमातून करावयाचे असते. भक्तियोगाने चित्तशुद्धी होऊन भेदरहित आत्मतत्त्वाचा अनुभव आला कीं मग प्रकृती हा भास असल्याची अनुभूती येते. त्यासाठी भक्तीने लौकिक व पारलौकिक सुखा बाबत आत्मानात्म विवेक करून वैराग्य धारण करावे लागते. अशा प्रकारच्या दृढ भक्तीने माझी प्राप्ती होते." हे ऐकून देवहुति म्हणाली, " हे प्रभो! माझ्या मंदबुद्धीस्तव मला हे समजणे अवघड आहे तरी ते सोपे करून सांगा. " तेंव्हा कपिलमुनी सांगू लागले, "माते! प्रत्येक कर्म कर्तेपणासह व निरपेक्षपणे भगवंताला अर्पण करणे, ही निष्काम भक्ती होय. ह्या निष्काम भक्तीनेच देहादिक उपाधींचा नाश होऊन मुक्तावस्था प्राप्त होते. संसारी मनुष्याचे सर्वश्रेष्ठ कल्याण म्हणजे निष्काम भक्तीने मन माझ्यात गुंतवून टाकणे. भक्तीने कशापासून मुक्त व्हावयाचे आहे ते समजण्यासाठी मी तुला पुरुष-प्रकृति म्हणजे काय ते थोडक्यात सांगतो. हे विश्व प्रकाशित करणारा आत्मा म्हणजेच पुरुष होय. तो अनादि, निर्गुण, प्रकृतीच्या पलीकडे असलेला, स्वयंप्रकाशी व फक्त अंत:करणात स्फुरणारा आहे. ह्याच पुरुषाने आपल्या लीलाविलासाने अव्यक्त अशा

त्रिगुणात्मक मायेचा स्वीकार केला. तीच लीला परायण प्रकृती सत्वादी गुणांच्या सहायाने प्रजा निर्माण करू लागली. प्रकृतीच्याच ज्ञान झाकण्याच्या आवरण शक्तीने जीव आपल्या मूळ स्वरूपाला विसरून स्वत:ला कर्ता मानू लागतो. ह्या कर्तृत्वाभिमानामुळे बद्धता येते. व जीव जन्म-मृत्युच्या फेऱ्यात सांपडतो. " हे ऐकून देवहुति म्हणाली, " हे पुरुषोत्तमा! स्थूल व सूक्ष्म ह्यांच्या कार्यस्वरूपाचे कारण असलेले पुरुष-प्रकृतिचे लक्षण नीट समजावून सांगा!" कपिल मुनी सांगू लागले, " माते! अव्यक्त असलेल्या त्रिगुणात्मक तत्त्वालाच प्रधान, अथवा प्रकृति असे नाव आहे. ही प्रकृति सर्व व्यक्त पदार्थांचा आधार आहे. पंचमहाभूते, पंचतन्मात्रा , पंचज्ञानेंद्रिये, पंचकर्मेंद्रिये व अंत:करण चतुष्टय अशा २४ तत्त्व समुदायाला प्रकृतिचे कार्य मानले जाते. पंचविसावे तत्त्व काल आहे. त्यामुळे भय निर्माण होते. कालामुळेच पंचमहाभूते, मन, बुद्धी व अहंकार या आठ तत्त्वात साम्यावस्था निर्माण होऊन जीवाची उत्पत्ती होते. साम्यावस्था असलेल्या प्रकृती मध्ये जी गती उत्पन्न होते ती या काल नामक शक्तीमुळेच होते. याचा अर्थ असा कीं काल म्हणजे परब्रह्मच आत्मतत्त्वाने जीवात व काल रूपाने बाहेर व्याप्त असलेले पंचविसावे तत्व आहे. तीच माया आहे. त्या मायेतच परब्रह्माने आपले चिदाभासवीर्य म्हणजेच चैतन्य स्थापन केले. त्यामुळेच तेजोमय महत्तत्त्व निर्माण झाले व त्यातूनच जग अंकुरले आहे. पण महत्तत्त्वाचा व्यय अथवा रुपांतर झालेले नाही. फळाच्या बीजात जसा वृक्ष सूक्ष्म रूपाने सामावलेला असतो तद्वत महत्तत्त्वात सूक्ष्मरूपाने सर्व विश्व सामावलेले असते. ते प्रलय काळी आच्छादले जाते व उत्पत्ती काळी प्रकाशमान होते.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

श्रीमद्भागवत-स्कंध तिसरा

पुष्प ३५ वे (अध्याय २६)

## प्रकृति-पुरुष विवेक

कपिल मुनी आईला पुढे सांगू लागले, " माते! महत्तत्त्व हेच ईश्वर प्राप्तीचे स्थान आहे. महत्तत्त्वाचे दुसरे नाव चित्त आहे. ते स्वाभाविक अवस्थेत शांत, स्वच्छ व शुध्द असते. त्यालाच 'वासुदेव' असे म्हणतात. महत्तत्त्वापासून वैकारिक, तैजस व तामस असे तीन अहंकार झाले. त्याच्यापासून क्रमश: मन, इंद्रिये व पंच महाभूते झाली. या अहंकार समूहाला 'संकर्षण' असे म्हणतात. या अहंकाराचे देवता रूपाने कारणत्व व पंच महाभूतांच्या रूपाने कार्यत्व ही लक्षणे आहेत. सत्वादि गुणांच्या संबंधाने शांतत्व, घोरत्व, व मूढत्व ही लक्षणे आहेत. वैकारिक अहंकारापासून संकल्प-विकल्पात्मक मनाची उत्पत्ती झाली. मनाचा अधिष्ठाता व अधिदैवत "अनिरुध्द" आहे. तैजस अहंकाराच्या क्रियाशीलतेने वस्तूचे स्फुरणरूप ज्ञान व कार्यनिर्णय करणाऱ्या "बुद्धी"ची उत्पत्ती झाली. बुद्धीचे अधिदैवत 'प्रद्युम्न' आहे. पाप-पुण्य जाणण्याचे कार्य बुद्धी करते. ज्ञान ही बुद्धीची शक्ती आहे. तर बुद्धीने निर्णय दिल्यावर कर्म करण्याची शक्ती प्राणाची आहे. तामस अहंकारापासून शब्द तन्मात्रेची उत्पत्ती झाली. श्रवणेन्द्रिय हे शब्दज्ञानाचे स्थान आहे. शब्दापासून आकाश विकारले. प्राण, 'मन व इंद्रियांचा' आश्रय होऊन सर्व वस्तूंना सामावून पोकळी निर्माण करून सर्वांना व्यापून राहणे हे आकाशाचे कार्य आहे. कालगतीने आकाशापासून मृदू, कठीण, शीत, उष्ण इत्यादी स्पर्शांचे ज्ञानस्थान असलेल्या त्वगेन्द्रीयासह स्पर्शतन्मात्रेची निर्मिती झाली. स्पर्शतन्मात्रेचा विकार वायू. चलन-वळण, अकोंचन-प्रासारण इत्यादी कार्यशक्ती इंद्रियात उत्पन्न करणे, शब्द व गंधादिंचे वहन करणे ही वायूची वृत्तिरूप लक्षणे आहेत. वायू विकारला व चक्षुरिन्द्रियासह रूपतन्मात्रेपासून तेज उत्पन्न झाले. चक्षुरिन्द्रियाच्या माध्यमातून वस्तूच्या आकाराचे ज्ञान, बदलांचे रूप दाखवणे, आकार, प्रकार व परिणाम दाखवणे, तेजोरूप असणे, चमकणे, पक्व करणे, शीत निवारणे, सुकवणे, तहान, भूक, निद्रा, आलस्य, मैथुन इत्यादी क्रिया ह्या 'रूप' तन्मात्रेच्या वृत्ती आहेत. तेजापासून जल व रसनेन्द्रीयासह रसतन्मात्रेची निर्मिती झाली. रसनेन्द्रियाने चव समजण्याचे ज्ञान होते. आर्द्रता निर्माण करणे, भिजवणे, लगदा करणे, प्रवाही

होणे, तहान भागवणे इत्यादी जलाच्या वृत्ती आहेत. जलापासून पृथ्वी व वास समजण्याची ज्ञानशक्ती असलेल्या घ्राणेंद्रियासह गंध तन्मात्रा झाली. साकार होणे, पदार्थ धारण करणे, स्त्री-पुरुष गुणांना प्रकट करणे, जीवांचे पोषण करणे इत्यादी कार्यरूप लक्षणे पृथ्वीची आहेत. अशा गुणप्रकारांनी निर्माण केलेल्या (पंचमहाभूते, महत्तत्त्व व अहंकार या) सात तत्त्वात आदिनारायण स्वत: प्रवेशले. त्यावेळी त्याचे ब्रम्हांडात रुपांतर झाले. ते तेजस्वी अंडे (म्हणजेच ब्रम्हांड) अनेकवर्षे अचेतन अवस्थेत पडून असताना त्यात चवदा भुवनांसह विराट पुरुषाची निर्मिती झाली. माते, सर्व तन्मात्रा, ज्ञानेंद्रिय, कर्मेंद्रिय, अहंकार, इत्यादिंसह जरी विराट पुरुष उत्पन्न झाला होता तरी त्याला जाग आलेली नव्हती. पण जेंव्हा चित्ताचा अधिष्ठाता क्षेत्रज्ञ "वासुदेव" चित्तासह त्याच्यात प्रवेशला तेंव्हा त्याला जाग आली. हे माते! आपण सुद्धा जेंव्हा शांत व गाढ झोपतो त्यावेळी पंचप्राण, पंचज्ञानेंद्रिये, मन, बुद्धी या पैकी स्वशक्तीने आपणास कोणीच उठवू शकत नाही. पण चित्ताचा अधिष्ठाता "वासुदेव" योग्य समयी आपणास जागवतोच. त्यासाठी क्षेत्रज्ञ वासुदेव आपल्या शरीरात साक्षीरूपाने असल्याची दृढ जाणीव निरंतर ठेवावी. त्यालाच नामस्मरण भक्ती असे म्हणतात.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-स्कंध तिसरा

## पुष्प ३६ वे (अध्याय २७,२८)

## प्रकृति-पुरुष विवेक व मोक्ष

माते! पाण्यात प्रतिबिंबित झालेल्या सूर्याला जसा पाण्याच्या शीतोष्णादि गुणाचा स्पर्श होत नाही, तद्वतच प्रकृतिमय शरीरात असलेल्या आत्म्याचे आहे. आत्मा निर्गुण, निराकार, निर्विकार व अकर्ता असूनही जेंव्हा तो जीव दशेतल्या प्रकृतिच्या गुणांशी संबंध जोडतो तेंव्हा तो एकदेशी होतो. व स्वत:ला कर्ता मानू लागतो. त्यामुळे तो देह संबंधाने उत्पन्न होणाऱ्या पाप-पुण्याचा धनी होऊन जन्म-मृत्युच्या फेऱ्यात सापडतो. माते! दृश्यमान होणाऱ्या विश्वाला प्रतिबिंब म्हणतात. वैकारिक, तैजस व तामस अशा तीन प्रकारच्या अहंकारात देह, इंद्रिये व मन यांच्यात असलेल्या आपल्या स्वत:च्या वेगळेपणाच्या अस्तित्वाच्या कल्पनेला प्रतिबिंब असे संबोधले जाते. त्या प्रतिबिंबाच्या कारण स्थानाच्या आधारेच मूळ परमात्म्याचा बोध होतो. जसे भिंतीवर पडलेल्या कावडश्याच्या आधारे त्याच्या उगमस्थानी जाता येते. तिथे आपल्याला प्रतिबिंब दिसते. त्या प्रतिबिंबाच्या आधारे मूळ सूर्यनारायणाचा बोध करून घेता येतो. तद्वत संसारचित्र ज्या मनावर उमटते म्हणजे प्रतिबिंबित होते त्याच्या आधारे मूळ स्थानातल्या परब्रह्माचा अनुभव घेता येतो. अर्थात् हा अनुभव अहंकाराच्या द्वारेच घडत असतो. शब्दादी सूक्ष्म पंचमहाभूते, तन्मात्रा, मन, बुद्धी इत्यादी जेंव्हा प्रकृतीत लीन होतात तेंव्हा त्याला निद्रा असे संबोधले जाते. ती निद्रा आपण रोज अनुभवतो. पण तशाही अवस्थेत पुरुष जागाच असतो. तो सर्वथा अहंकार शून्य असतो. जो पर्यंत शरीरभावाचा उपशम होऊन चित्त 'वासुदेव' रूपाशी तादात्म्य पावत नाही तोवर मनावर हे संसाराचे प्रतिबिंब उमटत राहते. अशा प्रकारे सर्व गोष्टींचे मनन करून विवेकी पुरुष अहंकारा सहित सर्व तत्त्वांचे प्रकाशक असलेल्या अधिष्ठानाचा म्हणजेच आत्मतत्त्वाचा माझ्या कृपेने अनुभव घेतो. हे सर्व विवेचन ऐकून देवहुतिने विचारले, " प्रभो! पुरुष-प्रकृती नित्य एकमेकांच्या आश्रयाने राहणारी असल्यामुळे व प्रकृतीच्या विशेषत्वा-मुळेच जर अकर्त्या पुरुषाला बंध निर्माण होत असेल तर प्रकृतीचे गुण शिल्लक राहिल्याने जीवाला मोक्ष कसा प्राप्त होईल?" कपिल मुनी म्हणाले, "माते! अग्नीचे उत्पत्ती स्थान लाकूड आपणच उत्पन्न केलेल्या अग्नीने संपूर्ण

भस्म होते तद्वत आपल्या मूळस्थानाच्या शोधात निष्काम भक्तियोगाने व प्रबळ विरक्ती धारण करून चित्त भगवंतात एकाग्र केल्याने प्रकृतीचे गुण हळूहळू नाहीसे होतात. मग चित्त माझ्या ठिकाणी एकाग्र केलेले असल्यामुळे माझ्याच कृपेने मोक्षपदाला प्राप्त होतात. माते! मोक्षमार्ग स्वेच्छेने स्वीकारावा लागतो. त्यासाठी प्रथम सगुणोपासना व सगुणोपासनेतून निर्गुणोपासनेकडे जावे. हा सबीज उपासना मार्ग आहे. अव्यक्ताची उपासना हा निर्बीज उपासना मार्ग आहे. मार्ग कोणताही स्वीकारला तरी धर्म पालन व अधर्माचा त्याग करावाच लागतो. त्यासाठी नियम हे पाळावेच लागतात. विधिवशात मिळणाऱ्या उपजीविकेवर संतुष्ट असणे. परिमित व पवित्र आहार, मन, वाणी व शरीर यांनी कोणत्याच जीवाला क्लेश न देणे. सत्य बोलणे, चौर्य कर्माचा विचारही मनात न आणणे, वस्तुसंग्रह न करणे, ब्रम्हचर्य पालन इत्यादी नियम आहेत. थोडक्यात म्हणजे आंतर्बाह्य पावित्र्य आवश्यक आहे. नंतर प्राणायामाच्या अभ्यासाने ध्यान धारणा करावी. सबीज उपासनेत प्रथम सगुण मूर्तीचे ध्यान करावे. नंतर सगुण मूर्तीच्या चेहऱ्यावरच्या हास्यावर लक्ष केंद्रित करावे. मग त्या हास्यातल्या आनंदावर ध्यान धरावे. मग तेही त्यागून फक्त आकाशा वर लक्ष केंद्रित करून निर्गुण ध्यानाची संवय जडवून घ्यावी. अशा प्रकारे ध्यान धारणेने भगवंता विषयी प्रेम उत्पन्न करून घ्यावे. इतके कीं त्या भक्ती प्रेमामुळे अष्ट सात्विक भाव जागे झाले पाहिजेत. मग मन श्रीहरीत ताल्लिन होते. मन आसक्ती रहित होते. मग ब्रह्माकार अवस्था प्राप्त होते. जीवाचे जीवपण हरपून जाते. जीव देहोपाधीपासून वेगळा होतो. "मी व माझे' ही भावनाच लोप पावलेली असल्याने जीवाचे एकदेशित्व संपून तो सर्वत्र परमात्मस्वरूप अनुभवू लागतो. संसाराला स्वप्न का म्हणतात हे त्याला समजते. धारण झालेला देह प्रारब्धाधीन सोडून स्वत:कडे कोणताच कर्तेपणा न घेता देह पूर्व प्रारब्ध भोगू लागतो. चतुर्विध प्राणीमात्रांमध्ये वास करणारा परमात्मा आश्रयस्थानाच्या गुणभेदामुळे विविध प्रकारचा भासतो, हे त्याला अनुभवता येते. अशा प्रकारे जीव माझ्या भक्तीने माझी कृपा प्राप्त करून माझ्याशी एकरूप होतो. त्यालाच मोक्ष म्हणतात.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-स्कंध तिसरा

## पुष्प ३७ वे (अध्याय २९,३०,३१)

## भक्तीचे मर्म व काल महात्म्य

पुरुष-प्रकृति विवेचन ऐकून देवहुतिने विचारले कीं भक्ती म्हणजे नक्की काय? कपिल मुनी म्हणाले, "माते! स्वभाव व गुणभेद यांच्यामुळे भक्तियोग अनेक प्रकारचा झाला आहे. ईश्वराची भक्ती करणारा पण प्राणीमात्रांबद्दल सूडबुद्धी ठेवणारा तामस भक्त. ऐश्वर्य प्राप्तीसाठी ईश्वर भक्ती करणारा राजस भक्त. भेदबुद्धीने पाप क्षालनार्थ कर्तव्य म्हणून ईश्वरभक्ती करणारा सात्विक भक्त. हे झाले त्रिगुण भक्तियोग. आता निर्गुण भक्तियोग ऐक. गंगेचा प्रवाह जसा सहजतेने व निरंतर सागराकडे वाहात असतो त्याप्रमाणे संसारात करावे लागणारे नियतकृत्य केवळ माझ्यासाठी करण्याचा ध्यास ज्याच्या अंत:करणात असतो तो निर्गुण भक्त होय. असा निष्काम भक्तियोग हा परमपुरुषार्थ मानला गेला आहे. ह्याच भक्तियोगाने मनुष्य तीनही गुणांना ओलांडून मला येऊन मिळतो. या भक्तियोगासाठी सतत नामस्मरण, वैराग्य, निरपेक्षता, माझे मनन, शांती, समदर्शन, निर्वैरता व जाणीवपूर्वक अहंकाराचा त्याग करणे आवश्यक आहे. ह्याशिवाय मनाची सरलता, सत्संग, नियमित अध्यात्मश्रवण, सर्व प्राणीमात्रांविषयी अंत:करणात दया इत्यादी भागवत धर्माचे आचरण आवश्यक असते. केवळ उपचार म्हणून केलेल्या पूजनाने माझी प्राप्ती होत नाही. ते सुकृतात जमा होते. वृत्तीभेदाने निर्गुण भक्तियोगात जरी विविध प्रकार होत असले तरी मुलभूत तत्वे हीच असतात. म्हणून प्रत्येक सजीवात माझा म्हणजे परब्रम्हाचा वास असतो या जाणीवेतून सर्व जीवांबद्दल पूर्ण आदर बाळगून व्यवहारभेदाच्या तारतम्याने वागावे. विविध भक्तियोगापैकी जमेल तो भक्तियोग स्वीकारून मनुष्याने परमात्म प्राप्ती करून घ्यावी. माते! प्रकृती व पुरुष यांचे एकत्रित स्वरूप म्हणजे काल. पण गम्मत अशी आहे कीं पुरुष व प्रकृती ही दोन्ही रूपे जरी काळाची असली तरी काल हा वेगळेपणाने वावरत असतो. त्याला कोणी मित्र नाही वा कोणी शत्रू नाही. परमात्म्याचे विस्मरण होऊन भोग विलासात पशुवत रमणाऱ्या लोकांचा संहार तो अव्याहत करीत असतो. कालामुळेच चराचरात भय निर्माण होते. कलाच्याच भयामुळे समुद्र आपली मर्यादा ओलांडत नाही. याच्याच भयाने वनस्पती फळे फुले देतात. याच्याच धाकाने नद्या वाहतात. अग्नी प्रदीप्त होतो. सूर्य सतत कार्यरत राहतो. थोडक्यात म्हणजे सर्व विज्ञान याच्या आज्ञेत

असते म्हणूनच वैज्ञानिक आपले कार्य करू शकतात. कालाच्याच आज्ञेने त्रिगुणाचे नियामक विष्णू, ब्रह्मा व रुद्र प्रत्येक कल्पात उत्पत्ती, स्थिती व लय करण्यास प्रवृत्त होतात. काळरूप परमात्मा विश्वोत्पत्ती करतो पण स्वत: उत्पन्न होत नाही. संहारक शक्तीच्या योगाने मृत्यूचाही संहार करतो असा हा "काल" आहे. माते आकाशातल्या ढगांना वाहून नेण्याची शक्ती त्या ढगांना ज्ञात नसते. त्याच प्रमाणे निरनिराळया योनीत भ्रमण करणाऱ्या जीवांना काळाचे सामर्थ्य ज्ञात नसते. आणखी एक असे कीं ज्या योनीत जीव जन्माला येतो त्या योनीत तो सुख मानू लागतो. त्यापासून कधी विरक्त होत नाही. ही माझी माया आहे. किडा मुंगी वगैरेंचे जाऊ दे पण या मायेमुळे  मनुष्य स्वत:च्या देहासह कन्या, पुत्र, कलत्र, घर, पशू, पक्षी, द्रव्य इत्यादींच्या मोहात अडकून सुखोपभोगाच्या न संपणाऱ्या लालसा वाढवीत राहतो. 'मी व माझे' या धारणेतून लहान मोठी पापे करीत रहातो. पुढे वृद्धापकाळ जवळ येतो. शरीर नीट साथ देईनासे होते. पण वासना सुटत नाहीत. इंद्रियांचा जय न करता आल्यामुळे कुत्र्याप्रमाणे खायला घातले गेले तरी जीवनासक्ती सुटत नाही. पण काल काही थांबत नाही. मृत्यू समयी त्याला नेण्यासाठी आलेल्या भयानक यमदूतांना पाहून तो प्रचंड भेदरतो. त्यामुळे मलमूत्रोत्सर्ग होऊन त्याचे प्राण खेचले जातात. मग त्याचे प्राण एका निराळया शरीरात यातना भोगण्यासाठी घातले जातात. ज्या प्रकारची पापे केलेली असतील त्या प्रकारच्या विविध यातना दिल्या जातात. इथे मृत्यू नसल्यामुळे यातना भोगाव्याच लागतात. सर्व यातना भोगून झाल्यावर जीव शुद्ध होतो. मग परत पुढचा जन्म मिळतो.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-स्कंध तिसरा

## पुष्प ३८ वे (अध्याय ३२)

## मनुष्य जन्म-त्याची गती व भक्तीयोगाचे श्रेष्ठत्व

कपिल मुनी पुढे सांगू लागले, "माते! मनुष्य जन्म मिळण्यासाठी भगवंताच्या प्रेरणेने आपल्या पूर्व कर्मानुसार पुरुषाच्या वीर्यातून जीवबीजाचा स्त्रीच्या गर्भात प्रवेश होतो. मग दहा दिवसात बोर एवढा, महिन्याभरात डोके, दोन महिन्यात हात पाय इत्यादी अवयव, तिसऱ्या महिन्यात हाडे, त्वचा, रोम, व नखे तयार होतात. चवथ्या महिन्यात सप्तधातूंचेआवरण तयार होते. पाचव्या महिन्यात भूक व तहान यांची जाणीव होऊ लागते व मातेने खाल्लेल्या अन्नावर जीव जगतो. सहाव्या महिन्यात स्मरण शक्ती, सातव्या महिन्यात देह व आत्मा यांचे ज्ञान प्राप्त होते. त्यामुळे यातून सोडवण्यासाठी जीव कळवळून परमेश्वराची प्रार्थना करतो. मग दहाव्या महिन्यात अधोमुख अवस्थेत प्रसुतीवायू त्याला बाहेर ढकलतो. व मातेच्या योनी मार्गातून बाहेर येताच त्याचे ज्ञान नष्ट होते. संसारात येऊन पडल्यामुळे त्याला रडू येते. सुरुवातीस त्याला या कुशीवरून त्या कुशीवरही होता येत नाही. त्याच्या मनातला अभिप्राय आई वडिलांना कळू शकत नाही. हळू हळू परिस्थिती बदलत जाते. त्याला आपले परावे समजू लागते. देहाभिमान जागा होतो. अविद्येने ग्रासला जातो. भौतिक सुखाच्या मागे लागतो. बाल्यावस्थेत क्रीडन, तारुण्यावस्थेत तरुणींचे आकर्षण. मग विषय भोग आणि स्त्रीच्या हातातले बाहुले बनतो. मग अधोगतीला सुरुवात होते. पण यात फारसे आश्चर्य वाटायला नको. कारण ब्रह्मदेव सुद्धा आपली कन्या सरस्वतीचे लावण्य पाहून तिच्यावर मोहित झाला होता. हे माते! माझ्या स्त्री रूप मायेचे सामर्थ्यच असे आहे कीं ते भल्या भल्या दिग्विजयी वीरांनाही पायदळी तुडविते. त्यामुळे स्त्री व पुरुष परस्परांच्या वासनेमुळे एकमेकात पुरेपूर अडकून जातात. म्हणून आत्मानात्म विवेकाची जाणीव अत्यावश्यक असते. त्यासाठी स्वबुद्धीने भगवंताला शरण जाऊन शरीराचे सर्व व्यवहार नि:संग भावाने करावेत. माते! कर्म कर्तव्याचे पालन करताना अहेतुक भगवद्भक्ती करणे याचे नाव भागवतधर्म आहे. सकाम कर्माने भगवद्भक्ती करणारा चंद्रलोकी जातो. व पुण्यक्षयानंतर परत मृत्युलोकी येतो. भेदबुद्धीने भक्ती केल्यास पुन्हा जन्म घ्यावाच लागतो. निष्काम धर्माचरण करणाऱ्या मरीची प्रभृती ऋषी ब्रह्मदेवासह आदिपुरुषाला काही काल प्राप्त होतात. पण सत्वादी गुणांचे पुन्हा परस्पर मिश्रण होऊ लागले की त्यांना पुन्हा जन्म घ्यावा लागतो. निष्काम पण भेदबुद्धीने केलेल्या भक्तीने ही अशी

अवस्था होते. म्हणून माते! अत्यंत भक्तीभावाने व निष्काम बुद्धीने हृदयातच असणाऱ्या वासुदेवाला शरण जा. चित्तातल्या भगवान वासुदेवाच्या ठिकाणी प्रेमयुक्त भक्ती ठेवल्याने हळूहळू वैराग्य प्राप्त होते. मग ब्रह्मसाक्षात्कार करून देणारे ज्ञान प्राप्त होते. माते! ब्रह्म हे अखंड आहे. ते एकही नाही किंवा अनेकही नाही. तथापि दृश्य, दर्शन व द्रष्टा ह्या त्रिपुटीमुळे त्रिगुण होते. माते! संसाराच्या आसक्तीचा समूळ नाश हेच योग्याच्या योग साधनेचे फळ आहे. त्यासाठी श्रद्धा, भक्ती आणि वैराग्य यांच्या सह चित्त निरंतर भगवंतात ठेवावे. माते! माझा हा उपदेश विषयाधीन, गृहासक्त, दांभिक, दुराचारी इत्यादींना चुकुनही सांगू नये. पण ज्याला माझ्या प्राप्तीची इच्छा आहे, ज्याचे चित्त भगवंती जडलेले आहे अशा जीवाने श्रद्धापूर्वक एकवेळ जरी श्रवण केले तरी तो माझ्या परमपदाला प्राप्त होईल.

हरये नमः। हरये नमः। हरये नमः।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-स्कंध तिसरा

## पुष्प ३९ वे (अध्याय ३३)

## देवहुतिला मोक्षपदाची प्राप्ती

मैत्रेय मुनी विदुरांना म्हणाले, " विदुरा! कपिल मुनींचा हा उपदेश ऐकून देवहुतीच्या मनात स्थिरता उत्पन्न झाली. तिच्या मनावरचे मोह पटल दूर झाले. तिने आपला पुत्र ही भावना न ठेवता साक्षात परब्रह्म म्हणून त्यांची स्तुती केली. ती म्हणाली, " प्रभो! ब्रह्मदेवालाही जप-तप करून ज्या अव्यय बीजाचे दर्शन होत नव्हते त्या अव्यय बीजाला मी स्वत:च्या गर्भात धारण करू शकले हा एक मोठा चमत्कार मला अनुभवण्यास मिळाला आहे. आपण साक्षात निर्गुण असूनही सगुणात साकार झालेले परब्रह्म आहात. आपण मला आपली माता बनवून आपणच सर्व विश्वाचा सांभाळ करीत असल्याचे प्रत्ययास आणून दिले आहे. आता आपण सांगितलेल्या भक्तियोगाने मी माझा स्वत:चा उद्धार करून घेईन. माझे आपणास अनेक प्रणाम आहेत." आपल्या मातेने अत्यंत मन:पूर्वक केलेली ही स्तुति ऐकून भक्तवत्सल, मातृवत्सल परम पुरुष भगवान कपिल तिला म्हणाले, "माते! मी तुला जो सुलभ भक्तिमार्ग सांगितला आहे त्याच्या आचरणाने तूं लवकरच परमपदाला जाशील. माते! आता मला इथून जाण्याची अनुमती दे!" देवहुतिने कपिल मुनींना अत्यंत आदराने व साश्रूनयनांनी निरोप दिला. कपिल मुनी निघून गेल्यावर देवहुतिने प्रथम आपल्या मनाला स्थिर केले. आपल्या मनाला स्थिर करण्यास तिला खूपच प्रयास करावे लागले. पण तिने ते निग्रहाने केले. मग आपल्या वैभवशाली आश्रमात अनुष्ठानाला सुरुवात केली. आश्रमातल्या दुधाच्या फेसा प्रमाणे शुभ्र व मोरपिसा सारख्या मुलायम शय्यांचा त्याग केला. उच्च प्रकारच्या पाचू लावलेल्या व रत्न जडित भिंती असलेल्या विविध दालनांचे दरवाजे तिने आपल्या मनासाठी बंद करून पूर्ण उदासीनता पत्करली. इंद्रपत्नीही ज्या उद्यानात क्रीडा करण्यास उत्सुक असे त्या आपल्याच आश्रमा भोवतीच्या उद्याना वरची ममता तिने सोडून दिली. त्यामुळे ते उद्यानही खट्टू झाले. फळा-फुलांनी लगडलेले वृक्षही उदास झाले. पुत्र वियोगाने उदास झालेली देवहुति आपल्या मनाला आवर घालून परमात्म स्वरूपी पुत्राच्या चिंतनात मनाला प्रफुल्लीत करून ध्यानमग्न होऊ लागली. हळूहळू तिने आश्रमातल्या संपूर्ण वैभावातून आपले मन काढून घेतले. सर्व वेळ ती ध्यान धारणेत घालवू लागली. बिंदू सरोवरात त्रिकाळ स्नान करून पवित्र होऊ लागली. हळूहळू तिच्या कांतीवर तपाचे तेज फाकू लागले. ती महान तपस्विनी दिसू लागली. हळूहळू कृश

होऊ लागली. पण कांती मात्र अधिकाधिक तेजस्वी दिसू लागली. देवांनीही इच्छा करावी अशा अनुपम्य सुखोपभोगाचा तिने शरीराने तर त्याग केलाच होता पण निर्विकार मनाने पराकोटीचा त्याग केल्यामुळे तिची बुद्धी परमात्म्यात स्थिर झाली. त्यामुळे तिचा जीवभावच नष्ट झाला. ती निरंतर समाधी अवस्थेतच राहू लागली. देहासक्तिच नष्ट झाल्यामुळे तिचे तेज अधिकच प्रभावी झाले. आश्रमातल्या दासी तिची सगळीच देखभाल करू लागल्या. पण देहासक्ती पूर्ण नष्ट झाल्यामुळे देवहुति आता देहाने जरी आश्रमात दिसत होती तरी ती आता स्वत:च्या इच्छेने देह त्याग करू शकत होती. तिने एका शुभ मुहूर्तावर आपला पार्थिवदेह जलात रुपांतरीत केला व ती प्रवाही झाली. विदुरा! देवहुतिने योगसिद्धी प्राप्त करून घेतली ते पुण्यक्षेत्र "सिद्धपद"या नावाने त्रैलोक्यात प्रसिध्द आहे. विदुरा! हे आख्यान मन:पूर्वक श्रवण, मनन करतो तो परमपदाला प्राप्त होतो.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

इथे श्रीमद्भागवतातला तिसरा स्कंध पूर्ण झाला. या स्कंधात एकूण ३३ अध्याय व १३७७ श्लोक आहेत. त्या सर्वांचा पुष्प २१ ते पुष्प ३९ हा साररूप अनुवाद आहे

# स्कंध चवथा

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-स्कंध चवथा

## पुष्प ४० वे (अध्याय १)

## स्वायंभुव मनूच्या कन्यांचा वंश

मैत्रेय मुनी विदुरांना सांगू लागले, " विदुरा! स्वायंभुव मनूला शतरूपापासून प्रियव्रत व उत्तानपाद ही दोन मुले व देवहुति, आकुती व प्रसूती अशा तीन मुली झाल्या. त्यातील देवहुतिची कथा मी तुला सांगितलीच आहे. आता आकुतीची कथा थोडक्यात ऐक. मनूला मुलांची आवड होती म्हणून त्याने 'मुलीला होणारा पुत्र आपणास द्यावा' ह्या पुत्रिकाधर्मानुसार आकुतिचा विवाह तपस्वी व ऐश्वर्यवान 'रुची'नामक ऋषींच्या बरोबर लावून दिला. रुचींनी तपाचरणाने श्रीहरीच्या ध्यानात पुत्र उत्पन्न करण्याचा संकल्प केला. त्या प्रभावाने त्याना एक युग्म झाले. युग्मा पैकी पुत्र साक्षात श्रीहरीचा अवतार होता व कन्या लक्ष्मी होती. रुचींनी पुत्राचे नाव 'यज्ञ' व कन्येचे नाव 'दक्षिणा' असे ठेवले. ठरावा प्रमाणे पुत्र मनूला दिला. यज्ञपती जसा मोठा होऊ लागला तसा त्याचा प्रभाव वाढू लागला. दक्षिणा उपवर झाल्यावर तिने यज्ञपतींना वरले. भगवान यज्ञपती स्वायंभूव मन्वंतरातले इंद्र झाले व त्यांचे बारा पुत्र देव झाले. मनूने आपली तिसरी कन्या प्रसूती प्रजापती दक्षांना दिली. दक्ष व प्रसूती यांचीच प्रजा सर्व त्रैलोक्यात पसरली आहे. विदुरा! आता देवहुतिच्या कन्यांची संतती थोडक्यात ऐक. ती फार पुण्यकारक आहे. कला-मरिची यांना पुत्र कश्यप व कन्या पूर्णिमा अशी दोन अपत्ये. अनसूया-अत्री यांना अत्रींच्या तपामुळे ब्रह्मा, विष्णु व महेश हे चंद्र, दत्त व दुर्वास म्हणून जन्माला आले. हे ऐकून विदुर म्हणाले, " गुरुवर्य! उत्पत्ती, स्थिती व लय करणाऱ्या या श्रेष्ठ देवांनी कोणत्या कारणाने अत्री मुनींच्या घरी जन्म घेतला?" मैत्रेय म्हणाले, " विदुरा! प्रजोत्पादनाची पितृआज्ञा शिरोधार्य मानून अत्री कुलपर्वतावर अनसुयेसह तप करण्यास निघून गेले. त्यांच्या तपाचा संकल्प असा होता कीं, " जो कोणी या जगाचा नियंता आहे त्याला मी शरण आलो आहे. त्याने मला त्याच्यासारखेच संतान द्यावे." आणि या संकल्पाने त्यांनी इतके तीव्र तप केले कीं प्राणायामाच्या अभ्यासाने त्यांनी स्वत:च्या प्राणांचा निरोध केला. त्यामुळे त्यांच्या तपाचे तेज ब्रह्मरंध्रातून बाहेर पडून त्रैलोक्य तप्त करू लागले. त्यामुळे ब्रह्मा, विष्णू व महेश एकाच वेळी त्यांच्या समोर प्रगट झाले. त्या तिघांना साष्टांग दंडवत घालून व त्यांचे पूजन करून अत्रीमुनींनी विचारले, "मी एका जगन्नियन्त्याचे स्मरण केले आहे. त्यामुळे मी संकल्प केलेला जगन्नियंता आपल्या तिघांपैकी कोण? माझ्या मनाची गती खुंटून जाते म्हणून

आपणच यातील रहस्य सांगावे. "तेंव्हा देव म्हणाले, “ब्रह्मन्! आपला उत्पत्ती, स्थिती व लय यांच्या म्हणजे जगन्नियंत्याच्या संकल्पाचा असल्यामुळे आम्ही अविभक्त असूनही विभक्त होऊन आपल्या समोर प्रकट झालो आहोत. त्यामुळे आपल्याला जगन्नियंत्याच्या संकल्पा प्रमाणे तीन पुत्र होतील." असा वर देऊन ते आपल्या लोकी निघून गेले. ही गोष्ट सांगून मैत्रेय मुनी पुढे म्हणाले , " विदुरा! अंगिरा- श्रद्धा यांना सिनीवाली, कुहू, राका व अनुमती या कन्या व उतथ्य व बृहस्पती हे पुत्र झाले. पुलस्त्य-हविर्भू ह्यांना अगस्ती व विश्रवा हे दोन पुत्र झाले. पुलह-गती यांना कर्मश्रेष्ठ, वरीयान व सहिष्णू हे तीन पुत्र झाले. क्रतु-क्रिया ह्यांना साठ हजार वालखिल्य ऋषी झाले.

वसिष्ठ-अरुंधती याना सात पुत्र व वसिष्ठांना दुसऱ्या पत्नीपासून शक्ती वगैरे अनेक पुत्र झाले. अथर्व-चित्ती यांना तपोनिष्ठ दधिची नामक पुत्र झाला. भृगु-ख्याती यांना धाता व विधाता असे दोन पुत्र व 'श्री' नामक कन्या झाली. विदुरा! आता मनुकन्य प्रसूतीची संतती ऐक. दक्ष-प्रसूती याना सोळा कन्या झाल्या. त्यातल्या तेरा कन्या दक्षाने धर्माला अर्पण केल्या. त्यातल्या मूर्ती नामक कन्येला धर्मापासून 'नर-नारायण' हे जुळे झाले. "नर-नारायण" हे साक्षात भगवंताचे अवतार आहेत. हेच "नर-नारायण" अर्जुन-श्रीकृष्ण यांच्या रूपाने भूमीभार हलका करण्यासाठी अवतीर्ण झाले. दक्षाची चवदावी कन्या स्वाहा ही अग्नीला दिली. तिच्यापासून एकूण एकोणपन्नास अग्नी उत्पन्न झाले. पंधरावी कन्या स्वधा, “अग्निष्वात्त, बर्हिषद, सोमप व आज्यप” ह्या पितरांना दिली. स्वधाला धारिणी व वयुना अशा दोन कन्या झाल्या. सोळावी दक्ष कन्या सती. ती ब्रह्मदेवांच्या आग्रहामुळे दक्षाने अनिच्छेने भगवान शिवांना दिली. पण आपल्या पित्याने आकारण शिवाचा द्वेष केल्याने तिने ने योगसामर्थ्यादेहत्याग केला. त्यामुळे तिला संतती झाली नाही.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-स्कंध चवथा

## पुष्प ४१ वे (अध्याय २ व ३)

## प्रजापती दक्षाचा शिवद्वेष

प्रजापती दक्षाने शिवद्वेष केल्याचे ऐकून विदुर आश्चर्यचकित होऊन म्हणाले, "भगवान शिव तर चराचराचे गुरु व निर्वैर असताना हे कसे घडले? "

मैत्रेय सांगू लागले, " विदुरा! त्याचे असे झाले कीं एकदा प्रजापती दक्षाने आयोजित केलेल्या सत्राच्या वेळी सर्व मोठ मोठे ऋषी, मुनी, देव, ब्रह्मदेव, महादेव असे सर्व आपापल्या स्थानी बसलेले असताना महातेजस्वी दक्षाचे त्या सभेत आगमन झाले. तेंव्हा ब्रह्मदेव व महादेव यांच्या व्यतिरिक्त सर्वांनी उठून उभे राहून दक्षाचे स्वागत केले. पण महादेव डोळे मिटून ब्रह्मानंदात शांत बसले होते. ते पाहून दक्ष संतापला. व सभेला उद्देशून बोलू लागला, 'देव आणि अग्निसह सर्व ऋषी मुनींनो मी अज्ञानाने वा द्वेषाने बोलत नसून सर्वसामान्य शिष्टाचार काय असतात ते सांगतो. या भणंगाला माझी सुंदर कन्या ब्रह्मदेवांच्या सांगण्या वरून का होईना पण अनिच्छेने अर्पण केली आहे. त्यामुळे पुत्रासमान असलेल्या या घमेंडखोराने उठून उभे राहून प्रणाम करायला हवा होता. पण याने साध्या वाणीनेही माझे स्वागत केले नाही. लोकपालांच्या कीर्तीला हा निर्लज्ज महादेव मलीन करीत आहे.' दक्ष इतके बोलून थांबला. त्याने शिवाची प्रतिक्रिया अजमावली.

पण शिव काहीच प्रतिकार न करता ब्रह्मानंदात शांत बसून होते. त्यामुळे दक्ष अधिकच संतापला व मुख्य देव मना करीत असतानाही शिवांना 'ह्या अमंगल शिवाला यज्ञातला हविर्भाग न मिळो' असा शाप उच्चारला. आणि तावातावाने सभात्याग करून निघून गेला.

आपल्या स्वामींचा अपमान सहन न होऊन नंदीने दक्षाला व त्याला अनुमोदन देणाऱ्या सर्वांना शाप दिला कीं, ' स्वत:च्या शरीराचा अभिमान बाळगून शिवद्वेष करणारा भेदबुद्धीचा दक्ष तत्त्वज्ञानाला विन्मुख होईल व निव्वळ पशुवत वर्तन केल्याने त्याचे तोंड लवकरच बोकडाचे होईल. त्याला अनुमोदन

देणारे सर्व कर्मकचाट्यात सापडून जन्ममृत्यूच्या फेऱ्यात अडकतील. ते स्वदेह व कुटुंब पोषणार्थ वेदाध्ययन व काम्यव्रतेच करीत पृथ्वीवर भटकत राहतील.'

नंदिकेश्वराचा हा शाप ऐकून भृगुंनी शाप दिला कीं 'सगळे शिव-व्रती पाखंडी होतील.' नंदिकेश्वराचे व भृगुंसारख्या ज्ञानी ऋषींचे हे वक्तव्य ऐकून भगवान शिव आपल्या गणासह आपल्या स्थानी निघून गेले. मग दक्षाने यज्ञ पूर्ण केला.

हा वैर प्रसंग उलटून बराच कालावधी गेला. विश्वस्थापनेत ब्रह्मदेवांनी दक्षाला सर्व प्रजापतींचा अधिपती नेमला. त्या नियुक्तीने दक्ष गर्वाने फुलून गेला. कालांतराने दक्षाने परत यज्ञ आरंभला. पण त्या यज्ञाला त्याने शिवांना बोलावले नाही. त्यानंतर बऱ्याच दिवसांनी त्याने बृहस्पतीसव नामक खूप दिवस चालणारा महायज्ञ आरंभला. त्या यज्ञाला सुद्धा त्याने शिवांना बोलावले नाही. वा यज्ञभागही दिला नाही. त्या यज्ञासाठी इतर देव व देवता नित्य जाऊ लागल्या. त्यांच्या कडून आपला पिता दक्ष याने महायज्ञ चालू केल्याचे सतीला कळले. त्यामुळे शिवपत्नी सती शिवांना म्हणाली, "प्रभो! आपले श्वशुर प्रजापतींचे अधिपती दक्ष यांनी मोठा यज्ञ आरंभला आहे. मला माझ्या इतर बहिणीना व माता-पित्याला भेटण्याची इच्छा आहे. हे अजन्मा प्रभो! पती, पिता व गुरु यांच्या घरी न बोलावताही जाता येते नां?"

सतीच्या या चतुर बोलण्याचा रोख ध्यानी घेऊन भगवान शिव म्हणाले, " हे देवी! तूं म्हणतेस ते खरे आहे. पण केंव्हा तर जेंव्हा मिळालेल्या उच्च पदाने तो जीव मद, क्रोध, अहंकार, बल, इत्यादींमुळे द्वेषयुक्त झाला नसेल तेंव्हाच. विद्या, तप, बल, धन, तारुण्य व उच्चकुल ह्या सहा गोष्टी सत्पुरुषांचे सद्गुण ठरतात. पण त्याच सहा गोष्टी असत्प्रवृत्त वृत्तीच्या लोकांच्या ठायी असतील तर त्या दुर्गुण ठरतात. अशा लोकांना सत्पुरुषांचे तेज समजून येत नाही. तूं तुझ्या पित्याची अत्यंत लाडकी आहेस. पण आता माझी पत्नी झाल्यामुळे तो तुला ओळखही देणार नाही. हे सती! जीवाच्या चित्तवृत्तीचे साक्षी असणाऱ्या पुरुषांच्या अहंकारशून्य पारमार्थिक समृद्धीला पाहून त्यांच्या हृदयात संताप व इंद्रियांना व्यथा निर्माण होतात. त्यामुळे तो तुझा पिता जरी असला तरी त्याच्या मनात माझ्या विषयी सद्भाव नसल्यामुळे तूं तिथे जाण्याचा विचारही मनात आणू नकोस. आणि जर माझे न ऐकता गेलीस तर तुझ्या पित्याने तुझी व माझी केलेली अवहेलना तुला मरणप्राय असह्य होईल." इतके बोलून शिव ध्यानमग्न झाले.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

श्रीमद्भागवत-स्कंध चवथा

पुष्प ४२ वे (अध्याय ४)

## सतीचा देहोत्सर्ग

भगवान शिव मनोमन समजले कीं आता उत्पात हा होणारच. सती द्विधा मनस्थितीत गेली. पती अवज्ञा करण्याचे तिच्या मनात नव्हते. पण माता-पित्याच्या स्मरणामुळे अस्वस्थ झालेली सती विचार करून एकटीच जायला निघाली. ते पाहून आपल्या स्वामींचे मनोगत जाणणारे मणिमान, मद, यक्ष इत्यादी शिवगण नंदिकेश्वरला पुढे करून सतीच्या मागे धावले. त्यांनी सतीला नंदीवर बसविले. तिच्यावर छत्र धरले व गौरवाने विंझणवारा घालीत तिला यज्ञस्थानी घेऊन आले.

यज्ञमंडपात तिने प्रवेश केला. पण दक्षाने तिची तुच्छता दर्शक अनादराने पूर्ण उपेक्षा केली. सतीचा विरस झाला. दक्षाने दाखवलेल्या अनास्थेमुळे दक्षाची अवकृपा टाळण्यासाठी इतर कोणीच तिचे स्वागत केले नाही. पित्याने केलेल्या अनादराने सती फारच अस्वस्थ झाली. त्यामुळे तिने आई व बहिणी यांचा सत्कार स्वीकारला नाही.

इतक्यात आपला पिता आपल्या पतीची इतरांजवळ करीत असलेली निंदा तिच्या कानावर गेली. आणि मग मात्र ती संतापली. आपला पिता केवळ द्वेषबुद्धीने भगवान शिवांचा अपमान करीत असल्याचे तिने जाणले. ती संतापाने पित्यावर कडाडली, "या जगात भगवान शिवांपेक्षा कोणीही श्रेष्ठ नाही. त्यांना कोणी प्रिय वा अप्रिय नाही. ते सर्वरूप आहेत. त्याना विरोध करणारा आपल्या शिवाय जगात दुसरा कोणीही नाही. सत्पुरुषांनी ब्रह्मानंदासाठी ज्यांच्या चरणकमलांचा आश्रय घेतला आहे त्या भगवान शिवांचा आपण अकारण द्वेष करीत आहात. अकारण त्यांचाशी वैरभाव ठेवत आहात. त्यांची मंगलता सहन न होऊन त्याना अमंगल म्हणून संबोधता आहात. पण हे दक्षा! त्यांच्याच चरणावरचे निर्माल्य ब्रह्मदेव स्वमस्तकी धारण करीत असतात हे लक्षात घे! धर्म मर्यादांचे रक्षण करणाऱ्या आपल्या पूजनीय स्वामींची निंदा करणाऱ्या बेतालाची जीभ छाटून टाकावी किंवा ते शक्य नसेल तर आपले प्राण विसर्जन करावेत. हाच धर्म आहे. दक्षा! मी तुझा हा अधर्म सहन करू शकत नाही. चुकून अयोग्य वस्तूचे सेवन झाले तर ती ओकून टाकावी. तद्वत चुकून आपल्या पोटी जन्म झालेले हे शरीर मी टाकून देते. माझे पती परब्रह्मस्वरूप असल्यामुळे त्यांचे ऐश्वर्य अव्यक्त आहे. ते नित्य तृप्त आहेत. हे दक्षा! आपल्या जवळ ते नसल्यामुळे

यज्ञभागाने आपणास तृप्ती मिळवावी लागते. आता मी जर परत भगवान शिवांच्या सान्निध्यात गेले आणि थट्टेत जरी त्यांनी मला "दाक्षायणी" म्हणून संबोधले तर मला अत्यंत लज्जास्पद वाटेल. तसा प्रसंगच येऊ नये म्हणून मी आपल्यापासून झालेले शरीर विसर्जन करते."

सतीने वारंवार दक्षाला त्याच्यापासून उत्पन्न झालेल्या शरीराची जाणीव देऊनही अहंकारी दक्षाने तिकडे पूर्ण दुर्लक्ष केले. त्यामुळे अधिकच संतप्त होऊन सतीने यज्ञवेदी समोर बसून पतीस्मरण करून योगमार्गाने आपले शरीर भस्म करून टाकले. तिथे असलेल्या लोकात, ब्रह्मलोकात, देवलोकात असा चहूकडे हाहाकार माजला. सद्वर्तनी सज्जनांना दक्षाचे ते दुष्कर्म आवडले नाही. ते आपसात तसे बोलू लागले तेंव्हा आपला त्याचाशी काही संबंध नसल्यासारखे भृगु यज्ञवेदी जवळ शांत बसले होते. तेंव्हा संतापलेल्या शिवगणांनी दक्षाकडे आपला मोर्चा वळवला. ते पाहून भृगुंनी दक्ष संरक्षणार्थ मंत्रयुक्त आहुती देऊन ऋभूनामक हजारो देव निर्माण केले. त्यावेळी त्या ब्रह्मतेज संपन्न ऋभूंच्या पुढे शिवगणाचे सामर्थ्य चालले नाही म्हणून ते कैलासाकडे पळत सुटले.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-स्कंध चवथा

## पुष्प ४३ वे (अध्याय ५ पूर्ण व ६चालू)

## दक्ष यज्ञाचा विध्वंस

सतीच्या देह त्यागाची घटना नारदांनी भगवान शिवांना कैलासात जाऊन सांगितली. त्यामुळे भगवान शिव क्रुध्द झाले. त्यांनी आपल्या मस्तकावरच्या जटेतून फक्त एक जटा उपटून अट्टहास्याच्या गडगडाटात जमिनीवर आपटली. तत्क्षणी त्यातून एक प्रचंड मोठा व अवाढव्य पुरुष उत्पन्न झाला. त्याच्या मस्तकावरचे केस म्हणजे अग्निज्वाला वाटत होत्या. मस्तक स्वर्गाला जाउन भिडले होते. त्याला तीन तेजस्वी नेत्र होते. ते सूर्यासारखी आग ओकत होते. त्याच्या डोळयांकडे पाहणे अशक्य होत होते. त्याच्या दाढा अक्राळविक्राळ होत्या. शरीरयष्टी पोलादी व अभेद्य होती. त्याचे एकूण रूप फार भयानक होते.

भगवान शिवांना त्याने प्रणाम करून विचारले, " प्रभो! मी आपले काय प्रिय करू?" भगवान शिव म्हणाले, " हे वीरभद्रा! जा! माझ्या सर्व गणांचा सेनापती बनून जा! आणि दक्ष यज्ञाचा विध्वंस करून दक्षाला ठार मारून परत ये! तूं माझाच अंश आहेस! तुझे कल्याण असो!" ही शिवाज्ञा ऐकता क्षणीच वीरभद्र शिवांना प्रदक्षिणा करून दक्ष यज्ञाच्या दिशेने झेपावला. त्याच्या संरक्षणाखाली असंख्य शिवगण निघाले. त्यांच्या कलकलाटाने व धावण्याने सर्वत्र धूळ उडाली दशदिशा धुसर झाल्या. यज्ञमंडप धुळीने भरून गेला यज्ञशाळेतील सर्व ऋत्विज व ऋषी चक्रावले. यज्ञभूमी विरभद्राच्या पावलांनी हादरू लागली.

इतक्यात भेसूर दिसणाऱ्या शिवगणांनी यज्ञ परिसराचा विध्वंस करण्यास सुरुवात केली. अग्निशाला, यजमान गृहे, पाकशाला, सगळे सगळे उध्वस्त करण्यास सुरुवात केली. भृगु हातात स्त्रुवा घेऊन हवन करीत असतानाच वीरभद्राने त्यांना पकडून त्यांच्या दाढी-मिशा उपटल्या. कारण शिवाचा अपमान होत असताना ते दाढी-मिशा कुरवाळत होते. मग त्यांना माणिमानाच्या ताब्यात दिले. माणिमानाने भृगुंना एका खांबाला बांधून टाकले.

मग संतापलेल्या वीरभद्राने पुषांना पकडले व त्यांचे दात उपटले. कारण ते त्यावेळी दात काढून हसत होते. वीरभद्राने भगांचे डोळे उपटले. कारण ते डोळे मिचकाऊन दक्षाला प्रोत्साहन देत होते. मग वीरभद्राने आपला मोर्चा दक्षाकडे वळवला. बाकीचे ऋत्विज, देव, ऋषी व ब्राम्हण पळून गेले. संतापलेला

वीरभद्र दक्षाच्या छातीवर बसून त्याला बुकलू लागला. पण दक्षावर त्याचा काहीच परिणाम दिसेना. कोणत्याच शस्त्रानेही त्याला मृत्यू येईना. तेंव्हा वीरभद्राला फार आश्चर्य वाटले. पण त्याने हार मानली नाही. स्वामी कार्य पूर्ण करण्याच्या उद्देशाने त्याने थोडा विचार केला आणि एकाकी यज्ञीय पशूला मारण्याच्या दिव्य पद्धतीचे त्याला स्मरण झाले. त्याने दक्षालाच यज्ञीयपशूच्या वेदीवर ठेवले आणि त्याच पद्धतीने दक्षाचे मस्तक धडावेगळे करून त्या मस्तकाची आहुती दिली. मग स्वामीकार्य पूर्ण झाल्याच्या समाधानात तो सर्व शिवगणासह कैलासाकडे परत आला.

दक्षवध झाल्यावर यज्ञस्थानी सर्वत्र अवकळा पसरली. प्रतिकाराची शर्थ करणाऱ्या देवांना शिवगणाकडून छिन्नभिन्न व्हावे लागले. ते तशाच अवस्थेत यज्ञ पूर्तीचा मार्ग विचारण्यास ब्रह्मदेवांकडे आले. ब्रह्मदेवांना वंदन करून जसाच्या तसा वृत्तांत सांगितला व ब्रह्मदेव काय सांगतात ते ऐकण्यासाठी हात जोडून उभे राहिले. दक्षाने शिवशंकरांचा यज्ञभाग बंद करण्याचे अयोग्य कृत्य केल्यापासून ब्रह्मदेव तिकडे फिरकत नव्हते. ते हा उत्पात होणार हे जाणून होते.

पण आता हे सर्वजण मार्गदर्शनासाठी आलेले आहेत तर योग्य मार्गदर्शन करणे हे आपले कर्तव्य आहे. या जाणीवेतून ते म्हणाले, " भगवान शिवांना यज्ञभाग न देण्याचा घोर अपराध तुम्ही सर्वांनीच केलेला आहे. त्यांनी ते मनावरही घेतले नाही. कारण ते नित्यतृप्त आहेत. पण दक्षाच्या दुर्वचनामुळे ते आधीच दुखावले गेले होते. त्यात सतीच्या वियोगाची भर पडली. त्यातून सतीच्या बाबतीत दक्षाकडून जे घडले ते प्रजापतीच्या पदाला न शोभणारे आहे. भगवान शिवांना दुखावून तुम्ही सर्वांनीच त्यांचा घोर अपराध केलेला आहे. भगवान शिवांना दुखावून एकही प्रजापती व त्याची प्रजा सुखाने जगू शकणार नाही. हे मी जाणतो! कारण भगवान रुद्र हे पूर्ण स्वतंत्र आहेत. त्यांचे तत्व, शक्ती, पराक्रम, यांचे प्रमाण मीच काय पण कोणीच जाणू शकत नाही. त्यांना कोणाचा द्वेष नाही व कोणी प्रिय नाही. ते नेहमीच शांत असतात. तुम्ही जर शुद्ध अंत:करणाने त्यांना शरण जाल व त्यांचे पाय धरून त्यांची क्षमा याचना कराल तर ते लगेच प्रसन्नही होतील."

पण देवांना व प्रजापतींना भगवान शिवांच्या समोर एकटे जाण्याचे धैर्य होईना म्हणून ब्रह्मदेव त्यांना घेऊन कैलासाकडे निघाले.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

श्रीमद्भागवत-स्कंध चवथा

पुष्प ४४ वे (अध्याय ६ पूर्ण)

## ब्रह्मदेवांसह सर्वांचे कैलास गमन.

ब्रह्मदेवांसह सर्वजण कैलास पर्वता जवळ आले. कैलास पर्वतावरचे सौंदर्य अवर्णनीय होते. सर्व परिसर तप, मंत्र, योग यांच्या प्रभावाने अत्यंत पवित्र झालेला होता. थोड्याच वेळात ते सर्व कुबेराची रम्य राजधानी अलकानगरी ओलांडून पुढे आले तेंव्हा ते एका आल्हाददायक सुगंधाने भारावले गेले. त्या वनाचे नावच सौगंधिक वन होते. त्याच वनात एका प्रचंड मोठ्या वटवृक्षाखाली  सनकादि महासिद्ध ऋषी व इतरही अनेक ऋषी भगवान शिवशंकरांचा  आत्मबोधाचा उपदेश ऐकत बसलेले दिसले.

ब्रह्मदेवांना इतर देवांसह आलेले पाहून भगवान शिव आपल्या आसनावरून उठले. ब्रह्मदेव हसत हसत भगवान शिवशंकरांना म्हणाले, "हे भगवान शिव! विश्वयोनी प्रकृति आणि त्याचे बीज या पलीकडे असणारे परब्रह्म आपणच आहात.हे मंगलमय महेश्वरा! शुभ-कर्माचे फळ स्वर्ग वा मोक्ष आणि पाप कर्माचे फल नरक हे दोन्ही आपणच देता.  पण काही वेळा ते फळ काही व्यक्तींच्या बाबतीत उलटे होते ते कसे? प्रभो आपण सर्वज्ञ आहात. परमपुरुष भगवंताच्या मायेने आपल्या बुद्धीला स्पर्शही केलेला नाही. त्यामुळे मायेच्या प्रभावाने घडलेल्या अपराधांना आपल्या शिवाय कोण क्षमा करणार? आणि कृपा तरी कोण करणार? आपणच त्याच्यावर कृपा केली पाहिजे. आपणच सर्व यज्ञ पूर्ण करणारे आहात. यज्ञभागाचा आपला अधिकार मोठा असूनही यज्ञकर्त्यांच्या बुद्धीहीनत्वामुळे तो आपणास मिळू शकला नाही. त्यामुळे हा विध्वंस झाला आहे. पण आपण जसा विध्वंस करू शकता तसा उद्धारही करू शकता. तरी आता आपणच मारलेल्या दक्षाचा यज्ञ पूर्ण करण्यासाठी दक्ष पुन्हा जिवंत होऊ द्या! भगांना नेत्र येऊ दे, भृगुंना दाढीमिशा येऊ दे, पुशाला पूर्ववत दात येऊ दे, तसेच कशानेही घायाळ झालेले देव पुन्हा पूर्ववत होवोत.  आणि सर्वात महत्वाचे म्हणजे दक्षाने केलेल्या चुकीची दुरुस्ती म्हणून यज्ञ पूर्ण झाल्यावर जो भाग शिल्लक राहील तो सर्व आपला असेल. तरी आता हा यज्ञ आपल्याच भागाने पूर्ण होवो."

ब्रह्मदेवांनी अशी प्रार्थना केल्यावर भगवान महादेव प्रसन्न झाले व म्हणाले, "हे प्रभो! मायेने मोहित झालेल्या दक्षासारख्या अज्ञानी लोकांच्या अपराधाकडे मी लक्ष देत नाही. मी सगळयांना केवळ सावध करण्यासाठी ही शिक्षा दिली आहे. आता आपण म्हणता आहात तर दक्ष जिवंत होईल पण त्याचे मस्तक त्याच्याच कर्मामुळे यज्ञकुंडात जळून गेले असल्याने त्याला यज्ञीय पशूचे म्हणजेच बोकडाचे मस्तक लावावे लागेल. भागाने मित्रदेवतेच्या नेत्राने पाहावे, पुशाने यजमानांच्या दाताने भक्षण करावे. भृगुला बोकडाच्या दाढीमिशा लावाव्यात. इतर देवांची शरीरे मात्र पूर्ववत होतील कारण त्यांनी यज्ञातले शिल्लक पदार्थ माझा भाग म्हणून मान्य केले आहेत. अध्वर्यू इत्यादिकांच्या पैकी ज्यांचे हात तुटले असतील त्यांनी पूषाच्या हातांनी काम करावे. ज्यांचे बाहू तुटले असतील त्यांनी अश्विनीकुमारांच्या बाहूंनी काम करावे." भगवान शिवांच्या या सुचनांचे व पर्यायांचे सगळयांनीच स्वागत केले.

हरये नमः। हरये नमः। हरये नमः।

।श्रीगुरु:शरणं।।

श्रीमद्भागवत-स्कंध चवथा

पुष्प ४५ वे (अध्याय ७)

## दक्षयज्ञाची पूर्तता

भगवान शिवशंकरांच्या सर्व सूचनांचे व पर्यायांचे सर्वांनी मन:पूर्वक स्वागत केल्यावर देव, ऋत्विज व ऋषींनी भगवान शिवांना दक्षाच्या यज्ञमंडपात चलण्याची प्रार्थना केली. तेंव्हा भगवान शिव ब्रह्मदेवांसह दक्षाच्या यज्ञमंडपात आले. ब्रह्मदेवांनी भगवान शिवशंकरांच्या सूचनेप्रमाणे यज्ञपशूचे मस्तक दक्षाच्या धडाला जोडून दिले. भगवान शिवांनी आपली अमृत दृष्टी त्याच्यावरून फिरवताच दक्ष झोपेतून जागा व्हावा तसा जागा झाला. समोर भगवान शिवांना पाहून त्याचे हृदय शरदातल्या सरोवरासम निर्मल झाले. त्याला भगवान शिवाची स्तुती करण्याची तीव्र इच्छा झाली.

त्याच क्षणी त्याला आपली कन्या सतीची आठवण होऊन हृदय गलबलून गेले. कंठ दाटून आला. नेत्रातून अश्रू वाहू लागले. पण आता भगवान शिवांच्या दर्शनामुळे शुध्द झालेल्या त्याच्या अंत:करणात विवेक उत्पन्न झाला. त्याने भगवान शिवांची स्तुती करण्यास आरंभ केला. " हे भगवान! माझ्या अपराधाची शिक्षा देऊन आपण माझ्यावर अनुग्रहच केला आहे. श्रीहरी व आपण एकच आहात. केवळ आपल्या स्वरूपाला न जाणण्याच्या अज्ञानामुळे मी आपणास भरसभेत अपमानास्पद बोललो पण आपण ते मनावर घेतले नाही. हे स्वामी आता मला माझ्या सर्व चुका समजून आल्या आहेत. आपण मला उदार मनाने क्षमा करा!" अशा प्रकारे क्षमा याचना करून दक्षाने ब्रह्मदेवांच्या अनुमतीने यज्ञपूर्तीला प्रारंभ केला.

दक्ष जेंव्हा विशुध्द अंत:करणाने अध्वर्यू समवेत श्रीहरीचे ध्यान करू लागला तेंव्हा भगवान श्रीहरी अष्टभुज स्वरूपात तिथे प्रकट झाले. सर्व दिशा उजळून गेल्या. वातावरण पवित्र झाले. भगवान श्रीहरी प्रकट झालेले पाहून ब्रह्मदेव, भगवान शिव, व इतर सर्व उठून उभे राहिले. श्रीहरिला त्यांनी वंदन केले. प्रथम दक्षाने मन:पूर्वक स्तुती केली. मग इतर सर्वांनी आपआपल्या परीने स्तुती केली. त्यानंतर भगवान श्रीहरी दक्षाला म्हणाले, "हे प्रजापते! संपूर्ण विश्वाचे मी स्वत:च कारण आहे. ब्रह्मदेव व महादेव म्हणजे मीच आहे. पण मी उपाधी रहित व साक्षीभूत आहे. त्रिगुणी मायेच्या सहाय्याने मीच उत्पत्ती, स्थिती व लय करीत असतो. त्यासाठीच त्या त्या कर्मानुसार त्याला अनुरूप ब्रह्मा, विष्णू व महेश अशी रूपे मीच धारण करतो.

मी सर्वांचाच आत्मा असलो तरी केवळ साक्षित्वाने सतत सर्वत्र व्यापून असतो. तथापि माझ्या भक्तांना मी संरक्षण देतो. जे भक्त ब्रह्मा, विष्णू व महेश यांच्यात अभेद पाहतात ते परमपद प्राप्त करून घेतात."

इतके सांगून भगवान श्रीहरी अंतर्धान पावले. मग दक्ष प्रजापतीने यज्ञ पूजन करून अंगभूत व प्रधान अशा दोन्ही यज्ञांनी अन्य देवतांना त्यांचा त्यांचा हविर्भाग दिला. नंतर दक्षाने एकाग्र चित्ताने व अंत:करण पूर्वक भगवान शिवांना त्यांचा भाग अर्पण केला. त्यामुळे दक्षाला व प्रसूतीला एक वेगळेच समाधान प्राप्त झाले. मग उद्वासन कर्माने सोमपानी देवांचे यजन करून दक्षाने यज्ञाची सांगता केली. सांगता झाल्यावर दक्षाने ऋत्विजांसह अवभृथ स्नान केले. त्यानंतर दक्षाला इष्ट वर प्रदान करून सर्व देव-देवता स्वर्लोकी निघून गेल्या.

इतके सांगून झाल्यावर मैत्रेयमुनी पुढे म्हणाले, विदुरा! आम्ही असे ऐकले आहे कीं दक्षयज्ञात देहत्याग केलेल्या सतीने हिमालयाची पत्नी मैना हिच्या पोटी पुन्हा जन्म घेतला व भगवान शिवांची आराधना करून योग्य समयी त्यांच्याशीच विवाह केला. तीच उमा, अपर्णा, अंबिका, पार्वती, मृडानी इत्यादी नावांनी ओळखली जाऊ लागली. हे विदुरा! दक्षयज्ञ, दक्ष इत्यादींचा विध्वंस करणाऱ्या शिवांचे हे चरित्र मी बृहस्पतीचे शिष्य परम भागवत उद्धव यांच्या कडून जसे ऐकले तसे निवेदन केले आहे. हे निष्पाप विदुरा! भगवान शिवांचे हे चरित्र श्रवण, पठण व मनन करणाऱ्याची सर्व पापे नष्ट होतात.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-स्कंध चवथा

## पुष्प ४६ वे (अध्याय ८ चालू)

## ध्रुवाचे वन गमन

हे बुद्धिमान विदुरा! सनक, सनत, सनंदन, सनातन हे कुमार, नारद, ऋभू, हंस, आरुणी ह्या ब्रह्मदेवांच्या पुत्रांनी ब्रह्मचर्याश्रमात प्रवेश केल्यामुळे त्यांचे वंश नाहीत. अधर्म हा ही ब्रह्मदेवाचा पुत्र आहे. अधर्म हाच प्रलयाला कारणीभूत असतो. त्याचा वंश ऐक. अधर्माच्या पत्नीचे नाव मृषा! मृषा म्हणजे असत्य. मृषेला दोन अपत्ये झाली एक दंभ व दुसरी माया. दंभाला मायेपासून लोभ व निकृती (निकृती म्हणजे लांडी-लबाडी) अशी दोन अपत्ये झाली. लोभ व निकृतीला कली (म्हणजे कलह) व दुरुक्ती (म्हणजे अपशब्द) ही दोन अपत्ये झाली. कली व दुरुक्तीला भय व मृत्यू ही दोन अपत्ये झाली. भय व मृत्यू यांना निरय (नरक) व यातना ही दोन अपत्ये झाली. या वंशाचे तीन वेळा श्रवण केल्याने मनुष्य अधर्माचा त्याग करून पुण्य संपादन करतो. त्याचा मनोमळ दूर होतो.

विदुरा! आता ब्रह्मदेवाचा पुत्र स्वायंभुवमनू याच्या वंशाचे वर्णन ऐक. मनुला प्रियव्रत व उत्तानपाद अशी दोन अपत्ये होती. त्यातल्या उत्तानपादाला सुरुची व सुनीती अशा दोन भार्या होत्या. उत्तानपाद सुरुचीवर अधिक मोहित झाला होता. त्यामुळे तो तिच्या आधीन झाला होता. सुरुचीला उत्तम व सुनितीला ध्रुव अशी मुले होती. उत्तम एकदा आपल्या पित्याच्या मांडीवर बसून लाड करून घेत असताना ध्रुवाने ते पाहिले. तो ही तसेच लाड करून घेण्यासाठी पित्याच्या मांडीवर बसायला गेला. पण उत्तानपादाने त्याला बसू दिले नाही. तेंव्हा उत्तानपादाच्या शेजारी बसलेली सुरुची गर्विष्ठपणाने त्याला म्हणाली, "बाळा! तुला राजसिंहासनावर बसण्याचा अधिकार नाही. कारण तूं माझ्या ऐवजी दुसऱ्या कुणाच्या तरी पोटी जन्माला आलेला आहेस. तूं लहान असल्यामुळे तुला ते कळणार नाही. पण तुला जर राजसिंहासनावर बसण्याची इच्छा असेल तर तूं भगवान नारायणाची तपश्चर्या करून माझ्या पोटी जन्म घे.

आपली सावत्र आई आपली अवहेलना करीत असून वडील काहीच बोलत नाहीत हे पाहून अपमानित झालेला ध्रुव क्रोधाने उसासे टाकीत आपल्या आईकडे गेला. ध्रुवाचे दोन्ही ओठ थरथर कांपत होते. आपल्या आईला पाहाताच त्याला रडू कोसळले. सुरुची काय बोलली हे सुनितीला दासींकडून आधीच कळले होते. त्यामुळे तिने आवेगाने व विमनस्क मन:स्थितीत ध्रुवाला आपल्या मांडीवर घेतले. सुनितीचा

विवेक सदैव जागा असे. ती त्याच विवेकाने पण दु:खाने ध्रुवाला म्हणाली, " बाळा! सुरुची जे बोलली ते योग्यच म्हणावे लागेल. कारण तूं मज अभागीनीच्या पोटी जन्माला आला आहेस. तथापि तुझी सावत्र आई जे म्हणाली ते तूं द्वेषबुद्धी सोडून करशील तर तुलाही उत्तमप्रमाणे राजसिंहासनावर बसता येईल. त्यामुळे तूं राजसिंहासनावर बसण्यासाठी भगवान नारायणाची आराधना कर! जन्म-मरणाच्या फेऱ्यातून सुटण्यासाठी मुमुक्षु त्याच्याच चरणाचा आश्रय घेतात. पण त्यासाठी तुला सर्व सोडून भगवान नारायणाचे भजन करावे लागेल."

आपल्या मातेचा हा उपदेश शिरोधार्य मानून ध्रुवाने लगेच सर्व सोडून वनाचा मार्ग धरला. ध्रुव वनात गेल्याचे समजताच नारद तांतडीने ध्रुवाकडे आले. नारद ध्रुवाची समजूत घालू लागले, "अरे! या खेळण्या बागडण्याच्या वयात कसला मान-अपमान घेऊन बसलास? खरेतर तुझ्याच मोहामुळे तुला असंतोष प्राप्त झाला आहे. तूं आपल्या आईच्या सांगण्यावरून तपाचरण करण्यास आलास खरा पण ते फार अवघड आहे. बाळा! हे क्रोधापासून झालेले दु:ख सोड! मनुष्याने आपल्यापेक्षा अधिक गुणवान असेलेल्याला पाहून प्रसन्न व्हावे. गुणात कमी असलेल्यांवर दया करावी व समानगुण असलेल्यांशी मैत्री करावी. त्यामुळे दु:खाची निवृत्ती होते."

हे ऐकून ध्रुव म्हणाला, "भगवान! आपण इतका चांगला उपदेश केला असूनही मला तो धारण करवत नाही. आत्ता या क्षणी आपण मला त्रैलोक्यातल्या सर्वश्रेष्ठ पदावर आरूढ होण्याचा मार्ग सांगा. कीं ज्या पदावर आजवर कोणीच आरूढ होऊ शकले नाही!" ध्रुवाचा तेजस्वी निश्चय पाहून नारदांनी त्याला यमुनाकाठच्या मधुवनात जाऊन "ओम् नमो भगवते वासुदेवाय" या मंत्राने अहोरात्र ध्यानजप करण्यास सांगितले. ध्रुव त्याप्रमाणे तप करण्यास निघाला.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:|

॥श्रीगुरु:शरणं॥

श्रीमद्भागवत-स्कंध चवथा

पुष्प ४७ वे (अध्याय ८ पूर्ण व ९ चालू)

## ध्रुवाचे पुनरागमन

ध्रुव श्रीहरीचा नित्य निवास असणाऱ्या कालिंदी नदीच्या तीरावर असलेल्या मधुवनात आला. नारदांनी सांगितल्या प्रमाणे त्रिकाळ स्नान करून व पवित्र होऊन प्राणायाम वगैरे करून ध्यान धारणा करू लागला. पहिल्या तीन रात्री त्याने फक्त कवठ व बोरे खाऊन उपासना केली. पुढे महिनाभर तोच आहार ठेवला. पण महिन्यानंतर तो फक्त पान गवतावर सहा सहा दिवसांच्या अंतराने राहिला. तिसऱ्या महिन्यापासून केवळ जलपानावर राहू लागला. त्याने उपासनेचा जोर वाढवतच नेला. त्यामुळे केवळ चवथ्या महिन्यातच त्याने प्राणावर विजय मिळवला.

मग बारा बारा दिवसांनी वायुचा आहार घेऊन तपाची उग्रता वाढवीत नेली. पाचव्या महिन्यात त्याने श्वासावर नियंत्रण मिळवून चिंतन सुरु केले. इंद्रियांचे नियामक मन व शब्दादी पंचविषय सर्व बाजूंनी खेचून हृदयातल्या श्रीहरी पदकमली समर्पण केले. एक दिवस अचानक त्याच्या ध्यानोपासनेतल्या मंत्राचे सामर्थ्य त्याच्यात प्रकाशित झाले. प्रकृति-पुरुष नियामक परब्रह्माशी तो तादात्म्य पावला.

त्यामुळे ध्रुवात प्रकट झालेल्या त्या परब्रह्मतेजाने पृथ्वी हादरली. तिला ध्रुवाचा भार सहन होईना. त्रिभुवनातले लोकपाल थरथर कपू लागले. ध्रुवाने परब्रह्माशी तादाम्य पावून केलेल्या प्राणायाम समयीच्या प्राण निरोधाने लोकपालांचे प्राण कासावीस होऊ लागले. ते भगवान श्रीहरीला शरण गेले. श्रीहरीने त्यांना अभय देऊन सांगितले कीं बालध्रुवाने निग्रहाने आपले चित्त मज वासुदेवात लीन केले आहे. त्याच्या प्राण निरोधाने तुमचे प्राण रोधले गेले आहेत. मी ध्रुवाला त्याच्या तपापासून परावृत्त करीन तुम्ही निश्चिंत राहा. भगवान श्रीहरी तत्क्षणी मधुबनात ध्रुवा समोर आले.

भगवान श्रीहरी सगुणरुपात ध्रुवा समोर प्रकट होताच ध्रुवाच्या ध्यानातली मूर्ती अदृश झाली. ध्रुवाने आश्चर्यचकित होऊन डोळे उघडले. तो तीच मूर्ती समोर प्रकट झालेली पाहून तो गडबडला. पण क्षणातच स्वत:ला सावरून त्याने भगवान श्रीहरिला साष्टांग दंडवत घातले. थोडा भावावेग कमी झाल्यावर उठून उभा राहिला. त्याला श्रीहरीची स्तुति करावीशी वाटत होती. पण बालवयामुळे स्तुति कशी करावी ते सुचत नव्हते.

सर्वज्ञ श्रीहरीने त्याचे मनोगत जाणून आपल्या हातातला वेदोमय दिव्य शंख त्याच्या गालाला लावला. तत्क्षणी ध्रुवाला वेदवाणी प्राप्त झाली! जीव व ब्रह्म यांच्या स्वरुपाचा त्याला निश्चयात्मक बोध झाला. आणि तो भगवंताची स्तुति करू लागला. "हे सर्वशक्तिमान प्रभो! माझ्या अंत:करणात प्रवेश करून आपणच आपल्या तेजाने माझ्या वाणीला जागृत केले आहे. हे चैतन्यमयी ईश्वरा माझा आपणास साष्टांग नमस्कार आहे. अनंतगुणमय मायाशक्तीने संपूर्ण संसार उभारून आपणच त्यात अंतर्यामीरूपाने प्रवेश करता. आपणास शरण येताच आपण ज्ञानशक्ती प्रदान करता. त्याच ज्ञानशक्तीच्या बळावर झोपेतून उठल्यावर स्वप्न जसे वाटावे तसे आता हे विश्व स्वप्नवत् वाटू लागले आहे. दृश्य विश्वा पलीकडे असलेल्या आपल्या सूक्ष्मातिसूक्ष्म परमात्मस्वरूपाला मी जाणू शकत नाही. भगवन ! आपल्याच ठिकाणी विद्या-अविद्या इत्यादी अगदी परस्पर विरोधी शक्ती प्रकट होऊन विश्वात कार्यान्वित होतात. पण आपण मात्र त्या सर्वांच्या अतीत असता. अशा आपल्या दिव्य व अतर्क्य लीलासामर्थ्याला व आपल्याला माझे वारंवार वंदन आहे."

भक्तध्रुवाचे हे स्तवन थांबताच भगवान श्रीहरी म्हणाले, " ध्रुवा! तुझा संकल्प मी जाणला आहे. त्या संकल्पा प्रमाणे तशा पदाची प्राप्ती दुरापास्त आहे. तथापि संपूर्ण विश्व ज्याच्या भोवती सतत प्रदक्षिणा करीत असते तो ध्रुवलोक मी तुला देईन. आता तूं घरी जा. तुझे वडील तुला राज्य देतील. तुझी इंद्रियशक्ती अकुंठीत राहील. तूं अनेक वर्षे राज्य करून ध्रुवलोकी येशील." इतके सांगून भगवान श्रीहरी अदृश्य झाले. ध्रुव परत आपल्या नगरी जाण्यास निघाला.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-स्कंध चवथा

## पुष्प ४८ वे (अध्याय ९,१० व ११)

## ध्रुवाचा राज्याभिषेक

ध्रुव आपल्या नगरीच्या परिसराजवळ येताच राजसेवकांपैकी एकाने ही बातमी उत्तानपाद राजाच्या कानावर घातली. उत्तानपादाला आनंद झाला. इतक्या दिवसांचे पुत्र वियोगाचे दु:ख संपल्याच्या आनंदात स्वजनांसह ध्रुवाच्या स्वागतास तो रत्नजडित रथातून निघाला. उत्तानपादाच्या दोन्ही राण्या नटून थटून सुवर्णजडित पालखीतून निघाल्या. उपवनाजवळ येताच त्यांना ध्रुव समोरून येताना दिसला.

भगवान श्रीहरीच्या दर्शनाने पुनित झालेल्या आपल्या बाळाचे दर्शन होताच उत्तानपादाचा आनंद अनावर झाला. तो रथातून खाली उतरला व धांवतच ध्रुवाकडे जाउन त्याला आलिंगन दिले. पित्याचा भावावेग कमी होताच ध्रुवाने त्यांना वंदन केले. भगवंत ज्याच्यावर प्रसन्न होतात त्याच्याकडे सगळेच जीव ओढले जातात. त्याला सुरुची कशी अपवाद असणार?

सुनीती आपल्या पुत्राला पाहून इतकी आनंदली होती कीं त्याचा स्पर्श होताच तिचा प्रेमाचा बांध सर्व बंधने झुगारून स्तनातल्या बत्तीसधार क्षीरासह प्रवाही झाला. सर्वजण आनंदाने राजप्रासादाकडे निघाले. वेदघोष व मंजुळ सनया चालू होत्या. नागरिक दुतर्फा उभे राहून सुगंधी फुले व वनस्पती उधळीत होते. राजप्रासादात गेल्यानंतर राजा उत्तानपादाने आपल्या पुत्राचे अद्‌भुत कृत्य श्रवण केले. त्याला परम आश्चर्य वाटले. तेवढाच पुत्राचा अभिमानही वाटला. पुढे ध्रुव वयात आल्यावर प्रजाजनांचा ध्रुवाकडे असलेला ओढा पाहून व मंत्रिमंडळाची अनुकुलता पाहून उत्तानपादाने सुमुहूर्तावर ध्रुवाला राज्याभिषेक केला. व आपण स्वत: सर्वसंग परित्याग करून वनात निघून गेला.

ध्रुवाचा एक विवाह प्रजापती शिशुमार याची कन्या भ्रमिशी झाला. दुसरा विवाह वायू कन्या इलाशी झाला. ध्रुवाला भ्रमीपासून कल्प व वत्सर असे दोन पुत्र झाले व इलापासून उत्कल नामक एक पुत्र व एक कन्या झाली. ध्रुवाचा भाऊ उत्तम अविवाहित राहिला होता. पुढे उत्तम एकदा हिमालयात शिकारीला गेला असताना एका बलाढ्य यक्षाने त्याचा वध केला. तेंव्हा सुरुची पुत्र शोकाने परलोकवासी झाली.

आपल्या भावाला एका यक्षाने मारल्याचे समजल्यावर ध्रुवाला तीव्र संताप आला. ध्रुव आपला विजयरथ सिद्ध करून हिमालयातल्या अलका नगरीवर चालून गेला. यक्ष म्हणजे कुबेराचे सेवक. अलकानागरी कुबेराची राजधानी. अलकानगरी जवळ येताच ध्रुवाने आपला दिव्य शंख फुंकला त्या शंखध्वनीच्या स्पंदनाने यक्ष पत्न्यांच्या उरात धडकी भरली. भयाने त्या सैरभैर झाल्या. यक्षवीर तो नाद सहन न होऊन युद्धासाठी शस्त्रसज्ज होऊन नगरा बाहेर येऊन ध्रुवावर तुटून पडले. महारथी ध्रुवाने आलेल्या प्रत्येक यक्षाला आपल्या बाणाने घायाळ केले. एक लक्ष तीसहजार यक्ष ध्रुवावर चाल करून आले होते. पण ध्रुवाने आपल्या अद्‌भुत पराक्रमाने त्यांना ठार केले. ध्रुवासमोर एकही वीर उरला नाही. पण ध्रुव अत्यंत सावध होता. शत्रू नक्कीच वेगळया प्रकारे चाल करणार हे तो जाणून होता.

आणि तसेच झाले. यक्षांनी आपली मायावी शक्ती दाखवण्यास सुरुवात केली. ध्रुवाने तत्क्षणी भगवंताचे स्मरण करून नारायणास्त्र सज्ज केले व त्या अस्त्राने त्याने यक्षांच्या मायावी शक्तींचा संहार केला. व यक्ष धडाधड रणांगणी पडू लागले. हजारोंच्या संख्येने यक्ष सत्यलोकी आलेले पाहून स्वायंभूवमनूला त्यांची दया आली. तो तांतडीने अनेक ऋषींना समवेत घेऊन ध्रुवाजवळ आला.

आपल्या आजोबांना पाहून ध्रुवाने त्यांना वंदन केले. स्वायंभूवमनू ध्रुवाला म्हणाले, "बाळा! इतका क्रोध बरा नव्हे. क्रोध हे नरकाचे द्वार आहे. या क्रोधाच्या आधीन होऊन तूं एका यक्षाच्या अपराधासाठी अनेक निरपराध यक्षांची हत्या केलीस तेवढी पुरे. धर्म मर्यादांचे उल्लंघन न करता अहंकारशून्य अवस्थेत भगवद्भक्तीत सर्व कर्मे करावीत. बाळा! तूं तर लहानपणीच ईश्वर भक्तीने अढळपद प्राप्त केले आहेस! त्याच ईश्वराचा अध्यात्मदृष्टीने आपल्या अंत:करणात शोध घे. अरे! तुला जसा क्रोध येतो तसा तो तुझ्यापेक्षा जे ज्येष्ठ व श्रेष्ठ आहेत त्यांनाही येऊ शकतो. शिवाय कुबेर हा भगवान शिवशंकरांचा भक्त व प्रिय सखाही आहे. त्यामुळे कुबेर संतापला नाही तोवरच तूं भगवान कुबेरांना प्रसन्न करून घे." हे ऐकून ध्रुवाने लगेच युध्द थांबवले.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

## ।।श्रीगुरु:शरणं।।

## श्रीमद्भागवत-स्कंध चवथा

## पुष्प ४९ वे (अध्याय १२)

# ध्रुवाला कुबेराचे वरदान.

मैत्रेय मुनी पुढे सांगू लागले, "विदुरा! ध्रुवाने युद्ध थांबवले हे कळताच कुबेर स्वत:च ध्रुवाला भेटण्यासाठी आपल्या पार्षदांसह ध्रुवा समोर आला. यक्ष, चारण, किन्नर हे भगवान कुबेरांची स्तुती करीत होते. कुबेर समोर येताच ध्रुवाने विनम्र होऊन त्यांना प्रणाम केला. ते पाहून अत्यंत प्रसन्नतेने कुबेर ध्रुवाला म्हणाले, "हे क्षत्रियकुमारा! आपल्या आजोबांच्या उपदेशाने तूं क्षणाचाही विलंब न लावता विवेकाने क्रोधाचा त्याग केलास, हे पाहून मी तुझ्यावर प्रसन्न झालो आहे. तुझ्या भावाच्या वधाचे निमित्त होऊन काल हेच या युद्धाला कारण घडलेले आहे. तथापि अज्ञानाने "मी व माझे" ही बुद्धी ठेवून कर्मबंधनाने दु:ख भोगावे लागते. म्हणून ध्रुवा! तुला जर या कर्मबंधाच्या दु:खातून मुक्त व्हावयाचे असेल तर निर्वैर होऊन भगवान श्रीहरीच्या चरणी आत्मार्पण कर. मी तुझ्यावर प्रसन्न असल्यामुळे तुला जो हवा तो वर तूं माझ्याकडून मागून घे. "विचारप्रवण ध्रुवाने लगेच 'निरंतर श्रीहरीचरण स्मरणाचा' वर मागितला. कुबेराने अत्यंत प्रेमाने तथास्तु म्हणून तेथून गमन केले.

त्याक्षणापासून ध्रुवामध्ये अमुलाग्र फरक पडला. निर्गुण निराकार व सर्वोपाधीशून्य भगवान श्रीहरीच्या चरणी लीन झाल्यामुळे ध्रुवाला भगवान श्रीहरी सर्वव्यापी, सर्वगामी, सर्वान्तर्यामी, असल्याचा दृढ बोध होऊ लागला. त्या बोधाच्या समाधानातच त्याने अनेक मोठ मोठे यज्ञ करून पापक्षय केला व ऐश्वर्यभोगाने पुण्याचा क्षय करीत श्रीहरीच्या आज्ञेप्रमाणे ३६००० वर्षे भगवत्स्मरणात जितेंद्रिय होऊन पृथ्वीचे राज्य केले. नंतर संपूर्ण विश्व अविद्या रचित स्वप्न असल्याची दृढ धारणा करून त्याने आपला पुत्र उत्कल याला राज्यावर स्थापन केले. मग सर्वसंग परित्याग करून ध्रुवाने बद्रिकाश्रमाचा रस्ता धरला. बद्रिकाश्रमात गेल्यावर प्राणायामाच्या सरावाने बहिर्मुख इंद्रियांना हृदयस्थ श्रीहरीच्या चरणी अर्पण केले. सर्व वासनांपासून निवृत्त झालेल्या ध्रुवाला भगवत् भेटीची ओढ निर्माण झाली. त्याच्या नेत्रावाटे वारंवार अश्रुधारा सुरु झाल्या. त्याचे अंत:करण वारंवार द्रवू लागले.

हळू हळू त्याचा देहाभिमान नाहीसा होत होत पूर्ण नाहीसा झाला. इतका कीं आपण ध्रुव असल्याची त्याला जाणीवच राहिली नाही. त्यावेळी आकाशातून एक अति विशाल व सुंदर विमान खाली येताना ध्रुवाने पाहिले. दाही दिशा विमानाने प्रकाशित झालेल्या होत्या. प्रकाश पौर्णिमेच्या चंद्रासारखा शीतल होता. विमानातून आलेल्या नंद-सुनंद या दोन श्रीहरीच्या पार्षदांना पाहून ध्रुवाने पटकन उठून हात जोडले. त्यांचे रूप हुबेहूब श्रीहरीसारखेच होते. त्यांना तसेच चार आजानु बाहू, शंख, चक्र, गदा, पद्म, तसेच पितांबर, तसाच तुलसीहार, त्या हाराच्या सुगंधाने दशदिशा सुगंधित झालेल्या.

ध्रुव विनम्रतेने हात जोडून त्यांच्या समोर उभा राहिला. नंद-सुनंद म्हणाले, "राजन्! आपले कल्याण असो. आपण वयाच्या पाचव्या वर्षीच भगवान श्रीहरींना प्रसन्न करून घेतलेल्या श्रीहरींचे आम्ही सेवक आहोत. आपणास नेण्यासाठी आलो आहोत. सप्तर्षीसुद्धा ज्या धामाला जाऊ शकले नाहीत, त्या श्रीविष्णुंच्या धामाला आपणास नेण्यासाठी आम्ही आलो आहोत." नंद-सुनन्दांचे हे सुमधुर भाषण ऐकून ध्रुवाने प्रथम स्नान केले. मग संध्या-वंदनादी केले. मग मंगल अलंकार धारण केले. त्यावेळी बद्रिकाश्रमात असलेल्या ऋषींना वंदन केले. मग नंद-सुनन्दासह विमानाचे पूजन केले. विमानाला प्रदक्षिणा घातली. आणि आता विमानात बसणार तोच साक्षात् काल त्याच्या समोर मृत्युच्या रूपाने उभा राहिला. त्यावेळी मृत्यूही विनयाने खाली वाकला तेंव्हा त्याच्या मस्तकावर पाय देऊन ध्रुवाने विमानात आरोहण केले. तत्क्षणी आकाशातून मंगल वाद्ये वाजू लागली. फुलांचा वर्षाव होऊ लागला.

ध्रुव विमानातून निघाला आणि क्षणातच त्याला आपल्या आईची आठवण झाली! जिच्यामुळे आपल्याला ही गती प्राप्त झाली त्या आईला आपण कसे विसरलो? असे त्याच्या मनात येताच नंद-सुनंद यांनी ध्रुवाला त्याच्यापुढे दुसऱ्या विमानातून त्याची माता सुनीती जात असल्याचे दाखवले. ध्रुवाला परम समाधान वाटले.

थोड्याच कालावधीत त्यांची दिव्य विमाने त्रैलोक्य पार करून सप्तर्षी मंडलाच्यावर असलेल्या भगवान श्रीविष्णुंच्या नित्यधामात आली. त्या दिव्य धामात अत्यंत आल्हाददायक प्रकाश होता. त्या प्रकाशात कमी अधिकता नाही. तो दिव्य स्वयंप्रकाशी लोक आहे. याच्याच प्रकाशाने त्रैलोक्य प्रकाशित झाले आहे. जीवांवर दया न करणारी माणसे इथे येऊच शकत नाहीत. रात्रंदिवस प्राण्यांचे हितचिंतन करणारे, शांत, समदर्शी, निर्वैर, निरपेक्ष व स्वत:ला विसरून निरंतर भगवंताच्या चिंतनात असणारेच इथे प्रवेश करू शकतात. अशा प्रकारे उत्तानपाद राजाचा पुत्र तिन्ही लोकांच्यावर असलेल्या दिव्यलोकी तेजस्वी चुडामण्याप्रमाणे विराजमान झाला. अत्यंत वेगवान ज्योतिश्चक्र त्या अविनाशी लोकांच्या आश्रयानेच नेहेमी फिरत असते.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-स्कंध चवथा

# पुष्प ५० वे (अध्याय १३ व १४)

## ध्रुववंश व अंगराज

मैत्रेय मुनी इतके सांगून पुढे म्हणाले, "विदुरा! ध्रुवाचा हा महिमा प्रचेत्यांच्या यज्ञात केवळ तीन श्लोकातच आपल्या दिव्य वीणेच्या झंकारात नारदांनी गायिला होता. नारद म्हणाले, "पतिव्रता सुनितिच्या बालध्रुवाने तपाचरणाने जी गती प्राप्त करून घेतली ती भागवत धर्माचे आचरण करणाऱ्या वेद्वेत्त्यांनाही प्राप्त होत नाही. तर इतरांची गोष्ट दूरच. (श्लोक ४१). अहो! सावत्र मातेच्या वाग्बाणांनी विध्द झालेला बाळ दु:खाने वनांत गेला आणि माझ्या उपदेशाने तपाचरण करून प्रभूंना जिंकले. (४२) पांच-सहा वर्षाच्या बालकाने काही दिवसांच्या तपाचरणाने भगवान श्रीविष्णूंना प्रसन्न करून मिळवलेले आढळपद अनेक वर्षांच्या तपश्चर्येने तरी कोणी क्षत्रिय मिळवू शकेल काय?" नारदांनी केलेली स्तुति ऐकून विदुरांनी विचारले, " नारदांनी ज्या प्रचेत्यांच्या यज्ञात ध्रुवाची स्तुति केली ते प्रचेते कोण?

मैत्रेय म्हणाले, " विदुरा! ध्रुवाचा पुत्र उत्कल आसक्तीशून्य व निरंतर भगवत्स्मरणात राहू लागल्यामुळे त्याच्या कुळातल्या ज्येष्ठ व श्रेष्ठांनी त्याचा धाकटा भाऊ वत्सर याला राज्यावर बसविले. या वत्सराचा ज्येष्ठ पुत्र पुष्पार्णव. या पुष्पार्णवाचा पणतू चक्षु. हा नंतर चाक्षुष मन्वन्तराचा मनू झाला. ह्या चक्षुचा नातू अंग. अंग अत्यंत न्यायी व धर्मनिष्ठ राजा होता. पण त्याच्या पोटी वेन नावाचा अत्यंत क्रूरकर्मा पुत्र जन्माला आला. आपला पुत्र वेन याच्या दुष्टपणाला कंटाळून अंगराजा वनात निघून गेला. त्यानंतर वेन राजा झाला. तो मनमानी करू लागला. ऋषींनी त्याच्या प्रबोधनाचा प्रयत्न केला पण वेनाने घोर अपमान केल्याने ऋषींच्या क्रोधरुपी हुंकाराने त्याचा अंत झाला. तेंव्हा राजा नसल्यामुळे अराजक माजले. म्हणून ऋषींनी वेनाच्या हाताचे मंथन करून भगवान श्रीविष्णुंचा अंशावतार आदीसम्राट राजा पृथुचा जन्म करविला.

विदुरांनी विचारले कीं, "सत्वशील व दयाळू अंग राजाला वेनासारखा दुष्ट पुत्र कसा झाला? त्यातही धर्मज्ञ मुनींच्या शापरूप दंडाला बळी पडण्या इतका वेनाकडून मोठा अपराध तरी कोणता घडला? कारण, शास्त्राप्रमाणे असे म्हणतात कीं, राजा आपल्या अंगी आठही लोकपालांचे तेज धारण करीत असतो म्हणून प्रजाजनांनी त्याचा तिरस्कार करू नये. म्हणून आपण कृपया माझी ही जिज्ञासा पुरी करा!"

मैत्रेय म्हणाले, " विदुरा! अंग राजाची पत्नी सुनिथा ही अधर्माच्या वंशातल्या मृत्यूची कन्या होती. त्यामुळे तिचा पुत्र वेन हा अधार्मिक निपजला. तो अति क्रूर होता. खेळताना बरोबरीच्या मुलांना तो गुरासारखा मारीत असे. अंगराजाने प्रयत्नांची शर्थ केली पण वेनात काहीच सुधारणा होत नव्हती. तेंव्हा राजेपदाला अयोग्य अशी वेनाची दुष्ट प्रवृत्ती पाहून त्याचा पिता अंग शांतपणे कुणालाही कल्पना न येऊ देता राज्य त्याग करून अज्ञातवासात निघून गेला. मंत्री, पुरोहित, सुहृद इत्यादींनी अंगमहाराजांच्या शोधासाठी शोधनिपुण प्रचंड सैनिक दशदिशांना पाठवले. त्यांनी निकराचा शोध घेऊनही अंग महाराजांचा शोध लागला नाही. राजसैनिकांनी भृग्वादी मुनिना आपले अपयश कथन केले तेंव्हा राज्याला कोणी तरी राजा हवा म्हणून वेनाला राजा केले.

वेन फारच कठोर शास्ता होता म्हणून चोर डाकू यांचा उपद्रव जरी थांबला तरी राजमदाने वेन भल्या भल्या ज्ञानी ऋषींचा व मंत्र्यांचा अपमान करू लागला. व त्रैवर्णीकांच्या उच्चाटनाची आज्ञा दिली. तेंव्हा आपला क्रोध लपवून ज्ञानी ऋषींचा समूह राजाला समजवण्यासाठी राजा वेनाकडे आले. व म्हणाले, " राजन्! मनुष्याने शरीर, वाणी, मन व बुद्धी यांनी सदैव धर्माचरण करावे. त्याचा भाव निष्काम असेल तर मोक्ष मिळतो. म्हणून राजाने धर्मपालनावर भर द्यावा. धर्म हा प्रजाकल्याणाचे साधन आहे. धर्म नष्ट झाला तर राजाही अधोगतीला जातो."

हे ऐकून वेन म्हणाला, " अरेरे! तुम्ही अज्ञानी आणि मूर्ख आहात. तुम्ही तर अधर्माला धर्म मानीत आहात. तुमचा जीवननिर्वाह माझ्यामुळे सुरळीत चालत असून मला भजायचे सोडून तुम्ही एखाद्या कुलटेसारखे वर्तन करीत आहात. राजा हाच सर्व श्रेष्ठ असतो म्हणून तुम्ही सर्व पूजा मलाच अर्पण करीत जा. सर्व कर्मे मलाच समर्पण करीत जा."

हे ऐकून ऋषींच्या अंत:करणातला क्रोध प्रज्वलित झाला व सर्व ऋषींनी एकमताने असला राजा नकोच अशा विचारांनी क्रोधमय हुंकार देताच राजाचे प्राण शरीर सोडून गेले. वेनाच्या आईने त्याचे शरीर अन्य उपायांनी तसेच जतन केले. थोड्याच दिवसात अराजक माजले.

तेंव्हा ऋषींनी आपल्या तपाच्या सामर्थ्याने राजर्षी अंगाच्या वंशात भगवत्परायण राजा निर्माण करण्याचे ठरवले. त्यांनी सुनिथाने जतन करून ठेवलेल्या वेनाच्या शरीराच्या मांडीचे मंथन केले. त्यातून एक काळा कभिन्न  बुटका, आखूड हातांचा व मोठ्या जबड्याचा पुरुष उत्पन्न झाला. त्या पुरुषात वेनाचे सर्व पाप भरलेले होते. त्याला ऋषींनी 'निषाद' असे नाव देऊन नगरा बाहेरच्या जंगलात स्थान दिले. त्यामुळे जंगलात व दऱ्याखोऱ्यात राहून ही निषाद जमात लूटमार व पशूहत्येवर उपजीविका करू लागली.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-स्कंध चवथा

## पुष्प ५१ (अध्याय १५ व १६)

## महाराज पृथूंचा अविर्भाव व राज्याभिषेक

वेनाच्या शरीराची शुद्धी झाल्यावर ब्राम्हणांनी वेनाच्या बाहुचे मंथन केले. त्यातून एक अत्यंत तेजस्वी युग्म उत्पन्न झाले. स्त्री व पुरुष अशी ती जोडी होती. त्यावेळी जाणत्या ऋषींनी सांगितले कीं हा पुरुष भगवान श्रीहरी व ही स्त्री म्हणजे भगवान श्रीहरींपासून कधीही विभक्त न राहणारी लक्ष्मीच आहे. या पुरुषाचा पराक्रम अतुलनीय असेल. हा सतत आपले यश पसरवित जाईल म्हणून याचे नाव पृथु असे होईल. हा सम्राट राजा होईल. आणि ही उत्पन्न झालेली स्त्री पृथूची पत्नी अर्ची होईल. इतक्यात आकाशात दुंदुभी वाजू लागल्या. आपापल्या लोकांमधून देव अवतीर्ण झाले. भगवान ब्रह्मदेव, भगवान महादेव, इंद्रादी लोकपाल, अनेक ऋषी, पितर असे सर्व जण राजा पृथूचे अभिनंदन करण्यास आले. त्यावेळी ब्रह्मदेवांनी पृथुच्या हातावरचे चक्र पाहून हा विष्णूंचा अवतार असल्याचे निश्चयाने सांगितले. थोड्याच अवधीत पृथु पूर्ण वयात आले व अर्चीही तेवढीच वाढली. त्यामुळे वेद्वेत्या ब्राम्हणांनी लगेच पृथुच्या राज्याभिषेकाची तयारी केली. ती तयारी होई पर्यंत सर्व नद्या, समुद्र, पर्वत, पृथ्वी, गायी, पक्षी, नाग, पशु व अन्य अनेक प्राणी आपले नजराणे घेऊन हजर झाले. अप्रतीम वस्त्रालंकार धारण केलेल्या पृथुचा वैदिक पद्धतीने राज्याभिषेक झाला. त्यावेळी अनेक वस्त्रालंकार परिधान केलेल्या महाराणी अर्चीदेवी बरोबर महाराज पृथु अग्नीसारखे तेजस्वी दिसत होते. त्यांना सिंहासनावर बसवण्यात येण्याच्या समयी कुबेराने प्रकट होऊन एक अप्रतीम सुवर्ण सिंहासन त्यांना समर्पण केले. वरुणाने शीतल प्रकाशमय छत्र बहाल केले. वायुने चवऱ्या, धर्माने कीर्तीमाला, इंद्राने मुकुट, यमाने दंड, ब्रह्मदेवांनी वेदमयकवच, सरस्वतीने हार, भगवान विष्णूंनी सुदर्शनचक्र, लक्ष्मीने स्थिर संपत्ती, रुद्राने तलवार, पार्वतीने ढाल, चंद्राने दिव्य अश्व, पृथ्वीने मनोवाञ्छित स्थळी नेणाऱ्या पादुका, असे विवध दिव्य नजराणे त्यांना समर्पण केले. नंतर सूत व मागध महाराजा पृथु यांची स्तुती करण्यास उभे राहिले. तेंव्हा त्यांचा स्तुति करण्याचा हेतू जाणून राजा पृथूंनी बोलण्यास आरंभ केला. गंभीर वाणीने ते म्हणाले, " हे सूत, मागध व बंदिजन हो! या लोकी माझे अद्याप कोणतेच गुण प्रकट झालेले नाहीत. शास्त्रादिकांच्या अभ्यासाने जे गुण उत्पन्न होतात ते अनुभवास आल्या खेरीज त्या प्रकारची

स्तुति म्हणजे स्वत:ची निव्वळ थट्टा करून घेणे आहे. इतकेच नाही तर तो एक प्रकारचा उपहासच होईल. म्हणून हे मधुर वाणी असलेल्या स्तुति पाठकांनो तुम्ही पुण्यश्लोक भगवंताचे गुण वर्णन करून आपल्या वाणीचे सार्थक करणे योग्य होईल!" पृथुमहाराजांची ही अमृतमय वाणी ऐकून बंदिजनांनी सत्प्रवृत्त मुनीजनांच्या प्रेरणेने पृथुमहाराजांचे भविष्य कथन गायला सुरुवात केली. ते म्हणू लागले, " भगवान नारायण जेंव्हा स्वामायेने वेनाच्या शरीरातून अवतार धारण करतात तेंव्हा त्यांच्या पुरुषार्थाचे वर्णन करताना ब्रह्मदेवही चक्रावून जातात. तिथे आम्ही तर अगदीच तोकडे पडणार. तथापि मुनींच्या प्रेरणेने आम्ही आपल्या प्रशंसनीय कार्याचा विस्तार करणार आहोत. आपण साक्षात् श्रीहरीचे अवतार आहात. आपण प्रजापालनात अलौकिक समता दाखवाल. आपण पृथ्वीसारखी क्षमाशीलता दाखवाल. आपल्या प्रसन्न व सस्मित मुखाकडे पाहून प्रजा सदैव आनंदित राहील. आपले मनोगत कोणीही जाणू शकणार नाही. आपली कार्येही तशीच गुप्त असतील. आपण सदैव वैराग्यशील व निरपेक्षतेने कार्य प्रवण राहाल. महाराज पृथु हे चारी दिशात जय प्राप्त करतील. प्रजेचे क्लेश नष्ट करतील. व सर्व भूमंडळाचे शासक होतील. त्यावेळी देवच काय पण असुरही त्यांच्या प्रभावाची गीते गातील.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:|

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-स्कंध चवथा

## पुष्प ५२ वे (अध्याय १७ व १८)

## महाराज पृथु व पृथ्वी यांचा संवाद

बंदिजानांची स्तुति पूर्ण झाल्यावर ब्राम्हणांनी महाराज पृथूंना राज्याभिषेक करून त्यांना प्रजापालक म्हणून घोषित केले. त्यावेळी वेनाच्या राजवटीत त्रासलेल्या पृथ्वीने औषधी (म्हणजे धान्यादि पदार्थ) देणे बंद केले होते. त्यामुळे भुकेल्या प्रजेने त्यांना अन्न पुरवण्याची कळवळून प्रार्थना केली. पृथूंनी अन्नाचे दुर्भिक्ष कशामुळे झाले असेल याचा नीट बारकाईने अभ्यास केला. त्यावेळी त्यांनी योगमार्गाने हे जाणून घेतले कीं पृथ्वीने सर्व औषधी, वनस्पती इत्यादी जीवनावश्यक गोष्टी स्वत:तच लपवून ठेवल्या आहेत. म्हणून त्यांनी निश्चयपूर्वक आपल्या धनुष्याला बाण जोडला व पृथ्वीला लक्ष केले. तेंव्हा स्वत:चा बचाव करण्यासाठी पृथ्वी गोरूप धारण करून पळू लागली.त्रिभुवनात तिला जिथे जिथे शक्य होते तिथे तिथे तिने लपण्याचा प्रयत्न केला पण पृथुमहाराजांनी तो यशस्वी होऊ दिला नाही. त्यामुळे लपण्यास स्थान न मिळाल्याने भयभीत झालेली पृथ्वी दीनवाणे म्हणाली, "मी निरपराध असताना आपण माझ्यावर कां संतापला आहात? आपण धर्मज्ञ असूनही स्त्री वधला कसे प्रवृत्त झाला आहात? शिवाय मला मारून आपण व आपली प्रजा काय पाण्यावर राहाल काय?" तेंव्हा पृथु महाराज म्हणाले, " यज्ञातला हविर्भाग स्वीकारून तूं आम्हाला अन्न देत नाहीस म्हणून मी तुला मारण्यास उद्युक्त झालो आहे. ब्रह्मदेवांनी आमच्या पोषणासाठी निर्माण केलेली अन्नबीजे तूं आपल्या पोटात कां दडवून ठेवलीस? ती बाहेर काढ! आणि जर तूं तसे करणार नसलीस तर मी तुला छिन्नभिन्न करून तुझ्या चरबीने भूकेलेल्यांची भूक शमवीन. आपल्यावर अवलंबून असणाऱ्या जीवांशी निर्दयपणाने व दुष्टपणाने वागणारा पुरुष असो कीं स्त्री असो कीं नपुंसक असो वध्यच असतो. तूं मायावी सामर्थ्याचा दुरुपयोग करून हे गो-रूप धारण केले आहेस. त्यामुळे माझ्या बाणांनी मी तुझे तुकडे तुकडे करीन! आणि माझ्या योगबलाने सर्व प्रजा धारण करीन! तुझी मला गरज नाही. " पृथु महाराजांचे हे निग्रहाचे बोलणे ऐकून पृथ्वी शहारली. व पृथु महाराजांना म्हणाली, "आपण साक्षात् परमपुरुष आहात. आपल्याच त्रिगुण मायेने माझे चित्त भ्रमित झाले होते. मी आपणास शरण आहे. माझा आपणास नमस्कार आहे. प्रभो! थोडे शांत व्हा व माझी प्रार्थना ऐका. दुराचारी राजांनी अनाचार करून मला जाच करण्यास सुरुवात केली. त्या जाचाला कंटाळून मी सर्व औषधी माझ्याच पोटात लपवून

ठेवली आहेत. हे खरे आहे, पण आता त्याला बराच कालावधी गेला असल्याने ती बीजे जीर्ण झाली आहेत. त्यामुळे पूर्वीच्या आचार्यांनी सांगितलेल्या उपायांनी ती बाहेर काढावी लागतील. त्यासाठी मला पिणाऱ्या वासरांची व दोहन पात्रांची व्यवस्था करा. दुधाच्या रूपाने मी त्यांना सर्व इप्सित वस्तू देईन. नंतर आपणास आवश्यक तेवढा भूभाग समतल करा म्हणजे माझी जलधारणा क्षमता वाढेल व माझ्या पोटात सतत आर्द्रता राहील. हेच तुमच्या दृष्टीने योग्य होईल." पृथ्वीच्या या भाषणाला अनुसरून राजाने 'गो-रूप' पृथ्वीचे दोहन करावयाचे ठरवले. त्यासाठी राजाने मनू, बृहस्पती, इंद्र, इत्यादिना वासरे बनवून प्रजा पालनासाठी आवश्यक गोष्टींचे दोहन करून घेतले. पृथ्वी सर्व इच्छित वस्तू देणारी आहे व यावेळी पृथुच्या ती पूर्ण आधीन आहे असे पाहून सर्वांनीच आपल्या आपल्या प्रमुखाला वासरू बनवून दोहनाच्या रूपाने भिन्न भिन्न वस्तू प्राप्त करून घेतल्या. त्यामुळे महाराज पृथूंच्या मनातला राग मावळला. त्यांनी तिचा कन्या रूपाने स्वीकार केला. आवश्यक तेवढी भूमी समतल करून उत्तमोत्तम शहरे, गावे, वने, उपवने, वाटिका, गौळीवाडे, इत्यादी सर्व प्रकारच्या सुविधांनी परिपूर्ण अशी रचना करून घेतली व प्रजेचे पुत्रवत् पालन करू लागले.

हरये नमः। हरये नमः। हरये नमः।

।।श्रीगुरु:शरणं।।

श्रीमद्भागवत-स्कंध चवथा

पुष्प ५३ वे (अध्याय१९पूर्ण,२०चालू)

## महाराज पृथुंचे अश्वमेध यज्ञ

पृथ्वी दोहना नंतर स्थिरस्थावर झाल्यावर पृथूंनी ब्रम्हावर्तात शतमखाची दीक्षा घेतली. यज्ञ सामग्री देणाऱ्या भूमीने कामधेनुच्या रूपाने अगणित वस्तू देऊन यजमानांच्या सर्व इच्छा पूर्ण केल्या. सर्व शुद्ध पदार्थांची इतकी रेलचेल झाली कीं स्वर्गातल्या इंद्रालाही वैषम्य वाटून शंभरावा यज्ञ सुरु झाल्यावर इंद्राने पृथूच्या यज्ञाचा यज्ञीय घोडाच पळवला. अश्व पळवून नेताना आपल्याला कोणी ओळखू नये म्हणून त्याने साधुवेशाने ते कृत्य केले. त्यामुळे जटा, त्रिपुंड्र, अंगावरचे भस्म, इत्यादी साधू वेषामुळे अश्वरक्षण करणारा पृथुपुत्र गोंधळला. पण अत्रीमुनींनी त्याला ते इंद्राचे कपट असल्याचे सांगून तो घोडा परत आणण्यास सांगितले. तेंव्हा पृथुपुत्राने त्वेषाने इंद्रावर स्वारी केली. कपट वेश टाकून इंद्र पळून गेला. व पृथुपुत्र अश्व घेऊन परत आला. पृथुपुत्राचा हा अद्‌भुत पराक्रम पाहून यज्ञस्थानी असलेल्या ऋषींनी त्याचे नाव "विजिताश्व" असे ठेवले. इतके होऊनही इंद्राने आपला हेका सोडला नाही. त्याने काही दिवसांनी आपल्या मायावी शक्तीच्या सहाय्याने प्रथम अंधार पसरवून कपाल व खट्वांग धारण करून अश्व पळवला. पृथुच्या सुदैवाने व इंद्राच्या दुर्दैवाने अत्रीमुनींचे लक्ष गेलेच. इंद्राच्या छद्मी वेषामुळे विजिताश्व घोटाळयात पडला. पण सावध असलेल्या अत्रीमुनींनी तो इंद्रच असल्याचे निर्धाराने सांगितले. इंद्रही लगेच छद्मी वेष टाकून पळाला. पण तो छद्मी वेष लबाड लोक धारण करून पाखंड माजवू लागले. पाखंड म्हणजे इंद्र जे करीत होता ते पाप होते व ते करण्यासाठी त्याने जी वस्त्रे धारण केली ती धार्मिकचिन्हे असलेली वस्त्रे होती. चिन्ह म्हणजे खंड. म्हणून पाखंड म्हणजे पाप-चिन्ह. इंद्राच्या या वाकड्या चालीचा पृथूंना राग आला. पण यज्ञ दीक्षा घेतलेली म्हणून त्यांना काहीच करता येईना. तेंव्हा त्रासलेल्या ऋत्विजांनी मंत्राच्या सहाय्याने इंद्राचे हवन करायचे ठरवले. ऋत्विज आहुती टाकण्याच्या तयारीत असताना साक्षात् ब्रह्मदेव तिथे प्रकट झाले व म्हणाले, "ऋत्विजहो व पृथुराजन् ! तुम्ही ज्या देवांची आराधना करीत आहत ते इंद्राचे अंग आहेत. त्यामुळे इंद्रच यज्ञमूर्ती आहे. त्यालाच मारून तुम्ही काय मिळवणार? धर्मस्थापनेसाठी आपण केलेल्या या यज्ञाच्या असफलतेसाठी इंद्राने जी वस्त्रे धारण केली त्यामुळे पाखंड माजू लागले आहे. आता आणखी विरोध कराल तर अधिकच पाखंड माजेल. राजन्! तूं रागावू नकोस! पण हे देव मोठे हट्टी व रजोगुणी

असतात. इंद्राला त्याच्या पदाची लालसा आहे. तुला इंद्रपदाची लालसा नाही. त्यामुळे तूं केलेले नव्याण्णव यज्ञ तुला पृथ्वी पालनासाठी पुरेसे आहेत. तूं आणि इंद्र दोघेही पवित्रकीर्ती भगवान् विष्णूंचे अंश आहात. म्हणून स्वत:चेच रूप असलेल्या इंद्रावर तूं रागावू नकोस. कारण ज्या धर्माच्या प्रतिष्ठापनेसाठी हे यज्ञ केले जात आहेत ते आता स्वपदभयाने इंद्रालाच नकोसे झाले आहेत. त्यामुळे हे राजन्! प्रजापालनाचा मुख्य हेतू लक्षात घे. एकांगी विचारांपेक्षा समग्र विचारांनी तारतम्य वापरून यज्ञ थांबवावा असे मला वाटते." पृथुने निर्मल मनाने भगवान ब्रह्मदेवांची सूचना स्वीकारताच भगवान श्रीविष्णू इंद्रासह तिथे प्रकट झाले व म्हणाले, " राजन्! तुझ्या यज्ञात विघ्न आणल्या बद्दल क्षमा मागण्यास इंद्र इथे आला आहे. तूं त्याला क्षमा कर. ज्ञानी पुरुष देवमायेने मोहित होत नाहीत. कर्म, वासना व अविद्या हे तीनही शरीररूपी पुतळयामुळे उत्पन्न होतात. शरीर हे अनित्य आहे. शरीरावर ममता न ठेवता श्रद्धा पूर्वक माझी आराधना करणाऱ्याचे चित्त शुध्द होते. शरीर, ज्ञान, क्रिया व मन यांचा साक्षी असलेला आत्मा जेव्हा तटस्थ होतो तेंव्हा माझी प्राप्ती होते. थोड्याच दिवसात तुला सनकादि ऋषींचे दर्शन होईल. राजन्, ज्यांच्या चित्तात समता असेल अशांच्याच चित्तात मी राहतो. मी तुझ्यावर प्रसन्न आहे. तुला हवा तो वर मागून घे!" इंद्र पृथूची क्षमा मागण्यास पृथूला नमस्कार करू लागला. तेंव्हा त्याला वरचे वर थांबवून पृथुने आलिंगन दिले. मग पृथुने अत्यंत भक्तिपूर्वक भगवंताचे पूजन केले.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

श्रीमद्भागवत-स्कंध चवथा

पुष्प ५४ वे (अध्याय २०, २१)

## भगवान विष्णूंचे पृथूला वरदान

पृथुराजाने भगवान श्रीविष्णूंचे इतके भावपूर्ण पूजन केले. कीं निघण्याच्या तयारीत असलेले भक्तवत्सल भगवान वात्सल्यभावाने तिथेच थांबले. पृथूचे अष्ट सात्विक भाव जागे झाले होते. भगवान विष्णुंच्याकडे पहात पृथु अनन्यभावाने म्हणाला, " हे प्रभो! मजवर प्रसन्न होऊन आपण वर देण्यास तयार झालात पण मला आत्मज्ञान प्राप्त करून देणाऱ्या आपल्या अमृतमय कीर्ती कथांच्या श्रवणासाठी हजारो कान द्या. कारण आपल्या तत्त्वाचे विस्मरण झालेल्या आमच्या सारख्या अभागी लोकांना तेच कथामृत ज्ञानप्राप्ती करून देते. आपण मला वर माग म्हणालात, पण मला आपले हे बोलणे संसारातल्या मोहात गुंतवण्यासारखे वाटते. अहो! आपल्या वेदरूप वाणीनेसुद्धा मोहित होऊन सातत्याने सकाम कर्मे केली जातात. तिथे प्रत्यक्ष आपल्या वाणीने तसा मोह कां उत्पन्न होणार नाही? पण हे प्रभो! पिता जसा आपल्या पुत्राच्या कल्याणास्तव स्त:हूनच तत्पर असतो तसे आपणच माझ्या कल्याणाचा विचार करावा." भगवान श्रीविष्णूंनी पृथुच्या स्तुतिचा स्वीकार करून त्याच्यावर अनुग्रह केला. मग पृथुने पुन्हा एकदा भगवंताचे पूजन केले. श्रीहरी अंतर्धान पावल्यावर पृथुमहाराज अवभृथ स्नानाने पवित्र झाले. मग ऋत्विजांचे आशीर्वाद घेतले. मग प्रथेप्रमाणे सत्रासाठी जमलेल्या सर्व ऋषी, मुनी, राजर्षी, ब्रम्हर्षी, इत्यादी सर्वांचा यथायोग्य सत्कार केला. प्रचंड जनसमुदाय जमलेला होता. असंख्य नागरिकांची दाटी झालेली होती. पण सर्वत्र शिस्त व शांतता होती. प्रथेप्रमाणे महाराज पृथु सभेत भाषण करण्यास उभे राहिले. त्यावेळी त्या सभेत ते नक्षत्रात शोभून दिसणाऱ्या चंद्राप्रमाणे तेजस्वी दिसत होते. महाराज पृथु हे शरीराने चांगलेच धिप्पाड व अत्यंत प्रमाणबध्द होते. महाराज पृथूंनी यज्ञदीक्षा घेतलेली असल्यामुळे त्यांनी सर्व आभूषणांचा त्याग केलेला होता. पण त्यांचे स्वाभाविक व्यक्तिमत्वच इतके आकर्षक होते कीं त्या आभूषणांची उणीवच भासत नव्हती. आपल्या आजानुबाहूत त्यांनी दर्भ धारण केलेले होते. पृथूंनी आपल्या सुहास्य मुद्रेने सर्व सभेवर चांगलीच छाप पाडली होती. आपल्या मधुर व खणखणीत आवाजात त्यांनी भाषणाला सुरुवात केली. " सज्जन हो! आपले कल्याण असो! हे महानुभावानो! जिज्ञासू पुरुषांनी संत समुदायात आपले मनोगत प्रकट करावे असा प्रघात असल्यामुळे मी माझे मनोगत आपणा समोर प्रकट करीत आहे. या लोकी आपण

सर्वांनी मला प्रजारक्षण, शासन, उपजीविका व धर्मरक्षणासाठी राजा म्हणून नियुक्त केले आहे. प्रजेला धर्ममार्गाचे शिक्षण मिळण्याची व्यवस्था न करता करभार घेणाऱ्या राजाला प्रजेच्या पापाचे भागीदार बनावे लागते. त्यामुळे त्याचे वैभव नष्ट होते. म्हणून हे प्रजाजन हो! आपले व आपल्या राजाचे परलोकी हित व्हावे असे जर आपणास वाटत असेल तर तुम्ही शुद्ध अंत:करणाने व ईश्वरार्पण बुद्धीने आपल्या धर्माचे आचरण करीत जा. तोच आपला माझ्यावर अनुग्रह आहे असे मी समजेन. हे देव, ऋषी व पितर हो, आपणही आपल्या निर्मल चित्ताने याला अनुमोदन द्या. कारण धर्माचरण करणारा, ते दुसऱ्यांना सांगणारा व ते करण्यास अनुमोदन देणारा या तिघांनाही परलोकी समान फळ मिळते. हे पूजनीय सज्जन हो! एखाद्या दुराग्रही मनुष्याच्या मते कादाचित् नसेलही पण अनेक धर्मज्ञ व विवेकी लोकांच्या मते यज्ञपती परमेश्वर म्हणून कोणीतरी आहे. कारण या लोकी व परलोकी विशेष तेजस्वी भोगभूमी व तेजोमय शरीरे दिसतात. त्याच प्रमाणे ज्या वस्तूपासून आज सुख प्राप्त होत असते त्याच वस्तूपासून कालांतराने दु:ख प्राप्त होऊ शकते. किंवा एकच वस्तू एकाला सुखकारक तर दुसऱ्याला दु:खकारक होते. असे हे जगाचे विचित्रत्व आहे. ते कर्मफळदात्या जगन्नियंत्या यज्ञपती भगवंता खेरीज घडणार नाही. मनू, उत्तानपादराजा, ध्रुवराजा, राजर्षी प्रियव्रत, आमचे पितामह अंगराजा, आणि इतर धर्मनिष्ठ राजे तसेच ब्रह्मदेव, शंकर, प्रल्हाद, इत्यादी सर्वांचेच गदाधारी भगवान विष्णुंशीच कर्तव्य आहे. त्यांच्या मते कर्मफळ देणारा परमेश्वरच आहे. इतकेच काय पण धर्ममूढांखेरीज व आमचे पिताश्री वेनराजा खेरीज इतर सर्व प्रज्ञावान सज्जनांच्या मते फळदाता ईश्वरच आहे. कारण कर्म हे जड असल्याने फळ देऊ शकत नाही. देवताही फळ देऊ शकत नाहीत. कारण त्यांना अंतर्यामी सत्ते खेरीज स्वातंत्र्य नाही. शिवाय कित्येक ठिकाणी एकाच वेळीसारखी कर्मे केलेली असतानाही भिन्न फळे मिळताना दिसतात. तर काही ठिकाणी ती मिळतही नाहीत. या वरून उचित व हवे ते देण्यास वा न देण्यास किंवा बाह्यत: विपरीत दिसणारे घडवण्यास समर्थ असा एकच कोणीतरी आहे असे मानावे लागते. त्याच सर्वव्यापी भगवंताच्या चरण सेवेच्या आवडीने बुद्धीतला अनेक जन्मांचा मळ नाहीसा होतो. त्याला वैराग्याची प्राप्ती होते. मग वर्णाश्रमधर्मानुसार उचित व निष्काम कर्म करून ते भगवंताला अर्पण करण्याने आत्मज्ञान प्राप्त होते तोच मोक्ष. ह्या भूतलावरील जे प्रजाजन अशाप्रकारे श्रीहरीचे पूजन करीत असतात ते माझ्यावर मोठी कृपाच करीत असतात. अशा निरपेक्ष भक्तांसह भगवान श्रीहरी मजवर प्रसन्न होवोत." महाराज पृथूंच्या या भाषणाची देव, देवता, पितर, ऋषी, ब्राम्हण इत्यादी सर्वांनीच मुक्त कंठाने स्तुती केली. ते म्हणाले, " पृथु महाराज पृथ्वीचे पिताच आहेत. त्यांची भगवंताच्या ठिकाणी अविचल श्रद्धा राहून ते अनंत काल राज्य करोत. आमचा त्यांना नमस्कार आहे."

हरये नम:। हरये नम:। हरये नम:

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-स्कंध चवथा

## पुष्प ५५ वे (अध्याय २२)

## पृथु महाराजांना सनकादिकांचा उपदेश

पृथु महाराजांचे भाषण झाल्यावर प्रजाजन जेंव्हा पृथु महाराजांची प्रशंसा करीत होते तेंव्हा आपल्या दिव्यकांतीने सर्व लोकांना पवित्र करीत आकाशमार्गाने सनकादि कुमार येताना सर्वांनाच दिसले. क्षणातच राजासह सर्वजण उठून उभे राहिले. सर्वांनी एकाचवेळी त्यांना वंदन केले.

मुनिवर आसनस्थ झाल्यावर राजाने त्यांची षोडशोपचार पूजा केली. त्यांचे पादोदक आपल्या मस्तकी धारण करून पृथुने विनयाने बोलायला सुरुवात केली. "हे प्रभो! अत्यंत दुर्लभ असे आपले दर्शन मिळण्या इतके कोणते पुण्य आमच्या कडून घडले आहे ते समजत नाही! पण ते काहीही असो हे मुनिश्वरनो आपले मन:पूर्वक स्वागत असो. प्रभो! आम्ही आमच्या कर्मानुसार विपत्तीचे क्षेत्र असलेल्या या संसारात येऊन पडलो आहोत. आणि इंद्रिय भोगातच पुरुषार्थ मानीत आहोत. तेंव्हा यातून सुटण्याचा उपाय आपण आम्हाला सांगा!”

ह्यावर सनकमुनी प्रसन्नतेने बोलू लागले, " हे राजन्! परोपकार बुद्धीने विचारलेल्या या तुझ्या प्रश्नामुळे सर्वांचेच कल्याण होईल. राजन्! इतर कोणत्याही उपायांनी नाहीसा न होणारा वासनामल भगवत्कथेवर जडलेल्या प्रीतीमुळे नाहीसा होतो. निर्गुण परब्रह्मरुपी आत्म्या व्यतिरिक्त इतर जड वस्तूंवर आसक्ती ठेवू नये. मनुष्याच्या आत्यंतिक कल्याणाचे हे शास्त्राने सांगितलेले साधन आहे. योग्य प्रयत्न केल्यास ते सर्व जीवांना प्राप्त होण्यासारखे आहे. त्यासाठी सद्गुरुवर निष्ठा, शास्त्रवचनांवर दृढ विश्वास, शास्त्रपालनाची मनापासून तयारी व भागवतधर्माचे आचरण. विधिवशात् मिळेल त्यात समाधान मानून या साधनांनी भगवद्भक्ती केल्याने जडदेहा विषयी हळू हळू विरक्ती उत्पन्न होते. लवकरच निर्गुण परमात्म्या विषयी प्रेमभाव निर्माण होतो. मग वैराग्य प्राप्त होते. पुढे याच दृढ अभ्यासाने दृश्य व द्रष्टा असा भेद करणारे अंत:करण नाहीसे होते. मग कर्तृत्वादी सर्व भाव नाहीसे होतात. त्यामुळे द्रष्टा आत्मा व इंद्रियांचे विषय म्हणजेच दृश्यपदार्थ या दोन्हीच्या संबंधाला कारण असलेला अहंकारच नाहीसा झाल्यामुळे शब्दांच्या अतीत असलेले, मनाच्या व बुद्धीच्या पलिकडे असलेल्या आत्मतत्त्वाचे ज्ञान होते. यालाच

अनुभूतीने मिळणारे ज्ञान म्हणतात. द्रव्यप्राप्ति व इंद्रीयतृप्ती या गोष्टींची हाव चारी पुरुषार्थांचा नाश करणारी आहे. धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चार पुरुषार्थांपैकी मोक्ष या पुरुषार्थाला काळाचे भय नसल्याने तो सर्वोत्कृष्ट आहे. तो फक्त भगवद्भक्तीमुळे प्राप्त होतो. फक्त भगवद्भक्तीमुळेच हृदयग्रंथी मोकळया होतात. म्हणून भवसागर तरुन जाण्यासाठी श्रीहरीच्या चरणरूप नौकेचा आश्रय घ्यावा."

सनकांनी केलेला उपदेश ऐकून त्या बोधाशी तादात्म्य पावलेला राजा पृथु म्हणाला, " हे सर्वश्रेष्ठ मुनिश्वरांनो! आपला बोध माझ्या अंतरात भिनला आहे. माझ्या देहासह वर्तमान सर्व आपलेच असल्याची मला दृढ जाणीव झाली आहे. त्यामुळे गुरुदक्षिणा म्हणून मी ते आपल्या चरणी अर्पण करीत आहे." असे म्हणून राजाने सनकादि मुनींना विनम्र अभिवादन केले, त्यांची षोडशोपचार पूजा केली.

राजाची पूजा स्वीकारून सनकादिमुनी आकाशमार्गाने स्वस्थानी निघून गेले. सनकादि मुनींनी केलेला बोध राजाच्या अंगी मुरल्यामुळे वैभवशाली राजप्रासादात राहूनही त्याला रजोगुणाचा कधी स्पर्शही झाला नाही. त्याला अर्चीपासून पाच पुत्र झाले. ते सर्व पित्यासारखेच सर्वगुण संपन्न होते. मैत्रेय मुनी पुढे म्हणाले, "विदुरा! पृथु राजा प्रत्येकाचा हितचिंतक होता. तो मधुर व नि:संदिग्ध भाषण करीत असे. अचूक निर्णय हे त्याचे वैशिष्ठ्य होते.

ह्या आत्मज्ञानी राजाने प्रजेच्या हृदयात प्रेमादराचे स्थान मिळवले होते.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-स्कंध चवथा

## पुष्प ५६ वे (अध्याय २३ पूर्ण व २४ चालू)

## पृथुचरित्राचे महात्म्य व प्रचेत्यांचे चरित्र

मैत्रेयमुनी पुढे सांगू लागले, "विदुरा! पृथुमहाराजांनी आपल्या अजोड पराक्रमाने दीर्घकाल राज्य केल्यावर सर्व राज्यभार आपल्या ज्येष्ठ पुत्रावर सोपवला. स्वत: आपल्या पत्नीसह "मोक्ष प्राप्तीसाठी" वनात निघून गेले. अनेक दिवस फक्त कंदमुळे खाऊन राहिले. पुढे पुढे फक्त जलपानावर राहू लागले. नंतर प्राणायामाच्या सहाय्याने संपूर्ण इंद्रिय जय प्राप्त करून घेतला. भगवत्कथांमुळे ब्रह्मचैतन्या खेरीज त्यांच्या चित्तात काहीच उरले नाही. आपला अंतकाळ जवळ आलेला पाहून त्यांनी वज्रासनात बसून प्राणाला ब्रह्मरंध्रातून अनंतात विलीन करून देह सोडून दिला.

महासाध्वी अर्ची सदैव पतीसेवेत स्वत:ला विसरून गेलेली होती. स्व शरीराविषयी जराही आस्था न ठेवता ती पृथुमहाराजांशी पूर्ण एकरूप झाली होती. त्यामुळे पृथुने देह सोडलेला पाहून तिने क्षणाचाही विलंब न लावता शांत चित्ताने शुचिर्भूत होऊन वनातच चिता रचली. चितेला अग्नी दिला व तीन प्रदक्षिणा घालून अग्निप्रवेश केला. अशा प्रकारे परमधैर्याने पतीसह सहगमन करणाऱ्या अर्चीदेवीचे पवित्र वर्तन पाहून मंगल वाद्ये वाजू लागली. फुलांचा वर्षाव होऊ लागला.

उच्चलोक ओलांडून पृथु व अर्ची उच्चतर लोकी चालेले पाहून "पृथु व अर्ची" यांची उच्चलोकातील हजारो वरदायिनी देवींनी स्तुति केली. त्या म्हणू लागल्या, " अनेक जन्मानंतर मनुष्य जन्म प्राप्त होतो. अहो मनुष्याचे आयुष्य इतके थोडे असतानाही त्यांनी विष्णुपद प्राप्त करून घेतले आहे. त्यामुळे पृथु राजा व अर्चीदेवी यांनी मनुष्य जन्म हा मोक्षप्राप्तीचे साधन असल्याचा एक मोठा आदर्श घालून दिला आहे. तेंव्हा मनुष्य जन्मात प्रत्येकाने ईश्वरभक्ती करून स्वत:च्या जन्माचे सार्थक करून घ्यावे!" मैत्रेय मुनी पुढे म्हणाले, "विदुरा! भगवद्भक्त पृथूच्या चरित्राचा प्रभाव असा आहे कीं जो कोणी श्रद्धेने त्याचे पठन, मनन करतो त्याला धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चारही पुरुषार्थाची प्राप्ती होते."

मैत्रेय मुनी पुढे सांगू लागले, "विदुरा! पृथुराजाने तपोवनात जाताना आपले राज्य विजिताश्वाला दिले. विजिताश्व अत्यंत दयाळू व न्यायी होता. त्याने आपल्या चार भावांना चार दिशांकडची चार राज्ये दिली. आपण सम्राट राजा म्हणून राज्य करू लागला. अश्व पळवून नेणाऱ्या इंद्राला विजिताश्वाने अत्रीमुनींनी आज्ञा करूनही न मारल्यामुळे इंद्र विजिताश्वावर खुश झाला होता. त्यामुळे विजिताश्वावर प्रसन्न होऊन इंद्राने त्याला अंतर्धान पावण्याची विद्या दिली होती. त्यामुळे विजिताश्वाचे दुसरे नाव अंतर्धान असेही होते.

कालांतराने विजिताश्वाचा नातू बर्हिषद् राजा झाला.ह्या बर्हिषद् राजाने एकापाठोपाठ एक असे इतके यज्ञ केले कीं सगळी भूमी पूर्वेकडे टोक केलेल्या दर्भांनी आच्छादली गेली. त्यामुळे प्रजा त्याला कौतुकाने "प्राचीनबर्ही" या नावाने संबोधू लागली. प्राचीनबर्हीची योग्यता इतकी होती कीं साक्षात् ब्रह्मदेवांनी एकदा प्रकट होऊन सागरकन्या शतद्रुतिशी विवाह करण्यास सांगितला. त्याप्रमाणे प्राचीनबर्हीने शतद्रुतिशी विवाह केला. शतद्रुति इतकी सुंदर होती कीं सप्तपदीच्या वेळी अग्नीसुद्धा तिच्यावर मोहित झाला होता. शतद्रुतिला प्राचीनबर्हीपासून दहा पुत्र झाले. ते सर्वसारखेच असल्यामुळे प्राचीनबर्हीने त्यांची नावे प्रचेता अशी ठेवली. प्राचीनबर्हीने जेंव्हा त्यांना संतती उत्पन्न करण्याची आज्ञा दिली. तेंव्हा चांगल्या संततीच्या प्राप्तीसाठी तप करण्याच्या उद्देशाने ते पश्चिम दिशेला आपल्या आजोबांच्याकडे म्हणजेच सागरांत जात असताना वाटेत भगवान शिवशंकरांनी त्यांना योगादेश-स्तोत्राचा उपदेश केला.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-स्कंध चवथा

## पुष्प ५७ वे (अध्याय २४पूर्ण)

## प्रचेत्यांना योगादेश स्तोत्राचा उपदेश

विदुरांनी कुतुहलाने विचारले, " हे ब्रम्हन्! भगवान शिवांचे दर्शन सहज सुलभ नसताना प्रत्यक्ष दर्शन देऊन प्रचेत्यांवर त्यांनी कृपा करण्याचे कारण काय घडले?"

मैत्रेय म्हणाले, " विदुरा! प्रचेत्यांचा पितृआज्ञा पालनाचा भाव शुध्द व सात्विक होता. प्रचेत्यांचा साधुभाव पूर्ण जागा झालेला होता. त्यामुळे पित्याच्या आज्ञेचे योग्यरीत्या पालन करण्याच्या प्रामाणिक इच्छेने ते हरीस्मरणात देहभाव विसरून पश्चिमेकडे निघाले होते. ते एका अतिरम्य व अतिविशाल सरोवराच्या काठावरून जात असताना त्यांना मृदुंगाचा ध्वनी ऐकू आला. म्हणून विस्मित होऊन हरिस्मरणात ते सरोवराकडे पाहू लागले. त्यांची ती भावावस्था पाहून भगवान शिव त्या सरोवरातून प्रकट झाले. तेंव्हा दहाही प्रचेत्यांनी त्यांना साष्टांग नमस्कार घातला व ते हात जोडून उभे राहिले.

त्यावेळी भक्तवत्सल शिव त्यांना म्हणाले, "प्राचीनबर्ही राजाच्या पुत्रांनो! तुमचे कल्याण असो. तुम्ही ज्या कार्यासाठी निघाला आहात त्या कार्यात यशस्वी  होण्यासाठीच मी तुम्हाला दर्शन दिले आहे. कारण प्रकृति व पुरुष यांचे नियामक श्रीवासुदेव यांना जे शरण जातात ते मला प्रिय होतात. म्हणून मी तुम्हाला एक अतिशय पवित्र व कल्याणकारी स्तोत्र सांगतो. त्याचा तुम्ही शुध्द अंत:करणाने जप करा. म्हणजे तुमचे कार्य सिद्धीस जाईल. तेच हे योगादेश स्तोत्र! (हे योगादेश स्तोत्र स्कंध ४,अध्याय २४, श्लोक ३३ ते ६८ इतके आहे त्याचा थोडक्यात भावार्थ)

"निरंतर परमानंदात स्थिर असणाऱ्या सर्वात्मक परमेश्वरा! स्वकल्याणासाठी आमचा आपणास नमस्कार असो. आपण आमच्या चित्ताचे स्वयंप्रकाश अधिष्ठाता वासुदेव, अहंकाराचे अधिष्ठाता संकर्षण, ज्ञानाचे उगमस्थान असणाऱ्या बुद्धीचे अधिष्ठाता प्रद्युम्न, इंद्रियांचे नियंते हृषीकेश, मनस्तत्त्वाचे स्वामी अनिरुद्ध व संपूर्ण विश्वात्मा सूर्य आपणच आहात. त्या आपणासआमचा नमस्कार असो. आपण पूर्ण व

अव्यय असून विराट स्वरूपाने संपूर्ण विश्व व्यापलेले आहे. त्रैलोक्याचे रक्षण कर्ते, इंद्रिये, मन व प्राण यांच्या वायुरूप शक्तीही आपणच आहात. आपणास आमचा नमस्कार असो. शब्दगुणांसह अंतर्बाह्य व्यापलेले आकाश, तेज सर्व सर्व आपणच आहात आपणास आमचा नमस्कार असो. कार्य, कारण व कर्तृत्व यांच्या अहंकाराचे रुद्र आपणच आहात. परा, पश्यंती, मध्यमा व वैखरी या चार वाणी अभिव्यक्त करणारे आपणच आहात. आपणास आमचा नमस्कार असो. संपूर्ण विश्वाला ग्रासणारी माया उत्पन्न करून आपण मात्र त्या मायेने लिप्त न होता अनुपमेय सुंदर व आजानुबाहू चतुर्भुज रुप धारण करता. त्या आपणास आमचा नमस्कार असो. आपणच महत्तत्त्व, अहंकार, पंचमहाभूते, पंचतन्मात्रा, पंचविषय, त्यांच्या विविध देवता आणि चतुर्विध प्राणीमात्र उत्पन्न करता आणि मधमाशी जसा स्वत:च उत्पन्न केलेल्या मधाचा आस्वाद घेते तद्वत आपणच इंद्रियांच्या द्वारे विषयभोग घेता. त्या अंशालाच जीव म्हणून संबोधले जाते. पण भगवन्! हाच जीव आपण दिलेल्या क्रियास्वातंत्र्याने मोहग्रस्त होतो व विषय लालसा वाढवीत राहतो. पण आपण मात्र काल रूपाने नेहमीच सावध असता. म्हणून तर काळाच्या भयाने आपले आयुष्य व्यर्थ जाऊ नये म्हणून ब्रह्मदेवांसह चौदाही मनू आपली आराधना करीत असतात. अशाप्रकारे सर्व विश्व कालभयाने व्याप्त असता सर्वथैव निर्भय असणाऱ्या व आमचे आश्रयस्थान असणाऱ्या आपणास आमचे अनेक नमस्कार आहेत."

इतके सांगून भगवान रुद्र म्हणाले, " हे राजकुमारांनो! विशुद्ध अंत:कारणाने ह्या योगादेश स्तोत्राचा जप करीत राहा. हेच योगादेश स्तोत्र ब्रह्मदेवांनी आम्हा भृग्वादी पुत्रांना उत्कृष्ट संततीसाठी सांगितले होते. याच स्तोत्राच्या पाठाने आमचे अज्ञान नाहीसे झाले आहे. जो कोणी प्रात:काळी श्रद्धापूर्वक पाठ करील तो सर्व कर्मबंधनातून मुक्त होईल.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-स्कंध चवथा

## पुष्प ५८ वे (अध्याय २५ पूर्ण)

## पुरांजनाख्यान

प्रचेते तपाचरण करण्यास निघून गेल्यावर प्राचीनबर्ही यज्ञ-यागादि कर्मकांडात मग्न झाला. त्यावेळी अध्यात्मविद्या विशारद देवर्षी नारद त्याच्याकडे आले.

प्राचीनबर्हीची कर्मासक्ती पाहून म्हणाले, " राजा! या कर्म कांडाच्या मार्गाने तूं आपले कोणते कल्याण साधणार आहेस? कारण दु:खाचा शाश्वत नाश व शाश्वत परमानंद प्राप्ती ह्याचे नाव कल्याण आहे. ते कल्याण या कर्म-कांडातून होणारच नाही!"

प्राचीनबर्ही विचार करून म्हणाला "मी हा विचारच कधी केला नव्हता. ह्या कर्मकांडालाच मी पुरुषार्थ मानीत आलो आहे. त्यामुळे आता आपणच शाश्वत सुखाचा मार्ग मला दाखवावा.

नारद म्हणाले, " राजा! तूं ह्या यज्ञांमध्ये हजारो पशू निर्दयपणे मारले आहेस. तूं मेल्यावर हेच सर्व पशू आपल्या लोहमय शिंगांनी तुला छिन्नभिन्न करण्याची वाट पाहत आहेत. तुला या संकटातून तारणारा पुरंजन राजाचा इतिहास सांगतो. पूर्वी पुरंजन नावाचा एक विख्यात राजा होऊन गेला. त्याचा अविज्ञात नावाचा एक मित्र होता. तो अति गूढ कृत्ये करीत असे. ती कृत्ये कोणालाच कळत नसत. पुढे कालांतराने पुरंजन अविज्ञाताला सोडून स्वत:च्या भोगलालसा पुऱ्या करण्यासाठी पृथ्वीवर हिंडू लागला. कर्मधर्म संयोगाने त्याला हिमालयाच्या दक्षिण शिखरावर नऊ द्वारांची एक सुंदर नगरी दिसली. राजा त्या नगरीत शिरणार इतक्यात त्याला तेथे एक सुंदर स्त्री येताना दिसली. तिच्या समवेत दहा सेवक होते. प्रत्येकजण शंभर नायिकांचा पती होता. एक पांच फण्याचा भलामोठा सर्प सर्व बाजूंनी तिचे रक्षण करीत चालला होता. त्या मदनमंजिरीला पुरंजन म्हणाला, " हे कमलनयने! तूं कोण व कुणाची कन्या आहेस? मी पराक्रमी राजा असूनही तुझ्या नेत्रकटाक्षाने चांगलाच घायाळ झालो आहे. तो शक्तिशाली कामदेव मला पीडा करू लागला आहे."

तेंव्हा ती किशोरी म्हणाली, " हे नरश्रेष्ठा आपण एकमेकांना जाणत नाही वा आपल्या माता-पित्यांची परस्परांना काही माहितीही नाही. पण हे प्रियवर हे माझ्या बरोबरचे पुरुष माझे मित्र आहेत व हा सर्प ह्या नगरीचे रक्षण करीत असतो. माझ्या भाग्याने आपण इथे आला आहत. आपल्याला माझ्या भोगाची इच्छा झाली आहे. त्या भोगाच्या पूर्तीसाठी मी माझ्या या मित्र व मैत्रिणींसह तयार आहे."

अशाप्रकारे दोघे एकमेकांना अनुकूल भाषण करून त्या नऊद्वारांच्या नगरीत वास्तव्य करू लागले. नाना प्रकारच्या उपभोगात पुरंजन शंभर वर्षे निर्वेध रमून गेला. त्या नगरीला वर सात व खाली दोन द्वारे होती. वरच्या सात द्वारांपैकी पांच द्वारे पूर्वेकडे होती. उरलेली दोन, एक दक्षिणेकडे व एक उतरेकडे होते. खालच्या बाजूची दोन्ही द्वारे पश्चिमेकडे होती. पूर्वेला शेजारी शेजारी असलेल्या 'खद्योता व आविर्मुखी' ह्या दोन द्वारातून पुरंजन 'द्युमान' नामक मित्रा बरोबर 'विभ्राजित' नामक देशात जात असे. याच द्वारांच्या पुढे असलेल्या 'नलिनी व नालिनी' या द्वारातून पुरंजन अवधूत नावाच्या मित्रा बरोबर सौरभ देशात जात असे. पूर्वेकडेच पण सगळयात पुढे असलेल्या 'मुख्य' नामक द्वारातून पुरंजन रसज्ञ व विपण या मित्रांबरोबर बहुदन व आपण या देशात जाई. दक्षिणेच्या 'पितुहू' द्वारातून दक्षिणपांचाल व उत्तरेच्या 'देवहु' द्वारातून उत्तरपांचाल या देशांना श्रुतधर मित्रा बरोबर जात असे. पश्चिमेच्या असुरी व निॠती या द्वारातून पुरंजन अनुक्रमे दुर्मद मित्रासह ग्रामक देशी व लुब्धक मित्रासह वैशस देशी जात असे.

या शिवाय राजाला निर्वाक व पेशस्कृत असे दोन अंध मित्र होते व राजा या दोन अंध मित्रांच्या सहय्याने सगळीकडे जाई व सर्व कामे करी. विषुचीन नामक सेवका बरोबर राजा अंत:पुरात स्त्री-पुत्र यांच्यामुळे होणारा 'मोह-प्रसन्नता व आनंद' या भावनांचा उपभोग घेत असे.पुढे पुढे राजा कामाधीन होऊन राणीच्या तालावर नाचू लागला. राणीने पुरांजानला आपल्या नादी लावून चांगलेच फसवले. प्रजेनेही फसवले आणि हा मूर्ख लाचार होऊन इच्छा नसतानाही पाळलेल्या माकडासारखा तिचे अनुकरण करीत राहिला.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-स्कंध चवथा

## पुष्प ५९ वे (अध्याय २६ व २७)

## पुरंजनावर राणीचा राग

एक दिवस पुरंजनाला शिकारीला जाण्याची तीव्र इच्छा झाली व राणीला न सांगताच शिकारीला निघून गेला. शिकारीला जाताना राजाने सोन्याचे चिलखत घातले. धनुष्य व अक्षय भाता घेतले. अकराव्या सेनापतीला बरोबर घेतले. भरधाव धावणाऱ्या पांच घोड्यांचा रथ घेतला. तो रथ पांच प्रकारच्या चालींनी चालणारा सात आवरणांनी युक्त होता. राजाने शिकारीचे सर्व नियम झुगारून शिकार केली. शास्त्राने घातलेल्या सर्व मर्यादा ओलांडून तो स्वैरवर्तन करू लागला. मग दमल्यावर परत आला.

आल्या आल्या स्नान केले. उंची अत्तरे लावली. मग राणीला भेटायला आला. पण राणी तिच्या दालनातल्या मंचकावर नव्हती. म्हणून अंत:पुरातल्या स्त्रियांकडे चौकशी केली. तेंव्हा त्याला कळले कीं राणी क्रोधवश होऊन तिकडे जमिनीवर पडल्या आहेत. राजा धावतच तिकडे गेला. जमिनीवर अस्ताव्यस्त पडलेल्या राणीला पाहून कळवळला! मनधरणी केली. पण ती बधली नाही. मग पाय धरले. मग मांडीवर घेतले. पण ती कशानेच बधेना तेंव्हा राजाने तिला न सांगता शिकारीला गेल्याची चूक मान्य करून क्षमा मागितली. पु

रंजनाने अशाप्रकारे क्षमा मागितल्यावर राणीने सगळे नखरे बंद केले व पूर्ववत् त्याच्याशी रममाण झाली. व आपल्या तालावर नाचवू लागली. तिच्या भोगात राजाचे तारुण्य निघून गेले. तेवढ्या अवधीत पुरंजनाला अकराशे पुत्र व एकशे दहा कन्या झाल्या. ते सगळे पुत्र पौरंजनी या नावाने प्रख्यात झाले." इतके सांगून नारद पुढे म्हणाले, " हे प्राचीनबर्हे नंतर पुरंजनाने तुझ्यासारखीच यज्ञ दीक्षा घेतली व निरनिराळ्या पशू हिंसामय घोर यज्ञ करून आयुष्यभर काम्यकर्म करीत राहिला.

पुढे वृद्धापकाळ आला. आत्मज्ञाना बद्दल अनभिज्ञ राहिला. राजा बेफिकीर राहिलेला चंडवेग नावाच्या गंधर्वाने पूर्वीच हेरले होते. तो काळाची वाट पाहत होता. हा चंडवेग महाधूर्त व पाताळयंत्री होता. त्याच्या अधिपत्याखाली तीनशे साठ महाबलवान गंधर्व होते. त्या प्रत्येकाला गोरी व सावळी अशा दोन स्त्रिया होत्या. त्या आळीपाळीने पुरंजनपुरीतील भोग विलासाची साधने हळूहळू लुटून नेत होत्या. पण चंडवेगाच्या सैनिकांनीच जेंव्हा पुरंजनपुरी लुटायला आरंभ केला तेंव्हा पांचफण्याच्या प्रजागर नागाने खूप

प्रतिकार केला. पण तो बलहीन होऊ लागला.  पुरंजन स्त्रीच्या आधीन झालेला असल्यामुळे त्याला त्याची जाणीव झाली नाही.

याच दिवसात कालाची एकुलती एक कन्या ‘जरा’ कीं जिला स्वच्छेने कोणीच स्वीकारीत नाही. एक फक्त ययातीचा पुत्र पुरूचा अपवाद सोडला तर स्वेच्छेने आजवर तरी कोणी स्वीकारल्याचे ऐकीवात नाही. ती जरा वरसंशोधन करीत साऱ्या जगात फिरत होती." इथे थोडे थांबून नारद म्हणाले "ती माझ्याकडेही आली होती. तेंव्हा मी तिची दया येऊन तिला 'भय' नामक यवन राजाकडे पाठवून दिले. तेंव्हा त्या यवन राजाने आपले खूप सारे सैनिक तिच्या बरोबर दिले आणि तिला सांगितले कीं तूं कोणालाच आवडत नाहीस म्हणून तुझा कोणीच स्वीकार करणार नाही. तेंव्हा तूं कोठून व कशी फिरतेस हे कोणाच्याच लक्षात येणार नाही. अशी मी तुझी व्यवस्था करतो. तूं भूलोकी जा व जन्माला येणाऱ्या प्रत्येकाचा भोग घे. व प्रत्येकाचा नाश कर. तुझ्या मदतीला माझे सैन्य आहेच.

हरये नमः। हरये नमः। हरये नमः।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-स्कंध चवथा

## पुष्प ६० वे (अध्याय २८)

## पुरंजनपुरीचा नाश व पुरंजनाचा पुनर्जन्म

नारदमुनी प्राचीनबर्हीला पुढे सांगू लागले, " भय नावाचा तो यवनराजा, त्याचा भाऊ प्रज्वार व कालकन्यका जरा या तिघांनी मिळून आपल्या सैन्यासह पुरंजन राजावर हल्ला चढवला. कालकन्या जरा त्याचा अनिर्बंध उपभोग घेऊ लागली. भयाचे सैन्य म्हणजे अनेक रोग त्या नगरीत थैमान घालू लागले. कालकन्या जराने राजाला दृढ आलिंगन दिल्याने तो वैभव हीन झाला. सगळे नगर छिन्नविच्छिन्न होताना दिसू लागले. पुरंजनाचे अमात्य त्याचा अनादर करू लागले. गंधर्वांनी सगळी नागरी लुटली. पुरंजनच्या पत्नीचे त्याच्यावरचे प्रेम आटून गेले.

इकडे प्रज्वाराने सगळी नागरी पेटवून दिली. पांचफ़ण्याचा नाग नगरीचे रक्षण करण्यास असमर्थ ठरला. पुरंजनचा अंतकाळ आला. पुरंजन पत्नीच्या काळजीने तिच्या विचारातच मरण पावला. ‘ अन्ते मति सा गति ।’ या उक्ती प्रमाणे तो लगेच विदर्भ नरेशाची कन्या रूपमती म्हणून जन्माला आला. पुढे पांड्य नरेश मलयध्वजाने तिच्याशी विवाह केला. मलयध्वजापासून रुपमतीला एक सुंदर कन्या व सात शूर पुत्र झाले. ते पुढे द्रविडदेशीचे राजे झाले. कन्या अगस्तीमुनींना दिली.

पुढे मलय ध्वजाने यथावकाश वानप्रस्थाश्रम स्वीकारला. त्याच्या बरोबर रुपमतीही वनात गेली. मलयध्वज श्रीकृष्णभक्तीने आत्मज्ञान प्राप्त करून घेऊन मुक्त झाला. तेंव्हा वैदर्भीला म्हणजेच रुपमतीला प्रचंड शोक झाला. ती सती जाण्यास सिध्द झाली. ही वैदर्भी पूर्व जन्मीची पुरंजन राजा होती. वैदर्भीला प्रचंड शोक करताना पाहून पुरंजन ज्याला पूर्ण विसरून गेला होता तो अविज्ञात नावाचा जुना मित्र तिथे ब्राम्हणाच्या रूपाने त्याची समजूत घालायला वैदर्भी जवळ आला. आणि म्हणाला, " हे भामिनी तूं कोण आहेस? तूं ज्याच्यासाठी शोक करतेस तो कोण आहे? मी तुझा पूर्व जन्मातला अविज्ञात नावाचा मित्र आहे. तूं पूर्व जन्मातला माझा मित्र पुरंजन आहेस. तूं मला ओळखले नाहीस कां? मित्रा अरे तूं आणि मी मानस निवासीचे हंस आहोत. आपण कोणत्याही स्थानाशिवाय राहत होतो. पण मित्रा, विषयभोगाच्या इच्छेने

ग्रसल्यावर तुला घराची गरज वाटली. मग तूं ही नवद्वाराची नगरी निवडलीस. म्हणजेच मानवी शरीर निवडलेस. पांच फाण्याचा नाग म्हणजे प्राण. नऊ द्वारे म्हणजे नऊ छिद्रे. दोन डोळे, दोन कान, दोन नाकपुड्या व एक मुख ही सात वरची द्वारे व गुदद्वार आणि मूत्रद्वार ही दोन खालची द्वारे. अशी नऊ द्वारे असलेले मानवी शरीर. पांच विषय म्हणजे पांच उपवने. पांच कर्मेंद्रिये म्हणजे पांच बाजार पेठा. स्त्री म्हणजे बुद्धी. ह्याच बुद्धीच्या आधीन होऊन मनुष्य मूळ स्वरूपाला विसरतो. त्याच बुद्धीच्या संगतीने तुला ही अशी दु:खदायक स्थिती प्राप्त झाली. नीट विचार केल्यावर तुझ्या हे लक्षात येईल कीं तूं मलयध्वजाची पत्नी नाहीस किंवा पुरंजनही नाहीस. पूर्वी तूं स्वत:ला पुरंजनीचा पती समजत होतास व आज स्वत:ला पतिव्रता स्त्री समजत आहेस. याला कारण माझी माया. मुळात तूं व मी भिन्न नाही. एकाच व्यक्तीला आपले प्रतिबिंब दिसून ती व्यक्ती दोन ठिकाणी दिसू लागते व पाण्यातले प्रतिबिंब जरी हालले तरी मुळ व्यक्तीला फरक पडत नाही. पण प्रतिबिंब ज्यामुळे प्रतीत होते ती एक उपाधी असते. तसेच विद्या व अविद्या या दोन उपाधी आहेत. त्या उपाधींमुळे आत्मा स्वत:ला जीव व परब्रह्माला ईश्वराच्या स्वरूपात पहातो. अशा प्रकारे अविज्ञाताने जेंव्हा वैदर्भीच्या रूपातील पुरंजनाला सावध केले तेंव्हा मानसहंस म्हणजे मनाची उपाधी निर्माण झालेला जीव आपल्या स्वरूपात स्थिर होऊन आत्मज्ञानी झाला. तसे हे प्राचीनबर्हे मी तुला परोक्षरूपाने आत्मज्ञानाची दिशा दाखवली आहे. कारण विश्वकर्त्या जगदीशाला अप्रत्यक्ष वर्णनच अधिक प्रिय असते.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

## ।।श्रीगुरु:शरणं।।

## श्रीमद्भागवत-स्कंध चवथा

## पुष्प ६१ वे (अध्याय २९ चालू)

## पुरंजनाच्या आख्यानाचे तात्पर्य

पुरंजनाचे आख्यान ऐकून प्राचीनबर्ही विनयाने नारदांना म्हणाला, "हे प्रभो! कर्म मोहात अडकलेल्या मला पूर्ण बोध झालेला नाही. विवेकी पुरुष ते समजू शकतील. त्यामुळे आपण मला तात्पर्य समजावून सांगा. नारद म्हणाले, " पुरंजन म्हणजे नगर निर्माण करणारा जीव. पुरंजनाने मानवी देह निवडला. अविज्ञात म्हणजे ईश्वर. बुद्धी म्हणजे पुरंजनी. दहा इंद्रिये म्हणजे बुद्धीचे दहा मित्र. इंद्रियांच्या वृत्ती म्हणजे तिच्या सख्या. पांचप्राण म्हणजे प्रजागर नावाचा नाग. नऊ द्वारे म्हणजे दोन डोळे, दोन कान, दोन नाकपुड्या, एक तोंड ही वर असलेली सात द्वारे. गुदद्वार व मूत्र द्वार ही दोन खाली असलेली नरदेहाची द्वारे. डोळे म्हणजे खद्योता व आविर्मुखी ही द्वारे व त्यांचा विषय रूप तो विभ्राजित देश. आणि चक्षुरिन्द्रिय म्हणजे द्युमान नावाचा मित्र. दोन नाकपुड्या म्हणजे नलिन व नालीन द्वारे व गंध हा सौरभ देश व घ्राणेन्द्रीय हा अवधूत नावाचा मित्र. उजवा व डावा कान म्हणजे दक्षिण व उत्तर द्वारे. उजवा कान पितुहू व डावा कान देवहू द्वारे. मित्र श्रुतधर म्हणजे श्रवणेन्द्रिय. प्रवृत्ती मार्गाचे विवरण दक्षिण पांचाल व निवृत्ती मार्गाचे विवरण म्हणजे उत्तर पांचाल हे दोन देश. मुख्या नामक द्वार म्हणजे मुख. मित्र विपण म्हणजे वागेन्द्रिय व मित्र रसविद म्हणजे रसनेन्द्रिय. आपण नावाचा देश म्हणजे वाणीचे कार्य. व बहुदन देश म्हणजे विविध अन्न. लिंग हे 'आसुरी' नावाचे पश्चिमेकाडील एक द्वार व गुदा हे 'निऋती' नामक दुसरे पश्चिम द्वार. जननेन्द्रिय म्हणजे मित्र 'दुर्मद' आणि ग्रामक देश म्हणजे स्त्रीसंग. नरक हा वैशस नावाचा देश व पायुरिन्द्रिय म्हणजे लुब्धक नावाचा मित्र. आंधळे मित्र म्हणजे हात व पाय. हृदय हे अंत:पूर व विषूची मित्र म्हणजे मन. निर्णय देणारी बुद्धी असते म्हणून तिच्या तालावर जीव नाचतो. आत्मा साक्षी असतो. दोन्ही प्रकारच्या इंद्रियांचा नायक मन हा अकरावा सेनापती महाबलवान योद्धा. शरीर हा रथ. पांच घोडे म्हणजे पंचज्ञानेंद्रिये. बुद्धी सारथी. मन लगाम. पाप पुण्य ही दोन चाके. कर्मेन्द्रियच्या पांचप्रकारच्या क्रिया म्हणजे पांच प्रकारच्या चाली. विविध विषय म्हणजे विविध पशू. आणि ते मनाला येतील तसे मनसोक्त भोगणे म्हणजे मनमानी करून केलेली शिकार. राणीचे न ऐकणे म्हणजे सद्बुद्धीचे न ऐकता इंद्रियांच्या सोयीने घेतलेला निर्णय. चंडवेग गंधर्व म्हणजे संवत्सर. ३६० दिवस म्हणजे संवत्सराधीन असलेले गंधर्व. दिवस व

रात्र या आयुष्य क्षीण करणाऱ्या त्यांच्या गोऱ्या व सावळया बायका. कालकन्या जरा म्हणजे वृद्धापकाळ. मानसिक व शारीरिक कष्ट हे यवनराजाचे सैन्य आहे.शीत व ऊष्ण हे दोन ज्वर म्हणजे प्रज्वार. स्वत: जीव हा परब्रह्म असूनही इंद्रीयधर्मासह शरीर आपले मानतो व "मी व माझे" यात अडकून जन्म-मृत्यूच्या फेऱ्यात सांपडतो. हे प्राचीनबर्हे! तूं म्हणशील मी वेदाज्ञे प्रमाणे यज्ञ करतो. तर एक लक्षात घे कीं वेद हे त्रिगुणात्मक आहेत. त्यांत सर्वच प्रकारची कर्मे आहेत. ती सर्व फळ प्रतिपादन करीत असतात. त्यामुळे मनुष्य कार्मासक्त होऊन राहतो. पण भगवान श्रीहरीच्या एकाग्रता पूर्वक केलेल्या भक्तीमुळे आत्मज्ञान प्राप्त होऊन कार्मासक्ती नष्ट होते व नैष्कर्म्य प्राप्त होते. कार्मासक्त झालेल्यांना हे मर्म समजत नाही. एक गोष्ट ध्यानात घे कीं वैदिक कर्म भौतीकाची उत्तम फळे देणारे असल्यामुळे करायला व ऐकायला फार गोड वाटतात. पण ती परमार्थाला स्पर्शही करीत नाहीत. वेदांमध्ये भगवंताचे क्रीडन सर्व देवदेवतांच्या रूपाने असते. त्या तात्पर्यरूप आत्मतत्त्वाचे ज्ञान होणे फार गरजेचे असते.राजन्! तूं स्वत:ला अहंकाराने फार मोठा यज्ञकर्ता समजू लागला आहेस! कर्म तत्त्वाचे आत्मज्ञान तुला मुळीच झालेले नाही. श्रीहरीकडे बुद्धी लागणे ही सर्व कर्माची खरी फलश्रुती आहे. त्यामुळे थोर थोरांनी सांगितलेली एक रूपक कथा मी तुला सांगतो .

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

## ।।श्रीगुरु:शरणं।।

## श्रीमद्भागवत-स्कंध चवथा

## पुष्प ६२ वे (अध्याय २९ पूर्ण)

### रूपक कथा

नारद आता कोणती रूपक कथा सांगतात ते प्राचीनबर्ही अत्यंत उत्सुकतेने ऐकू लागला. नारद सांगू लागले, " राजा! एका वाटिकेत एक हरीण आपल्या स्त्रीच्या सहवासात रममाण होऊन कोवळे कोवळे गवत खात तिच्या मागे मागे फिरत होते. त्या हरिणाच्या समोरूनच अनेक लांडगे त्याच्यावर तुटून पडण्यासाठी हपापल्यासारखे पहात होते. पण आपल्या स्त्रीत रममाण झाल्याने याचे त्यांच्याकडे लक्ष नव्हते. इतक्यात पाठीमागून एका तरबेज शिकाऱ्याने बाण मारला. पण हरीण आपल्या स्त्रीत इतके तल्लीन होते कीं आपली शिकार झाल्याचा त्याला पत्ताच लागला नाही. राजन्! अशा हरिणाचा तूं विचार कर. राजन्! या रूपकाचा अर्थ असा कीं, ते हरीण म्हणजे तूं आहेस असे समज. वाटिका म्हणजे स्वत:चे राहाण्याचे घर. वाटिकेतील स्त्री म्हणजे घरातली स्त्री समज. कोवळे गवत म्हणजे सगळे विषय. लांडगे म्हणजे दिवस, रात्र, प्रहर, घटिका, पळे, इत्यादी कालविभाग. शिकारी म्हणजे काल. पण त्याला न जुमानता जीव गृहासक्त होऊन राहतो. आजवर तूं काम्यकर्मा खेरीज काहीच केलेले नसल्यामुळे त्या काळाची तूं शिकार झाल्याचा तुला पत्ताच नाही. त्यामुळे तूं आता तरी ह्या कर्मकांडातून मन काढून हरीस्मरणात चित्तशुद्धी करून घे. व निष्काम भक्तीने आत्मज्ञान प्राप्त करून घे. म्हणजे परलोकी तुझे कल्याण होईल. "

हे विवरण ऐकून प्राचीनबर्ही नारदांना म्हणाला, " हे प्रभो! कर्ममार्गाचा उपदेश करणाऱ्या माझ्या गुरूंनी मला आत्मज्ञाना विषयी काहीच शिकवले नसल्याने मी त्यात पूर्ण अनभिज्ञ राहिलो हे खरे. पण आता सावध झालो आहे. तथापि मला त्यांनी जे ज्ञान दिले त्याप्रमाणे असे कळलेले आहे कीं कर्म करणारे स्थूल शरीर इहलोक सोडून लिंग देहाने परलोकी जाऊन भोग भोगते. आणि इथे केलेली कर्मे इथेच नाहीशी होतात. ती काही बरोबर परलोकी येत नाहीत. मग इथे घडलेल्या व नष्ट झालेल्या कर्माचे फळ परलोकी कसे भोगले जाते?"

नारद म्हणाले, " राजा! चित्त नावाचा पदार्थ इहलोकी स्थूल देहात असूनही दिसत नाही. पण ज्ञानेंद्रिये व कर्मेंद्रिये यांच्या प्रवृत्तींना प्रेरणा देणाऱ्या चित्ताचे अनुमान करता येते. त्याच प्रमाणे चित्ताच्या स्वत:च्याही काही प्रवृत्ती आढळतात. त्यांच्या अनुषंगाने पूर्वजन्मीच्या पाप-पुण्य कर्माचे अनुमान करता येते. म्हणजे असे कीं पूर्व जन्मात जी गोष्ट अनुभवलेली असेल तिचीच वासना मनात उत्पन्न होते. जे पूर्वजन्मात कधीच अनुभवलेले नसेल त्या गोष्टीची वासना उत्पन्न होत नाही.

मनुष्याच्या पुनर्जन्मा विषयी अथवा विदेहमुक्ती विषयीही मनच सांगते. त्यातही एक गोष्ट लक्षात घे कीं इंद्रियांनी अनुभवलेले पदार्थच वारंवार मना समोर येतात. पण भोग संपल्यावर नाहीसे होतात. तसेच आपण जर एखादेवेळी भगवत् चिंतनात समरसून विशुद्ध सत्वात स्थिर झालो तर त्या क्षणाला भगवत्संसर्ग झाल्याने संसार स्वप्नातून जाग येते व क्षणकाल का होईना मूळस्वरूपाचे ज्ञान होते. जसा राहू नसतानाही ग्रहणाला कारण मानला जातो तसाच संसार नसतानाही गुणांच्या संसर्गाने "मी-माझे" या भावामुळे तो प्रतीत होतो. किंवा मानला जातो. आता हा "मी व माझे" असा अभिमान म्हणजेच अहंकार. सुषुप्ती, मूर्च्छा, मृत्यू, इत्यादी ठिकाणी इंद्रियांच्या व्याकुळतेमुळे अहंकार  जरी स्पष्ट जाणवत नसला तरी तो असतच असतो. जसा अमावास्येला चंद्र दिसत नसला तरी आकाशात असतच असतो. तसा अहंकारही त्यावेळी जाणवत नसला तरी  असतच असतो. किंवा दुसऱ्या प्रकारे समजून घे कीं तारुण्यात स्पष्टपणे प्रतीत होणारी इंद्रियांची सर्व कार्ये गर्भावस्थेत अथवा बाल्यावस्थेत जरी स्पष्टपणे प्रतीत होत नसली तरी ती असतच असतात. तसेच हे 'मी' पणाचे म्हणजेच अहंकाराचे आहे. संसारात तुम्ही स्वप्ने पहाता त्या स्वप्नात अनेक पदार्थ पहाता, पण जागृतावस्थेत ते नाहीसे होतात व आपणही ते स्वप्न असल्याचे जाणतो. तसेच अहंकाराने मन:पटलावर उमटलेले संसारचित्र आत्मज्ञानाच्या जागृतीने नाहीसे होते. म्हणून संसाराला स्वप्नवत किंवा मिथ्या म्हटले आहे. याचा अर्थ इतकाच कीं मन:प्रधान लिंगशरीर हेच जीवाच्या जन्म-मृत्यूस कारण आहे. म्हणून कर्म बंधनातून सुटण्यासाठी संपूर्ण विश्व हेच परब्रह्ममय असल्याची जाणीव मनांत ठेवून मन हरीभक्तीत तल्लीन करण्याची साधना करावी.

प्राचीनबर्हीने नारदांचा उपदेश अशाप्रकारे नीट समजून घेतला. मग शांतपणे विचार करून स्वमनाने यज्ञ-याग थांबवून सर्व कर्मकांडातून व राज्य कारभारातून मन काढून घेतले. राज्य पुत्रांच्या हवाली केले व स्वत: कापिलाश्रमात आत्मज्ञान प्राप्तीसाठी निघून गेला.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

श्रीमद्भागवत-स्कंध चवथा

पुष्प ६३ वे (अध्याय ३० पूर्ण)

## प्राचेतस दक्षाचा जन्म

प्राचीनबर्हीच्या आख्यानानंतर विदुरांनी पुन्हा प्रचेत्यांचा प्रश्न विचारला.

मैत्रेय सांगू लागले, " विदुरा! प्रचेत्यांनी भगवान श्रीहरीला प्रसन्न करून घेण्यासाठी योगादेश स्तोत्राचा मन:पूर्वक जप केला. देहभान विसरून ते श्रीहरीला आळवत होते. त्यांची ती खडतर तपश्चर्या फळाला आली. भगवान श्रीहरी त्यांच्या समोर आपल्या विलोभनीय रुपात प्रकट झाले.

गंभीर आवाजात त्यांना म्हणाले, " राजकुमारांनो! तुमच्या तपाने मी इतका प्रसन्न झालो आहे कीं जो कोणी प्रत:काळी तुमचे स्मरण करील त्याचे त्याच्या भावावर आपोआप प्रेम निर्माण होईल. इतकेच नाही तर सर्व जीवांबद्दल मैत्र भाव उत्पन्न होईल. तसेच जे या रुद्र गीताने (योगादेश स्तोत्राने) सकाळ संध्याकाळ एकाग्रतेने आळवतील त्यांना मी शुद्ध बुद्धी प्रदान करीन. तुम्ही केलेल्या पितृआज्ञा पालनाने तुमची कीर्ती सर्वत्र पसरेल. तुमच्या इच्छे प्रमाणे तुम्हाला एक सुविख्यात पुत्र होईल. तो गुणांनी साक्षात ब्रह्मदेव असेल. त्याच्या संततीने तो त्रैलोक्य व्यापिल. हे राजकुमारांनो! पूर्वी कंडूऋषींना प्रम्लोचा नामक अप्सरेपासून एक कमलनयना कन्या झाली. इंद्राने प्रम्लोचाला कंडूऋषींचा तपोभंग करण्यास पाठविले होते. इंद्राचे ते काम पूर्ण झाले म्हणून नुकत्याच जन्मलेल्या कन्येला तिथे वनातच टाकून प्रम्लोचा इंद्राकडे निघून गेली. तेंव्हा त्या कन्येचे पालन पोषण वनातल्या वृक्षांनी व वृक्ष-स्वामी सोम यांनी केले. तुम्ही सर्व समान धर्मी व स्वभावी असल्यामुळे तुम्ही सर्वजण तिच्याशी विवाह करा. ती तुम्हा सर्वांवर सारखेच प्रेम करील. अपेक्षित पुत्र प्राप्तीनंतर माझ्या अविचल भक्तीमुळे तुमच्या हृदयातील वासनामळ जळून जाईल. व तुम्ही माझ्या परमपदाला प्राप्त व्हाल. सद्बुद्धीने सत्कर्म करून ते मला अर्पण करण्याने गृहस्थाश्रमी सुद्धा कर्मबंधनात अडकत नाही. तुमचे कल्याण असो."

भगवंताचे हे आशिर्वचन ऐकून प्रचेते म्हणाले, " भगवन! आपल्या स्वरूपाचे दर्शन हे सर्व दु:खांचा अंत करणारे आहे. दु:ख निर्माण करणाऱ्या अविद्या शिल्लकच रहात नाहीत. ह्यापेक्षा अधिक कृपा ती कोणती असू शकते. भगवान शिवांच्या कृपेमुळे आम्हास आपले दर्शन झाले आहे.आपणच साक्षात महेश,

विष्णू व ब्रह्मा आहात. आमचा आपणास नमस्कार आहे. तरी सुद्धा भगवान शिवांसह सर्वच जण आपली स्तुती करतात म्हणून आम्हीही आमच्या कुवती प्रमाणे प्रयत्न केला आहे."

अशा प्रकारे प्रचेत्यांनी स्तुती केल्यावर "तथास्तु" म्हणून श्रीहरी अंतर्धान पावले. भगवंताचा आशिर्वाद घेऊन प्रचेते समुद्रा बाहेर आले. पण समुद्रकिनारी शिरकाव न होण्या इतकी दाट झाडी निर्माण झाली होती. त्यांनी प्रम्लोचा कन्या मारिषाच्या प्राप्तीसाठी त्या वनात शिरण्याचा प्रयत्न केला पण वृक्षांनी तो सफल होऊ दिला नाही. म्हणून प्रचेत्यांनी आत शिरण्यासाठी आपल्या मुखातून प्रचंड अग्नी व वायू सोडला. तेंव्हा स्वत: ब्रह्मदेव सोमाला घेऊन तिथे प्रकट झाले. त्यांनी सर्व स्थिरस्थावर केले. प्रचेते व वृक्ष यांचा सलोखा करून दिला. व सोमा करवी मारीषाचे कन्यादान करवून प्रचेत्यांचा मारीषाशी विवाह लाऊन दिला.

मारीषापासून प्रचेत्यांना एक पुत्र झाला. हा पुत्र पूर्वीचा स्वायंभुव मन्वंतरातला शिवद्वेष करणारा दक्ष होता. पण पुढे त्याला पश्चात्ताप झाला. म्हणून पूर्व सर्ग नष्ट झाल्यावर श्रीहरी कृपेने प्रचेते-मारीषा यांच्या पोटी त्याला पुनर्जन्म घेता आला. तपाचरणाने हा कर्म-तत्पर व कर्म निष्णात झाला. त्यामुळे त्याचे नाव “दक्ष” असे पडले. चाक्षुष मन्वंतरात ब्रह्मदेवांनी याला प्रजापतींचा नायक या पदावर नियुक्त केले. व सृष्टीच्या रक्षणाची जबाबदारी त्याच्यावर सोपविली. याच्याच प्रजेने सर्व विश्व भरून गेले आहे.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

## ।।श्रीगुरु:शरणं।।

## श्रीमद्भागवत-स्कंध चवथा

## पुष्प ६४ वे (अध्याय ३१ पूर्ण)

## प्रचेत्यांना परमपदाचा लाभ

भगवान श्रीहरीच्या वरा प्रमाणे प्रचेत्यांनी दीर्घकाळ गृहस्थाश्रम उपभोगला. यथावकाश त्यांना भगवंताच्या वचनाचे स्मरण होऊन विवेक उत्पन्न झाला. त्यांनी लगेच आपली पत्नी मारीषा हिला आपल्या पुत्राच्या स्वाधीन केले. व स्वत: पश्चिमेकडे जाजली मुनींना ज्या ठिकाणी सिद्धी प्राप्त झाली होती त्या पवित्र ठिकाणी आले. प्रचेत्यांना आत्मज्ञानाची तीव्र ओढ निर्माण झाली. म्हणून त्यांनी आत्मविचाररुपी ब्रह्मसत्राची दीक्षा घेतली. त्यांनी प्राण, मन, वाणी व दृष्टी यांचे नियमन करून आसनजय प्राप्त करून घेतला. त्यांची साधना चालू असताना त्या ठिकाणी नारदांचे आगमन झाले. अत्यादराने त्यांची पूजा करून प्रचेते म्हणाले, " प्रभो! मोठ्या भाग्याने आपले दर्शन झाले आहे. आम्ही दीर्घकाळ संसारासक्त राहिल्यामुळे आम्हाला भगवान श्रीशिवशंकरांनी व भगवान श्रीविष्णूंनी केलेल्या उपदेशाचे विस्मरण झाले आहे. तरी आता आपण परमार्थतत्त्वाचा साक्षात्कार घडवणारे अध्यात्मज्ञान आमच्या हृदयात प्रकाशित करावे अशी आमची आपणास नम्र प्रार्थना आहे. त्यायोगे हा दुस्तर भवसागर आम्ही सहज पार करून जाऊ."

नारद म्हणाले, " हे प्रचेत्यांनो! भगवान श्रीहरीच्या निरंतर चिंतनानेच नरदेहाचे सार्थक होते. श्रीहरीच्या निरपेक्ष व अव्यभिचारी भक्तीने श्रीहरी जसा संतुष्ट होतो तसा तो यज्ञ, दान, तप, इंद्रियसामर्थ्य, अफाट बुद्धीमत्ता, प्रचंड वेदाध्ययन इत्यादी कोणत्याच गोष्टींनी संतुष्ट होत नाही. त्या त्या कर्माची फळे श्रीहरीच इतर देवतांच्या करवी देववीत असतो. पण क्षेमकल्याणाचे अंतिम ध्येय आत्मज्ञान हेच आहे. आत्मज्ञान श्रीहरीच देतात कारण तेच सर्व प्राणिमात्रांच्या अंतरात आत्मरूपाने प्रविष्ट आहेत. दिसणारे सर्व चराचर जसे पृथ्वीपासून उत्पन्न होते व पृथ्वीतच लय पावते तसे पृथ्वीसह दिसणारे व अदृश्य असे संपूर्ण चराचर एका श्रीहरीपासून उत्पन्न होते व त्याच्यातच लय पावते. श्रीहरी उत्पन्न होत नाही कीं लयही पावत नाही. तो असतच असतो. श्रीहरीच्या ठिकाणी द्रव्य, क्रिया व ज्ञान यांचा अहंकार व त्या अहंकाराने उत्पन्न होणारा भ्रम व भेद यांची सत्ता नसते. आकाश जसे कशानेच लिप्त होत नाही तसेच गुणोत्पत्ती करणारा श्रीहरी कशानेच लिप्त होत नाही. हे प्रचेत्यांनो! अंत:करण निरपेक्ष करा, अंत:करणात समदर्शन जागे ठेवा.

मिळेल त्यात संतुष्ट राहून केलेल्या अव्यभिचारी भक्तीने श्रीहरी लवकर प्रसन्न होतात. भगवंताला सर्वस्व मानणाऱ्या अनासक्त भक्तावरच भगवंत प्रेम करतात. भगवंत जरी आत्मानंदात परिपूर्ण असले तरी निरपेक्ष, निर्वैर, समदर्शनी, शांत व भगवंताचे चिंतन, मनन व ध्यास धरणाऱ्याच्या ते आधीन होतात." अशा प्रकारचा उपदेश करून नारद ब्रह्मलोकी निघून गेले.

भगवान नारदांचे बोलणे प्रमाण मानून प्रचेत्यांनी आपले मन भगवद्भक्तित अर्पण केले. यथावकाश ते भगवत्चिंतनात श्रीहरीच्या परमपदाला प्राप्त झाले. मैत्रेय मुनींनी सांगितलेले हे भगवच्चरित्र श्रवण करून विदुरांचे अंत:करणात श्रीकृष्णभक्तिचा उद्रेक झाला. त्यांचे अष्ट सात्विक भाव जागे झाले. नेत्रातून अश्रुपात होऊ लागला. त्यांनी कृतज्ञतेने मैत्रेयमुनींच्या चरणी मस्तक ठेवले. मग आत्मज्ञानाने तृप्त होऊन हरी चिंतनात मैत्रेय मुनींचा निरोप घेऊन हस्तिनापूरला निघून गेले.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

इथे श्रीमद्भागवतातला चवथा स्कंध पूर्ण झाला. या स्कंधात एकूण ३१ अध्याय व १४४५ श्लोक आहेत. त्या सर्वांचा पुष्प ४० ते पुष्प ६४ हा साररूप अनुवाद आहे

# स्कंध पाचवा

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-स्कंध पांचवा

## पुष्प ६५ वे (अध्याय १)

## प्रियव्रत चरित्र

शुकमुनी राजा परीक्षिताला म्हणाले, " राजा! स्वायंभूव मनूच्या उत्तानपाद या पुत्राच्या वंशाचे वर्णन झाले. आता दुसऱ्या पुत्राच्या म्हणजे प्रियव्रताच्या वंशाचे वर्णन ऐक.

राजन्! प्रियव्रत सर्वसंग परित्याग करून आत्मस्वरूपी लीन होण्यासाठी नारदांकडून ब्रह्मसत्राची दीक्षा घेण्याच्या तयारीत होता. स्वायंभूव मनू प्रियव्रताच्या अंगी असलेल्या पृथ्वी पालनांच्या गुणाचा विचार करून त्याला राज्य करण्यास सांगत होता. पण प्रियव्रत त्या मन:स्थितीत नव्हता. त्यावेळी गुणमय प्रपंच्याचा वाढीचा विचार करणाऱ्या ब्रह्मदेवांचे प्रियव्रताकडे लक्ष गेले. ते लगेच मरिची, अत्री इत्यादी ऋषी व चारही वेद बरोबर घेऊन सत्यलोकातून भूलोकी प्रियव्रताकडे आले. नारद व मनू तिथे होतेच.

प्रियव्रताची समजूत घालण्यासाठी आलेले ब्रह्मदेव म्हणाले, "प्रियव्रता! मी तुला सत्य सिद्धांत सांगतो. श्रीहरीची लीला अनाकलनीय आहे. श्रीहरीच्या आज्ञेचे पालन तुझा पिता, तुझे गुरु नारद, भगवान महादेव व मी सुद्धा करीत असतो. श्रीहरीची इच्छा कोणालाच व कोणत्याच उपायांनी टाळता येत नाही. इंद्रियनिग्रह करून तूं तुझे गुरु नारदांच्या कृपेने काम, क्रोधादी षड्रिपुंना आधीच जिंकलेले आहेस. म्हणून आता तूं त्या पुराण पुरुषाच्या इच्छेनुसार पृथ्वी पालन कर. नंतर यथावकाश नि:संग होऊन आत्मस्वरूपी लीन हो."

त्रैलोक्यगुरु ब्रह्मदेवांनीच असे सांगितल्यावर प्रियव्रताने त्यांना साष्टांग दंडवत घातले व त्यांची आज्ञा मान्य केली. आता प्रियव्रत महाराज निरंतर श्रीहरी स्मरणात शुद्ध अंत:करणाने श्रीहरीचे कार्य समजून समर्थपणे पृथ्वीचे राज्य करू लागले. प्रजापती विश्वकर्म्याची कन्या बर्हिष्मती हिच्याशी प्रियव्रताचा विवाह झाला. तिच्यापासून त्यांना आग्नीध्र, इध्मजिन्व्ह, यज्ञबाहू, महावीर, हिरण्यरेता, धृतपृष्ठ, सवन, मेधातिथी, वीतिहोत्र आणि कवी असे दहा सद्‌गुणी पुत्र व अकरावी ऊर्जस्वति नामक कन्या झाली. कवी, महावीर व सवन यांनी संन्यास घेतला. प्रियव्रताला दुसऱ्या पत्नीपासून उत्तम, तामस व रैवत असे तीन पुत्र झाले ते पुढे मन्वंतराधिपती झाले. प्रियव्रताने अकरा अर्बुदवर्षे राज्य केले. कन्या ऊर्जस्वतिचा विवाह

शुक्राचार्यांशी लाऊन दिला. तिलाच देवयानी नावाची कन्या झाली. भगवंताच्या नैष्ठिक व निरपेक्ष भक्तीमुळे त्याला अलौकिक सामर्थ्य प्राप्त झाले होते.

त्या सामर्थ्याच्या बळावर त्याने १.जंबूद्विप व भोवती क्षार समुद्र, २.प्लक्ष द्विप व भोवती उसाच्या रसाचा समुद्र, ३. शाल्मली द्विप व भोवती मदिरेचा समुद्र, ४. कुश द्विप व भोवती तुपाचा समुद्र, ५. क्रौंच द्वीप व त्याच्या भोवती दुधाचा समुद्र, ६. शाक द्वीप व त्याच्या भोवती दह्याचा समुद्र, ७. पुष्कर द्वीप व त्याच्या भोवती गोड्यापाण्याचा समुद्र अशी सात द्वीपे व सात समुद्र निर्माण केले. जंबू द्विपाच्या दुप्पट मोठे प्लक्ष द्वीप आहे. असे प्रत्येक द्वीप आधीच्या पेक्षा दुप्पट विस्ताराचे होते. समुद्रही तसेच वाढते होते.

प्रियव्रताने आग्नीध्रला जंबूद्विपाचा, इध्मजिन्व्हाला प्लक्ष, यज्ञबाहूला शाल्मली, हिरण्यरेताला कुश, धृतपृष्ठाला क्रौंच, मेधातिथीला शाक व वीतीहोत्राला पुष्कर असे सात पुत्रांना सात द्विपाचे अधिपती बनवले. राजन्! मनासह सहा इंद्रियांना जिंकणाऱ्या भगवद्भक्ताचा असा पुरुषार्थ प्रत्ययाला येणे ही काही मोठी आश्चर्य वाटण्या जोगी गोष्ट नाही. कारण प्रियव्रत महाराज प्रत्येक गोष्ट निरंतर हरीभक्तीत व हरीसाठीच करीत होते. अशा प्रकारे विश्व व्यवस्थापनेचे प्रचंड कार्य केल्यावर कुठे तरी थांबायलाच हवे असा विचार करून प्रियव्रत पुनश्च नारदांना शरण गेला. व नारदांच्या उपदेशाप्रमाणे हरिभक्ती करून प्रियव्रताने परमपद प्राप्त करून घेतले.

प्रियव्रत महाराजांच्या या दिव्य चरित्राचे गायन त्या काळी लोक तीन श्लोकात करीत असत. ते श्लोक असे,

"प्रियव्रतकृतं कर्म को नु कुर्याद्विनेश्वरम् । यो नेमिनिम्नैरकरोच्छायां घ्नन् सप्तवारिधिन् ।।५.१.३९।।

भूसंस्थानं कृतं येन सरिद्गिरिवनादिभिः। सीमा च भूतनिर्वृत्यै द्वीपे द्वीपे विभागशः ।।५.१.४०।।

भौमं दिव्यं मानुषं च महित्वं कर्मयोगजम् । यश्चक्रे निरयौपम्यं पुरुषानुजनप्रियः ।।५.१.४१।।

(राजा प्रियव्रताने पृथ्वीवरील अंधक्कार नष्ट करून सप्तद्वीपे व सप्त समुद्र निर्मितीचे जे लोकोत्तर कार्य केले ते करण्यास परमेश्वराखेरीज कोण समर्थ आहे?।।३९।। मर्यादांसह सप्त द्विपांची रचना करून प्रत्येक द्वीपात प्राणिमात्रांच्या सुखासाठी नद्या, पर्वत, वने, उपवने इत्यादी निर्माण करून दिले.।।४०।। ईश्वरभक्त प्रियव्रताने स्वर्ग, मृत्यू व पाताळ या लोकातील सर्व वैभव तुच्छ मानून ईश्वरभक्तित तल्लीन होऊन जीवनाचे सार्थक करून घेतले. ।।४१।।)

हरये नमः। हरये नमः। हरये नमः।

।।श्रीगुरु:शरणं।।

## श्रीमद्भागवत-स्कंध पांचवा

## पुष्प ६६ वे (अध्याय २ व ३)

# आग्नीध्र चरित्र व नाभिराजा

आग्नीध्र पित्याच्या आज्ञेचे पालन करीत जम्बुद्विपाचा कारभार पाहू लागला. आग्नीध्र पितृलोक प्राप्तीसाठी अपत्य प्राप्ती व्हावी म्हणून मंदराचल पर्वतावर एकाग्र चित्ताने ब्रह्मदेवांची आराधना करू लागला. ब्रह्मदेवांनी त्याचा हेतू जाणून पूर्वचित्ती नामक अप्सरेला त्याच्याकडे पाठवून दिले. तिच्या पायातल्या नुपूरांच्या झंकाराने आग्नीध्र समाधीतून बाहेर आला. पूर्वचित्तीची आकर्षक कमनीय आकृती व मोहक हालचाल पहातच रहिला. कामदेवाने आग्नीध्रच्या अंत:करणात केंव्हा प्रवेश केला ते आग्नीध्रला कळलेच नाही.

आग्नीध्र पूर्वचित्तीला प्रसन्न करण्याच्या हेतूने म्हणाला, "हे सुंदरी! तप करणाऱ्यांचे तप भंग करणारे हे रूप तुला कोणत्या तपामुळे प्राप्त झाले आहे हे तरी आम्हाला कळू दे. पण ते जाऊ दे! मला तर खात्रीने असे वाटते कीं ब्रह्मदेवांनीच तुला माझ्यासाठी पाठवले असले पहिजे. त्यामुळे आता मी काही तुला सोडणार नाही. कारण तुझ्यावर खिळलेले माझे डोळे आता दुसरीकडे पाहू इच्छित नाहीत. त्यामुळे हे सुंदरी तूं तुझ्या मैत्रिणींसह माझ्या बरोबर रहावेस असे मला वाटते." शुकमुनी म्हणाले, "राजन्! आग्नीध्र स्त्रियांना प्रसन्न करण्यात मोठा चतुर होता. कारण पूर्वचित्ती त्याच्या भाषणावर एकदम खुष झाली. त्याचे वाक्चातुर्य, बुद्धिमत्ता, कुल, शील, रूप, वय व ऐश्वर्य पाहून पूर्वचित्ती त्याच्यावर लुभावली गेली. त्याच्या अङ्किंत होऊन जम्बुद्विपाधिपती आग्नीध्र बरोबर अनेक वर्षे उपभोग घेत राहिली. आग्नीध्रला तिच्यापासून नाभी, किंपुरुष, हरिवर्ष, इलावृत्त, रम्यक, हिरण्मय, कुरु, भाद्राश्व आणि केतुमाल असे नऊ पुत्र झाले.

नऊ पुत्रांचा जन्म झाल्यावर आग्नीध्रची अपत्य प्राप्तिची इच्छा पूर्ण झालेली पाहून पूर्वचित्ती परत ब्रह्मदेवांच्या सेवेत रुजू झाली. आग्निध्रने आपल्या जम्बुद्विपाचे नऊ भाग करून ते नऊ मुलांमध्ये वाटून दिले. म्हणून जम्बूद्वीप नऊ खंडांचे झाले. आग्निध्रला पूर्वचित्तीचा विरह सहन झाला नाही. म्हणून त्याने वैदिकमार्गाचे अनुष्ठान करून पितृलोकाची प्राप्ती करून घेतली व पूर्वचित्ती बरोबर राहू लागला. पुढे नऊ भावांनी मेरुच्या नऊ कन्यांबरोबर विवाह केला. नाभीच्या खंडाचे नाव अजनाभ खंड असे पडले. बाकीचे

खंड त्या त्या पुत्रांच्या नावाने ओळखले जाऊ लगले. शुकमुनी पुढे सांगू लागले, " राजन्! नाभिराजाने आपली पत्नी मेरुदेवी हिच्यासह अत्यंत शुद्ध अंत:करणाने जगद्वंद्य पुत्र व्हावा म्हणून लोक कल्याणाच्या उद्देशाने यज्ञ केला. यज्ञ, दान, मंत्र इत्यादींनी प्रकट न होणारे श्रीहरी नाभी व मेरुदेवी यांच्या विशुद्ध भावाने प्रकट झाले.

त्यावेळी ऋत्विज भगवंताला म्हणाले, "हेप्रभो! आपल्या मायेचा अंत कोणालाच लागत नाही. कारण आजचेच उदाहरण पहा कीं नाभिराजा आपणास आपल्यासारखा पुत्र मागत आहे. खरे तर मागितला तर आपण मोक्षही देणारे आहात. पण आपल्याच मायेच्या प्रभावाने हा नाभिराजा आपल्यासारखा पुत्र व्हावा अशी इच्छा करीत आहे." ऋत्विजांच्या प्रार्थनेतला भाव व नाभिराजाचा निरपेक्ष भक्तीभाव पाहून श्रीहरी म्हणाले, " हे ऋत्विज हो! माझ्यासारखा पुत्र होण्याचा अत्यंत दुर्लभ वर आपण मागत आहात. कारण विश्वात माझ्यासारखा दुसरा कोणी असणे कसे संभवनीय आहे? तथापि आपल्या सारख्या सत्शील ऋत्विजांचे वचन खोटे होऊ नये म्हणून मी स्वत:च नाभिराजाच्या पोटी जन्म घेईन."

इतके सांगून शुकमुनी पुढे म्हणाले, "हे राजन्! भगवंताच्या मनात दिगंबरसाधू, तपस्वी, ज्ञानी, नैष्ठिक ब्रम्हचारी यांना त्यांच्या धर्माचे मर्म समजावून सांगावयाचे होते. म्हणूनच त्यांनी मेरुदेविच्या पोटी नभिराजाच्या घरी अवतार धारण केला."

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

## श्रीमद्भागवत-स्कंध पांचवा

## पुष्प ६७ वे (अध्याय ४ पूर्ण व ५ चालू)

### भगवान ऋषभदेव

भगवान श्रीहरींनी “वर” दिल्या प्रमाणे ते नाभिराजाची पत्नी मेरुदेवी हिच्या उदरी योग्य समयी अवतीर्ण झाले. नाभिराजाने पुत्राचे श्रेष्ठत्व जाणून ऋषभ असे नाव ठेवले. ते जसे जसे वाढू लागले तसे त्यांच्या वागण्या-बोलण्यात शांती, सत्यवचन, न्यायीवृत्ती, दया, पावित्र्य, वैराग्य, समदर्शन, निर्वैरता, निरपेक्षता, विनयशीलता, ज्ञानीपणाचे लक्षण, समयसूचकता, क्षमाशीलता, सहनशीलता, संयम, इत्यादी सर्व सद्‌गुण प्रतीत होऊ लागले. त्यामुळे ऋषभदेव वयात आल्यावर प्रजाजनांना ऋषभदेवानी राज्य करावे असे वाटू लागले.

प्रजेचे मनोगत जाणून नाभिराजाने ऋषभांना राज्याभिषेक केला व स्वत: मेरुदेविसह बद्रिकाश्रमात नर-नारायणांच्या अनुग्रहासाठी निघून गेला. प्रजाजन नाभिराजाच्या या वर्तनाचे आदराने नेहमीच गायन करीत. त्यात ते म्हणत," ज्याच्या विशुद्ध कर्माने प्रसन्न होऊन भगवान श्रीहरीच ज्याचे पुत्र झाले त्या नभिराजाच्या उदार कर्माचे अनुकरण कोण करू शकणार आहे?"

भगवान ऋषभांचे गुरुकुलातील वास्तव्य संपताच इंद्राने आपली कन्या "जयंती" त्यांना दिली. जयंतीला ऋषभांपासून शंभर पुत्र झाले. हे सर्व पुत्र आपल्या पित्याप्रमाणेच तेजस्वी होते. त्यातला सर्वात ज्येष्ठ पुत्र "भरत" इतका श्रेष्ठ निघाला कीं त्याच्या आदर्श प्रजापालनामुळे प्रजा अजनाभखंडाला "भरतखंड" म्हणू लागली. त्याच्या नंतरचे ऋषभांचे  नऊ पुत्र कुशावर्त, इलावर्त, मलय, केतूं, इंद्रस्पृक, विदर्भ व कींकट हे भारतखंडात त्यांच्या त्यांच्या नावाचे प्रदेश निर्माण करून राज्य करू लागले. कवी, हरी, अंतरीक्ष, प्रबुद्ध, पिप्पलायन,आविर्होत्र, द्रुमिल, चमस व करभाजन हे महान भागवत झाले. तेच नऊ नारायण म्हणून प्रसिद्ध आहेत.

उरलेले एक्याऐंशी पुत्र पितृआज्ञेत राहून वेदज्ञ झाले. ऋषभदेव साक्षात् ईश्वर असूनही सामान्य लोकांसारखा आचार व व्यवहार करून लोकांना कर्माचे मर्म समजून सांगत असत. आत्मानात्म विवेकात राहून संसार कसा करावा व अनर्थकारक परंपरा कशा टाळाव्यात इत्यादी धर्म रहस्य त्यांनी लोकांना समजाऊन दिले. ते स्वत: अगदी निस्पृह व परिपूर्ण असूनही त्यांनी लोकशिक्षणासाठी आदर्श संसार व राज्य कारभार केला. त्यांच्या पूर्णत्वाची साक्ष म्हणजे एकदा इंद्राला ऋषभांच्या षड्गुण ऐश्वर्याचे वैषम्य वाटून इंद्राने ऋषभांच्या राज्यात पाऊस पाडला नाही. तेंव्हा ऋषभानी आपल्या योग सामर्थ्याने सर्वत्र पर्जन्य वृष्टी केली व लोकाना सुखी केले. ऋषभदेव स्वत: अंत:करणातून अत्यंत निस्पृह, विरक्त असल्यामुळे त्यांच्या शासन काळात प्रजा इतकी निस्पृह झाली होती कीं विधिवशात् प्राप्त होणाऱ्या द्रव्य, अन्न, वस्त्र, निवारा व वस्तू इत्यादी मध्ये ते पूर्ण संतुष्ट असत. अप्राप्य वस्तूची हाव, तुलनात्मक अभिलाषा, मत्सर, द्वेष इत्यादी अवगुणांचा लवलेशही प्रजेत शिल्लक राहिला नव्हता. एकदा पृथ्वी पर्यटन करताना ऋषभदेव आपल्या पुत्रांसह ब्रह्मावर्तास आले. आपला आवडता राजा आल्याचे समजताच जनता त्यांच्या दर्शनास आली. त्यावेळी पुत्रांसह सर्व प्रजाजनांची ती एक सभाच भरली गेली. आपल्या पुत्रांची अंत:करणे स्वाधीन असून, नम्रता व प्रेम यांनी त्यांचे वर्तन सुव्यवस्थित आहे हे ज्ञात असूनही लोकशिक्षण देण्याच्या उद्देशाने ऋषभदेव त्या सभेत बोलू लागले. ते म्हणाले, "पुत्रांनो! मानवदेह मोठ्या भाग्याने प्राप्त होतो. त्याचे हरीभक्तीने सार्थक करावे. प्रजाजनहो! स्त्रीसक्त कामी लोकांच्या संगतीला नरकाचे द्वार म्हटले जाते तर परमशांत, निरपेक्ष, निस्पृह, सदाचार संपन्न, महापुरुषाच्या सेवेला मोक्षाचे द्वार म्हटले जाते. इंद्रिय तृप्तीच्या नादात मनुष्य प्रमादी होतो. त्यामुळेच जन्म-मृत्यूचा फेरा चालू राहातो. जीवाला जोपर्यंत आत्मज्ञानाची ओढ निर्माण होत नाही तो वर तो देहाला "मी" मानत राहातो व त्रितापाने पोळत राहातो. म्हणून जाणीव पूर्वक संसारासक्ती कमी कमी करीत हरिभक्ती वाढवीत न्यावी. अतत्वार्थ भाषणी मौन धरावे. कर्तव्य कर्म हरीभक्तीत करावे. हरिकथा श्रवण कराव्या . सर्वत्र भगवंताची सत्ता असल्याची जाणीव ठेवावी. श्रेष्ठत्व व कनिष्ठत्व हे व्यवहारा पुरते मर्यादित ठेवून अंत:करणातून माझ्याशी निष्कपट व्यवहार करावा. अशा प्रकारे सर्व चराचर माझे शरीर समजून निष्कामभक्तीने स्वत:चे कल्याण साधावे."

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-स्कंध पांचवा

## पुष्प ६८ वे (अध्याय ५ व ६ पूर्ण)

## भगवान ऋषभदेवांचा देहत्याग

शुकमुनी पुढे म्हणाले, "राजन्! कालांतराने योग्य समयी ऋषभदेवांनी आपला ज्येष्ठ व श्रेष्ठ पुत्र भरत याला राज्याभिषेक केला. भरत हा निष्काम भगवद्भक्ती करण्यात अत्यंत श्रेष्ठ होता. तो पृथ्वी पालन करू लागल्यावर ऋषभदेवांनी परमहंस धर्म स्वीकारला व दिगंबरावस्थेत ब्रह्मावर्ताच्या बाहेर पडले. त्यांनी पूर्ण मौन धरले. मूक बधीर असे जडवत् ते नुसते दिसेल त्या रस्त्यावरून चालत राहिले. त्यामुळे त्यांना कधी शहरे लागत तर कधी खेडी तर कधी वस्त्या तर कधी फक्त जंगल. कधी कधी काही दुष्ट लोक त्यांचा खूप छळ करीत. पण त्यांनी आपल्या मूक व बधीर अवस्थेचा कधीच भंग होऊ दिला नाही. त्यांनी शरीरावरील ममत्वच नष्ट केलेले असल्यामुळे कार्य-कारणरूप प्रपंचाचे साक्षी होऊन ते फिरत राहिले. ते सदैव प्रसन्न व हसतमुख चेहऱ्याने वावरत असत. पुढे त्यांनी अजगर वृत्ती धारण केली.

हे राजा परीक्षित! परमहंसांना त्यागाच्या आदर्शाची शिकवण देण्यासाठीच ऋषभदेवांनी अशी खडतर योगचर्या धारण केली. प्रत्यक्षात ते आत्मस्वरूप परब्रह्मच होते. सर्व सिद्धी त्यांच्या सेवेत सदैव तत्पर असत पण त्यांनी सिद्धींच्याकडे कधी ढुंकूनही पहिले नाही.

राजा परीक्षिताने आश्चर्याने विचारले " प्रभो! माझ्या अल्पमतिनुसार ज्ञानाग्नीने कर्मबीजे नष्ट होऊन आत्मस्वरूपी रममाण झालेल्या सिद्ध पुरुषाला सहजगत्या प्राप्त झालेल्या सिद्धींच्या वापराचा दोष लागत नाही असे म्हणतात. असे असताना ऋषभदेवांनी त्यांचा स्वीकार कां बरे केला नाही?"

शुक मुनी म्हणाले " राजन्! अशा महापुरुषांना कसलाच दोष लागत नाही हे जरी खरे असले तरी लोकशिक्षणाचे धोरण अंगीकारून ऋषभदेव पृथ्वी भ्रमण करीत होते. त्यामुळे कोणत्याच मोहात न अडकण्याचा त्यांनी आदर्श निर्माण केला. मनामुळेच मोह निर्माण होतो म्हणून मनाविषयी असे म्हटले आहे कीं,

न कुर्यात्कर्हिचित्सख्यं मनसि ह्यवनस्थिते । यद्विश्रम्भच्चिरात्चीर्ण चस्कन्द तप ऐश्वरम् ॥५.६.३ ||

नित्यं ददाति कामस्यच्छिद्रं तमनु येऽरस्य: | योगिन: कृतमैत्रस्य पत्युर्जायेव पुंश्चली ||५.६.४ ||

कामोमन्युर्मदोलोभ: शोकमोहभयादय: | कर्मबन्धश्च यन्मूल: स्वीकुर्यात्को नु तद्बुध: ||५.६.५.||

अर्थ:- या चंचल मनाशी कधीही मैत्री करू नये. त्याच्यावर विश्वास ठेवल्यामुळेच तर श्रेष्ठ योगी भगवान शिवांचे तप क्षीण झाले. ॥३॥ व्यभिचारिणी स्त्री जशी पतीचा विश्वासघात करते तद्वत् मनही त्याच्या काम-क्रोधादी साथीदारांना आक्रमणाची संधी देऊन योग्याचा घात करते. ॥४॥ काम-क्रोधादि भोगांचे व कर्मबंधाचे मूळ मनच आहे. मग कोणता बुद्धिमान पुरुष याच्यावर विश्वास ठेवील?||५||

म्हणून ऋषभदेव इंद्रादी लोकपालांचे भूषण असूनही आपल्या आचरणाने आपला दैवी प्रभाव झाकून ठेवला होता. लिंगदेहाच्या त्यागामुळे निराभिमान झालेले त्यांचे शरीर त्या त्यागामुळेच स्वच्छंद फिरत होते. ते योगा योगाने कोंकण, वेंकटाचल इत्यादी दक्षिण कर्नाटकात गेले. तिकडेच कुटकाचलाच्या वनांत झंझावाताच्या वेळूघर्षणात जो प्रचंड वणवा पेटला त्यातच त्यांचे शरीर भस्मीभूत झाले. राजन्! ऋषभदेवांच्या मार्गाने मनाने जाणे सुद्धा कठीण आहे. कारण योगीजन ज्या योगसिद्धींच्या प्राप्तीसाठी उत्सुक असतात व निरंतर त्याच प्रयत्नात असतात. त्या योगसिद्धी ऋषभ देवांची सेवा करण्यास तत्पर असतानाही निर्विकारपणे त्यांचा त्याग करणाऱ्या ऋषभ देवांचे अनुकरण कसे बरे करता येईल? पण राजन्! भगवान ऋषभदेवांचे हे चरित्र मनुष्याचे सर्व पाप नष्ट करणारे आहे.

राजन्! भक्तांची अनेक कामे करणारे भगवान श्रीकृष्ण भक्तांना मुक्ती देतात पण आपला भक्तियोग सहजा सहजी देत नाहीत. पण ऋषभदेवांच्या या चरित्र-रसात श्रवण, पठण, मननरुप स्नान केल्याने तोही प्राप्त होतो. त्यामुळे खऱ्याखुऱ्या कल्याणा विषयी जाणीव नसलेल्या लोकांना ज्या ऋषभदेवांनी आत्मज्ञानाचा उपदेश केला, त्या ऋषभदेवांना माझा नमस्कार असो.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-स्कंध पांचवा

## पुष्प ६९ वे (अध्याय ७ व ८)

## भरताचे चरित्र

शुकमुनी पुढे सांगू लागले, " राजन्! भारत महाराजांनी ऋषभदेवांच्या आज्ञेनुसार विश्वरुपाची कन्या पांचजनीशी विवाह केला. तिच्यापासून भरतांना सुमती, राष्ट्रभूत, सुदर्शन, आवरण व धुम्रकेतूं असे पांच सद्‌गुणी पुत्र झाले. महाराज भरत हे बहुश्रुत व अभ्यासू होते. कोणतीही गोष्ट करण्यापूर्वी त्यागोष्टीचे अभ्यासपूर्वक ज्ञान संपादन करून साधक-बाधक विचार करून मग तारतम्याने निर्णय घेण्यात ते अत्यंत कुशल प्रशासक होते. त्यांच्या न्यायी, प्रेमळ व दयाळू स्वभावामुळे ते संपूर्ण अजनाभखंडात इतके लोकप्रिय झाले कीं "अजनाभवर्षाला" लोक कौतुकाने "भरतवर्ष" म्हणू लागले. तेच नाव पुढे रूढ झाले.

‘ होता, अध्वर्यू, उद्गाता व ब्रम्हा ’ या चार ऋत्विजांच्या सहाय्याने केल्या जाणाऱ्या अग्निहोत्र, दर्शपूर्णमास, चातुर्मास्य, पशू व सोम अशा सर्व यज्ञांचे व त्यांच्या कर्माचे पूर्ण ज्ञान भरत महाराजांनी संपादन केले. मग वेदोपनिषदात प्रतिपादन केलेल्या ब्रम्हार्पणाचे महत्व समजून घेऊन सर्व यज्ञ ब्रम्हार्पण बुद्धीने करीत असत. त्यातही भरत महाराजांचे वैशिष्ठ्य असे कीं त्या त्या अनुष्ठाना-पासून प्राप्त होणारे अपूर्व फळही ते पुराणपुरुष यज्ञदेवांनाच अर्पण करीत असत.

भरतमहाराज निरंतर भगवान वासुदेवाच्या विश्वरुपाचे ध्यान करीत असत. अशा प्रकारच्या निर्दोष कर्माचरणामुळे त्यांचे अंत:करण शुद्ध झाले होते. निरंतर ध्यानाच्या साधनेने श्रीहरीच्या ठिकाणी त्यांची भक्ती उत्तरोत्तर वाढत गेली. दीर्घकाळ भगवद्भक्तित राज्य करता करता कोठे तरी थांबले पाहिजे अशा निर्णयाने राज्य आपल्या पुत्रांवर सोपवून स्वत: पुलहाश्रमात निघून गेले. अंत:करण शांत झालेल्या अवस्थेत त्यांची निष्काम भक्ती तीव्र होऊ लागली. ते स्वत:ला विसरण्याच्या परमोच्च अवस्थेत जाऊ लागले. त्रिकाळ स्नान करून पवित्रतेने भगवंताच्या आराधनेचे कडकडीत व्रत ते आचरु लागले. सूर्योदय होऊन सूर्यबिंब वर येऊ लागले कीं भरत महाराज एकाग्रचित्ताने हिरण्मयपुरुषाचे सूर्यऋचेने स्तवन करीत.

ते स्तवन असे,

"परोरज: सवितुर्जातवेदो देवस्यभर्गो मनसेदं जजान |

सुरेतसाद: पुनराविश्य चष्टे हंसं गृध्राणं नृषाद्रिङ्गिरामिम: ||५.७.१४||"

अर्थात् " भगवान सूर्याचे कर्मफलदायक तेज प्रकृतिच्याही पलीकडचे आहे. त्यांनीच संकल्पाने विश्वोत्पत्ती केली आहे. तेच सर्वान्तर्यामित्वाने सर्वत्र प्रवेश करून जीवांचे आपल्या चित्शक्तिने रक्षण करून त्यांच्या बुद्धीला प्रेरणा देतात. अशा बुद्धी प्रवर्तक तेजाला आम्ही शरण जाऊन वंदन करतो." असा त्यांचा दिनक्रम चालू होता.

पण एक दिवस भरत महाराज नित्यनैमित्तिक कर्म करून नदी किनारी प्रणवाचा जप करीत असताना एक गर्भवती हरिणी पाणी पिण्यास आली. ती पाणी पिणार इतक्यात तिला सिंहाची भयानक डरकाळी ऐकू आली. तेंव्हा तिने प्राणभयाने पैलतीर गाठण्यासाठी जी उडी मारली त्यात तिचा गर्भपात झाला व गर्भ नदीच्या प्रवाहात पडला. म्हणून भरत महाराजांनी त्या मातृहीन पाडसाला आपल्या आश्रमात आणले. भरत महाराज त्याचे संगोपन करू लागले. त्याच्या संगोपनात भरत महाराजांच्या सर्व नियमात शिथिलता येऊन हळूहळू ते खूपच कमी झाले. अशाप्रकारे मृगबालकाच्या रूपाने ओढवलेल्या प्रारब्धकर्माने भरत महाराज आपल्या कार्मानुष्ठानापासून दूर गेले. प्रारब्धकर्म म्हणण्याचे कारण असे कीं राज्यत्याग, कलत्र-पुत्र त्याग करणाऱ्या भरतमहाराजांना प्रकृतीच्या अतर्क्य घटनेमुळे हरिणी पाडसाच्या संगोपनाचे कर्म अनासक्त अवस्थेतही करावे लागले. आता त्या हरिणी पाडसात त्यांचे चित्त गुंतल्यामुळे भरतमहाराजांना आत्मस्वरूपाचा विसर पडला. त्यावेळी अटळ काळ त्यांच्या शरीरात घुसला व अंतकालीन भावनेप्रमाणे ते कलंजरपर्वतावर एका हरिणीच्या पोटी जन्मास आले. पूर्व जन्मीच्या तपामुळे त्यांची पूर्वजन्मातली स्मृती तशीच राहिली. ते एक दिवस पुन्हा पुलहाश्रमात येऊन दाखल झाले. पुलहाश्रमात शाळीग्रामतीर्थात अंग बुडवून प्रारब्ध समाप्तीची वाट पहात हरिचिंतन करू लागले.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

श्रीमद्भागवत-स्कंध पांचवा

पुष्प ७० वे (अध्याय ९)

## भरताचा ब्राम्हणकुळात जडभरत म्हणून जन्म

यथायोग्य वेळी आपल्या मृग शरीराचा त्याग करून परमभागवत भरत महाराज अंगिरस कुळातल्या एका वेदसंपन्न ब्राम्हणाच्या पोटी जन्मास आले.

त्या ब्राम्हणाला ज्येष्ठ पत्नीपासून नऊ मुले होती. ती सर्व वेदसंपन्न व कर्मकांड प्रवीण होती. त्या ब्राम्हणाला कनिष्ठ पत्नीपासून जे जुळे झाले त्यातली एक मुलगी व एक मुलगा होता. तो मुलगा म्हणजेच भरत महाराज. या ही जन्मात त्यांची स्मृती कायम होती. त्यामुळे त्यांनी स्वजनसंगतीच्या मोहाने आपला परत अध:पात होऊ नये म्हणून जाणीवपूर्वक जडमूढ स्वरूप धारण केले व सर्व संग सोडून हृदयात हरिध्यान व हरिस्मरण यात रममाण झाले. त्यांच्या तेजस्वी कांतीने व तेजस्वी चेहऱ्याने पित्याचे त्यांच्यावर अत्यंत प्रेम जडले. योग्यवेळी पित्याने त्यांचा व्रतबंध केला.

पण भरत काहीच शिकेना. तेंव्हा त्याचे वडील हताश झाले व एवढ्या तेजस्वी मुलाचे पुढे काय होणार? या काळजीने खंगले व एक दिवस अकस्मात काळाच्या आधीन झाले. भरताची आई सती गेली. त्यामुळे भरता विषयी प्रेम वाटणारे कोणी उरले नाही. भरताच्या जडमूढतेमुळे सगळे त्याला जडभरत म्हणू लागले. घरातून त्याला जे अन्न प्राप्त होई ते तो अमृतासमान मानून तृप्त होई. आत्मज्ञानामुळे तो सर्व द्वंद्वातून मुक्त झालेला होता. त्याला व्यक्तिगत सुख-दु:ख, मान-अपमान, उन-पाऊस, थंडी-वारा, शीत-उष्ण, आनंद-खेद असे काही उरले नसल्याने कमरेला एक मळके वस्त्र व गळयात कळकट झालेले जानवे एवढ्यावर तो फिरत असे. जमिनीवर झोपत असे. घरातून त्याला अति हीन वागवले जाई! शिळे-पाके, विटलेले असे कसेही अन्न त्याला दिले जाई. पण इंद्रिय तृप्ती ही त्याच्या गावीच नसल्याने व मिळेल ते ब्रम्हभावात सेवन करण्यामुळे तो चांगला धष्टपुष्ट व तेजस्वी दिसत असे. त्यामुळे त्याच्या भावांनी त्याला शेतावर वाफे करणे व राखण करण्यास ठेवले.

त्यासुमारास त्या प्रदेशातल्या एका डाकूंच्या सरदाराने पुत्रप्राप्तीसाठी भद्रकालीला नरबळी देण्यासाठी आणलेला मनुष्य शिताफीने पळून गेला. तेंव्हा त्या सरदारांच्या सेवकांनी स्वत:च्या प्राण भयाने

त्याचा कसून शोध घेतला. पण तो सापडेना. तेव्हा निराश होऊन परत येताना त्यांना जडभरत शेतात राखण करताना दिसला. त्याला एकट्याला पाहून त्या सेवकांनी त्याला पकडून भद्रकालीच्या मंदिरात आणले. मग विधिवत स्नान घालून नवी वस्त्रे नेसवून चंदनाची उटी लावली. मग चांगले जेवायला घातले व वाजत गाजत नरपशू म्हणून भद्रकाली समोर आणले. नंतर त्या डाकूंच्या पुरोहिताने नरपशूच्या रक्ताने भद्रकालीला तृप्त करण्याच्या उद्देशाने अभिमंत्रून ठेवलेली तलवार हाती घेतली.

त्यावेळी ब्रम्हभावात स्थिर असलेल्या निरपेक्ष, निर्वैर, समदर्शनी देहासक्ती सोडलेल्या ईश्वरभक्ताचा बळी देण्याच्या कुकर्माने भद्रकाली संतापली. जडभरताच्या ब्रम्हतेजामुळे तिच्यामध्ये असह्य दाह उत्पन्न झाला. ती मूर्तीफोडून बाहेर आली. तिच्या बरोबर तिचे पार्षदही बाहेर आले. तिने क्षणाचाही विलंब न लावता त्या पुरोहितावर झडप घातली आणि त्याच्याच हातातले खड्ग घेऊन त्याचाच शिरच्छेद केला. सपासप इतरही सर्वांची मस्तके धडा वेगळी केली. त्या सर्वांच्या कंठ नाळातून निघणाऱ्या उष्ण उष्ण रक्तासवाच्या प्राशनाने भद्रकाली आपल्या पार्षादांसह धुंद झाली. व त्यांच्या मास्तकांचे चेंडू करून खेळू लागली.

इतके सांगून शुकमुनी म्हणाले, "राजन्! ब्रम्हभावातल्या सत्पुरुषाचा "नरपशू" म्हणून अज्ञानाने कां होईना घात करण्याचा प्रयत्न केल्यास त्याचा परिणाम घात करणाऱ्याला भोगावाच लागतो. कारण देहावरील आसक्ती सोडून भगवंताला शरण गेलेल्या भक्ताचे रक्षण भगवंत स्वत:च आपल्या कालरूपी आयुधाच्या माध्यमातून भद्रकाली सारख्या निरनिराळया देव-देवतांकडून करीत असतो.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-स्कंध पांचवा

## पुष्प ७१ वे (अध्याय १०)

## जडभरत व राजा रहूगण यांची भेट

शुक मुनी पुढे सांगू लागले, " एकदा सिंधूसौवीर देशाचा राजा रहूगण पालखीतून जात होता. पालखी इक्षुमती नदीच्या तीरावर आली. तेंव्हा भोयांच्या जमादाराला एका भोयाची गरज वाटली. त्यामुळे तो शोधक नजरने इकडे तिकडे पाहत चालला. त्याचे लक्ष धष्टपुष्ट व मलिन वस्त्रे नेसलेल्या उघड्या अंगाच्या जडभरताकडे गेले. त्याने जडभरताला पालखी वाहण्याच्या कामास लावले. महात्मा जडभरत त्या कामासाठी योग्य नसतानाही प्रारब्धभोग समजून व तो भोगूनच संपवलाच पाहिजे या धारणेने जडभरत निमूटपणे पालखी वाहू लागला.

पालखी वाहताना आपल्या पायाखाली किडा मुंगी चिरडली जाऊ नये म्हणून तो जमीन न्याहाळीत चालत होता. त्यामुळे त्याची चाल इतर भोयांशी जुळत नव्हती. परिणामी पालखीला हिसके बसू लागले. त्या हिसक्यांनी त्रस्त होऊन राजा रहूगण दरडावून म्हणाला " अरे भोयांनो! काय हिसका हिसकीं चालवली आहे ? जरा नीट चाला!" शिक्षेच्या भयाने इतर भोई दीनवाणीने राजाला म्हणाले, "महाराज! आपल्या आज्ञे प्रमाणे इतक्यावेळ आम्ही नीट चालत होतो. पण हा नवीन भोई नुकताच कामाला लावलेला असूनही नीट चालत नाही! त्यामुळे आम्हाला त्याच्या बरोबर पालखी वाहणेही कठीण झाले आहे."

त्या भोयांचे हे दीनवाणे बोलणे ऐकून राजा रहूगण कुत्सितपणे भरताला म्हणाला, " हे बंधो! पालखीचा भार वाहून वाहून तूं बराच थकलेला दिसतोस! बऱ्याच वेळपासून तुला एकट्यालाच पालखी वाहावी लागत आहे. शिवाय तूं अशक्त व वृध्दही दिसतोस! अरेरे! मला तर फार वाईट वाटते!" राजाच्या या व अशा बऱ्याच उपरोधिक बोलण्याचा जडभरतावर आत्मानंदात असल्याने काहीच परिणाम झाला नाही.

तेंव्हा संतापून राजा रहूगण ओरडला, "काय रे! जिवंत असूनही ऐकू न येणाऱ्या मृत माणसासारखा काय चालत आहेस? अरे निर्लज्ज माणसा! सेवकाने मालकाशी उन्मत्त वर्तन केल्या बद्दल तुला जबर शिक्षा केल्या शिवाय तूं वठणीवर येणार नाहीस असे दिसते."

राजाचे हे अहंकारी बोलणे ऐकून जडभरत म्हणाले, " हे वीरवर! तूं मला उद्देशून जर हे बोलला असशील तर ते अगदी योग्य आहे. त्यात वक्रोक्ती काहीच नाही. कारण भार नावाची काही वस्तू असेल तर ती वाहून नेण्यासाठीच आहे. मार्ग म्हणून काही असेल तर तो चालण्यासाठीच आहे. अशक्त वा सशक्त हे शरीराला तुलनेत लागू पडणारे आहे. आत्म्याला नाही. स्थूलता, कृशता, आधी-व्याधी, तहान-भूक, इत्यादी सर्व धर्म देहाभिमान्याला लागू पडतात. माझ्यात त्यांचा लवलेश नाही. त्यामुळे मला ते लागू पडत नाहीत. हे वीरवर राजन्! जिवंत अथवा मृत या स्थिती कोणाला असतात तर आदी व अंत असणाऱ्या विकारी पदार्थांना! तिथे ती स्थिती नियमित असते! आता स्वामित्वाचा प्रश्न म्हणाल तर सर्वांचा स्वामी एकच आहे. तथापि आपण स्वत:ला स्वामी समजत असाल तर जिथे स्वामी व सेवक हा भाव स्थिर असेल तिथेच फक्त आज्ञापालनाचा प्रश्न निर्माण होतो. आपला व माझा अशा प्रकारचा "स्वामी-सेवक" असा भेद-बुद्धीचा भाव ह्या आत्ताच्या व्यवहारा खेरीज केंव्हाच आलेला नाही. त्यामुळे परमार्थ दृष्टीने विचार केल्यास कोण स्वामी व कोण सेवक? शिवाय आपण जो शिक्षेचा धाक दाखवला आहात, त्या बाबत महाराज! मी वेडा, उन्मत्त, मूर्ख व आपल्याच स्थितीत असणारा आहे. त्यामुळे मला शिक्षा करून आपल्या हाती काय बरे लागणार आहे? जर मी मुळातच मूर्ख व चुका करणारा असेल तर मला केलेली शिक्षा म्हणजे दळलेले पीठ पुन्हा दळण्यासारखेच नाही कां?" इतके बोलून जडभरत प्रारब्ध क्षय करण्यासाठी पुन्हा पूर्वी प्रमाणे पालखी वाहू लागला.

राजा रहूगण क्षणकाल जरी राजेपणाच्या धुंदीत 'रजो' गुणात प्रवेशला होता तरी तो तत्त्वजिज्ञासेचा श्रेष्ठ अधिकारी होता. महात्मा जडभरताच्या मुखातून अनेक योगग्रंथांनी प्रतिपादन केलेली आत्मज्ञानाची सैद्धांतिक वाक्ये ऐकून त्याचा राजमद खाडकन उतरला. त्याने पालखीतून उडी मारली व जडभरताचे चक्क पाय धरले. व म्हणाला, " महाराज! मला क्षमा करा! आपण ब्राम्हणाचे चिन्ह यज्ञोपवीत धारण केलेले आहे. पण अशा मलिन वेषाने फिरणारे आपण अवधूत तर नाही? आपल्या बोलण्यातला गुढार्थ मला समजलेला नाही. मोठ मोठ्या विचारी पुरुषांना तरी तो समजेल किंवा नाही या बद्दल मी साशंक आहे. युद्धादी कर्मामुळे होणाऱ्या श्रमांच्या अनुभवावरून मी आपणास आपण खांद्यावर घेतलेल्या पालखीचे वाहण्याचे कष्ट म्हणालो. बरे या व्यवहारात काहीच सत्य नसल्याचे आपले प्रतिपादन आहे. त्यामुळे सत्यासत्यतेच्या विचारांचा माझ्या मनात चांगलाच गोंधळ उडाला आहे. कारण असे कीं चुलीवरच्या भांड्याला खालून अग्नी लावला कीं ते भांडे तापून त्यातले तांदूळ शिजतात. या एकमेकांच्या संबंधाने होणाऱ्या क्रिया आहेत. तशाच त्या देह, इंद्रिये, मन व प्राण यांच्या संयोगातून देहधारी जीवाला सुख-दु:खादी धर्माचा अनुभव येतो. राजा जेंव्हा परमेश्वराचा सेवक म्हणून अपराध्याला दंड करतो व त्या दंडाने जर तो सुधारला नाही तर त्याचा दोष राजाला लागत नाही. त्या क्रियेला पिष्टपेषण कसे म्हणता येईल? महाराज! मी "राजा" या अभिमानाने आपल्या सारख्या श्रेष्ठ पुरुषाचा अपमान केला आहे त्या बद्दल क्षमा करून माझ्या शंकांचे समाधान करावे हि नम्र प्रार्थना आहे."

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-स्कंध पांचवा

## पुष्प ७२ वे(अध्याय ११ पूर्ण व १२ चालू)

## राजा रहूगणास जडभरताचा उपदेश

राजा रहूगणाचे सगळे बोलणे ऐकून जडभरत म्हणाले, "राजन्! तूं अज्ञानी असूनही मोठ्या पांडित्याच्या गोष्टी करीत आहेस! ज्या व्यवहाराचा तूं सत्य म्हणून स्वीकार करीत आहेस तो अध्यात्मिक दृष्टीने आत्मज्ञानी सत्य मानीत नाहीत. लौकिक व्यवहारा प्रमाणे वैदिक कृत्येही सत्य नाहीत. ज्यांना संसारासह स्वर्गादी भोग सत्य वाटतात त्यांना उपनिषदातील महावाक्ये सुद्धा तत्त्वज्ञान समजावून सांगण्यास असमर्थ आहेत. मन जो पर्यंत त्रिगुणाधीन असते तो पर्यंत जीव ज्ञानेंद्रिये व कर्मेंद्रिये यांच्या सहाय्याने शुभाशुभ कर्मे करीतच रहातो. मन हेच निरनिराळया नावांनी देव, मनुष्य इत्यादी शरीर रूप उपाधी निर्माण करते. कारण मन हे वासना, विषय, त्रिगुण, विकार, पंचमहाभूते व पंचज्ञानेंद्रिये या सोळा कलांमध्ये प्रमुख आहे. विषयासक्त मन जीवाला संसारसंकटात टाकत असते. पण तेच मन विषयहीन झाले कीं जीवाला मोक्षपद प्राप्त होते. विषयासक्त व कर्मासक्त मन पंचज्ञानेंद्रिये, पंचकर्मेंद्रिये व अहंकार या अकरा वृत्तींचा आश्रय घेऊन राहाते. पंचकर्मे, पंचतन्मात्रा व शरीर हे अकरा आधारभूत विषय मानले जातात. त्रिगुण, विषय, संस्कार, काल, कर्म व स्वभाव यांच्या विविधप्रकारच्या मिश्रणामुळे मनाच्या अकरा वृत्तींचे असंख्य भेद निर्माण होतात. पण आत्म्याच्या सत्तेमुळेच त्यांचे अस्तित्व असते. मन ही जीवाची मायामय उपाधी आहे. आत्मानात्म विवेकाने चैतन्यमय आत्मतत्त्वाचा स्वीकार केल्याशिवाय संसार बंध सुटत नाही. प्रवाह रूप वृत्ती या तशाच रहातात. पण संसारबंध मात्र सुटतो. जागृती व स्वप्न या दोन अवस्थांमध्येच त्याची जाणीव असते. सुषुप्तित ती नसते. चिन्मात्र क्षेत्रज्ञ म्हणजेच आत्मतत्त्व मनाच्या या वृत्तींना साक्षी रूपाने पहात असतो. राजा! हा क्षेत्रज्ञ जन्म-मृत्यू रहित सर्वगामी, सर्वसाक्षी, सर्वव्यापी व ब्रम्हदेवादिकांसह सर्व चराचराचा आश्रय आहे. तोच आपल्या आधीन असलेल्या मायेने चराचराचे नियंत्रण करीत असतो. त्यालाच भगवान वासुदेव असे म्हणतात. वायू जसा यच्चयावत् जीवांच्या सर्वांगी असतो तसाच बाहेरही असतो. तद्वतच भगवान वासुदेव चराचराचे प्रेरणा स्थान आहे. हरीनामस्मरणाने, भगवंताच्या अभेदभक्तीने स्वाभाविक रित्या सर्वसंगपरित्याग झाल्या शिवाय व कामक्रोधादी षड्रिपुंना जिंकल्या शिवाय आत्मतत्त्व जाणून घेता येत नाही. ते जाणून घेतल्या शिवाय मायेचा निरास होत नाही. मन जरी संसार बंधनात टाकणारे असले तरी त्याची उपेक्षा करता येत नाही. उपेक्षित मनाची शक्ती मायामय असल्याने ती अधिकच

वाढते. त्यामुळे मन जरी एक कल्पना असली तरी त्या कल्पनेचा निरास सद्‌गुरूंना शरण जाऊनच करता येतो एरव्ही नाही. राजा रहूगणाला मोठाच प्रश्न पडला म्हणून तो विनयाने म्हणाला, "हे प्रभो आपले अमृतमय भाषण मला नीट समजलेले नाही. कारण ओझे उचलण्याच्या क्रियेमुळे होणारे श्रम प्रत्यक्ष असूनही केवळ व्यवहार मूलक आहेत. व तत्त्वविचारां समोर टिकत नाहीत. म्हणजे नक्की कसे?" जडभरत म्हणाले," राजन्! देह हा पृथ्वीचा एक विकार आहे. हा विकार पालखी नावाचा दुसरा विकार आपल्या खांद्यावरून वहात आहे. पालखी नावाच्या विकारात नराधिप नामक पार्थिव विकार बसलेला आहे. तो विकार देहबुद्धीच्या वृत्तीभेदाने स्वत:ला राजा समजून गर्वाने आंधळा झाला आहे. पण हे पृथ्विपते! यात तुझे काहीच श्रेष्ठत्व सिध्द होत नाही. कारण चराचर भूते पृथ्वीपासून निर्माण होतात व पुन्हा पृथ्वितच लीन होतात. निरनिराळ्या कर्मामुळे त्यांना निरनिराळी नावे पडलेली असतात इतकेच. या शिवाय व्यवहाराचे दुसरे मूळ कोणते आहे सांग बरे? राजन्! "पृथ्वी"या शब्दाचा व्यवहारही तितकाच मिथ्या आहे. कारण पृथ्वीचे उपदानकारण सूक्ष्म परमाणू असून ती त्यातच विलीन होणार असते. परमाणू हे सुद्धा मनाच्या अज्ञानाने कल्पिलेले असतात. त्या परमाणूंच्या एकत्र येण्याच्या वृत्तीभेदानेच पृथ्विरूप कार्याची सिद्धी भासते. कार्य-अकार्य, चेतन-अचेतन, काल, कर्म, स्वभाव इत्यादी सर्व भगवंताची माया आहे असे समज. भेदाव्यातिरिक्त परिपूर्ण असलेल्या वस्तूलाच परब्रम्ह किंवा वासुदेव असे आत्मज्ञानी म्हणतात."

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-स्कंध पांचवा

## पुष्प ७३ वे (अध्याय १२ व १३ पूर्ण)

## राजा रहूगणाचे जडभरतांनी केलेले समाधान

जडभरत पुढे सांगू लागले, " राजन्! हे आत्मज्ञान तप, वेदाध्ययन, यज्ञ इत्यादीनी प्राप्त होत नाही. तर ते सत्पुरुषांना शरण गेल्याने प्राप्त होते. विषयवार्ता ज्यांच्या जवळ फिरकू शकत नाही, ज्यांचे चित्त सदैव वासुदेवात स्थिर झालेले असते अशांना सत्पुरुष म्हणतात. त्याने केलेल्या उपदेशाने जीवाला मुमुक्षत्व प्राप्त होते. राजन्! मी स्वत: पूर्वीचा राजा भरत आहे. मी ऐहिक व पारलौकिक अशा सर्वच गोष्टींवरील आसक्ती सोडून एकाग्र चित्ताने वासुदेवाची आराधना करीत असे. काया वाचा मने मी वासुदेवाला शरण गेलो होतो. पण एक दिवस अचानक जलात पडलेल्या हरिणीच्या पाडसाला वाचवण्याच्या कर्मात वृत्तीभेदाने उत्पन्न झालेल्या मोहात अडकून अंतकाळी त्या हरिणीच्या पाडसात वृत्ती राहिल्याने मी मृगयोनीत जन्माला आलो. केवळ वासुदेवाच्या भक्तीमुळे मृगयोनीतही माझी स्मृती भगवद्भक्तीसह मला प्राप्त झाली. मृगदेह सोडल्यानंतर या नरदेहातही ती स्मृती कायम राहिली आहे. तेंव्हापासून जनसंपर्काची मला धास्तीच बसली आहे. त्यामुळे नि:संग होऊन मी प्रारब्ध क्षय करीत कालक्रमणा करीत आहे. राजन्! तूं " खरे आश्रयस्थान कोणते?" असा प्रश्न विचारलास. तर खरे आश्रयस्थान सत्संग आहे. सत्संगामुळे संसारासक्ती हळू हळू क्षीण होत जाते व जीव भगवत्पदी स्थिर होतो. जडभरत पुढे म्हणाले, " हे राजा रहूगण! सत्व, रज, तम, या त्रिगुणात्मक कर्मांनी आपले कर्तव्य करणारा व द्रव्यप्राप्तीसाठी तत्पर असणारा एक व्यापारी तांडा द्रव्य लालसेने भवारण्यात येऊन पडला. त्या भवारण्यात त्याला कोणतेच सुख प्राप्त होत नाही. तांड्याचा पुढारी चांगला नसल्याने त्या भवारण्याच्या भवाटवीत सहा चोर त्याला चांगलेच लुबाडतात. तांड्याची स्वाभाविक प्रवृत्ती घर-दार, पाणी व द्रव्य यांच्याकडेच असते. त्यासाठीच तो पुढारी भवारण्यात इतस्तत: धावत असतो. कधी वावटळीमुळे धूळ उडून त्याला दिसेनासे होते . तो दिशाहीन होतो. कधी तो शुष्क नदीत शिरतो. कधी अन्न न मिळाले तर तांड्यातल्या आपल्या व्यापारी बांधवांच्याकडे भिक्षा मागतो. कधी वणव्यात सापडतो. कधी इतर हुशार व बलवान व्यापाऱ्याकडून लुबाडला जातो. तेंव्हा तो शोकाने व मोहाने निपचीत पडून राहतो. कधी मनासारख्या नातलगांच्या सहवासात घटकाभर स्वत:ला आनंद मिळवण्याचा प्रयत्न करतो. पण तो सफल होत नाही. कधी परस्त्री व परधनरुपी मधाच्या शोधांत

फिरतो. तेंव्हा तिथे असलेल्या माश्या त्याला चांगलीच पिडा करतात. त्यांच्या दंशाने तो चांगलाच होरपळतो. त्यातूनही काही मध प्राप्त झालाच तर तो इतरच कोणी तरी त्याच्याकडून जबरदस्तीने हिरावून घेतात. कधी त्याला बरे दिवस असतात तेंव्हा लोकांशी लबाडीचा व्यवहार करून त्यांच्या द्वेषाला पात्र होतो. कधी कधी भवारण्यात त्याचे सर्व धन नष्ट होते. तेंव्हा त्याच्याकडे घर-दार, अंथरूण-पांघरूण, यापैकी काहीच उरत नाही. मग दुसऱ्याकडे तो या गोष्टींची याचना करतो. त्यांच्या कडून त्याला काही मिळाले नाही तर अस्वथ होतो व परद्रव्याची हाव धरतो. अपमानित होतो. एकमेकांशी जमतही नाही पण एकमेकांशिवाय होतही नाही. आणि तशाच अवस्थेत परस्परांशी रोटी-बेटी व्यवहार करतो. पण ज्या ठिकाणाहून आपण निघालो त्या ठिकाणी कधीच परत येत नाही. हे राजा रहूगण! या मार्गाच्या अलीकडे एक मार्ग आहे पण त्या मार्गाने जाण्याचे कोणी मनात आणत नाही. मोठमोठ्या दिग्पालांना जिंकणारे वीर "ही माझी पृथ्वी आहे" असा अभिमान धरून वैरभावाने युद्ध करून मरतात. पण विष्णुपद प्राप्त करू शकत नाहीत. वेलींच्या कोवळया फांद्यांचा आश्रय त्यांना गोड वाटतो. त्या फांद्यांवर बागडणाऱ्या व अस्पष्ट वाणी उच्चारणाऱ्या मोहक पक्षांमध्ये त्यांचे मन गुंतून जाते. हंसांच्या कळपात सामील होण्याची त्याची इच्छा प्रबळ असते पण हंसाचरण न झेपण्याच्या भयाने तो वानरांच्या कळपात रममाण होतो. आणि मग संसार चक्रात फिरत राहतो. त्याला परम पुरुषार्थाचा साफ विसर पडतो. हे राजा रहूगणा! अरे तूं सुद्धा याच मार्गात भटकत आहेस. त्यामुळे हे राजेपदाचे बिरुद झुगारून दे व भगवंताच्या चरणी आत्मार्पण करून विषयासक्ती सोडून दे! मग हरीनामस्मरणरूप ज्ञान खड्गाने संसारचक्राचा भेद करून परमपद प्राप्त करून घे!" हे ऐकून राजा रहूगण जडभरतांच्या चरणावर मस्तक ठेऊन म्हणाला, " हरिनामाने शुध्द व पवित्र अंत:करण झालेल्या आपल्या सारख्या सत्पुरुषाच्या काही काळाच्या सहवासाने व अमृतमय उपदेशाने माझे अज्ञानमय कुतर्क नष्ट झाले आहेत. मी स्वत:ला फारच श्रेष्ठ व हुशार राजा समजत होतो. पण माझा तो भ्रम आपण दूर केला आहे. आपण मला ज्ञानप्रदान करून माझे कल्याण केले आहे. आपणच माझे गुरु आहात. मी आपणास शरण आलो आहे. आता आपला अनुग्रह मला प्राप्त होऊन माझ्या जीवनाचे सार्थक व्हावे ही माझी प्रार्थना आहे." राजा रहूगणाने अशी प्रार्थना केल्यावर जडभरतांनी राजाला आत्मज्ञानाचा उपदेश दिला व स्वत: प्रारब्ध क्षय करीत पृथ्वीवर भ्रमण करू लागले. हे रूपक ऐकून परीक्षितराजाने त्याचे स्पष्टीकरण विचारले.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-स्कंध पांचवा

## पुष्प ७४ वे (अध्याय १४ व १५ पूर्ण)

## रूपकात्मक संसारचक्राचे स्पष्टीकरण

परीक्षित राजाने विचारले म्हणून शुकमुनी रूपकाचे स्पष्टीकरण करू लागले, "भगवंतानी आपल्या मायेच्या प्रभावाने देहाला सर्वस्व मानणारे त्रिगुणात्मक जीव उत्पन्न केले. कर्मवासनेमुळे अनेक प्रकारचे जीव समूह उत्पन्न होतात. अशा देहधारी जीवांचा समूह म्हणजे व्यापारी तांडा. कारण देहधारी जीव पंचज्ञानेद्रीये व पंचकर्मेंद्रिये यांच्या सहाय्याने पंच विषय भोगण्यासाठीच या संसाररूप घोर अरण्यात येतात. त्याला लुटणारे सहा चोर म्हणजे श्रोत्र, त्वचा, नेत्र, जिंव्हा, नासिक व मन! ही सहा इंद्रिये म्हणजेच सहा चोर, जीवाचे पारमार्थिक धन लुटून घेतात. विवेकहीन पुढारी म्हणजे आत्मानात्म विवेक नसलेली बुद्धी. वावटळ म्हणजे तारुण्यात वाटणारे स्त्रीबद्दलचे आकर्षण. धूळ म्हणजे स्त्री अधीनतेने परमार्थ विसरणे व प्रमादी व्यवहारामुळे संकटग्रस्त होणे. शुष्क नदी म्हणजे पाखंड मार्गाचा अवलंब. कलत्र, पुत्र व इतर नातेवाइकांनी त्याच्या धनाचा केलेला अपहार म्हणजे पळवलेला मध. जेंव्हा त्याच्याकडे धनरूप मध भरपूर असतो तेंव्हा तो इतरांशी चांगला वागतोच असे नाही. मग द्वेषाला पात्र होतो. त्याची परिस्थिती बदलून जर त्याला दारिद्र्य प्राप्त झाले तर दुखावले गेलेले नातेवाईक, मित्र इत्यादी त्याचा वचपा काढतात. याप्रकारे संसारचक्राच्या भवारण्यात सुखदु:खादिंचा अनुभव घेत जीव समूह एकमेकांशी व्यवहार करीत रहातो. कालांतराने घर-दार, अंथरूण-पांघरूण असे काही राहिले नाही म्हणजे दुसऱ्याकडे हात पसरतो. हात पसरून नाही मिळाले कीं चोरी करतो. परिणामी निंदा, अपमान इत्यादी अनुभवतो पण जीवनासक्ती काही सुटत नाही. या जीवसमूहाचे वैशिष्ठ्य असे कीं द्रव्यसंबंधाने परस्परात फारसे जमत नसतानाही अगदी रोटी-बेटी व्यवहारासह सगळे व्यवहार व्यवस्थित चालू राहतात. काही आनंद काही खेद अशा प्रकारे कालक्रमणा करणारा जीव जिथून आला त्या उत्पत्तीस्थानी म्हणजे परमेश्वराशी तादात्म्य पावण्यास तयार होत नाही. कारण ते स्थान तो जाणतच नसतो. तर जाणार कसे? कारण त्या ठिकाणी फक्त निर्वैर, निरपेक्ष, समदर्शनी, शांत,व निष्काम असे भगवद्भक्तच जाऊ शकतात. विषयसुखात रमलेले लोक तिथे जाऊच शकत नाहीत. कोवळया वेली म्हणजे पुण्यकर्म! पुण्यकर्माने पुनर्जन्म मिळणारे व स्त्रियांच्या कडेवर खेळणारे

बालक म्हणजे अस्पष्ट उच्चार करणारे पक्षी. हंस म्हणजे कर्तव्यबुद्धीने धर्माचरण करणारे जीव. आणि वानर म्हणजे स्वैर विषयोपभोगासाठी धर्माचरण करणारे जीव. त्यामुळे तो पुनश्च जन्म-मृत्युच्या फेऱ्यात सांपडतो. व परत जीवसमूहाच्या म्हणजे व्यापारी तांड्याला येऊन मिळतो. इतके सगळे स्पष्टीकरण करून शुकमुनी म्हणाले, " राजन्! राजर्षि भरतांच्या मार्गाचे अन्य कोणी राजा मनाने सुद्धा अनुकरण करू शकणार नाही. कारण राजर्षि भरतांनी सोडण्यास कठीण अशा अखिल पृथ्वीच्या राज्याचा मोह मनातून काढून टाकला होता. अशा या थोर राजर्षि भरतांना सुमती नामक पुत्र झाला. तो आपल्या आजोबांच्या म्हणजे ऋषभदेवांच्या मार्गाने गेला. म्हणून त्याचा पुत्र देवद्युम्न राजा झाला. भरतापासून तेराव्या पिढीत भगवान विष्णूंच्या अंशाने  गय नावाचा एक राजा होऊन गेला. तो "महापुरुष" या संज्ञेने ओळखला जाऊ लागला, प्रजा त्याच्याबद्दल आदराने असे म्हणत असे कीं " अहो! सर्वात मोठे आश्चर्य असे कीं जो सर्व चराचराला तृप्त करतो, तो नित्यतृप्त परमात्मासुद्धा राजा गयाच्या यज्ञाने तृप्त होत असे." ह्या गयापासून पुढे दहाव्या पिढीत विरज नावाचा फार प्रसिद्ध राजा झाला. त्याला शंभर पुत्र व एक कन्या झाली. विरज राजा विषयी एक श्लोक फार प्रसिध्द आहे. प्रजा आपल्या पिढीला सांगत असे, " भगवान विष्णू जशी देवांची शोभा वाढवतात तद्वत् प्रियव्रत वंशातल्या ह्या विरज राजाने आपल्या सुयशाने ह्या लोकाची शोभा वाढवली आहे."

हरये नमः। हरये नमः। हरये नमः।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-स्कंध पांचवा

## पुष्प ७५ वे (अध्याय १६ व १७ पूर्ण)

## भुवनकोश वर्णन

राजा परीक्षित म्हणाला, " हे मुनिवर्य! प्रियव्रताच्या योगसामर्थ्यामुळे निर्माण झालेल्या सप्तद्वीपांचे म्हणजेच या विराट भुवनकोशाचे वर्णन आपण मला ऐकवा!"

शुकमुनी म्हणाले, "राजन्! भगवंताची माया अनंत व अतर्क्य आहे. ती माया ब्रम्हदेवही जाणत नाहीत. तथापि नाम, रूप, परिमाण आणि लक्षणे यांच्या द्वारे काही गोष्टी सांगतो. या भुवनकोशातला सगळयात खाली असलेला कोश म्हणजे जंबुद्वीप! याचा विस्तार एकलक्ष योजने आहे. (एक योजन म्हणजे ८ मैल) याच जम्बुद्विपात आपण रहात आहोत. प्रत्येकीं ९हजार योजने विस्तार असलेल्या ९खंडांनी जम्बूद्वीप नटलेला आहे. जम्बुद्विपाच्या मध्यभागी इलावृत्त आहे. इलावृत्त खंडाच्या नाभिस्थानी मेरु पर्वत आहे. इलावृत्ताच्या उत्तरेकडे नील पर्वत व रम्यक खंड आहे. राम्यक खंडाच्या पलीकडे श्वेत पर्वत व हिरण्मय खंड आहे. हिरण्मय खंडाच्या पलीकडे शृंगवान पर्वत व कुरु खंड आहे. इलावृत्ताच्या दक्षिणेकडे निषधपर्वत व हरीवर्ष खंड आहे. हरीवर्षाच्या नंतर हेमकुट पर्वत व किंपुरुष खंड आहे. मग हिमालय पर्वत व अजनाभ किंवा भरतखंड आहे. म्हणजे इलावृत्ताच्या दक्षिणेच्या टोकाला भरतखंड व उत्तरेच्या टोकाला कुरुखंड आहे. इलावृत्ताच्या पूर्वेला गंधमादन पर्वत व भद्राश्व खंड आहे. इलावृत्ताच्या पश्चिमेला माल्यवान पर्वत व केतुमाल खंड आहे. इलावृत्तात असलेल्या मेरु पर्वताच्या माथ्यावर मध्यभागी ब्रह्मदेवांची ब्रह्मपुरी नामक सुवर्णनगरी आहे. व आठ दिशांना आठ लोकपालांच्या आठ नगरी आहेत. ती प्रत्येक नगरी ब्रह्मपुरीच्या एक चतुर्थांश आहे. मेरु पर्वताच्या समतल माथ्याचा विस्तार ३२ हजार योजने आहे. मेरु पर्वताची उंची पायथ्यापासून माथ्यापर्यंत ८४हजार योजने आहे. मेरूपर्वताच्या पायथ्याशी मेरुला आधार देण्यासाठी मंदार, मेरुमंदार, सुपार्श्व व कुमुद असे चार दिशांना चार पर्वत आहेत. या व्यतिरिक्त मेरूच्या पायथ्याशी सभोवती कुरुंग, कुरर, कुसुम्भ, वैकंक, त्रिकुट, शिशिर, पतंग, रूचक, निबंध,शिनी, वास, कपिल, शंख, वैडूर्य, जारुधी, हंस, ऋषभ, नाग, कलंजर व नारद असे वीस पर्वत आहेत. शुकमुनी पुढे म्हणाले, " हे राजन्! बळीराजाच्या यज्ञात वामनावतारात त्रैलोक्य व्यापणाऱ्या भगवान श्रीविष्णूंच्या पायाच्या अंगठ्याचे नख

लागून ब्रम्हकटाहाची थोडी खपली उडाली. त्यामुळे बाहेरील उदकाची धार त्या विवरातून आत शिरली. त्या धारेने प्रथम भगवंताचे चरणक्षालन केले. त्यामुळे ती नित्य पुनीत राहते व इतरांना पुनीत करते. हजारो युगांच्या प्रवासानंतर ती धृवलोकी आली. तिथून आकाशमार्गातला चंद्रलोक भिजवून मग मेरूच्या माथ्यावर असलेल्या ब्रह्मदेवांच्या ब्रह्मपुरीत आली. ब्रह्मपुरीतून ती चार दिशांना प्रवाही झाली. अलकनंदा या नावाने दक्षिणेकडे असलेल्या निषध पर्वत, हरीवर्ष खंड, हेमकुट पर्वत, किंपुरुष खंड व किंपुरुष खंडातून हिमालयावर उतरते. हिमालयातून भरतखंडात येते. भरतखंडात ती गंगा या नावाने प्रसिद्ध आहे. या गंगा नदीत स्नान केल्याने अश्वमेध यज्ञाचे फळ प्राप्त होते. भरतखंड ही कर्मभूमी आहे. इतर आठ खंड या भोगभूमी आहेत. त्यांनाच भूलोकी स्वर्ग असे म्हणतात. मानवी कालगणने नुसार तेथील देवतुल्य मनुष्यांचे आयुष्य दहाहजार वर्षाचे असते. त्यांना इंद्रिय क्षीणतेची बाधा होत नाही. पुण्य संपेपर्यंत ते अविरत तरुण असतात.


हरये नमः। हरये नमः। हरये नमः।

## ।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-स्कंध पांचवा

## पुष्प ७६ वे (अध्याय १८ व १९ पूर्ण २० चालू)

## विविध खंडांचे व द्वीपांचे वर्णन




शुकमुनी पुढे म्हणाले, " राजन्! प्रियव्रतपुत्र अग्नीध्र जम्बुद्विपावर राज्य करू लागला. त्याला नऊ पुत्र झाले. जम्बुद्विपाचा भूखंड त्याने नऊ पुत्रातसारखा विभागून दिला. प्रत्येक खंडाला त्या त्या पुत्राचे नाव पडले. भद्राश्व खंडात भगवान वासुदेवांच्या हयग्रीव नामक धर्ममूर्तीची उपासना केली जाते. हरीवर्षखंडात भगवान नरसिंहरूपाने अवतीर्ण झाले असल्याने तिथे महाभक्त प्रल्हाद भगवंताची निष्काम भक्ती करीत असतो. केतुमाल खंडात भगवान कामदेवाच्या (प्रद्युम्नाच्या) रूपाने वास करित असतात. राम्यक खंडात भगवंत मत्स्यरूपाने रहातात. कारण पूर्वी मनूला जे मत्स्यरूप दाखवले होते त्याच रुपाची इथे पूजा केली जाते. उत्तरेकडील कुरु खंडात भगवान वराहरुपात प्रकट झाले म्हणून पृथ्वीदेवीसह तेथील सर्वजण वराहरूपातल्या भगवंताची उपासना करतात. किंपुरुष खंडात रामभक्त हनुमंत आपल्या किन्नरांसह प्रभुरामचंद्रांची उपासना करतात. भरतखंडात भगवान नर-नारायण यांच्या रूपाने हिमालयातल्या बद्रिकाश्रमात वास्तव्य करतात. राजन्! भरतखंडात पुष्कळ नद्या व पर्वत आहेत. त्यातील

काही प्रमुख पर्वत म्हणजे मलय, मैनाक, त्रिकुट, कोल्लक, सह्याद्री, देवगिरी, ऋष्यमूक, श्रीशैल्य, वेंकट, महेंद्र, विन्ध्य, शुक्तीमान, ऋक्षगिरी, परीयात्र, द्रोणागिरी, चित्रकूट, रैवतक, नील, कामगिरी इत्यादी अनेक पर्वत आहेत. त्यांच्याच कड्यावरून उगम पावणाऱ्या असंख्य नद्या भरतखंडात आहेत. राजन्! त्यातल्या कावेरी, वेणी, पयस्विनी, तुंगभद्रा, कृष्णा, कोयना, भीमरथी, गोदावरी, निर्विन्ध्या, पयोष्णी, तापी, रेवा, सुरसा, नर्मदा, सिंधू, चर्मण्वती, गंगा, यमुना, कौशिकीं, शरयू, सरस्वती, चंद्रभागा, ब्रह्मपुत्रा, गंडकीं, सुशोमा, शतद्रू, रोधस्वती, वितस्ता, आस्क्नी, मंदाकिनी इत्यादी काही प्रमुख नद्या आहेत. त्यांच्या नुसत्या स्मरणाने सुद्धा मनुष्याचे पाप नष्ट होते. भरतखंडात जन्माला आलेल्या मानवी जीवाला निष्काम भगवद्भक्तिने मोक्ष प्राप्ती करून घेता येते. इतर खंडात पुण्यक्षय होई पर्यंत फक्त भोग मिळू शकतो मुक्ती नाही. राजन्! जम्बुद्विपाच्या विस्तारा एवढाच क्षार समुद्र जम्बुद्विपा भोवती आहे. क्षार समुद्राच्या शेजारी दोन लक्ष विस्ताराचे प्लक्षद्वीप आहे. या द्वीपात शंभर योजने घेर असलेला सुवर्णाचा "प्लक्ष" वृक्ष असल्याने याला प्लक्ष द्वीप असे नाव पडले आहे. प्रियव्रताचा मुलगा इध्मजीन्व्ह याचा अधिपती होता. त्याला सात पुत्र झाले म्हणून त्याने याचे सात खंड पाडले. ते आपल्या मुलांना वाटून दिले. या द्विपातले लोक दिसायला देवांसारखेच आहेत. या द्वीपात सप्तजिंव्ह अग्निदेव राहतात. इथे श्रीसूर्यनारायणांची उपासना केली जाते. या प्लक्ष द्विपाच्या सभोवती दोन लक्ष योजने विस्ताराचा इक्षुरसाचा (उसाच्या रसाचा) समुद्र आहे. या द्विपाच्या उत्तरेला शाल्मली द्वीप आहे. शाल्मली द्विपाचा विस्तार चारलक्ष योजने आहे. सभोवती तेवढ्याच विस्ताराचा मदिरेचा सागर आहे. या द्वीपात शंभर योजने घेर असलेल्या खोडाचा शाल्मली वृक्ष असल्याने तेच नाव याला पडले. इथे भगवान विष्णुंच्या गरुडाचे वास्तव्य असते. या द्विपाचा पहिला अधिपती यज्ञबाहू होता. इथेही सात खंड आहेत. इथे सोमाची उपासना केली जाते. याच्या उत्तरेला सुरासागराच्या पलीकडे कुशद्वीप आहे. कुश द्विपाचा पहिला अधिपती हिरण्यरेता होता. कुशद्विपाचा विस्तार आठलक्ष योजने आहे व तेवढ्याच विस्ताराचा घृत(तूंप)सागर त्याच्या सभोवती आहे. इथे देवांनी अग्नीसारखे तेजस्वी दर्भ म्हणजे कुश उत्पन्न केले म्हणून हे कुशद्वीप झाले. इथेही सात खंड आहेत. इथे भगवान श्रीहरीची उपासना केली जाते. घृतसागराच्या पलीकडे म्हणजे उत्तरेला सोळा लक्ष योजने विस्ताराचे क्रौंचद्वीप आहे. याचा पहिला अधिपती धृतपृष्ठ होता. यालाही सात पुत्र झाले म्हणून इथेही सात खंड आहेत. इथे जलदेवतेची उपासना केली जाते. याच्या भोवती तेवढ्याच विस्ताराचा क्षीर सागर आहे. त्याच्या पलीकडे उत्तरेला बत्तीस लक्ष योजने विस्ताराचे शाकद्वीप आहे. याच्या भोवती दह्याचा सागर आहे. प्रचंड मोठ्या शाक वृक्षामुळे याला शाकद्वीप नाव पडले. इथेही सात खंड आहेत. इथे भगवान श्रीहरीच्या वायू रुपाची उपासना करतात. याच्या दधिसागराच्या पलीकडे उत्तरेला चौसष्ट लक्ष योजने विस्ताराचे पुष्कर द्वीप आहे. हे द्वीप मानसोत्तर पर्वताने दोन खंडात विभागले आहे. या मानसोत्तर पर्वतावर सूर्य रथाचे चाक फिरत असते. इथे भगवान श्रीहरीची उपासना केली जाते. हे द्वीप चौसष्ट लक्ष योजने विस्ताराच्या गोड्यापाण्याच्या सागराने व्यापलेले आहे. व त्याच्या पलीकडे लोकालोक पर्वत आहे.

हरये नमः। हरये नमः। हरये नमः।

।।श्रीगुरु:शरणं।।

## श्रीमद्भागवत-स्कंध पांचवा

## पुष्प ७७ वे (अध्याय २० व २१ पूर्ण )

# सूर्य रथ व त्याची गती

राजन्! पुष्कर द्विपाच्या सभोवती असलेल्या शुद्धोदकसागराच्या पलिकडे लोकालोक पर्वत आहे. लोकालोक पर्वत म्हणजे या पर्वताच्या आतील बाजूस सर्व लोक आहेत. त्याच्या बाहेर अलोक आहे. पर्वताच्या आतील विभागच प्रकाशित होतो. सूर्यप्रकाश पर्वतच्या पलीकडे जाऊ शकत नाही. सर्व द्वीपे व इतर लोक मिळून लोकालोक पर्वतापर्यंतचा विस्तार पन्नास कोटी योजने आहे. लोकालोक पर्वत साडेबारा कोटी योजने विस्ताराचा आहे. सूर्य हा केंद्रस्थानी आहे. सूर्यापासून लोकालोक पर्वत पंचवीस कोटी योजने दूर आहे. श्रीहरीने जेंव्हा विराटरूपाने हे ब्रम्हांड निर्माण केले तेंव्हा ते मृत होते. त्या मृत अंड्यात वैराजरूपाने जेंव्हा भगवान श्रीहारींनी प्रवेश केला तेंव्हा ते अंडे प्रकाशमान झाले. मृत अंड्यात प्रवेश केला म्हणून भगवान सूर्यनारायणांना मार्तंड असे म्हणू लागले. हिरण्मयगर्भापासून प्रकट झाले म्हणून त्यांना हिरण्यगर्भ असेही म्हणतात. हाच सर्व ज्योतिर्गणाचा अधिपती आहे. याच्या मंद, तीव्र व मध्यम अशा तीन गती असतात. या गतींना उद्गायन, दक्षिणायन व वैषुवत् असे म्हणतात. भगवान श्रीसूर्यनारायणांच्या रथाला संवत्सर नावाचे एकच चाक आहे. मेरु पर्वताच्या माथ्यावर खोचलेला वायुरूप आस सूर्य रथाच्या संवत्सर नामक चाकातून निघून ध्रुवलोकातल्या दुसऱ्या खांबाला फिरण्याच्या व्यवस्थेने वायूपाशाने बांधलेला आहे. त्यामुळे ध्रुवमंडला वरून त्या आसाच्या योगाने संपूर्ण विश्व ध्रुवमंडला भोवती फिरत असते. मानसोत्तर पर्वतावर पूर्वेला इंद्राची देवधानी नगरी आहे. दक्षिणेस यमाची संयमनी नगरी आहे. पश्चिमेस वरुणाची निम्रलोचनी नगरी आहे. उत्तरेस सोमाची विभावरी नगरी आहे. सूर्यरथाला अरुण नामक सारथ्याने उष्णिक, गायत्री, त्रिष्टुप, पंक्ती, बृहती व जगती असे सात छन्दाश्व जोडले आहेत. अरुण व सूर्य यांच्या मध्ये साठ हजार वालखिल्य ऋषी सूर्याभिमुख उभे राहून वेदमंत्रांनी भगवान श्रीसूर्यनारायणांची स्तुती करीत असतात. सूर्यरथाच्या संवत्सर नामक चाकाला मास रुपी बारा आऱ्या असून त्या आऱ्यांवर सहा ऋतुरूप धावा चढवलेल्या आहेत.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-स्कंध पांचवा

## पुष्प ७८ वे (अध्याय २२ व २३ पूर्ण )

## कालचक्र व शिशुमारचक्र

नक्षत्रयुक्त कालचक्र मेरुला व ध्रुवाला प्रदक्षिणा करीत भरभर फिरत असते. त्याच कालचक्रावर राहून फिरणाऱ्या सूर्यादी ग्रहांची गती भिन्न भिन्न असते. त्यामुळेच निरनिराळया काळी निरनिराळया नक्षत्रांच्या व राशींच्या ठिकाणी सूर्यादी ग्रह दृष्टीस पडतात. भगवान श्रीसूर्यनारायण लोक कल्याणासाठी आपल्या 'काळ'नामक रूपाचे बारा भाग करतात. सर्व जीवांचा आत्मा असणारे श्रीसूर्यनारायण स्वर्ग व भूमी यांच्या मध्यावर अंतरिक्षात फिरत असलेल्या कालचक्रावर फिरत असतात. फिरणाऱ्या कालचक्रावर फिरताना भगवान श्रीसूर्य नारायण मेषादी बारा राशींचा उपभोग घेताना काळाचे बारा भाग करतात. सूर्यानारायाणांना एक राशी भोगण्यास लागणारा कालावधी म्हणजे एक महिना. प्रत्येक महिन्यात चंद्रामुळे शुक्लपक्ष व कृष्णपक्ष असे दोन पंधरवडे निर्माण होतात. शुक्लपक्ष म्हणजे पितरांचा एक दिवस व कृष्णपक्ष म्हणजे पितरांची एक रात्र. सूर्यनारायणांच्या एका राशीतून दुसऱ्या राशीत होणाऱ्या प्रवेशाला संक्रमण म्हणतात. म्हणून तो दिवस संक्रांतीचा असतो. सूर्यनारायणांच्या मेष राशी प्रवेशापासून ते मीन राशी प्रवेशून ती पूर्ण भोगे पर्यंत जो बारा महिन्यांचा कालावधी जातो त्याला वर्ष असे म्हणतात. ही वर्षे पांच प्रकारची असतात. ज्यावर्षी शुक्ल प्रतिपदेला संक्रांत येते तेंव्हा चंद्र व सौर अशा दोन्ही महिन्यांचा आरंभ एकाच वेळी होतो तेंव्हा त्या वर्षाला संवत्सर म्हणतात. नंतरच्या वर्षाला परिवत्सर, परिवत्सरानंतर इडावत्सर, इडावत्सरानंतर अनुवत्सर व नंतर वत्सर असा क्रम आहे. चंद्र हा सूर्यापासून एक लक्ष योजने खाली असल्याने चंद्राची गती शीघ्र आहे. सूर्याचा एका वर्षाचा मार्ग तो साधारण एक महिन्यात पार करतो. सर्व जीवसमुदायाचे प्राण व जीवन चंद्रावर अवलंबून आहेत. दहा इंद्रिये, पंचमहाभूते, व मन या सोळा कलांनी युक्त असलेल्या चंद्राला मनोमय, अन्नमय व अमृतमय म्हणतात. चंद्रमंडळाच्यावर तीन लक्ष योजने अंतरावर अश्विनी ते अभिजित अशी अठ्ठावीस नक्षत्रे जोडलेली आहेत. तीही मेरुला प्रदक्षिणा करीत असतात. चंद्रमंडळाच्या वर तीन लक्ष योजने उंच शुक्र ग्रह असून हा पर्जन्य वृष्टीला पोषक आहे. हा एक एक नक्षत्र ओलांडताना पावसाला प्रतिबंध करणाऱ्या ग्रहांचा उपशम करीत जातो. चंद्राचा कल्याणकारी पुत्र

बुध हा शुक्राच्यावर दोन लक्ष योजने उंचीवर आहे. तो जर सूर्याच्या पुढे गेला तर मात्र वादळ, अतिवृष्टी वा अनावृष्टी या आपत्ती संभवतात. बुधाच्यावर दोनलक्ष योजने उंचीवर मंगळग्रह आहे. तो वक्री गेला नाही तर तीन पक्षात बारा राशी ओलांडतो. मंगळाच्या वर दोन लक्ष योजने उंचीवर गुरु अर्थात बृहस्पतीग्रह आहे. तो वक्री गेला नाही तर वर्षाला एक राशी भोगतो. हा ज्ञानी जनांना नेहमीच अनुकूल असतो. बृहस्पतीच्या वर दोन लक्ष योजने उंच शनैश्वर आहे. तो अगदी मंद गतीने जात असल्यामुळे १२ राशी भोगण्यास त्याला तीस वर्षे लागतात. शानैश्वराच्या वर अकरा लक्ष योजने उंचीवर सप्तर्षी आहेत. सप्तर्षींच्या वर तेरा लक्ष योजने उंचीवर ध्रुव लोक म्हणजेच श्री विष्णूंचे परमपद आहे. याच परमपदी उत्तानपाद राजाचा पुत्र ध्रुव राहतो. याच परमपदा भोवती सर्व विश्व लहान, मध्यम व लांब अशा वायुरूप दोराने कालचक्रावर बांधलेले असल्यामुळे घाण्याच्या बैलासारखे प्रदक्षिणा करीत फिरत असते. काही लोक या कालचक्राचे अर्थात ज्योतिषचक्राचे वर्णन भगवान वासुदेवांच्या "शिशुमार" नामक अवताराच्या रुपात करतात. म्हणून त्याला शिशुमारचक्र असे म्हणतात. भगवंताचा हा अवतार कुंडलाकार देहाचा असून खाली डोके व वर पुच्छ करून लांबवर पसरलेला आहे. पुच्छाग्रावर धृवाची कल्पना केलेली आहे. पुच्छाग्राच्या खाली प्रजापती, अग्नी, इंद्र, धर्म आहेत. कुंडलाकार म्हणजे मकराकार शरीर. त्यामुळे डाव्या व उजव्या दोन्ही बाजूच्या नक्षत्रांची संख्यासारखीच आहे. उजव्या बाजूला अभिजित नक्षत्रापासून पुनर्वसु नक्षत्रा पर्यंतची उत्तरायणाची चवदा नक्षत्रे आहेत. व डाव्या बाजूला पुष्य नक्षत्रापासून उत्तराषाढा नक्षत्रा पर्यंतची दक्षिणायानाची चवदा नक्षत्रे आहेत. पोटात आकाश गंगा आहे. छातीती सूर्यनारायण आहेत मनाच्या ठिकाणी चंद्र, नाभिस्थानी शुक्र, स्तनांवर अश्विनीकुमार, हृदयात नारायण, प्राण व अपानात बुध आणि रोमारोमात संपूर्ण तारांगण आहे. शिशुमारचक्र हे भगवान श्रीविष्णुंचे सर्वदेवमय स्वरूप आहे. त्याचे प्रात:स्नानानंतर स्मरणरूप ध्यान मनुष्याला पाप मुक्त करणारे अहे. ध्यानाचा श्लोक असा, "नमो ज्योतिर्लोकाय कालायनायानिमिषां पतये महापुरुषायाभिधीमहीति ||५.२३.८|| संपूर्ण नक्षत्रमंडळाचा आश्रय, कालचक्र स्वरूप, सर्व देवाधिपती परमात्म्याचे आम्ही ध्यान करतो.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

।।श्रीगुरु:शरणं।।

# श्रीमद्भागवत-स्कंध पांचवा

## पुष्प ७९ वे (अध्याय २४,२५ व २६ पूर्ण )

## राहू मंडल, पाताळे व अंतरिक्षातील इतर स्थाने

शुकमुनी पुढे सांगू लागले, "राजन्! सूर्यमंडलाखाली दहा हजार योजने अंतरावर राहूमंडलाचे स्थान कल्पिलेले आहे. राहू मंडलाच्या खाली दहा हजार योजने अंतरावर सिद्ध, चारण व विद्याधर यांची निवास स्थाने आहेत. त्याच्या खाली जेथपर्यंत वायू व ढग यांचा संचार होतो तेथ पर्यंतच्या अंतरिक्षात यक्ष, राक्षस, पिशाच्च, भूतगण यांचा संचार होऊ शकतो. त्या खाली शंभर योजनांवर भूलोक आहे. भूलोकाच्या खाली सप्त पाताळे आहेत. ही पाताळे म्हणजे सुध्दा एक प्रकारचे स्वर्गच आहेत. इथे विविध पाताळात दानव, दैत्य, नाग हे सर्व गृहस्थी जीवन आनंद व वैभव यांच्या सह सुखेनैव भोगत असतात. अतलात दानव रहातात, वितलात हटकेश्वर रुपात महादेव आपल्या भूतगणासह रहातात. सुतलात इंद्रालाही मिळालेले नाही असे वैभव भोगीत विरोचनपुत्र बळी रहातो. तलातलात त्रिपुराधिपति मय नावाचा दानव रहातो. महातलात तर्क्षकश्यप व कद्रू यांची प्रजा तक्षकादी सर्प रहातात. रसातलात निवातकवच वगैरे दैत्य रहातात. सर्वात खाली असलेल्या पाताळात वासुकी नाग आपल्या इतर बांधवांसह रहातो. या सप्त पातालांच्या खाली तीस हजार योजने अंतरावर भगवंताची अनंत नावाची तामस कला आहे. ही कला म्हणजे द्रष्टा व दृश्य यांना एकत्र करणारी कला आहे. अध्यात्मातल्या चतुर्व्यूह उपासनेत त्यांनाच संकर्षण म्हणतात. ध्यानाच्या माध्यमातून ते मुमुक्षुंच्या हृदयात प्रकट होतात. व अनंत काळापासून कर्मवासनांमुळे साधकाच्या अंत:करणात घट्ट झालेल्या त्रिगुणात्मक अविद्येच्या हृदयग्रंथी मोकळया करतात त्यायोगे साधकाचा अहंकार नष्ट होऊन कार्यकारणरूप प्रपंच भासत रहातो. इतके सांगून झाल्यावर परीक्षित राजाने विचारले, "प्रभो त्रिगुणात्मक कर्मवासनेची उच्च- नीच फळे कोणती?" राजन्! सत्व, रज, तम असे तीन भेद आहेत. त्यामुळे ज्याच्या त्याच्या श्रद्धेच्या फरकामुळे ह्या गतींमध्ये फरक निर्माण होतात. अविद्येमुळे मनात कामना धरून केलेल्या निषिद्ध कर्मांनी हजारो प्रकारच्या नरकयातना प्राप्त होतात. नरक संख्या जरी एकवीस सांगितली असली तरी त्यात अनेक गती आहेतच. त्या शिक्षा अथवा दंड पीडाकारक असतात. शिवाय मृत्यू

नसल्यामुळे पीडा अपरिहार्य होते. मग पाप निवृत्ती झाल्यावर त्याला पूर्व जन्मातल्या पाप पुण्यानुसार पुन्हा इहलोकी जन्म मिळतो. हे सर्व टाळण्यासाठीच निवृत्ती मार्गाचे विवरण दुसऱ्या स्कंधात केले आहे. हे भुवनकोशाचे स्थूलरूपाचे वर्णन श्रवण करून आपले तर्क न लावता श्रद्धा, भक्ती व शुद्ध अंत:कारणाने मनन करणाऱ्याला भगवंताच्या सूक्ष्मतेची अनुभूती प्राप्त होते. त्यासाठी हे स्थूलरूपाचे श्रवण करून मग हळूहळू मन सूक्ष्मात घालावे.

हरये नम:। हरये नम:। हरये नम:।

इथे श्रीमद्भागवतातला पांचवा स्कंध पूर्ण झाला. या स्कंधात एकूण २६ अध्याय व ६६८ श्लोक आहेत. त्या सर्वांचा पुष्प ६४ ते पुष्प ७९ हा साररूप अनुवाद आहे.

स्कंध सहापासून पुढील खंडांसाठी

लिहा : esahity@gmail.com

किंवा भेट द्या : www.esahity.com

# ई साहित्य प्रतिष्ठान

वाचन हा एक चांगला टाईमपास आहे. त्यात चांगला वेळ जातो. पण वाचन हा केवळ टाईमपास नाही. आणि "वेळ" हा "घालवण्या"साठी नाही. आपण वाचत असतो तेव्हा आपण घडतही असतो. पुस्तकांतले शब्द आपले छिन्नी हतोड्याचे काम चोख बजावत असतात. मनावर संस्कार होत असतात. त्यामुळे वाचन करणारा समाज आणि निव्वळ पोटार्थी समाज यांच्यात फ़रक असतो. दिसतो. जाणवतो.

त्यातूनही शब्द जर मातृभाषेतून असतील तर त्या छिन्नीला धार येते. हातोडी जोमदार होते. आणि मातृभाषा जर मराठीसारखी भरजरी, वैभवशाली आणि धारदार असेल तर मनावर होणारा परिणाम आणि संस्कार अधिकच गडद असतात. म्हणून मराठीत वाचन संस्कृती रुजवायची आहे. वाचनाची आवड जोपासायची आहे. वाचनाची वृत्ती, वाचनाचा छंद फ़ुलवायचा आहे. एकट्यादुकट्या व्यक्तीत नाही. मराठीच्या कोट्यवधी साक्षरांत मराठी वाचनाची गोडी निर्माण करणं आणि त्याचं छंदात रुपांतर करणं हे आमचं ध्येय आहे. आणि त्यासाठी माध्यम आहे इंटरनेट.

एक गोष्ट सत्य आहे. अगदी रुस्तमातला रुस्तम वाचक आपलं पहिलं पुस्तक विनामूल्य मिळवतो. कधी घरात पडलेलं. कधी शेजारून. कधी वाचनालयातून. मग जसजशी गोडी लागत जाईल तसतसं किंमतीची पर्वा न करता पुस्तक मिळवून वाचायला लागतो. पण ही गोडी पेरावी, रुजवावी, जोपासावी लागते. म्हणून आम्ही विनामूल्य पुस्तकं दर आठवड्याला निर्माण करून पाठवत असतो. या अभियानात आम्हाला लेखकांचं खुप पाठबळ आहे. अनेक चांगले चांगले लेखक आपली उत्तम दर्जाची पुस्तकं आम्हाला विनामूल्य उपलब्ध करून देतात. म्हणून तर आम्ही आपल्याला उत्कृष्ट पुस्तकं विनामूल्य देऊ शकतो. विनामूल्य आहे म्हणून काहिही साधंसुधं देत नाही. बाजारात पैसे देऊनही मिळणार नाहीत अशी भारी पुस्तकं आम्ही विनामूल्य देऊ शकतो ती केवळ आमच्या लेखकांच्या कृपेने.

ई साहित्य प्रतिष्ठान हे व्यासपीठ नवीन साहित्यिकांसाठी आणि वाचकांसाठी ई पुस्तकांचे दालन घेऊन उभे ठाकले आहे. लाखो वाचकांपर्यंत ही पुस्तके विनामूल्य वितरीत करायला सुरूवात केली आहे. चार वर्षांपुर्वी स्थापन झालेल्या ई साहित्य प्रतिष्ठानने आजवर आपल्या वाचकांना सुमारे चारशे, दर्जेदार, मराठी ई पुस्तके विनामूल्य दिली आहेत. चारशे नवीन साहित्यिकांना या व्यासपीठावरून सादर केले. इंटरनेटवर मराठी भाषेतील साहित्य लोकप्रिय करण्याची चळवळ हिरिरीने पुढे नेली. कविता, कथा कादंबऱ्या आणि गंभीर विषयांवरची पुस्तके प्रकाशित केली. दोन लाख रसिकांपर्यंत हे दर्जेदार साहित्य विनामूल्य पोचवले. चारशे गुणिले दोन लाख म्हणजे आठ कोटी पुस्तके ई साहित्य प्रतिष्ठान तर्फ़े वितरित झाली असे म्हणता येईल. तसे पाहिले तर हे एक भव्य काम सुरू आहे. नव्या प्रतिभा, नवे लेखक, नवीन निर्मिती. मराठीत एक नवा अध्याय लिहिला जात आहे.

आता आम्हाला वाचकांचं पाठबळ हवंय. ज्यांना पुस्तकं वाचायला आवडतात त्यांचे ई मेल पत्ते पाठवाच. पण जे साक्षर असून, मराठी असून काहीच वाचत नाहीत, किंवा 'मराठी' वाचत नाहीत अशांचे मेल पत्ते आवर्जून पाठवा. अशा दहा लोकांपैकी एकाला जरी मराठी वाचनाची आवड लावण्यात आपण यशस्वी झालो तरी ते एक पुढचे पाऊल असणार आहे. म्हणून ही कळकळीची विनंती आहे की आपल्या आजूबाजूच्या दहा किंवा अधिक मराठी साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला द्या. या पत्त्यांचा वापर फ़क्त आणि फ़क्त मराठी पुस्तके पाठवण्यासाठी केला जाईल. त्याचबरोबर दहा किंवा अधिक पत्ते पाठवणाऱ्यांना ई साहित्य प्रतिष्ठानचे VIP सभासद म्हणून नोंदले जाईल. ही सेवा पूर्णपणे निःशुल्क आहे.

आपल्या पत्राची वाट पहात आहोत.

धन्यवाद

आपले नम्र

टीम ई साहित्य प्रतिष्ठान

श्रीकृष्णार्पणमस्तु